**दिल्ली, नवराष्ट्र ब्यूरो.** अर्थसंकल्पापूर्वी गुरुवारी संसदेत आर्थिक पाहणी अहवाल सादर करण्यात आला. यात गेल्या वर्षातील भारताच्या आर्थिक कामगिरीचा आढावा देण्यात आला आहे, ज्यामध्ये जीडीपी वाढीचा अंदाज आणि महागाईचा समावेश आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी संसदीय अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाल्यानंतर लोकसभेत २०२५-२६ चा आर्थिक पाहणी अहवाल सादर केला. मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांच्या देखरेखीखाली आर्थिक व्यवहार विभागाच्या आर्थिक विभागाने हा अहवाल तयार केला आहे. २०२७ च्या आर्थिक वर्षात भारताच्या जीडीपी वाढीचा उच्च दर अंदाजे ७.२% आहे आणि निम्न दर अंदाजे ६.८% आहे. जीडीपी वाढीमागे मजबूत देशांतर्गत मागणी हा एक प्रमुख घटक मानला जातो. पहिल्यांदाच, आर्थिक सर्वेक्षणात एआयवरील एक स्वतंत्र प्रकरण समाविष्ट आहे, जे सूचित करते की, येत्या काळात सरकार नवीन तंत्रज्ञानावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करेल. भारताच्या आर्थिक सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये जागतिक अनिश्चिततेमुळे देशांतर्गत मागणीमुळे २०२६ च्या पहिल्या आर्थिक वर्षात ७.४% वाढीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यात पायाभूत सुविधांचा विस्तार, वित्तीय सावधगिरी आणि लवचिकतेसाठी सुधारणांवर भर देण्यात आला आहे.



### पाहणी अहवालात विशेष काय?

- यावर्षी, आर्थिक सर्वेक्षणात एकूण १६ प्रकरणे आहेत
- एआयला एक स्वतंत्र प्रकरण समर्पित करण्यात आले आहे
- आर्थिक वर्ष २७ साठी जीडीपी वाढीचा वरचा श्रेणी अंदाज ७.२ टक्के आहे आणि खालचा श्रेणी अंदाज ६.८ टक्के आहे
- आर्थिक सर्वेक्षणात सोने आणि चांदीचा विशेष उल्लेख
- आर्थिक वर्ष २६ साठी भारताचा विकास दर ७% पेक्षा जास्त आहे. क्षमता ७% पर्यंत वाढली आहे. यूएस टॅरिफ असूनही मजबूत कामगिरी अपेक्षित आहे
- जीडीपीच्या ४.८% पर्यंत वित्तीय तूट पूर्ण झाली
- सीएडीवरील अवलंबित्वामुळे रुपया कमकुवत झाला आहे. चलन स्थिरतेसाठी उत्पादन निर्यात आवश्यक आहे.
- जीएसटी सुधारणांचा पुढचा टप्पा ई-वे बिल सिस्टीमवर केंद्रित असण्याची शक्यता आहे
- विकासाभोवती जोखमींचे संतुलन मोठ्या प्रमाणात समान आहे
- अमेरिकन टॅरिफ दरम्यान रुपयाची घसरण ही दुःखद गोष्ट नाही
- महागाईच्या अंदाजावर परिणाम करण्यासाठी सीपीआय आधार वर्षाची पुनरावृत्ती

# जि.प., पं.स.चे मतदान ५ ऐवजी ७ फेब्रुवारीला

### आता ९ फेब्रुवारीला होणार मतमोजणी

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून ५ फेब्रुवारीऐवजी आता ७ फेब्रुवारी रोजी मतदान; तर ७ फेब्रुवारीऐवजी ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने हा बदल जाहीर केला आहे. राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १३ जानेवारी रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार उमेदवारीअर्ज दाखल करणे, अर्ज मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे इत्यादी टप्प्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी ३१ जानेवारीच्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदतवाढ दिली आहे; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात २८ ते ३० जानेवारीपर्यंत दुखवटा जाहीर केला आहे.

**चिंताजनक** — परदेशातील उदाहरणांसह आर्थिक सर्वेक्षणात गंभीर चिंता व्यक्त

# डिजिटल व्यसनाच्या विळख्यात भारतीय तरुण

**दिल्ली, नवराष्ट्र ब्युरो.** संसदेत गुरुवारी सादर करण्यात आलेल्या आर्थिक सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये भारतात विशेषतः मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये डिजिटल व्यसन आणि स्क्रीनशी संबंधित मानसिक आरोग्य आव्हानांमध्ये झपाट्याने वाढ होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. अहवालात असा इशारा देण्यात आला आहे की, स्मार्टफोन, सोशल मीडिया, गेमिंग आणि ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरील अतिरेकी सहभाग आरोग्य, शिक्षण परिणाम आणि दीर्घकालीन आर्थिक उत्पादकतेवर परिणाम करत आहे. सर्वेक्षणात डिजिटल व्यसनाची व्याख्या ऑनलाईन कामांना वारंवार, अत्यधिक किंवा सक्तीच्या वापराची पद्धत म्हणून केली आहे.



### सोशल मीडियाचे व्यसन

अहवालात सोशल मीडिया व्यसनाबद्दल विशेष चिंता व्यक्त केली आहे, जी चिंता नैराश्य, कमी आत्मसन्मान, सायबर धमकीचा ताण आणि आत्महत्येच्या उच्च दरांशी जोडलेली आहे. या जोखमी असूनही डिजिटल सहभाग वाढत आहे. २०२४ पर्यंत भारतात ओटीटी व्हिडीओ आणि फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्मवर अंदाजे ४० कोटी आणि सोशल मीडियावर अंदाजे ३५ कोटी वापरकर्ते असण्याचा अंदाज आहे. सर्वेक्षणानुसार, परिणामी भारतातील तरुण उच्च डिजिटल वातावरणात वाढत आहेत, तर डिजिटल प्रवेशामुळे शिक्षण, रोजगार आणि नागरी सहभागाच्या संधी वाढल्या आहेत.

### आरोग्यासह सामाजिक भांडवलावर परिणाम

अहवालानुसार, असे वर्तन लक्ष कमी होणे, झोप कमी होणे, चिंता आणि कामावर किंवा अभ्यासात कामगिरी सुमार होणे या स्वरूपात वाढत्या प्रमाणात प्रकट होत आहे. कालांतराने समुदाय सहभाग कमी करून आणि ऑफलाईन सामाजिक कौशल्ये कमी करून सामाजिक भांडवलदेखील कमकुवत करते. अहवालात आर्थिक खर्चाकडे देखील लक्ष वेधले आहे. यामध्ये अनपेक्षित ऑनलाईन खर्च, गेमिंग आणि सायबर फसवणूक यामुळे होणारे थेट आर्थिक नुकसान तसेच कमी रोजगार, कमी उत्पादकता आणि कमी कमाईमुळे होणारे अप्रत्यक्ष नुकसान यांचा समावेश आहे.

### परदेशातील उदाहरणे

- अहवालात आंतरराष्ट्रीय उदाहरणे देखील देण्यात आली आहेत. ऑस्ट्रेलियाने एका विशिष्ट वयाखालील मुलांसाठी सोशल मीडिया खात्यांवर देशव्यापी बंदी लागू केली आहे.
- दक्षिण कोरियाच्या २०११ च्या 'शटडाऊन कायद्या'मुळे अल्पवयीन मुलांना मध्यरात्रीनंतर गेमिंग वेबसाइट्स वापरण्यापासून रोखले गेले.
- चीनने आठवड्याच्या शेवटी आणि सुट्टीच्या दिवशी गेमिंगचा वेळ दररोज एक तास मर्यादित केला.
- सिंगापूरने शाळांमध्ये आणि सार्वजनिक प्लॅटफॉर्मवर सायबर वेलनेस आणि जबाबदार डिजिटल नागरिकत्वाला प्रोत्साहन देते.

### समीर वानखेडेला कोर्टाचा झटका

**दिल्ली, वृत्तसंस्था.** आयआरएस अधिकारी आणि माजी एनसीबी अधिकारी समीर वानखेडे यांनी शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान दिग्दर्शित बॅडस ऑफ बॉलीवूड या वेब सिरीजवर त्यांची प्रतिमा खराब करण्याचा आणि त्यांची थट्टा करण्याचा आरोप केला होता. नंतर त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आणि शाहरुख खान, गौरी खान, नेटफ्लिक्स इंडिया आणि रेड चिलीज यांच्याविरुद्ध मानहानीचा खटला दाखल केला. तथापि, या प्रकरणात समीरला आता मोठा धक्का बसला आहे. गुरुवारी न्यायालयाने मानहानी याचिका फेटाळून लावली.

# सोने-चांदी उच्चांकावर

## सोने ११,००० तर चांदी २८,००० ने वाढ

**दिल्ली, वृत्तसंस्था.** सोन्या-चांदीचे दर सलग चौथ्या दिवशी विक्रमी उच्चांकावर पोहोचले आहेत. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशननुसार गुरुवारी १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा भाव ११,४८६ रुपयांनी वाढून १,७६,१२१ रुपयांवर पोहोचला आहे. ३ दिवसांत सोने २१,८११ रुपयांनी महागले आहे.

तर, एक किलो चांदीची किंमत २७,६६६ रुपयांनी वाढून ३,८५,९३३ रुपये प्रति किलोवर पोहोचली आहे. ३ दिवसांत चांदीची किंमत ६८,२२८ रुपयांनी महागली आहे. यावर्षी आतापर्यंत केवळ २९ दिवसांत चांदी १.५५ लाख रुपयांनी आणि सोने ४३ हजार रुपयांनी महागले आहे.



### २९ दिवसांत सोन्यात ४३,००० ची वाढ

यावर्षी जानेवारीच्या २९ दिवसांतच सोन्याची किंमत ४२,९२६ रुपयांनी वाढली आहे. ३१ डिसेंबर २०२५ रोजी १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा भाव १,३३,१९५ रुपये होता, जो आता १,७६,१२१ रुपये झाला आहे. त्याचबरोबर, चांदी १,५५,५१३ रुपयांनी महाग झाली आहे. ३१ डिसेंबर २०२५ रोजी एक किलो चांदीची किंमत २,३०,४२० रुपये होती, जी आता ३,८५,९३३ रुपये प्रति किलोवर पोहोचली आहे.

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



# अखेरचा निरोप



नवराष्ट्र
पुणे, ३० जानेवारी २०२६
navarashtra.com /navarashtra











# अमित शाहांसह देशभरातील नेतेही दादांसाठी गहिवरले

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री रक्षा खडसे, रामदास आठवले, विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर, पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे, गोव्याचे मुख्यमंत्री सावंत, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांच्यासह अनेक मंत्री, खासदार, आमदार आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी अजितदादांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण केले. तत्पूर्वी, उद्धव ठाकरे यांनी सहकुटुंब रात्री उशिरा येऊन अजितदादांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले. पत्नी खासदार सुनेत्रा पवार, पुत्र जय आणि पार्थ यांच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू शब्दांपलीकडचे होते.

बारामतीला आदर्श शहर बनवण्याचे स्वप्न बारामतीला 'आयडियल सिटी' करण्याचे स्वप्न उराशी बाळगणारे अजितदादा आज काळाच्या पडद्याआड गेले असले, तरी त्यांच्या स्वप्नांची मशाल अजूनही पेटलेली आहे. नेता गेला, पण त्याचा विचार राहिला. देह गेला, पण ध्यास राहिला. आणि म्हणूनच अजितदादा गेले नाहीत, ते बारामतीच्या स्मृतीत कायमचे कोरले गेले आहेत, अशी भावना अनेकांनी यावेळी व्यक्त केली.



## पार्थ, जय यांचे जनतेला अभिवादन

ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, श्रीनिवास पवार, युगेंद्र पवार, राजेंद्र पवार, आमदार रोहित पवार यांच्यासह संपूर्ण पवार कुटुंबीय उपस्थित होते. अंत्यविधीनंतरही दादांवर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे क्रिडांगणावरून पाय निघत नव्हते. पार्थ आणि जय यांनी जनसमुदायाला हात जोडून अभिवादन केले. त्या क्षणी हजारो डोळ्यांत पुन्हा अश्रू तरळले.



## बारामतीमध्ये सन्नाटा

कोरोनानंतर पहिल्यांदाच बारामती पूर्णपणे बंद राहिली. वैद्यकीय सेवा वगळता सर्व व्यावसायिक दुकाने पूर्णपणे बारामतीकरांनी बंद ठेवून उत्स्फूर्तपणे बंद पाळला. दुसऱ्या दिवशी देखील पूर्ण बारामती बंद होती. कोरोना नंतर पहिल्यांदाच बारामतीमध्ये सन्नाटा पाहायला मिळाला. मात्र रस्ते दादांच्या दर्शनासाठी येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या वाहनांमुळे फुलून गेले होते. बारामती शहरातच नव्हे तर तालुका व अन्य तालुक्यातील विविध गावांमध्ये देखील कडकडीत बंद पाडून शोक पाळण्यात आला. दादा गेले, आता सर्व संपले, पुढे काय? असा चिंताजनक प्रश्न प्रत्येकाच्या मनात दिसत होता.

## अधिकारी, कर्मचारीही गहिवरले

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबर प्रशासनामध्ये काम करणारे अधिकारी व कर्मचारीदेखील हळहळत होते. यामध्ये वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांनीदेखील मोठी हळहळ व्यक्त करत आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यात बंदोबस्तासाठी नेहमी तैनात असणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांनीदेखील आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. यामध्ये अजितदादा सोबत असलेला अंगरक्षक घटनास्थळी दिवसभर थांबून रडत होता.

## काटेवाडीत पार्थिव नेले

अजितदादांचे आपले मूळ गाव काटेवाडीवर विशेष प्रेम होते. त्यांच्या आई गावीच असत. त्यामुळे काटेवाडी येथील उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मूळ घर असलेल्या ठिकाणी त्यांचे पार्थिव आणल्यानंतर परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. अनेक जण रडत होते. पहाटेपासूनच काटेवाडीमध्ये परिसरातील नागरिकांनी अजितदादांच्या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती. नेहमी कामात मग्न असलेल्या दादांचे पार्थिव पाहून काटेवाडी गहिवरली.



## आमचा वाघ गेला!

अजितदादांना निरोप देताना काटेवाडीतील महिलांची अवस्था बघवत नव्हती. आमचा दादा महाराष्ट्राचा वाघ होता, आज आम्ही बहिणी आमच्या या वाघाला सलाम करतो, असे बोलताना या महिलांच्या हुंदक्यांनी उपस्थितांची मने हेलावली. ज्या नेत्यावर आजवर हक्काने रागवलं, ज्यांच्याकडे हक्काने कामं मागितली, ज्याने हट्ट पुरवला, तो 'दादा' आज कायमचा शांत झाल्याची भावना प्रत्येकाच्या मनात दाटून आली होती आणि ती व्यक्त होत होती.

# आम्हाला पोरके करून आमचा देवच गेला!

## काटेवाडीत महिला, कार्यकर्त्यांचा आक्रोश

**बारामती, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** आमचा दादा महाराष्ट्राचा वाघ होता... ओ साहेब, थांबा ना, आमच्या दादांना असे नेऊ नका, तुमच्या पाया पडतो! हे काळीज पिळवटून टाकणारे शब्द होते काटेवाडीतील कार्यकर्त्यांचे. 'आमचा दादा आम्हाला पोरका करून गेला... आमचा देवच गेला!' अशा शब्दांत काटेवाडीतील महिलांनीदेखील टाहो फोडला. गुरुवारी सकाळी अजितदादा पवार यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी त्यांचे मूळ गाव काटेवाडीत आणले गेले. त्यावेळी समर्थकांच्या डोळ्यांतील अश्रूंचा बांध फुटला.

अजित पवार यांचे पार्थिव सकाळी बारामती वैद्यकीय महाविद्यालयातून त्यांच्या काटेवाडीतील निवासस्थानी आणण्यात आले. दादांना आपल्या गावच्या मातीची आणि इथल्या माणसांची प्रचंड ओढ होती; सण-उत्सव ते नेहमी इथेच साजरे करायचे. त्यामुळेच, आज जेव्हा त्यांचे पार्थिव घराबाहेर आले, तेव्हा लाडक्या नेत्याला शेवटचे पाहण्यासाठी नागरिकांनी अलोट गर्दी केली. ही गर्दी इतकी प्रचंड होती की परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली होती.

### दादांना नेऊ नका!

काटेवाडीतील अंत्यदर्शन आटोपल्यानंतर त्यांचे पार्थिव रुग्णवाहिकेत चढवण्यात आले, तेव्हा तिथे उपस्थित असलेल्या प्रत्येकाच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहत होत्या. दादांना नेऊ नका, अशी विनवणी करत कार्यकर्ते आणि ग्रामस्थ ओक्साबोक्शी रडत होते. काहींनी तर रुग्णवाहिकेलाच मिठी मारून आपल्या नेत्याला रोखून धरण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. गर्दी इतकी प्रचंड होती की परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आमदार रोहित पवार यांना स्वतः बंगल्याच्या गेटवर चढावे लागले. त्यांनी दोन्ही हात जोडून कार्यकर्त्यांना शांत राहण्याचे आणि पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्यानंतर पोलिसांनी रांगा लावून एक-एक करून नागरिकांना दर्शनासाठी आत सोडले..











## काय कवी, कविता करता की नाही?

### हेमांगी कवीने सांगितली आठवण

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनानंतर एक धडाडीचा नेता हरपल्याची भावना अनेकांच्या मनात येत आहे. मराठी अभिनेत्री हेमांगी कवी हिनेदेखील सोशल मीडियावर एक लांबलचक पोस्ट शेअर करत अजित पवार यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा दिला आहे.



अजित पवार यांनी हेमांगी कवीला आडनावावरून एक मिश्किल प्रश्न विचारला होता. त्याची आठवण हेमांगीने पोस्टच्या माध्यमातून शेअर केली आहे. 'दहा वर्षांपूर्वीची गोष्ट. मी एका कार्यक्रमासाठी गेले होते. कार्यक्रम संपल्यानंतर कलाकारांना स्टेजवर बोलावण्यात आले. शासकीय कार्यक्रम असल्यामुळे आम्हाला सगळे प्रोटोकॉल फॉलो करणे गरजेचे होते. आमच्या मागे सगळे व्हीआयपी होते. तेवढ्यात मागून एक आवाज आला, काय कवी? मी आश्चर्याने मागे वळून पाहिले. तेव्हा माझ्या मागे दादा उभे होते. मी तेव्हा दचकून दादा तुम्ही, असं म्हणाले. तेवढ्यात दादा, 'आडनाव कवी आहे तर काय कविता वगैरे करता की नाही?' तेव्हा मी हसून म्हणाले की, 'मी फक्त नावाची कवी आहे.' त्यावर 'आडनाव कवी कसं काय मग?' असा दादांनी प्रश्न विचारला. तेव्हा मी त्यांना थोडक्यात उत्तर दिलं होतं. तेव्हा मला कुणीतरी तुम्ही पुण्याच्या का? असा प्रश्न विचारला. तेव्हा दादांनी उत्तर देत, अरे त्या माण तालुक्याच्या आहेत.. जयकुमार यांच्या गावच्या आहेत, असं सांगितलं. मी शॉक झाले.

## आमचं आयुष्य आणि सभागृहही आधीसारखं नसेल- अदिती तटकरे

आम्ही नेता गमावला आमचा. त्यांना परत बघता नाही येणार, याचं दुःख आम्हाला आहे, असं म्हणताना अदिती तटकरे यांचे डोळे पाणवले. अदिती म्हणाल्या, दादांनी नेहमीच आम्हा सगळ्यांना पाठबळ दिलं. आधार दिला. चांगलं काम केलं तर प्रशंसा करायचे. थोड्या कुठे चुका झाल्या तर हक्काने वडिलांसारखे ओरडायचे. मार्गदर्शन करायचे. एक दिवस असा गेला नाही की, दादांचं नाव तोंडातून निघालं नसेल. ही आठवण कायम मनात राहील. दादांनी भरभरून प्रेम दिलं. माझ्या वडिलांचं जसं मार्गदर्शन मिळत आलं तसं त्यांचंही नेहमी मिळत आलं. प्रोत्साहन देत राहिले. नेहमी तरुणांना, महिलांना, युवतींना संधी मिळाली पाहिजे. नवनेतृत्व आपल्यात घडलं पाहिजे, हेच त्यांचं म्हणणं असायचं. मला आठवतं मी २०१९ मध्ये जेव्हा आमदार झाले, त्यावेळी पहिले भाषण सभागृहात कसे करायचे हे मी दादांकडून शिकले. अगदी बजेट वरचे मुद्दे कसे मांडायचे, पुरवणी मागण्या, भाग क्रमांक, पान क्रमांक बोलून कसं उठायचं, या सगळ्या गोष्टी त्यांनी शिकवल्या. आता सगळं संपलं.'



## 'दादां'ना निरोप देताना सह्याद्रीही हेलावला



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जाण्याने संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. बारामतीमध्ये त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेले ज्येष्ठ नेते शरद पवार आपल्या भावना रोखू शकले नाहीत. आयुष्यभर अनेक राजकीय वादळे अंगावर झेलणाऱ्या आणि वैयक्तिक धक्के पचवणाऱ्या शरद पवारांच्या डोळ्यात पुतण्याच्या जाण्याने अश्रू तरळले होते. हे दृश्य पाहून उपस्थित असलेल्या प्रत्येकाचे मन हेलावून गेले. अजित पवार हे केवळ पवार कुटुंबाचे सदस्य नव्हते, तर ते बारामतीकरांचे 'दादा' आणि आधारवड होते. त्यांच्या अंत्यविधीला जनसागराचा महापूर लोटला होता. ४० वर्षांचा संसार अर्धवट सोडून जाणाऱ्या पतीच्या जळत्या चितेकडे पाहून खासदार सुनेत्रा पवार हतबल झाल्या होत्या. पार्थ आणि जय पवार या दोन्ही मुलांनी आपल्या वडिलांना साश्रूपूर्ण नयनांनी निरोप दिला. अजित पवार यांच्या बॉडीगार्डपासून ते सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत प्रत्येकजण धाय मोकलून रडताना दिसत होता.





Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

सदैव आपल्या वाचकांसोबत

पुणे

३० शुक्रवार जानेवारी २०२६

epaper.navarashtra.com

/navarashtra

१९३४ ला स्थापन नवभारत माध्यम समूहाचे मराठी दैनिक

# नवराष्ट्र

navarashtra.com

मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, अकोला, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, जळगाव येथून एकाच वेळी प्रकाशित



करेज चित्रपटाची जागतिक झेप!

आतील पानावर






# जगासाठी भारत आशेचा किरण

## अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी मोदींचा माध्यमांशी संवाद

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** भारत जगासाठी आशेचा किरण म्हणून उदयास येत असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केले. युरोपियन युनियन सोबतच्या मुक्त व्यापार कराराचा संदर्भ देत ते म्हणाले की ते महत्त्वाकांक्षी भारतासाठी आहे आणि देशातील उत्पादकांनी त्यांच्या क्षमता वाढवण्यासाठी या संधीचा फायदा घ्यावा. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी माध्यमांना संबोधित करताना पंतप्रधान बोलत होते. भारत सुधारणा एक्सप्रेसवर वेगाने वाटचाल करत आहे. सुधारणांच्या अंमलबजावणीत सकारात्मक योगदान दिल्याबद्दल त्यांनी संसद सदस्यांचे आभार मानले. मोदी म्हणाले की, त्यांचे टीकाकार देखील शेवटच्या व्यक्तीला फायदा पोहोचवण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेला मान्यता देतात आणि सुधारणांची ही परंपरा पुढील पिढीच्या सुधारणांसह सुरू राहील. भारताची लोकशाही व्यवस्था आणि लोकसंख्याशास्त्र जगाला मोठी आशा देते. लोकशाहीच्या या मंदिरात, भारताला ताकद, लोकशाहीप्रती वचनबद्धता आणि लोकशाही प्रक्रियेद्वारे घेतलेल्या निर्णयांचा आदर करण्याचा संदेश देण्याची संधी आहे. हे संदेश जागतिक स्तरावर स्वीकारले जात आहेत.



### आमच्या सशस्त्र दलांवर गर्व

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंस्टाग्रामवरील त्यांच्या पोस्टमधील एक श्लोक शेअर केला, ज्यामध्ये बीटिंग रिट्रीट समारंभाचे दर्शन घडवले. ज्यामध्ये भारताच्या लष्करी संघटनेबद्दल आणि सशस्त्र दलांबद्दल अभिमान व्यक्त केला गेला आणि त्यांचा सन्मान केला गेला.
- त्यांनी लिहिले, राष्ट्राचे रक्षण करण्यासाठी त्यांच्या समर्पणाबद्दल आम्हाला आमच्या सशस्त्र दलांचा अभिमान आहे. हा समारंभ प्रजासत्ताक दिनाच्या समाप्तीचे प्रतीक आहे आणि भारतीय सेना, नौदल, हवाई दल आणि केंद्रीय सशस्त्र पोलिस दलांच्या बँडद्वारे देशभक्तीपर सादरीकरणे सादर केली जातात.

### राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर उत्तर

पंतप्रधान मोदी ४ फेब्रुवारी रोजी लोकसभेत आणि ५ फेब्रुवारी रोजी राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर उत्तर देतील. अर्थमंत्री निर्मला सीतारमण अर्थसंकल्पीय चर्चेला उत्तर देतील. त्या ११ फेब्रुवारी रोजी लोकसभेत आणि १२ फेब्रुवारी रोजी राज्यसभेत उत्तर देतील. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा होईल. लोकसभा १८ तास आणि राज्यसभेत १६ तास अर्थसंकल्पावर चर्चा करेल.

## पंतप्रधानांचा देशाला ढोंगी संदेश

### जयराम रमेश यांचे मोदींवर टीकास्त्र

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या इतर अधिवेशनांप्रमाणे यावेळीही देशाला ढोंगी संदेश दिला, असा आरोप काँग्रेसने गुरुवारी केला. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीला संसद भवन संकुलात त्यांच्या नेहमीच्या भाषणात पंतप्रधान मोदींनी सांगितले की देश दीर्घकालीन समस्यांमधून बाहेर पडत आहे आणि दीर्घकालीन उपायांसाठी काम करत आहे. आता व्यत्यय आणण्याची वेळ नाही तर उपाय शोधण्याची वेळ आहे. पंतप्रधानांच्या विधानानंतर, सरचिटणीस जयराम रमेश यांनी एक्सवर पोस्ट केले की, पंतप्रधान राष्ट्रीय मुद्द्यांवर विरोधकांना विश्वासात घेण्यासाठी सर्वपक्षीय बैठका बोलावणार नाहीत किंवा त्यांचे अध्यक्षपद भूषवणार नाहीत. ते शेवटच्या क्षणी विधेयके सादर करतील आणि आवश्यक कायदेशीर तपासणीशिवाय संसदेत ती बुलडोझरने मंजूर करून घेतील. ते म्हणाले, संसदेत बसून विरोधी नेत्यांच्या चिंतांना उत्तर देण्याऐवजी ते दोन्ही सभागृहांमध्ये निवडणुकीसारखी भाषणे देतील. प्रत्येक अधिवेशन सुरू होण्यापूर्वी, ते संसदेला पार्श्वभूमी ठेवून त्यांचा नेहमीचा ढोंगी संदेश देशाला देतील. त्यांनी उपहासात्मकपणे म्हटले, आजचा निषेध हा त्या मालिकेचाच एक भाग आहे.



## लोकसभेचे कामकाज १ फेब्रुवारीपर्यंत स्थगित

**दिल्ली.** आर्थिक सर्वेक्षण सादर झाल्यानंतर गुरुवारी, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी, लोकसभेचे कामकाज १ फेब्रुवारी (रविवार) पर्यंत तहकूब करण्यात आले. प्रश्नोत्तराच्या तासानंतर अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी २०२५-२६ चा आर्थिक सर्वेक्षण सभागृहात मांडला. त्यानंतर, शून्य तासाच्या सुरुवातीला, सभापतींनी रविवारपर्यंत कामकाज तहकूब केले. संसद आता १ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता पुन्हा सुरू होईल. परंपरेनुसार, रविवार असूनही सरकार अर्थसंकल्प सादर करेल.

## यूजीसीचा निर्णय स्वागतार्ह

### समानतेला प्रोत्साहन देणारे पाऊल : स्टॅलिन

**चेन्नई, वृत्तसंस्था.** यूजीसी (उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये समानतेला प्रोत्साहन) नियमावली, २०२६ ची अंमलबजावणी जरी उशिरा झाली असली तरी, खोलवर रुजलेल्या भेदभाव आणि संस्थात्मक उदासीनतेने ग्रस्त असलेल्या उच्च शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या दिशेने हे एक स्वागतार्ह पाऊल आहे. त्यांनी भर दिला की या नियमावली मजबूत केल्या पाहिजेत आणि संरचनात्मक कमतरता दूर करण्यासाठी आणि खऱ्या जबाबदारीने अंमलात आणण्यासाठी त्यात सुधारणा केल्या पाहिजेत. १३ जानेवारी रोजी, देशाच्या उच्च शिक्षण नियामक संस्थेने २०१२ च्या भेदभाव विरोधी चौकटीची जागा घेत विद्यापीठ अनुदान आयोग (उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये समानतेचा प्रचार) नियमावली, २०२६ अधिसूचित केली. नवीन नियम उच्च शिक्षण संस्थांमध्ये जाती-आधारित भेदभावासह भेदभाव दूर करण्यासाठी एक अंमलबजावणीयोग्य प्रशासन चौकट प्रदान करतात.



### योगी आदित्यनाथ मंत्रिमंडळाची मंजुरी, 'त्या' ९९ कुटुंबांना दिलासा

## विस्थापित हिंदू बंगाली कुटुंबांचे पुनर्वसन

**लखनौ, नवराष्ट्र ब्युरो.** उत्तर प्रदेश मंत्रिमंडळाने गुरुवारी पूर्व पाकिस्तान (आता बांगलादेश) मधून विस्थापित झालेल्या ९९ हिंदू बंगाली कुटुंबांचे पुनर्वसन करण्यास मान्यता दिली. वरिष्ठ मंत्री सुरेश कुमार खन्ना यांनी सांगितले की, ही कुटुंबे सध्या मेरठ जिल्ह्यातील तलावाच्या जमिनीवर बेकायदेशीरपणे राहत आहेत. मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकारांना माहिती देताना अर्थ आणि संसदीय कामकाज मंत्री खन्ना म्हणाले की, सध्या मेरठच्या मवाना तहसीलमधील नागला गोसाई गावात राहणाऱ्या या कुटुंबांना राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या आदेशांचे पालन करून स्थलांतरित केले जाईल. या निर्णयामुळे विस्थापित झालेल्या ९९ कुटुंबाना दिलासा मिळणार आहे. पुनर्वसन योजनेअंतर्गत, रसूलाबाद तहसीलमधील भैंस्या गावात पुनर्वसन विभागाच्या नावावर नोंदणीकृत ११.१३७५ हेक्टर जमिनीवर ५० कुटुंबांचे पुनर्वसन केले जाईल, तर उर्वरित ४९ कुटुंबांचे ताजपूर तारासौली गावात १०.५३० हेक्टर जमिनीवर पुनर्वसन केले जाईल.



## मिया मुस्लिमांना त्रास द्या : सरमा



**गुवाहाटी, वृत्तसंस्था.** कोणत्याही प्रकारे मिया मुस्लिमांना त्रास द्या. जर त्यांना त्रास झाला तर ते आसाम सोडून जातील, असे वादग्रस्त विधान आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी केले आहे. मुस्लिमांना त्रास द्यायचा असेल तर मी रात्री १२ वाजता जाईन.

आसाममध्ये मतदारयादी एसआयआरवरून भाजप आणि विरोधी पक्षांमध्ये वाद सुरू आहेत. काँग्रेसचा आरोप आहे की भाजप मतदारयादीतून नावे जोडण्यासाठी आणि काढून टाकण्यासाठी फॉर्म ७ वापरत आहे.

त्याला उत्तर देताना सरमा म्हणाले की त्यांनी भाजप कार्यकर्त्यांना विशेष मतदारयादी सुधारणे मोहिमेचा भाग म्हणून मिया समुदायाविरुद्ध मोठ्या प्रमाणात फॉर्म ७ सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

### संताप • लोकसभा अध्यक्ष बिर्लांनी खासदारांना फटकारले

## बोलायचे असेल, तर बाहेर जा

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान, सभापती ओम बिर्ला खासदारांनी आपापसात चर्चा केल्याबद्दल संतापले. ते म्हणाले, आज, मी पाहतो की सदस्य आपापसात दीर्घ चर्चा करत आहेत. हे सभागृह त्यासाठी नाही. जर तुम्हाला आपापसात दीर्घ चर्चा करायची असेल तर कृपया बाहेर जा आणि चर्चा करा. आता, जर कोणी आपापसात दीर्घ चर्चा करताना दिसले तर मी नाव घेऊन बोलेन. त्यांनी काँग्रेसचे सरचिटणीस आणि खासदार केसी वेणुगोपाल यांचाही उल्लेख केला. सभापती म्हणाले, माननीय सदस्य केसी वेणुगोपाल, जर तुम्हाला दीर्घ चर्चा करायची असेल तर बाहेर जा.



### मंत्री सर्व प्रश्नांची थोडक्यात उत्तरे देतील

प्रश्नोत्तराच्या तासाबाबत, सभापतींनी सदस्यांना सांगितले की २० प्रश्न विचारले जातात आणि मंत्री सर्व प्रश्नांची थोडक्यात उत्तरे देतील याची खात्री करण्याचा आमचा प्रयत्न आहे. सभापतींनी आदिवासी व्यवहार मंत्रालयातील राज्यमंत्री दुर्गादास उईके यांनाही टोकले.

## १२५ दिवसांचा रोजगार ही फसवणूक : चिदंबरम



**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** काँग्रेस नेते पी. चिदंबरम यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अर्थसंकल्पीय भाषणावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांनी व्हीबी जी रामजी कायद्याअंतर्गत १२५ दिवसांच्या रोजगाराच्या आश्वासनाला फसवणूक म्हटले आहे. राष्ट्रपती मुर्मू यांनी आपल्या भाषणात सांगितले की विकसित भारत-व्ही.बी.जी. रामजी कायद्यामुळे गावांमध्ये १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी मिळेल. चिदंबरम म्हणाले की, अलिकडच्या काळात मनरेगाअंतर्गत एका सरासरी कुटुंबाला फक्त ५० दिवसांचा रोजगार मिळाला आहे. सरासरी ५० दिवस अचानक १२५ दिवस कसे होतील? सरकार २०२४-२५ आणि २०२५-२६ मध्ये दिलेल्या रकमेपेक्षा अडीच पट जास्त पैसे देईल का? हे १२५ दिवस हमी नाही. ही फक्त फसवणूक आहे. फक्त १२५ दिवस का? हे पोकळ आश्वासन आहे.

## Short News

### सोरेन सरकार जनतेच्या रक्षणात अपयशी

**रांची.** झारखंडचे माजी मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते बाबुलाल मरांडी यांनी राज्यातील जनतेला संदेश लिहून हेमंत सोरेन सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. मरांडी यांनी सोशल मीडियावर लिहिले आहे की, जर तुम्ही झारखंडमध्ये राहता आणि यशस्वी व्यवसाय चालवत असाल तर सावधगिरी बाळगा आणि तुमच्या लोकांना त्यांची घरे सोडू देऊ नका, कारण सरकारने नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी घेण्यास स्पष्टपणे नकार दिला आहे.

### उत्तर प्रदेशातील वीज ग्राहकांना मोठा धक्का

**लखनौ.** उत्तर प्रदेशातील वीज ग्राहकांना मोठा धक्का बसला आहे. वीज महामंडळाने आतापर्यंतचा सर्वात मोठा इंधन अधिभार लादण्याचा आदेश जारी केला आहे. फेब्रुवारीच्या बिलांमध्ये १०% वाढ होईल. राज्य वीज ग्राहक परिषदेने नियामक आयोगाकडे हस्तक्षेप करून आतापर्यंत केलेल्या मासिक गणनेची चौकशी करण्यासाठी सार्वजनिक महत्त्वाचा प्रस्ताव दाखल केला आहे. गेल्या वर्षी जानेवारीमध्ये अतिरिक्त शुल्क परतफेड करण्याची तरतूद मंजूर केली होती.

### आरजी कर बलात्कार : पीडितेच्या कुटुंबाचा दावा

## निवडणुकीची ऑफर




**कोलकाता, वृत्तसंस्था.** आरजी कर पीडितेच्या पालकांनी दावा केला की अनेक राजकीय पक्षांनी त्यांना विधानसभा निवडणूक लढवण्याची ऑफर दिली आहे. ते कोलकाता येथे माध्यमांशी बोलत होते. पीडितेच्या आई म्हणाल्या, आम्हाला दोघांनाही राजकीय पक्षांनी संपर्क साधला होता. तृणमूल काँग्रेसने सुरुवातीपासूनच आम्हाला राजकारणात येण्याची ऑफर दिली आणि पैशांचीही ऑफर दिली, परंतु आम्ही ही ऑफर स्वीकारण्यास नकार दिला.

आम्हाला न्याय हवा आहे आणि सरकारने आम्हाला न्याय द्यावा. आम्ही अद्याप निवडणूक लढवण्यास तयार नाही. म्हणून, आम्ही सध्या या विषयावर भाष्य करू इच्छित नाही. पीडितेच्या वडिलांनी सांगितले की, तृणमूल काँग्रेस, सीपीएम आणि भाजपसह सर्व राजकीय पक्षांनी आम्हाला पुढील विधानसभा निवडणूक लढवण्याची संधी दिली आहे. आम्ही राजकारणात नाही. आम्हाला फक्त आमच्या मुलीला न्याय हवा आहे आणि दुसरे काही नाही, म्हणून आम्हाला राजकारणात येण्याची गरज वाटत नाही.

### जो न्याय देईल त्याला पाठिंबा

जो पक्ष न्याय मिळवून देईल, त्या पक्षाला आम्ही पाठिंबा देऊ. आम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी काम करणाऱ्या कोणत्याही पक्षात आम्ही सामील होऊ शकतो, परंतु सध्या आम्ही निवडणूक लढवण्याचा विचार करत नाही. आमचा लढा केवळ न्यायासाठी आहे, म्हणून आम्ही या मुद्द्याचे राजकारण करू इच्छित नाही. डॉक्टरच्या वडिलांनी सांगितले की त्यांना भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांनी ऑफर दिली होती, परंतु त्यांनी नकार दिला.

### यूजीसी विधेयक २०२६ चा विरोध




प्रयागराज. उच्च शिक्षणातील जातीय भेदभावाला आळा घालण्यासाठी अधिक कठोर नियम लागू करणाऱ्या यूजीसी विधेयक २०२६ च्या विरोधात अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या वकिलांनी आंदोलन केले.

## 'जल जीवन'मध्ये अनियमितता; ४,००० लोकांवर कारवाई

**दिल्ली.** जल जीवन मिशनच्या अंमलबजावणीत अनियमिततेच्या तक्रारी आल्यानंतर भारतभरात ४,००० हून अधिक लोकांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती सरकारने गुरुवारी लोकसभेत दिली. प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील म्हणाले की, तक्रारींच्या आधारे प्रकरणांची चौकशी करण्यासाठी पथके तयार करण्यात आली होती आणि त्यांचे अहवाल राज्यांसोबतही शेअर करण्यात आले होते. मंत्र्यांनी सांगितले की, तक्रारींमध्ये प्रामुख्याने कामाचा दर्जा कमी असणे, आर्थिक अनियमितता आणि अपुरा पाणीपुरवठा यासारख्या तक्रारी होत्या. त्यांनी पुढे सांगितले की, ४,००० हून अधिक लोकांवर कारवाई करण्यात आली आहे. मिशनअंतर्गत कामांसाठी अनुदान राज्य सरकारांना दिले जाते, जे निविदा जारी करतात.

## लाचखोरीत अडकला माजी ग्रामविकास अधिकारी

### सहाय्यकही अटकेत, पाच वर्षांची शिक्षा

**कन्नूर, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** केरळमधील कन्नूर येथील थलासेरी दक्षता न्यायालयाने एका माजी ग्राम अधिकारी आणि एका ग्राम सहाय्यकाला लाच घेतल्याबद्दल दोषी ठरवले आणि त्यांना प्रत्येकी पाच वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. न्यायाधीश के. रामकृष्णन यांनी बुधवारी कन्नूर-२ चे माजी ग्राम अधिकारी आणि विद्यमान उप-तहसीलदार के.व्ही. शाजू आणि माजी ग्राम सहाय्यक सी.व्ही. प्रदीप यांना दोषी ठरवले आणि प्रत्येकी ९०,००० चा दंडही ठोठावला. हे प्रकरण कन्नूरमधील पल्लीकुन्नू येथील रहिवाशाने दाखल केलेल्या तक्रारीवरून उद्भवले. तक्रारदाराने मालमत्ता कर भरण्यासाठी कन्नूर-२ ग्राम कार्यालयात अर्ज केला, जिथे माजी ग्राम अधिकारी शाजू यांनी लाच मागितल्याचा आरोप आहे. जमिनीच्या मोजमापादरम्यान, शाजूने लाच म्हणून ९,००० स्वीकारले. उर्वरित १,००० रुपये लाचेची रक्कम स्वीकारताना, दक्षता आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कन्नूर युनिटच्या अधिकाऱ्यांनी त्याला रंगेहाथ पकडले.

### युक्तिवाद | गहलोतांच्या ऑनर किलिंग विधेयकावर राज्यपालांचा 'ब्रेक'

# आता राजस्थानमध्ये बीएनएस ढाल

**जयपूर, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** राजस्थानच्या राजकारणात पुन्हा एकदा राजभवन आणि जुन्या सरकारमधील निर्णयांचा संघर्ष पाहायला मिळत आहे. राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी २०१९ मध्ये ऑनर किलिंग रोखण्यासाठी मंजूर केलेले मागील अशोक गहलोत सरकारचे महत्त्वाकांक्षी विधेयक परत केले आहे. या संदेशामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधानसभेत राजकीय गोंधळ उडाला. राज्य सरकारचा असा युक्तिवाद आहे की हे विधेयक लागू केले तेव्हा देशात भारतीय दंड संहिता आणि सीआरपीसी लागू होते.





### गहलोत सरकारचा हेतू काय होता?

२०१७ मध्ये झालेल्या पेहलू खान प्रकरणासारख्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, गहलोत सरकारने लिंचिंग आणि ऑनर किलिंगविरुद्ध कठोर कायदे आणले. या विधेयकात आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना धमकावणाऱ्या आणि बहिष्कृत करणाऱ्या स्वयंघोषित खाप पंचायतींवर कारवाई करण्याची तरतूद होती. त्यात गुन्हेगारांसाठी कठोर अटींचा समावेश होता, ज्यामध्ये त्यांच्या आयुष्याच्या शेवटपर्यंत तुरुंगवास आणि ५ लाख दंड यांचा समावेश होता.

### जुन्या फायलींवर रिटर्नचा शिक्का

मागील सरकारची विधेयके परत करण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी, मॉब लिंचिंग विधेयक, २०१९, तीन कृषी कायदे आणि वसुंधरा राजे यांच्या काळातील धर्म स्वातंत्र्य विधेयक देखील परत करण्यात आले आहे. अलीकडेच, भजनलाल सरकारने त्यांचे नवीन राजस्थान बेकायदेशीर धार्मिक धर्मांतर प्रतिबंधक विधेयक, २०२५ मंजूर करून आपले हेतू स्पष्ट केले. राज्यपालांच्या या पावलावरून हे स्पष्ट होते की आता राजस्थानमधील गुन्ह्यांवर कारवाई करण्यासाठी राज्याच्या स्वतंत्र कायद्यांऐवजी केंद्राच्या नवीन संहितांवर अवलंबून राहावे लागेल.

## भारत-ईयू कराराचे जागभर कौतुक

### भू-राजकीयदृष्ट्या वेळेवर उचललेले पाऊल : माध्यमांनीही वाखाणले

**दिल्ली, नवराष्ट्र ब्युरो.** भारत-युरोपी महासंघ (ईयू) मुक्त व्यापार कराराचे आंतरराष्ट्रीय माध्यमे, राजकीय नेते, उद्योजक आणि जगभरातील धोरण तज्ज्ञांनी कौतुक केले आहे. या कराराचे वर्णन आर्थिक आणि भू-राजकीयदृष्ट्या एक ऐतिहासिक, धोरणात्मक आणि वेळेवर उचललेले पाऊल, अशा शब्दांत केले जात आहे.

जगभरातील आघाडीच्या माध्यमांनी भारत-ईयू कराराची व्यापकता, महत्त्वाकांक्षा आणि धोरणात्मक वेळेची नोंद घेतली आहे. द टेलिग्राफने जेम्स क्रिस्प यांच्या 'मोदी इज द रिअल विनर इन मदर ऑफ ऑल ट्रेड डील्स विथ ईयू' या शीर्षकाच्या लेखात या कराराचे वर्णन सर्व व्यापार करारांची जननी म्हणून केले आहे. वृत्तपत्राने वृत्त दिले आहे की, करारामुळे भारतात होणाऱ्या ९६.६ टक्के ईयू निर्यातीवरील शुल्क काढून टाकले जाते किंवा कमी केले जाते, तर ईयू सात वर्षांत ९९.५ टक्के भारतीय वस्तूंवरील शुल्क कमी करेल. ब्लूमबर्गने डॅनस्ट्रॉम यांच्या 'ऑल रो लीड टू मोदी अॅवज वर्ल्ड हेजेज ट्रम्प' या शीर्षकाच्या लेखात म्हटले आहे की, भारत आणि युरोपियन युनियनमधील 'मदर ऑफ ऑल डील्स' करार हा उदयोन्मुख पॅटर्नचे ज्वलंत उदाहरण आहे. वॉल स्ट्रीट जर्नलने जागतिक टॅरिफ अडथळ्यांतून मध्यममार्ग काढणारा करार, म्हणून वर्णन केले आहे.



### नव्या पर्वाची सुरूवात

युरोपमधील अनेक वरिष्ठ राजकीय नेत्यांनी या कराराचे जाहीरपणे स्वागत केले. जर्मन चान्सलर फ्रेडरिक मर्झ यांनी कराराला 'सकारात्मक संकेत' म्हटले आणि विकास आणि समृद्धीला चालना देण्यासाठी त्याची लवकर अमलबजावणी करण्याचे आवाहन केले. फिनलंडचे अध्यक्ष अलेक्झांडर स्टब्स यांनी भारत-ईयू कराराला ऐतिहासिक आणि दोन्ही बाजूंनी झालेला सर्वात मोठा व्यापार करार म्हणून वर्णन केले. ते म्हणाले की, यामुळे आर्थिक आणि राजकीय संबंध लक्षणीयरीत्या मजबूत होतील.

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



सदैव आपल्या वाचकांसोबत
माध्यम समूह संस्थापक
• स्व. श्री. रामगोपाल माहेश्वरी •

"आपुलकीचे चार शब्द मनापासून बोलतां आले की आयुष्यात हितचिंतकांची कमतरता कधीच भासत नाही..."

# जीवनस्तर उंचावणेच हवे एआयचे ध्येय!

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) नोकऱ्या संपुष्टात येईल आणि बेकारी वाढतील असे दावे करण्यात येत असतानाच इन्फोसिस आणि एक्सस्टेपचे सहयोगी संस्थापक नंदन निलेकणी यांनी अशी महत्त्वपूर्ण सूचना केली की, भारताने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जनतेचे जीवनमान सुधारण्यासाठी करावा. देशाला कृत्रिम बुद्धिमत्तेच्या शर्यतीमध्ये पुढे घेऊन जावे लागेल. एआयचा वापर रचनात्मक करण्यासाठी करण्यात यावा. निलेकणी यांनी असा सल्ला दिला की, एआयचा उपयोग सरकारी सेवा, कृषी, आर्थिक सेवा, लॉजिस्टिक्स, न्यायपालिका आणि उद्योगांचे संचालन करण्यासाठी केला जाऊ शकतो. एआयला सुपर इंटेलिजेंस समजून भयभीत होण्याची आवश्यकता नाही. पाश्चिमात्य देशांमध्ये असे बोलले जात आहे की, एआय लोकांना रिकामटेकडे बनवतील. लोक समुद्रकिनाऱ्यावर जाऊन आराम करतील. डिजिटल वॉलेटचा वापर करतील आणि व्हिडीओ गेम खेळत बसतील. हे सर्व काल्पनिक दावे आहेत. समजूतदारपणे आणि योग्य नियंत्रण ठेवून एआयचा वापर केला तर ते मानवासाठी वरदान ठरू शकते. एआयच्या वापरामुळे प्रगती आणि पतनही होऊ शकते. एआयचा चुकीचा वापर मानसिक आरोग्य बिघडवू शकते आणि कौटुंबिक सामाजिक मूल्य सुध्दा उद्ध्वस्त करू शकते. विवेकहिन व्यक्ती यामुळे आळशी बणू शकतो, तर विवेकी व्यक्ती जीवनस्तर सुधारू शकतो. आपल्याला अशी पिढी निर्माण करावी लागेल की, एआयच्या माध्यमातून लोकांचा जीवनस्तर उंचावता येईल आणि वंचित व्यक्ती लाचार होण्यापासून बचाव करू शकेल. भारतात आधार कार्डला यशस्वी सिध्द करणारे निलेकणी यांनी म्हटले आहे की, यामुळे देशातील १ अब्ज लोक लाभान्वित होत आहेत. युपीआयमुळे शून्य गुंतवणूक करून २० अब्ज लोक देवाण-घेवाण करतात. भाजी विक्रेता सुध्दा ट्रांजेक्शन फी न देताही भाजी विक्रीतून नफा मिळवू शकतो. लोक अल्गोरिदमचा वापर करून तीर्थयात्रेची स्थळे निश्चित करू लागले आहेत. आता आम्ही आपल्या गरजा लक्षात घेऊन चिप्स तयार केल्या पाहिजे. आवाजावर आधारित एआय भारतात सर्वाधिक व्यवहारिक आहे. डिजिटल इक्विटीच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ज्याप्रमाणे युपीआयने डिजिटल व्यवहार सुलभ केलेले आहे, त्याचप्रमाणे आवाजाने संचालित होणारे इंटरफेस कृषी, शिक्षण आणि अन्य क्षेत्रात उपयोगी ठरू शकतात. यासाठी फारसे शिक्षित होण्याची आवश्यकता नाही. भारतामध्ये प्रतिभा आहे आणि आधारभूत ढाचा तयार करून काही वर्षात एआयमुळे मिळणाऱ्या संधीचा लाभ घेऊन अनेक क्षेत्रात पुढे जाणे शक्य आहे.




**लोक अल्गोरिदमचा वापर करून तीर्थयात्रेची स्थळे निश्चित करू लागले आहेत. आता आम्ही आपल्या गरजा लक्षात घेऊन चिप्स तयार केल्या पाहिजे. आवाजावर आधारित एआय भारतात सर्वाधिक व्यवहारिक आहे.**

# राष्ट्रवादी काँग्रेसपुढे उभे ठाकले आव्हानांचे डोंगर

अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे महाराष्ट्राचे राजकारण मोठ्या प्रमाणावर प्रभावित होण्याची शक्यता राजकीय गोटात वर्तविण्यात येत आहे. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षांना नव्याने राजकीय डावपेच आखावे लागणार आहे. राष्ट्रवादी पक्ष अजित पवारांवर विसंबून होता. जेव्हा अजित पवार यांनी त्यांचे काका शरद पवार यांच्यापासून वेगळे झाले होते, तेव्हा राकाँचे बहुतांश आमदार अजित यांच्यासोबत गेले होते. विधानसभेत पक्षाच्या ४१ आमदारांचे नेतृत्व करणारे अजित दादा यांचा राज्यसरकारमध्ये प्रचंड दबदबा होता, आता त्यांच्या निधनामुळे उपमुख्यमंत्रिपद आणि अर्थमंत्रिपद कोणाला मिळेल, हा राकाँपुढे मोठा प्रश्न आहे. राज्यसरकारमध्ये पवार घराण्याचा एकही मंत्री नाही. अशा परिस्थितीत पक्षाचे नेतृत्व कोण करेल, याचा निर्णय पक्षाला तातडीने घ्यावा लागणार आहे. उपमुख्यमंत्रिपदासाठी कोणाचे नाव पुढे येईल? मंत्रिमंडळात पवार घराण्याच्या कोणत्या सदस्याचा समावेश करण्यात येईल. पक्षाचे अध्यक्षपद पवार घराण्याच्या एखाद्या सदस्याकडे सोपविले जाईल की, पक्षाच्या अन्य नेत्यांकडे ही जबाबदारी सोपविण्यात येईल?

## महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण झाली पोकळी





अजित पवार यांच्या गटाच्या काही वरिष्ठ नेत्यांनी असे म्हणणे होते की, आम्ही प्रदीर्घ चर्चेनंतर वेगळे झालेलो आहोत. यासाठी पक्षाच्या कार्यकर्त्यांचा विश्वासात घ्यावे लागेल. अशा परिस्थितीत पवार कुटुंब कसा निर्णय घेतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अजित पवार यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या राजकारण पोकळी निर्माण झाली आहे. शरद पवारांनी भाजपसोबत युती करण्यापासून स्वतःला आतापर्यंत दूर ठेवले आहे. अजित पवार यांच्या निधनामुळे दोन्ही गट द्विधा मनःस्थितीत आहे. महाराष्ट्रात इ.स. २०२९ मध्ये होत असलेल्या विधानसभेच्या निवडणुकी लक्षात घेऊन दोन्ही गट एकत्र येऊ शकेल का?

राकाँपुढे पक्षाचे अस्तित्व सिध्द करण्याचे आव्हान उभे ठाकले आहे. अजित पवार पक्षाचे अध्यक्ष होते, तर प्रफुल्ल पटेल कार्याध्यक्ष आहेत. यामुळे अशी शक्यता वर्तविली जात आहे की, पटेल यांच्याकडेच पक्षाचे नेतृत्व सोपविण्यात येईल. आता हेच बघावे लागेल की, प्रफुल्ल पटेल व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनिल तटकरे यासंबंधात कोणता निर्णय घेतील. जयंत पाटील यांच्या नावाचीही चर्चा सुरू आहे. पक्षातील काही नेते आणि कार्यकर्त्यांना असे वाटते की, आता पक्षाचे नेतृत्व अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपविण्यात यावे. सुनेत्रा यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढविली होती आणि पक्षाच्या काही जबाबदाऱ्या सांभाळनेही सुरू केले होते. पक्षाच्या कार्यकर्त्यांची सहानुभूती सुध्दा सुनेत्रा यांना मिळेली. दुसरीकडे असेही बोलल्या जात आहे की, राकाँचे दोन्ही गट एकत्र येऊ शकतात. ८५ वर्षे वयाचे शरद पवार हे पूर्वीप्रमाणे राजकारणात सक्रीय राहण्याची शक्यता नाही. त्यांनाही विचार करावा लागेल की, दोन्ही गटांच्या एकत्रीकरणामुळे काही राजकीय लाभ मिळू शकतात, कारण वेगळे राहिल्यामुळे त्यांच्यासोबत काही निवडक आमदार राहतील. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांमध्ये दोन्ही गट इतके जवळ आले होते की, शरद पवार यांच्या पक्षाच्या अनेक उमेदवारांनी अजित पवार यांच्या पक्षाच्या निवडणूक चिन्हावर निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला होता. पिंपरी-चिंचवड येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी एकत्र येऊन निवडणुका लढविल्या होत्या. उभय पक्षांनी त्यांचे हे ऐक्य पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये कायम ठेवले होते. तेव्हा असे म्हटले जात होते की, जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्यानंतर काही महिन्यातच पवार काका-पुतणे एकत्र येईल.

चंद्रमोहन द्विवेदी

# ई-वाहनांमध्ये आवाजाची वेगळी सिस्टीम

ई-वाहनांचा आवाज येत नसल्यामुळे पायी चालणारे, सायकलस्वार किंवा अन्य वाहनचालकांना कळतच नाही की, आपल्या मागून किंवा बाजूने एखादे वाहन येत आहे. यामुळे अपघात होण्याची भीती असते. अशा वाहनांना रिव्हर्स घेतानाही आवाज येत नाही. शहरांमध्ये वाहनांची संख्या जास्त असल्यामुळे रस्त्यावर दोन वाहनातील अंतर कमी असते. हे लक्षात घेऊन आटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडियाने (एआरएआय) इलेक्ट्रिक चार चाकी वाहनांमध्ये एकॉस्टिक व्हेकल अलर्टिंग सिस्टम (एव्हीएस) लावणे १ ऑक्टोबरपासून सक्तीचे केले आहे. यामुळे वाहन निर्मात्या कंपन्यांना नवीन वाहनांच्या विक्रीपूर्वी वाहनांमध्ये ही सिस्टम लावावी लागणार आहे. यामध्ये ई-कार, ई-बस आणि बॅटरीवर चालणाऱ्या वाहनांचा समावेश आहे. जी ई-वाहने सध्या रस्त्यांवर चालविण्यात येत आहे, त्या सर्व वाहनांमध्ये ही सिस्टम लावणे बंधनकारक होणार आहे. ही सिस्टम अमेरिका, युरोप आणि जपानमध्ये ई-वाहनांमध्ये आहे. आता भारतही या दिशेने पावले उचलित आहे. ई-वाहनांमध्ये लावण्यात आलेल्या या सिस्टममुळे पेट्रोल-डिझेलवर चालणाऱ्या गाड्यांसारखा आवाज येईल. युरोपमध्ये वाहनांचा वेग तासी २० किलोमीटर असतो, त्यामुळे या सिस्टमचा कमीतकमी ५६ ते ७५ डेसिबल आवाज येईल, त्यामुळे तो सहज ऐकायला येईल. वाहनांचा एकसारखा आवाज असावा, हा नियम लागू करण्यात आला आहे. एआरएआयचे संचालक डॉ. रेजी मथाई यांनी सांगितले की, इलेक्ट्रिक दुचाकी आणि तीन चाकांच्या वाहनांमध्ये आवाजाची ही सिस्टम लावण्याचा प्रस्ताव असून यावर चर्चा सुरू आहे. ज्या लोकांनी पेट्रोल-डिझलवर चालणारी वाहने सोडून पर्यावरण अनुकूल ई-वाहन खरेदी केले, त्यांच्या हे लक्षात आले की, या वाहनामुळे धुराचे प्रदूषण होत नाही आणि ही वाहने आवाज न करता धावतात. ही वाहने बाजूने गेली तरी लक्षात येत नाही. यामुळे पादचारी, अन्य वाहनाचे चालक सतर्क होऊ शकत नाही. यामुळे ध्वनी प्रदूषण होणार नाही, परंतु गाडीचा कमीतकमी आवाज आलाच पाहिजे, त्यामुळे लोक सतर्क होतील.



## माघ मेळा



**प्रयागराज.** प्रयागराज येथील वार्षिक माघ मेळ्यात भाविक यमुना, गंगा आणि अदृश्य सरस्वतीच्या पवित्र त्रिवेणी संगमावर बोटीने प्रवास करतात. कडाक्याच्या थंडीत लाखो यात्रेकरू पवित्र स्नानासाठी बोट राईडचा आनंद घेत संगमापर्यंत पोहोचतात. ही बोट सफर सुरक्षित व जलद प्रवासासाठी महत्त्वाची ठरते.

तानाजी-नेताजी | अराऊंड द वर्ल्ड ...

# कसे असणार शहरी सरकार नव्या महापौरांवर दारोमदार

तानाजी म्हणाला, नेताजी महानगरपालिका निवडणुकीनंतर शहराला नव्या महापौरांची प्रतीक्षा आहे. शहराचा प्रथम नागरिक कोण असेल? सन्मानाच्या पदावर कोण बसेल? अवघी उत्सुकता ओसंडून वाहत आहे. नेताजी म्हणाले, तानाजी हे प्रथम नागरिक द्वितीय नागरिक भानगड काय आहे? सरळ-सरळ महापौर किंवा मेयर म्हणा ना. जो व्यक्ती योग्य वाटतो त्याला बहुमताचा पक्ष खुर्चीवर बसविणार. लॉटरी पद्धतीने निवड झाल्यामुळे महिला महापौर अधिकारावर येणार हे पक्के. सत्ताधारी गटाच्या महिलांमध्ये प्रतिस्पर्धा वाढली आहे. कुणाला वाटते माझा चेहरा नवा करकरीत आहे. कुठलाच डाग नाही. तर दुसरीला वाटते माझी चौथी टर्म आहे. मोठा अनुभव आहे. तिसरीला वाटते प्रशासन हाताळू शकेल असा अनुभव गाठीशी आहे. राजकीय डावपेच माहित आहेत. आता पक्ष माझाच विचार करणार म्हणजे करणार. तानाजी म्हणाले, नेताजी ९ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर महापालिकेत लोकांचे सरकार येत आहे. प्रशासक राज संपले आहे. लोकांना आता विकास हवा आहे. सडकेवर दिसणारे गड्डे, पिण्याच्या पाण्याला दुर्गंध, खाली प्लॉट मध्ये पडलेला कचरा उडून लोकांच्या दाराशी येणे, वाहतुकीची समस्या भेडसावत आहे.




आता नव्या महापौरांसमोर अवघ्या समस्या उभ्या होतील आणि त्यांना निराकरण करावे लागेल. कामासाठी नव्या महापौरांना कधी आपल्या हाती हंटर घ्यावा लागेल. महानगरपालिका प्रशासनाकडून काम करायचे हे एक दिव्य आहे. महापौरांना महानगरपालिका शाळा सुधारण्याकडे लक्ष पुरवावे लागेल. विद्यार्थ्यांच्या गळतीची कारणे शोधून काढावी लागतील. महापालिकेचे अनेक बगीचे आहेत. काहींचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यांचे सौंदर्य जपावे लागणार आहे. शुद्ध जलपूर्ती हा महत्वाचा प्रश्न आहे. मागे इंदूरमध्ये जे झाले ते नागपुरात होऊ नये, यासाठी जलप्रदाय विभागाला सचेत ठेवण्याचे काम मेयरला करावे लागेल. फुटपाथ अतिक्रमणाने हाऊसफुल्ल झाले आहेत. त्यांना मोकळे करावे लागेल. समाधान काढावे लागेल. नेताजी म्हणाले, तानाजी नागपूरची न्यूयार्कसोबत तुलना नको. विदेशात शहराचे पोलीस दल व प्रशासन महापौरांच्या अधीन असते. तो शहराचा एकमेव बॉस असतो. कुणी विदेशी पाहुणे विमानतळावर उतरले तर त्यांचे स्वागत महापौरांना करावे लागते. आता मात्र तसा भाग दिसत नाही.

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

www.navarashtra.com

#Viral #फीवर

"उच्च शिक्षण क्षेत्रात निष्पक्षता आणि समानता प्रस्थापित करणे हाच या नियमांचा मुख्य उद्देश आहे. मी सर्वांना आश्वस्त करू इच्छितो की, यात कोणताही भेदभाव होणार नाही."

–**धर्मेंद्र प्रधान**, केंद्रीय शिक्षणमंत्री

# जपानच्या स्टोअरमध्ये चोरीची पूर्ण मोकळीक

अजब-गजब

टोकियोत सध्या एक असा स्टोअर चर्चेत आहे, ज्याची अनोखी स्कीम सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. हे काही सामान्य दुकान नसून येथे येणाऱ्या लोकांना चोरी करण्याची पूर्ण मोकळीक दिली जाते. स्टोअरच्या नियमांनुसार आत प्रवेश केल्यावर व्यक्तीला पूर्ण ६० सेकंद मिळतात, ज्यात तो कपडे, ॲक्सेसरीज, गॅझेट्स किंवा अन्य कुठलेही सामान उचलू शकतो. परंतु ही ऑफर जितकी आकर्षक वाटते तितकीच आव्हानात्मक आहे. कारण याच्या सोबत काही कठोर अटीही जोडलेल्या आहेत. या स्टोअरचे नाव टीओएच आहे. जपानी भाषेत टीओएच हा चोरीसाठी वापरण्यात येणाऱ्या एक अक्षराच्या उच्चारणांपैकी एक आहे. हा स्टोअर १३-१६ मार्चपर्यंत ४ दिवसांसाठी पुन्हा खुला केला जाणार आहे. मागील वर्षी जेव्हा हा पहिल्यांदा सुरू झाला होता, तेव्हा हा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. परंतु अनेकदा लोकांना कित्येक तासांपर्यंत रांगेत उभे रहावे लागले होते, या अनोख्या प्रयोगाचे आयोजन एका रेडिओ कार्यक्रमाशी निगडित कलाकारांकडून करण्यात आले होते. या स्टोअरमध्ये प्रवेश करण्यासाठी १ हजार येन द्यावे लागतात. आतील वातावरण एखाद्या भूमिगत बाजारासारखे तयार करण्यात आले आहे, प्रवेश मिळताच तुमच्याकडे ६० सेकंद असतात, ज्यात हाताला लागेल ते उचलता येते. मग यात कपडे, ॲक्सेसरीज किंवा तंत्रज्ञानाशी निगडित कुठलेही सामान असू शकते. परंतु या पूर्ण सेटअपमध्ये सर्वात मोठे आव्हान शांतता आहे. स्टोअरच्या प्रत्येक कोपऱ्यात अत्यंत संवेदनशील मायक्रोफोन लावण्यात आले आहेत, जे किंचित कृत्यही टिपते. जरा जरी आवाज झाला तर तुम्हाला त्वरित बाहेर पाठविले जाते. यानंतर कुठलेच सामान मिळत नाही, तसेच पुन्हा प्रयत्न करण्याची संधी दिली जात नाही. मागील वर्षी ही संकल्पना वेगाने व्हायरल झाली होती. ज्यानंतर मोठी गर्दी निर्माण झाली होती. अनेकदा लोकांना स्टोअरमध्ये प्रवेशासाठी कित्येक तासांसाठी प्रतीक्षा करावी लागली होती. या स्टोअरचे वातावरण एखाद्या गुप्त किंवा अंडरगाऊंड मार्केटसारखे ठेवण्यात आले असून यात आत जाणाऱ्यांचा रोमांच आणि तणाव दोन्ही वाढत असतो. ६० सेकंदांच्या आत सामान उचलणे आणि मग बहेर पडणे, ते देखील कुठल्याही आवाजाशिवाय लोकांसाठी मोठे आव्हान ठरते.



# पृथ्वीवर पाणी कुठून आले?

SCIENCE FACTS

पृथ्वीवरील महासागर आणि जीवसृष्टीसाठी आवश्यक असलेले पाणी नेमके कुठून आले, हे विज्ञानासाठी आजही एक मोठे कोडे आहे. आतापर्यंत शास्त्रज्ञांचा असा विश्वास होता की, चार अब्ज वर्षांपूर्वी लेट हेवी बॉम्बार्डमेंट काळात कोसळलेल्या धूमकेतू आणि उल्कापातांमुळे पृथ्वीवर पाणी आले. मात्र, युनिव्हर्सिटी स्पेस रिसर्च असोसिएशनच्या (यूएसआरए) नव्या संशोधनाने या सिद्धांताला मोठे आव्हान दिले आहे. शास्त्रज्ञांनी अपोलो मोहिमेदरम्यान चंद्रावरून आणलेल्या खडकांचा आणि मातीचा अत्यंत सूक्ष्म अभ्यास केला. पृथ्वीवर भूगर्भीय हालचालींमुळे जुने पुरावे नष्ट होतात; मात्र चंद्रावर वातावरण नसल्यामुळे तिथे अब्जावधी वर्षांचा इतिहास गोठलेल्या स्थितीत सुरक्षित आहे. शास्त्रज्ञांनी या खडकांमधील ऑक्सिजन आयसोटोप्सचे विश्लेषण केले. चंद्राच्या पृष्ठभागावर अब्जावधी वर्षांपासून जतन झालेल्या नोंदी दर्शवतात की, या उल्कांनी पृथ्वी-चंद्र प्रणालीला फक्त अल्प प्रमाणातच पाणी पुरवले. संशोधनानुसार, चंद्रावरील मातीमध्ये सुमारे १ टक्के पदार्थ उल्कांमुळे आलेला असू शकतो. हे प्रामुख्याने कार्बनयुक्त उल्कांमधून आलेले असून, त्यातील पाण्याचे प्रमाण पृथ्वीवरील महासागरांचे स्पष्टीकरण देण्यासाठी अपुरे आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाचा ७१ टक्के भाग महासागरांनी व्यापलेला असला, तरी पाण्याचे एकूण वजन पृथ्वीच्या वस्तुमानाच्या केवळ ०.०२३ टक्के आहे, तरीही हे प्रमाण खूप मोठे असून, ते फक्त उल्कांमुळे आले असे मानणे आता कठीण झाले आहे. या संशोधनाचा अर्थ असा होतो की, पृथ्वीच्या उत्पत्तीच्या वेळीच किंवा तिच्या अंतर्गत हालचालींतून पाण्याचा मुख्य साठा निर्माण झाला असावा, तो बाहेरील उल्कापातांवर अवलंबून नव्हता. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील कायमस्वरूपी सावली असलेल्या प्रदेशात असलेले पाणी भविष्यातील मानवी वस्तीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरेल.



## सीरियामध्ये जगातील सर्वात प्राचीन मनोरे

माईंड ब्लो

इजिप्तमधील तुतानखामेनचा मकबरा असो किंवा इटलीतील पॉम्पेई शहर, पुरातत्त्व विभागाच्या शोधांनी नेहमीच मानवी इतिहासाला नवी दिशा दिली आहे. मात्र, सध्या गृहयुद्धाने होरपळलेल्या सीरियामध्ये लागलेला 'टेल करामेल' येथील शोध शास्त्रज्ञांसाठी सर्वात मोठा चमत्कार ठरला आहे. हजारो वर्षांपूर्वी येथे एक अत्यंत प्रगत संस्कृती नांदत होती, याचे पुरावे आता समोर आले आहेत. उत्तर सीरियातील अलेप्पो शहरापासून २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या टेल करामेलमध्ये उत्खननादरम्यान दगडांचे गोलाकार टॉवर्स (मनोरे) सापडले आहेत. रेडिओकार्बन डेटिंगनुसार, हे टॉवर्स इसवी सन पूर्व ११ व्या सहस्राब्दीपासून ते इसवी सन पूर्व ९६५० मधील आहेत. मानवी इतिहासातील ही अशा प्रकारची सर्वात जुनी रचना मानली जात आहे. या शोधामुळे मानवी संस्कृतीच्या सुरुवातीच्या कथेला एक नवीन कलाटणी मिळाली आहे. पुरातत्वशास्त्रज्ञांच्या मते, हे विशाल टॉवर्स केवळ राहण्यासाठी किंवा देखरेखीसाठी नव्हते. त्यांचा वापर धार्मिक कार्यांसाठी आणि सामूहिक सभांसाठी केला जात असावा. त्या काळातील लोक येथे एकत्र येऊन विधी आणि अनुष्ठान करत असत. यावरून हे स्पष्ट होते की, इतक्या प्राचीन काळी देखील मानवी समाज संघटित होता आणि त्यांच्या स्वतःच्या सांस्कृतिक परंपरा होत्या. टॉवर्सच्या परिसरात सुमारे ९० घरे आणि लहान खोल्या सापडल्या आहेत, ज्यामुळे ही एक मोठी वस्ती असल्याचे सिद्ध होते.

STORY कथा

# मूर्ख राजा आणि हुशार ब्राह्मण



अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एके दिवशी एका राजाने सर्व ब्राह्मणांना आपल्या दरबारात बोलावले आणि म्हणाला, ₹मला एक भव्य परीक्षा घ्यायची आहे. जो कोणी ही परीक्षा उत्तीर्ण होईल त्याला भव्य बक्षीस मिळेल.₹ सर्व ब्राह्मणांना राजेशाही बक्षीसाची अपेक्षा होती, परंतु राजाची त्यांची परीक्षा घेण्याची पद्धत खूपच विचित्र होती. त्याने सर्व ब्राह्मणांना असे काहीतरी सांगण्यास सांगितले जे त्याला पूर्णपणे समजेल आणि त्याला त्रास देणार नाही. एका हुशार ब्राह्मणाने त्याबद्दल विचार केला आणि मग राजाकडे गेला. तो म्हणाला, ₹महाराज, मी तुम्हाला एक अशी गोष्ट सांगेन जी तुम्हाला समजणे कठीण होणार नाही आणि ती तुम्हाला त्रास देणार नाही.₹ ब्राह्मणाने राजाला एक साधी गोष्ट सांगितली, कोणत्याही गुंतागुंतीशिवाय. राजाला कथा समजली आणि तो खूश झाला. हुशार ब्राह्मणाने राजाला समजावून सांगितले की कधीही आपल्या अधिकाराचा गैरवापर करू नये आणि शहाणपणाने निर्णय घ्यावेत. राजाने ब्राह्मणाचे म्हणणे ऐकले आणि त्याला जाणवले की त्याच्या आळशीपणामुळे तो राज्याच्या भल्यासाठी काहीही करत नाही. त्यानंतर, राजाने आपल्या सवयी बदलल्या आणि आपल्या राज्याचे योग्यरित्या राज्य करू लागला.

**तात्पर्य :** आपण आपले निर्णय विचारपूर्वक घेतो तेव्हा खरे शहाणपण येते.

# सदा असे सोज्वळ निवृत्तिसंगें

आस्था

**शर्करेची गोडी निवडावया भले। साधु निवडिले सत्संगती॥ सत्संगे प्रमाण जाणावया हरी। येर ते निर्धारी प्रपंचजात॥ भानुबिंब पाहा निर्मळ निराळा। अलिप्त सकळ तैसे साधु॥ ज्ञानदेव हरि जपोनि निर्मळ। सदा असे सोज्वळ निवृत्तिसंगें॥ सोळा कळि चंद्र पूर्णिमे पूर्ण बोधु। संतजना उद्बोधु सागरन्यायें॥ नित्यता पूर्णिमा हृदयीं चंद्रमा। आलिंगन मेघश्यामा देतु आहे॥**

परमात्म्याची गोडी निवडण्याचा अधिकार महान महान संतांनाच आहे. म्हणून हरिला ओळखण्यांला एक सत्संगतीच पाहीजे. इतर लोंक असले तरी त्यांना प्रपंचाची माहिती असेल. पण श्रीहरिची ओळख करून देणारे एक साधुच आहेत. जसे पाण्यांमध्ये सूर्याचे प्रतिबिंब पडलें तरी सूर्य त्याहून अलिप्त आहे. त्याप्रमाणे साधुसंत प्रपंचात वागत असूनही अलिप्त असतात. श्रीहरीच्या जपाने मी निर्मळ होऊन अत्यंत पवित्र अशा निवृत्तीरांयाच्या संगतीत सदा आहे. असे माऊली ज्ञानदेव सांगतात. पौणीमेच्या दिवसी चंद्र सोळा कलांनी परिपूर्ण झाला असता सागराला ज्याप्रमाणे भरती येते त्याप्रमाणे श्रीहरिस पाहता संतांच्या हृदयरुपी सागरास भरती येते.

# विवो एक्स २००टी ५जी

LAUNCH पॅड



विवो एक्स २००टी ५जी स्मार्टफोन भारतीय बाजारात ग्राहकांसाठी लॉँच करण्यात आला आहे. महत्त्वाच्या फीचर्सबद्दल बोलायचे झाले तर हा हँडसेट ५० मेगापिक्सलचा टेलिफोटो कॅमेरा आणि ३२ मेगापिक्सलचा सेल्फी कॅमेरा यासारख्या फीचर्ससह आणला गेला आहे. विवोच्या या फोनच्या १२ जीबी आणि २५६ जीबी व्हेरिएंटची किंमत ५९,९९९ रुपये आणि १२ जीबी आणि ५१२ जीबी व्हेरिएंटची किंमत ६९,९९९ रुपये आहे. या प्राइस रेंजमध्ये विवो कंपनीचा हा नवीन फोन मोटोरोला सिग्नेचर आणि ओप्पो रेनो १५ प्रो मिनीला टक्कर देणार आहे. अँड्रॉइड १६ वर काम करणारा हा फोन ओरिजिन ओएस ६ वर काम करेल. विवोच्या या फोनमध्ये ६.६७ इंचाचा AMOLED फुल एचडी प्लस रिझोल्यूशन डिस्प्ले आहे जो १२०Hz रिफ्रेश रेटला सपोर्ट करतो. स्पीड आणि मल्टीटास्किंगसाठी या विवो फोनमध्ये मीडियाटेक डायमेंसिटी ९४०० प्लस चिपसेटचा वापर करण्यात आला आहे. या फोनमध्ये ५० मेगापिक्सलचा ZEISS प्रायमरी सेन्सर, ५० एमपी अल्ट्रा वाइड अँगल सेन्सर आणि ५० एमपी सुपर टेलिफोटो कॅमेरा सेन्सर आहे. सेल्फीसाठी ३२ मेगापिक्सलचा फ्रंट कॅमेरा सेन्सर देण्यात आला आहे. फोनमध्ये चैतन्य आणण्यासाठी ६२०० एमएएचची दमदार बॅटरी देण्यात आली आहे, जी ४० वॉट वायरलेस आणि ९० वॉट फ्लॅश चार्जला सपोर्ट करते. सुरक्षेसाठी या फोनमध्ये ड्युअल-बँड Wi-Fi, ब्लूटूथ व्हर्जन ५.४, ५जी आणि ३डी अल्ट्रासोनिक फिंगरप्रिंट सेन्सर आहे.

# निरोगी पचनसंस्थेसाठी 'व्हिटॅमिन-यू' वरदान

हेल्थ

प्रदूषित वातावरणामुळे आपली प्रतिकारशक्ती कमकुवत होत चालली आहे. कमी वयातच अनेक आजार घेरतात. अशा परिस्थितीत शरीर सुदृढ ठेवण्यासाठी जीवनसत्त्वे आणि खनिजांनी युक्त आहार घेणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक जीवनसत्त्वांबद्दल आपण ऐकले असेल, पण तुम्हाला 'व्हिटॅमिन-यू' बद्दल माहीत आहे का? व्हिटॅमिन-यू हे कोणतेही औषध किंवा सप्लिमेंट नसून, एक नैसर्गिक घटक आहे. हे प्रामुख्याने कोबी, ब्रोकोली आणि 'क्रुसिफेरस' गटातील भाज्यांमध्ये मुबलक प्रमाणात आढळते.

**त्वचेचे आरोग्य सुधारते :** पोटातील अतिरिक्त ॲसिड संतुलित करण्यासाठी आणि पचन सुधारण्यासाठी हे अत्यंत गुणकारी मानले जाते. हे पोटात तयार होणारे अतिरिक्त ॲसिड कमी करते, ज्यामुळे जळजळ आणि ॲसिडिटीची समस्या दूर होते. जंक फूड किंवा तणावामुळे आंतड्यांना होणाऱ्या सूक्ष्म जखमा भरून काढण्याचे आणि आंतड्यांचा आतील थर मजबूत करण्याचे काम हे जीवनसत्त्व करते. हे शरीरातील दाह कमी करते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करते. पोषक तत्त्वांचे शोषण वाढल्यामुळे त्वचेचे आरोग्य सुधारते आणि मूडही चांगला राहतो.



- **कोबी आणि ब्रोकोली :** लंचमध्ये तुम्ही कच्ची कोबी किंवा वाफवलेली ब्रोकोली खाऊ शकता. कोबीवर लिंबाचा रस टाकून खाणे अधिक फायदेशीर ठरते.
- **जास्त शिजवणे टाळा :** अन्न जास्त शिजवल्यास त्यातील व्हिटॅमिन-यू चे प्रमाण कमी होते. त्यामुळे भाज्या कच्च्या स्वरूपात किंवा हलक्या वाफवून कोशिंबीर म्हणून खाल्ल्यास त्याचा जास्त फायदा होतो.
- **नैसर्गिक स्रोत :** यासाठी कोणत्याही कृत्रिम सप्लिमेंटची गरज नाही, केवळ घरगुती ताज्या भाज्यांतून हे मुबलक प्रमाणात मिळू शकते.

# घराचे पायापूजन करताना पाळा नियम

वास्तू

नवीन घर बांधणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. हे स्वप्न निर्विघ्नपणे पूर्ण व्हावे यासाठी 'पायापूजन' किंवा 'भूमिपूजन' विधी अत्यंत महत्त्वाचा असतो. त्यामुळे अगदी घराची पायाभरणी करताना देखील काही वास्तू नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. नवीन इमारत किंवा घर बांधताना पायापूजनाचे वास्तुनियम जाणून घेऊया.



**दिशा :** वास्तूशास्त्रानुसार घराची पायाभरणी आणि पूजन नेहमी ईशान्य कोपऱ्यातून सुरू करावे. कारण या दिशेला देवांचा वास असल्याचे मानले जाते. तसेच पाया खोदण्याचे काम सूर्योदयापूर्वी आणि सूर्यास्तानंतर करू नये.

**मुहूर्त :** पायापूजन कधीही कोणत्याही दिवशी करू नये. शास्त्रानुसार शुभ मुहूर्त, तिथी आणि नक्षत्रावरच भूमीचे पूजन करावे. श्रावण, कार्तिक, मार्गशीर्ष आणि माघ महिने घराच्या बांधकामासाठी अत्यंत शुभ मानले जातात. तसेच मंगळवार आणि शनिवार टाळून ज्योतिषांच्या सल्ल्याने मुहूर्त ठरवावा.

**कलश पूजन :** पायाच्या आत कलश बसवावा, त्या कलशात एक चांदीचा साप, चार लोखंडी खिळे, हळदीच्या पाच गाठी, तुळशीची पाने, सुपारीची पाने, मातीचे दिवे, फळे, नारळ, गूळ, चौकोनी दगड, मध, पंचरत्न आणि पंचधातू या वस्तू ठेवाव्यात. चांदीचा साप कलशात ठेवून पूजन केल्यास नैसर्गिक आपत्तींपासून घराचे रक्षण होते असे मानले जाते.

चारोळी



**आयुष्याचा खेळ खेळण्यासाठी,**
**तुझ्यासारखा सोबती हवा...**
**जेव्हा हताश, निराश होईल मी,**
**तेव्हा हातात तुझा हात हवा...**

निमिष विनोद माहेश्वरी यांचेसाठी मुद्रक आणि प्रकाशक अचला श्रीनिवास यांनी नवभारत प्रेस लि. प्लॉट नं. १३, सेक्टर-८, सानपाडा (पूर्व), नवी मुंबई-४०० ७०५ येथे मुद्रित करुन, नवभारत प्रेस लि., दुसरा मजला, एक्सप्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजी नगर, जे. एम. रोड, पुणे- ४११ ००४ येथे प्रकाशित केले.
एडिटर इन चीफ-निमिष विनोद माहेश्वरी. कार्यकारी संपादक- संजय मलमे*
(*पी.आर.बी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)
पुणे फोन : ०२०-२९९७०५७०/५८०. मुंबई फोन : ०२२-४९६४२३०९
सानपाडा प्रेस फोन : ०२२-४६१६०८९४
वर्ष १२, अंक २४ RNI NO. MAHMAR/२०१५/६६३०३.

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919





# आमचा देव गेला!

## अजितदादांच्या अकाली निधनाने मिटकरी भावविवश

### खासदार निलेश लंके यांनीही फोडला टाहो

**बारामती, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** उपमुख्यमंत्री अजित पवारांवर गुरुवारी शासकीय इतमातात अत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी एकच टाहो फोडला. सामान्य कार्यकर्त्याला आमदार केले, आमचा देव गेला, असे म्हणत आमदार अमोल मिटकरी यांनी टाहो फोडला. मिटकरींसह खासदार निलेश लंके यांनाही अश्रू अनावर झाले. अजितदादा वारले नाहीत, चुकीची बॉडी आणली आहे. बारामतीकरांना काही कळतेय का? दादा लय हुशार माणूस आहे. आम्हाला नाय सोडून जाणार, असे म्हणत मिटकरी आणि निलेश लंकेंनी टाहो फोडला.

अमोल मिटकरी म्हणाले की, सहा वर्षांपूर्वी मी भाड्याच्या घरात राहणारा माणूस होतो. मला अचानक फोन आला की, तुला मी आमदार करणार आहे. तू कागदपत्र घेऊन ये. तेव्हा मी दादांना सांगितले की, दादा माझ्याकडे कुठलाच कागद नाही. इन्कम टॅक्स वगैरे भरायचा मी काही संबंध नव्हता. दादांनी वकील लावून कारण कागदांची पूर्तता करायला सांगितली.



### दादांची 'देवगिरी'तून चप्पल चोरून आणली, अन्...

पाच वर्षात माझे घर झाले. माझी एकच विनंती होती की, दादा तुमच्या पुण्याईने घर झाले आहे. जसे बिग बॉसच्या सुरज चव्हाणचे झाले, त्याप्रमाणे माझे घर झाले. दादांना मी सांगितले होतं की, माझ्या घराला पाय लावा. मागच्या वर्षी बजेटचे अधिवेशन होते. त्यांनी मला सांगितले की, माझ्या मागे बजेटची गडबड आहे. मी येऊ शकत नाही. तुला घाई असेल तर तू पूजा उरकून घे. कारण आता उन्हाळा खूप लागलेला आहे. एकदा दादा मला ओरडले देखील होते. मी येईल, परंतु तू उरकून घे असे त्यांनी सांगितले. त्यानंतर मी देवगिरीवर गेलो, तिथून दादांची चप्पल मी चोरून आणली आणि त्याची पूजा माझ्या घरात जाऊन केली, असा भावनिक क्षण सांगताना अमोल मिटकरी धाय मोकलून रडल्याचे पाहायला मिळाले.

### कोणाकडे बघायचे? मिस यू दादा : सूरज चव्हाण



बारामती, आई-वडिलांनंतर मी तुमच्यात माझे आई-आप्पा पाहत होतो आणि तुम्ही पण मला सोडून गेलात, आता या पोरक्या सूरजने कोणाकडे बघायचे? मिस यू दादा, अशा शब्दात बिग बॉस फेम सूरज चव्हाणने आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. गुरुवारी अजितदादांच्या पार्थिवावर बारामती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. अजित पवार यांना शेवटचा निरोप देण्यासाठी जनसागर उसळला होता. 'एकच वादा, अजित दादा', 'अमर रहे, अमर रहे, अजित दादा अमर रहे', 'परत या, परत या, अजित दादा परत या' 'दादा, दादा' असा हंबरडा फोडत हजारोंच्या साश्रू नयनांनी अजित पवार यांना अखेरचा निरोप दिला.

### अजितदादांच्या सुरक्षारक्षकांनाही अश्रू अनावर; पार्थ-जय पवारांनी दिला आधार



बारामती, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी अग्निसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांच्यासोबत नेहमीच खंबीरपणे उभे राहणाऱ्या सुरक्षारक्षकांनही अश्रू अनावर झाले. अजित पवारांच्या पार्थिवाला अग्नी दिल्यानंतर चितेजवळ त्यांच्या सुरक्षारक्षकांना भावना अनावर झाल्या. तिथेच ते धाय मोकलून रडू लागले. त्यामुळे बाजुला असलेल्या जय पवारांनी त्यांना मिठीत घेतले अन् त्यांचे सांत्वन केले. अजित पवारांच्या जाण्याने अबालवृद्धांना दु:ख झाले आहे. त्यांच्याबरोबर एक क्षणही व्यतित केलाल माणूस त्यांच्याविषयी भरभरून बोलतोय. त्यामुळे त्यांच्यासोबत सतत असणारे त्यांचे सुरक्षा रक्षकही आज हवालदिल झाले. त्यामुळे आपल्या दादाला अनंतात विलीन होताना पाहताना त्यांच्याही अश्रूंचा बांध फुटला असेल. अजित पवारांच्या निधनानंतर पार्थ आणि जय पवार यांच्याही भावना अनावर झाल्या होत्या. पण जबाबदारीचे भान ठेवून त्यांना वावरावे लागले. अंत्यसंस्काराची तयारी करण्यापासून आलेल्या प्रत्येकाचे सांत्वन स्वीकारण्यापर्यंत सर्वकाही त्यांनी नेटाने सांभाळले. त्यामुळे आपल्या वडिलांच्या सुरक्षा रक्षकांनाही त्यांनीच आधार दिला.

## राजकीय वर्तुळात मोठी पोकळी



**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या अकाली निधनाने राज्याच्या राजकीय वर्तुळातही मोठी पोकळी निर्माण झाली आहे. तर, गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या दोन राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या चर्चांना या दुःखद घटनेनं वेगळ्याच वळणावर नेऊन ठेवले आहे. तसेच, आता अजित दादांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतृत्व आणि उपमुख्यमंत्री पदाच्या अनुषंगाने चर्चा घडत असतानाच, राष्ट्रवादी काँग्रेसमधील वरिष्ठ नेते गेल्या काही महिन्यांतील चर्चेच्या आठवणी, प्रसंग सांगताना भावविवश झाल्याचे गुरुवारी दिसून आले. सामान्य कार्यकर्त्यांपासून ते ज्येष्ठ नेत्यांपर्यंत सर्वांच्या डोळ्यात अश्रू होते.

बुधवारी सकाळी अजित पवारांचे निधन झाल्याचे समजताच कार्यकर्त्यांनी रुग्णालयाबाहेर गर्दी केली होती. तसेच रात्री उशिरापर्यंत कार्यकर्ते 'दादा अमर रहे'च्या घोषणा देत होते. गुरुवारीही हेच चित्र पहावयास मिळाले.

## मृत्यूसमोर सर्व वाद संपतात!

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या निधनावर सामाजिक कार्यकर्त्या आणि आंदोलनकर्त्या अंजली दमानिया यांनी भावनिक प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार यांच्याविरुद्ध आपण आयुष्याचा मोठा काळ संघर्ष केला असल्याचे सांगत हा संघर्ष वैयक्तिक नसून वैचारिक आणि तत्त्वांचा होता, असे त्यांनी स्पष्ट केले.



अंजली दमानिया म्हणाल्या की, अजित पवार यांच्याशी मतभेद अत्यंत तीव्र होते. लोकशाही मूल्ये, पारदर्शकता आणि राजकारणातील नैतिकता या मुद्द्यांवरून त्यांच्याविरोधात लढा दिला. मात्र, काल त्यांच्या निधनाने हा संघर्ष आज संपला आहे. मृत्यूसमोर सर्व वाद, मतभेद आणि संघर्ष थांबतात, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

### 'हा' क्षण टीका, आरोपांचा नाही : अंजली दमानिया

आजचा क्षण हा टीका किंवा आरोपांचा नसून विचार करण्याचा आहे, असेही दमानिया यांनी सांगितले. लोकशाही म्हणजे काय, मूल्यांसाठीचा संघर्ष किती महत्त्वाचा आहे आणि वैचारिक मतभेद असतानाही माणुसकी कशी जपली पाहिजे, यावर आत्मपरीक्षण करण्याची ही वेळ आहे, असे त्या म्हणाल्या. शेवटी त्यांनी ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो, अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली अपर्कण केली.

## सांत्वन • सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवारांना दिला आधार

# तुमचा एकदम लाडला...!

### सुळेंच्या अश्रूंचा बांध फुटला

**बारामती, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाची वार्ता मिळताच खासदार सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार दिल्लीतून बारामतीत आल्या. यावेळी पवार कुटुंबीयांचे स्नेही विठ्ठल मणियार देखील दाखल झाले. त्यांना पाहताच सुप्रिया सुळेंच्या अश्रूंचा बांध फुटला. 'तुमचा एकदम लाडला', असे म्हणत मणियार यांच्या गळ्यात पडून सुळेंनी अश्रूंना वाट मोकळी करून दिली. यावेळी सुनेत्रा पवार यांना देखील अश्रू थांबवता आले नाहीत. या दोघींनीही विठ्ठल मणिया यांनी आधार दिला आणि त्यांचे सांत्वन केले.

काही वर्षांपूर्वी झालेल्या एका मुलाखतीत विठ्ठल मणियार यांनी शरद पवारांशी मैत्री कशी झाले ते उलगडले होते. महाविद्यालयीन काळात आपण शरद पवारांच्या विरोधात विद्यार्थी प्रतिनिधीची निवडणूक लढवली होती.



### कोण आहेत विठ्ठल मणियार?

- विठ्ठल मणियार हे एक व्यावसायिक आहेत. प्रदीर्घ काळापासून ते शरद पवारांचे आणि त्यांच्या कुटुंबाचे स्नेही आहेत. शरद पवार राजकारणात येण्याच्या आधीपासून म्हणजेच महाविद्यालयीन काळापासून त्यांची आणि विठ्ठल मणियार यांची मैत्री आहे.
- तसेच त्यांचे कौटुंबिक संबंधही अत्यंत जिव्हाळ्याचे आहेत. गेल्या अनेक दशकांपासून विठ्ठल मणियार आणि शरद पवार हे दोघंही खूप चांगले मित्र आहेत. विठ्ठल मणियार यांनी सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार या दोघींना त्यांनी आधार दिला. त्यावरुनच हे दिसून आलं की पवार कुटुंबाचे आणि विठ्ठल मणियार अत्यंत जवळचे स्नेही आहेत.



## एकत्र येण्यासाठी आमची वाटचाल!

### शशिकांत शिंदे यांचे सूचक वक्तव्य

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासाठी आमची वाटचाल असेल, असे सूचक वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी बारामती येथे केले. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी विमान दुर्घटनेत दुर्दैवी निधन झाल्याने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असतानाच, अजित पवारांच्या जाण्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटासमोर नेतृत्वाची मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यामुळे येत्या काळात या गटाची दिशा, निर्णयप्रक्रिया आणि राजकीय रणनीती काय असेल, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



### आता सत्य बोलणे गरजेचे

शशिकांत शिंदे म्हणाले, आता सत्य बोलणे गरजेचे आहे. महापालिका निवडणुकांनंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येऊ, असे अजित पवार यांनी स्वत: सांगितले होते. त्या अनुषंगाने काही बैठका देखील झाल्या होत्या. अजितदादा हे शरद पवारांकडे पाहूनच हे वक्तव्य करत होते. त्यामुळे त्याच दिशेने आमची पुढील वाटचाल असेल. दरम्यान, अजित पवार यांनीही यापूर्वी एका जाहीर सभेत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत अप्रत्यक्ष संकेत दिले होते. आम्ही एकत्र आलो की काही लोकांच्या पोटात दुखायला का लागते? असा सवाल उपस्थित करत त्यांनी या चर्चांना दुजोरा दिला होता.

### एकत्र येण्याचे 'गिफ्ट' द्यायचे होते : अंकुश काकडे

पुण्यातील नेते अंकुश काकडे यांनीही दोन्ही राष्ट्रवादी एकत्रिकरणावर मोठे भाष्य केले आहे. १२ डिसेंबरला दोन राष्ट्रवादी एकत्र येण्याचे गिफ्ट साहेबांना देण्याचे अजित पवारांच्या मनात होते, असे अंकुश काकडे यांनी सांगितले. राजकारणातील माझी आणि अजित दादांची सुरुवात एकच वेळेला झाली. दादा हे आमचे नेते नेहमी राहिले, पवार साहेबांचा राजकीय वारसा घेऊन दादांनी केलेले काम महाराष्ट्र विसरू शकणार नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### एकत्र येण्याच्या चर्चांना नवसंजीवनी

अजित पवारांच्या निधनानंतर बदललेल्या राजकीय परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये पुन्हा सलोखा निर्माण होणार का, याबाबत उत्सुकता वाढली असून, शशिकांत शिंदे यांच्या या विधानामुळे एकत्र येण्याच्या चर्चांना नवसंजीवनी मिळाल्याचे मानले जात आहे. येत्या काही दिवसांत या संदर्भात नेमकी काय भूमिका घेतली जाते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.



**बारामती,** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी खासदार सुप्रिया सुळे यांनी सुनेत्रा पवारांना आधार देत अंत्यविधीच्या ठिकाणी आणले. अंत्यविधीच्या ठिकाणी जात असताना सुप्रिया सुळेंनाही रडू कोसळले. अजित पवारांचे अंतिम दर्शन घेत असताना सुनेत्रा पवारांना अश्रू अनावर झाले. यावेळी सुळेंनी त्यांना धीर दिला.

## दादांच्या महत्त्वाच्या खात्यांचे भवितव्य काय?

### उपमुख्यमंत्रीपद राष्ट्रवादीकडेच राहणार का?

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली असून, त्यांच्या ताब्यात असलेल्या महत्त्वाच्या खात्यांचे आणि पदांचे पुढे काय होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वित्त, नियोजन आणि उत्पादन शुल्क ही अत्यंत महत्त्वाची खाती, तसेच पुणे आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद आता कोणाकडे जाणार, याबाबत राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

उपमुख्यमंत्रीपद राष्ट्रवादीलाच दिले जाणार का, हा प्रश्नही आहे. उपमुख्यमंत्रीपदासाठी कोणाच्या नावावर शिक्कामोर्तब होणार, याबाबत अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट झालेली नाही. अजित पवार यांच्या घराण्यातील कुणीतरी किंवा पक्षातील ज्येष्ठ व अनुभवी नेत्यांचा विचार केला जाईल, असे संकेत राजकीय वर्तुळातून दिले जात आहेत. वित्त आणि नियोजन खाते अजित पवारांकडे होते. अर्थसंकल्प, विकास निधीचे नियोजन, विविध योजनांना निधी उपलब्ध करून देणे या सर्व बाबींमध्ये त्यांची भूमिका निर्णायक होती.

# यापूर्वीच्या चौकशीचे काय झाले? डीजीसीएला सवाल!

**तांत्रिक बिघाड आणि इतर कारणांचा तपास डीजीसीए करील : शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत**

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** महाराष्ट्रात आणि देशात यापूर्वी घडलेल्या अनेक विमान अपघातांच्या चौकशीचे पुढे काय झाले, असा थेट सवाल उबाठा शिवसेना खासदार संजय राऊत यांनी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाला (डीजीसीए) केला आहे. काल उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला झालेल्या अपघातानंतर हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असल्याचे त्यांनी सांगितले. संजय राऊत म्हणाले की, आतापर्यंत देशात अनेक चार्टर फ्लाइटचे अपघात झाले आहेत. अहमदाबादमध्ये बोईंग विमान कोसळून अनेकांचा बळी गेला, गुजरातच्या माजी मुख्यमंत्र्यांचाही मृत्यू झाला. या सर्व घटनांच्या चौकशीचे आदेश डीजीसीएने दिले, मात्र त्या चौकशांचे निष्कर्ष पुढे काय झाले, याचा जाहीर अहवाल देशासमोर कधीच आला नाही.

### सुरक्षितता वैधता तपासण्याची जबाबदारी डीजीसीएची

निवडणुकीच्या काळात अनेक राजकीय नेते विविध खासगी विमान कंपन्यांच्या सेवा घेतात. त्या कंपन्यांचे विमान, पायलट, तंत्रज्ञ, त्यांची पात्रता आणि सुरक्षिततेची वैधता तपासण्याची जबाबदारी डीजीसीएची आहे, असेही राऊत यांनी स्पष्ट केले. बारामती येथील विमानतळावर यापूर्वीही अनेकदा विमाने उतरली असून अजित पवार अनेक वेळा तेथे आले आहेत. मात्र कालच्या घटनेत दृश्यमानता कमी असल्याचे दिसते. विमानाने दोनदा उतरण्याचा प्रयत्न केला, पण ते भरकटल्याचे प्रथमदर्शनी जाणवते. यात तांत्रिक बिघाड आणि इतर कारणांचा तपास डीजीसीए करेल, असे राऊत म्हणाले.



### ब्लॅक बॉक्समधून उलगडा होईल!

शरद पवार यांनी या प्रकरणात संपूर्ण निवेदन दिले असून, ते योग्य असल्याचेही त्यांनी नमूद केले. अनेक अपघातांनंतर चौकशीच्या घोषणा होतात, पण त्या चौकशांचे निष्कर्ष कधीच जनतेसमोर येत नाहीत, अशी टीकाही राऊत यांनी केली. ब्लॅक बॉक्समधून नेमका बिघाड आणि त्या क्षणी नेमके काय घडले, याचा उलगडा होईल.

### भाजपाने ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचे आरोप मागे घ्यावेत, हीच खरी श्रद्धांजली

- संजय राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या निधनानंतर भाजपकडून दिल्या जात असलेल्या श्रद्धांजली जाहिरातींवरून जोरदार टीका केली. अजित पवार यांच्यावर पूर्वी भ्रष्टाचाराचे आरोप करणाऱ्या भाजपने आता पानभर जाहिराती देऊन श्रद्धांजली वाहणे हे ढोंग असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे.
- अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यातील प्रमुख मराठी दैनिकांमध्ये भाजपकडून पानभर श्रद्धांजली जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या जाहिरातींचा धागा पकडत राऊत यांनी भाजपच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. भाजपने कमाल केली आहे.
- दादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी पानभर जाहिराती दिल्या. मात्र त्याने नेमके काय साध्य होणार? असा सवाल करत संजय राऊत यांनी भाजपला आठवण करून दिली की, अजित पवार यांच्यावर भाजप, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी ७० हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याचे गंभीर आरोप केले होते. जर भाजपला खरोखरच अजित पवार यांना श्रद्धांजली द्यायची असेल, तर हे सर्व आरोप सार्वजनिकपणे मागे घ्यावेत. तीच अजित पवार यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे स्पष्ट मत संजय राऊत यांनी व्यक्त केले आहे.

### संजय राऊतांना भाजपाचे प्रत्युत्तर

अजितदादांवर भाजपाने केलेले ७० हजार कोटींचे आरोप मागे घेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल असे शिवसेना ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी म्हटले आहे. त्याला आता भाजपाने प्रत्युत्तर दिले आहे. भाजपाचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी एनडीएतील घटक पक्षांत संबंध कसे जपतात? हे मविआ आणि संजय राऊत तुम्हाला कळणार नाही. 'यह तुम्हारे बस की बात नहीं', असा टोला बन यांनी हाणला आहे. संजय राऊत यांनी भाजपाला लक्ष्य केल्यानंतर नवनाथ बन यांनी देखील सोशल मीडिया पोस्ट करूनच राऊत यांना प्रत्युत्तर दिले. एनडीएतील घटक पक्षांत संबंध कसे जपतात, हे मविआ आणि संजय राऊत तुम्हाला कळणार नाही, 'यह तुम्हारे बस की बात नहीं', असा टोला हाणला.

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



એન - કે ડેઈલી ન્યુઝ ગુજરાત Whatsapp Group +91 96879 19919

सुंबुल तौकीरच्या 'आज सच बोलुंगी' या नवीन गाण्याला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रेम आणि सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. गाणे रिलीज झाल्यापासून चाहते सोशल मीडियावर त्यांचे मत शेअर करत आहेत, अनेक लोकांचा असा विश्वास आहे की हे गाणे साधे, प्रामाणिक आणि मनापासून आहे. त्याचे बोल सत्य बोलण्याबद्दल, स्वत:साठी उभे राहण्याबद्दल आणि आपल्या भावनांना गाम्भीर्याने न घेण्याबद्दल हे गीत आहे. हे गाणे सुंबुलसाठी अनेक प्रकारे खास आहे.



# 'आज सच बोलुंगी'

# सुंबुल तौकीरने

## प्रेक्षकांची मने जिंकली

'आज सच बोलुंगी' हे गाणे सुंबुलने स्वतः तिची बहीण सानिया तौकीरसोबत गायले आहे, तर हे गाणे त्यांचे वडील तौकीर खान यांनी लिहिले आहे. हे गाणे भावना आणि सत्याने भरलेले एक सुंदर कौटुंबिक सहकार्य आहे. या म्युझिक व्हिडीओमधील सुंबुलच्या अभिनयाचेही मोठ्या प्रमाणात कौतुक झाले आहे. प्रेक्षकांचे म्हणणे आहे की तिचे भाव खूपच नैसर्गिक आणि भावनिक आहेत. तिने अतिरेकी नाटक केले नाही, ज्यामुळे तिचा अभिनय आणखी प्रभावी झाला. अनेक ऑनलाइन टिप्पण्यांमध्ये असेही म्हटले आहे की सुंबुल एक कलाकार म्हणून लक्षणीयरीत्या नजरेत भरते. तिच्या अभिनयासोबतच, लोक इतके मजबूत संदेश देणारे गाणे निवडण्याच्या तिच्या धाडसाचे कौतुकही करत आहेत. आजच्या युगात, जेव्हा बहुतेक गाणी ग्लॅमर किंवा रोमान्सवर केंद्रित असतात, तेव्हा 'आज सच बोलुंगी' त्याच्या प्रामाणिकपणा आणि भावनिक खोलीसाठी वेगळे दिसते. चाहत्यांचा असा विश्वास आहे की हे गाणे स्वाभिमान आणि आंतरिक शक्तीचा एक सुंदर संदेश देते. गाण्याला मिळणाऱ्या प्रेमाबद्दल बोलताना सुंबुल म्हणाली, 'हे गाणे माझ्या हृदयाच्या खूप जवळचे आहे कारण त्यात माझ्या कुटुंबाचे कष्ट आणि माझा स्वतःचा आवाज यांचा मिलाफ आहे.

राणी मुखर्जीच्या मर्दानी ३ मधील देशातील मुलींना वाचवण्याचा शक्तिशाली आणि मार्मिक संदेश अनेक विचारशील आणि प्रभावशाली व्यक्तींना प्रभावीत करत आहे. २३ वर्षीय ऑलिंपिक पदक विजेती भारतीय नेमबाज मनू भाकर आता या चित्रपटाच्या समर्थनार्थ पुढे आली आहे.



# नेमबाज मनू भाकरलादेखील आहे चित्रपटाची उत्सुकता

# 'मर्दानी ३'

सोशल मीडियावर मनूने लिहिले की, 'मर्दानीसारखे चित्रपट आपल्याला आठवण करून देतात की आपण फक्त प्रेक्षक बनून राहू शकत नाही. माणूस म्हणून, आपल्या जबाबदाऱ्या पार पाडणे महत्त्वाचे आहे.

मुलींची सुरक्षितता ही नेहमीच सर्वोच्च प्राथमिकता आहे आणि राहील. मुलींना सुरक्षीततेसाठी, त्यांच्या आत्मनिर्भरतेसाठी सुरक्षित वातावरणाची आवश्यकता असते. मला नेहमीच सर्व मर्दानी चित्रपट आवडले आहेत, परंतु मर्दानी ३ खरोखरच अद्भुत दिसतो.' राणी मुखर्जीच्या मर्दानी ३ ने इंटरनेटवर धुमाकूळ घातला आहे आणि सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.

महिलांवरील गुन्ह्यांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या या चित्रपटाचा तिसरा भाग गरीब कुटुंबांतील ८-९ वर्षांच्या निष्पाप मुलींच्या अपहरणाच्या गंभीर मुद्द्यावर प्रकाश टाकेल. मर्दानी हा भारतातील अलीकडचा प्रभावी महिलाप्रधान चित्रपट आहे. मर्दानी ३ हा चित्रपट ३० जानेवारी २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. राणी मुखर्जी मर्दानी ३ द्वारे तिच्या गौरवशाली कारकिर्दीची ३० वर्षे साजरी करत आहे, हा एक मैलाचा दगड आहे ज्याने संपूर्ण चित्रपट उद्योगाला तिच्या वारशाचे उत्सव साजरे करण्यासाठी बाहेर पडण्यास भाग पाडले आहे.

चित्रपट निर्माते अ‍ॅटली 'एए२२एक्सएए६' नावाचा चित्रपट घेऊन येत आहेत. अ‍ॅटली यांनी नुकतीच 'एए२२एक्सएए६' बद्दल एक बातमी शेअर केली आहे. या चित्रपटात स्टार आयकॉन अल्लू अर्जुन आणि दीपिका पदुकोण पहिल्यांदाच एकत्र येणार आहेत. 'जवान' या आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी ठरलेल्या चित्रपटानंतर अ‍ॅटली आता त्याच्या पुढील ड्रीम प्रोजेक्टच्या तयारीत व्यस्त आहे. 'एए२२एक्सएए६' हा केवळ भारतातच नाही तर जागतिक स्तरावर प्रेक्षकांना आकर्षित करेल, असा अ‍ॅटलीचा विश्वास आहे.



# दीपिका पादुकोण-अल्लू अर्जुन

## एटलीच्या चित्रपटात जोडी दिसणार



अलिकडेच झालेल्या एका कार्यक्रमात, अ‍ॅटली म्हणाला, 'दररोज आपण काहीतरी नवीन शोधत आहोत. या चित्रपटाबद्दल जाणून घेण्याची प्रेक्षकांची मनिषा आहे. खरे सांगायचे तर, मीही चित्रपटाविषयी सांगण्यास जास्त उत्सुक आहे. हा चित्रपट तयार करण्यासाठी आमची टीम दिवस-रात्र मेहनत घेत आहे.

## अ‍ॅटलीच्या आधीच्या चित्रपटांप्रमाणेच भव्यदिव्य

हा चित्रपट नक्कीच प्रेक्षकांना आवडेल, असा मला विश्वास आहे.' अ‍ॅटलीच्या यापूर्वीच्या चित्रपटांप्रमाणेच हा चित्रपटदेखील भव्यदिव्य स्वरुपाचा असेल.

तो केवळ स्थानिक प्रेक्षकांपुरता मर्यादित राहणार नाही. त्याची कथा, दृश्ये आणि निर्मिती मूल्ये विशेषतः जागतिक प्रेक्षकांना लक्षात घेऊन डिझाईन केली जात आहेत. भावनिकता आणि मनोरंजन याचे संतुलन साधण्यात अ‍ॅटलीचे प्रभुत्व आहे. एए२२एक्सएए६' कडून अपेक्षा खूप उंचावल्या आहेत. हा चित्रपट केवळ व्यावसायिक भारतीय चित्रपटांना नवीन उंचीवर नेणार नाही तर जागतिक स्तरावरसुद्धा तो प्रेक्षक, समिक्षकांचे लक्ष वेधेल, अ‍ॅटली सध्या चित्रपटाच्या तपशीलांबद्दल मौन बाळगत असला तरी, त्याचा आत्मविश्वास सांगतो की अ‍ॅटली काहीतरी खास घेऊन येत आहे.

अभिनेत्री आणि निर्माती रिचा चड्ढा एका नवीन आणि रोमांचक प्रोजेस्टच्या माध्यमातून तिच्या सर्जनशीलतेचा विस्तार करत आहे. ती एक नॉन-फिक्शन मालिका तयार करणार आहे, जी प्रवास, संस्कृती आणि लोक आणि प्रेक्षणीय ठिकाणांबद्दलच्या कथांचा शोध घेईल. धाडसी आणि अर्थपूर्ण कथाकथनासाठी ओळखली जाणारी रिचा या मालिकेद्वारे एका नवीन क्षेत्रात प्रवेश करत आहे, ज्यामध्ये प्रामाणिक अनुभव आणि सांस्कृतिक अन्वेषण एकत्र केले जाईल.

या मालिकेतून तिचा नॉन-फिक्शन क्षेत्रात एक निर्माती म्हणून प्रवेश होईल. अभिनेत्री ते बहु-प्रतिभावान चित्रपट व्यक्तिमत्त्वापर्यंतचा तिचा प्रवास आणखी प्रशस्त होईल. हा शो भारताच्या समृद्ध संस्कृती, विविध समुदाय, परंपरा आणि लोकांच्या जीवनातील अनुभवांची एक मनोरंजक झलक दाखवेल, ज्यामध्ये रिचाची खोल अंतर्दृष्टी आणि संवेदनशील दृष्टिकोन दिसून येईल.

### फिक्शन-नॉन फिक्शन दोन्हीत नाविन्याचा प्रयत्न

रिचा नेहमीच सशक्त आणि प्रभावी कथांना प्राधान्य देत आली आहे. काल्पनिक आणि गैर-काल्पनिक दोन्ही कथांमध्ये नावीन्य आणण्यास ती वचनबद्ध आहे. तिची पहिली निर्मिती 'गर्ल्स विल बी गर्ल्स' ला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशंसा आणि मान्यता मिळाली, जी प्रामाणिक आणि निर्भय कथाकथनाच्या तिच्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब आहे. रिचा म्हणते, माझ्या या नव्या उपक्रमातून मी अनेक अशी स्थळे दाखवेन, ज्याचा थेट देशाच्या सांस्कृतिक वारशाशी संबंध असणार आहे.'

# रिचा चड्ढा

## नॉन फिक्शन क्षेत्रात मुशाफिरी करणार



# माझा कुणी गॉडफादर नाही, मला हिंदी चित्रपट मिळत नाहीत!

मी अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट केले आहेत, पण हिंदी चित्रपट मिळणे मला खूप कठीण आहे. का? कारण माझा कोणी गॉडफादर नाही, अभिनेता माहिर पंधी सांगत होता. अभिनेता माहिर पंधी गेल्या काही काळापासून टेलिव्हिजनमध्ये काम करत आहे. 'डिसेंडंट्स', 'वीर हनुमान - बोलो बजरंग बली की जय' आणि 'छोटी सरदारणी' सारख्या शोचा भाग असण्यासोबतच त्याने 'कॉन्ग्रेच्युलेशन्स! माय एक्स' आणि आता 'डॅनियल' सारखे आंतरराष्ट्रीय प्रोजेक्टदेखील केले आहेत. चित्रपट आणि त्याच्या भूमिकेबद्दल अधिक माहिती देताना तो म्हणतो, 'डॅनियलचा प्रवास २०२३ मध्ये सुरू झाला. त्याच वर्षी माझा 'कॉन्ग्रॅट्स माय एक्स' हा चित्रपट जगभरात प्राइमवर प्रदर्शित झाला आणि तो माझा दुसरा आंतरराष्ट्रीय चित्रपट असणार होता. सुरुवातीला, हा एक पायलट प्रोजेक्ट असणार होता, ज्यामध्ये एका छोट्या क्रूचा समावेश होता. मला वाटते की, पायलटपासून प्रत्यक्ष चित्रपटापर्यंत मी एकमेव अभिनेता होतो.

**ELEGANT FLORICULTURE & AGROTECH (INDIA) LIMITED**

**CIN:** L01110PN1993PLC217724

**Registered Office:** Gut No. 358, Village Mouje Kashal, Taluka Maval, Vadgaon, Pune, Pune, Maharashtra, India, 412106

**Corporate Office:** Shop No 17 APMC Market Yard, Mota Chiloda, Chiloda, Gandhi Nagar, Gandhinagar, Gujarat, India, 382355

**Email:** elegantflora2012@gmail.com **Phone:** 9769433723

**Website:** https://www.elegantflora.in/

**NOTICE OF THE EXTRA-ORDINARY GENERAL MEETING OF THE COMPANY AND E-VOTING**

NOTICE is hereby given, the Extra-Ordinary General Meeting (EGM) of the Members of **ELEGANT FLORICULTURE & AGROTECH (INDIA) LIMITED** to be held on Wednesday, February 18, 2026 at 02:00 P.M at through Video Conferencing/Other Audio-Visual Means ("VC/OAVM) to transact the business mentioned in the Notice of EGM dated 27th January, 2026, in compliance with all the applicable provisions of the Companies Act, 2013 ("Act") and rules framed thereunder read with General Circulars issued by MCA/SEBI time to time.

In accordance with the General Circular No. 10/2022 dated December 28, 2022, issued by the Ministry of Corporate Affairs (MCA) and Circular SEBI/HO/CFD/PoD-2/P/CIR/2023/4 dated January 5, 2023 issued by SEBI (hereinafter collectively referred to as "the Circulars") the Notice of EGM has been sent through electronic mode only to those Members whose email addresses are registered with the Company/ Depositories. Member may note that Notice will be uploaded on the website of the Company at https://www.elegantflora.in/ , website of BSE Limited at www.bseindia.com and website of National Securities Depository Limited (NSDL) i.e. www.evoting.nsdl.com

Members whose names are recorded in the Register of Members or in the Register of Beneficial Owners maintained by the Depositories as on Wednesday, February 11, 2026 ("Cut-off date"), shall only be entitled to avail the facility of remote e-voting as well as e-voting on the date of Annual General Meeting.

Pursuant to the provisions of Section 108 of the Companies Act, 2013 read with Rules made thereunder (as amended) and Regulation 44 of SEBI (LODR) Regulations, 2015 (as amended) and above-mentioned MCA Circulars, the Company is providing facility of remote e-voting and e-voting on the date of the EGM to its Members in respect of the businesses to be transacted at the EGM. For this purpose, the Company has entered into an agreement with NSDL for facilitating voting through electronic means.

The remote e-voting will commence on 9:00 A.M. on Sunday, February 15, 2026 and will end on 5:00 P.M. on Tuesday, February 17, 2026. During this period, the members of the Company holding shares as on Cut-off date may cast their vote electronically (Remote E-Voting). Members may note that a) the remote e-voting module shall be disabled by NSDL after the aforesaid date and time for voting and once the vote on a resolution is cast by the member, the member shall not be allowed to change it subsequently; b) the facility of e-voting shall be made available at the EGM; and c) the members who have cast their vote by remote e-voting prior to the EGM may also attend the EGM but shall not be entitled to cast their vote again. Detailed procedure for remote e-voting/ e-voting is provided in the Notice of the Extra-Ordinary General Meeting.

**FOR, ELEGANT FLORICULTURE & AGROTECH (INDIA) LIMITED**
**Sd/-**
**MANGESH PARASHRAM GADAKH**
**Whole-time director**
**Date: 29.01.2026** **DIN: 09736469**

अर्ज क्र. ३
[नियमावली- १३(१)(ए) पहा]

**कर्ज वसुली न्यायाधिकरण पुणे**

युनिट क्र. ३०७ ते ३१०, ३ रा मजला, काकडे बिझ आयकॉन शिवाजी नगर, पुणे – ४११००५

**प्रकरण क्र.: ओए/५३०/२०२५**

**कर्ज वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियमावली, १९९३ च्या नियम ५ च्या उप नियम (२ ए) सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १३ च्या पोट कलम (४) अंतर्गत समन्स**

**एक्झि. क्र.: १२६४१**

**एचडीएफसी बँक**
**विरुद्ध**
**महेश कांतीलाल संकपाळ**

प्रती,
**१) महेश कांतीलाल संकपाळ**
डी/डब्ल्यू/एस/ओ- कांतीलाल
मु पो, कोरेगाव कराड, कराड सातारा सातारा, महाराष्ट्र ४१५१०६
**२) तोफिक कदर पटेल (सह-कर्जदार)**
ए/पी गोटे, ता. – किरड सातारा, महाराष्ट्र ४१५२१४

**समन्स**

कारण, प्रकरण क्र. **ओए/५३०/२०२५** माननीय पीठासीन अधिकारी/ रजिस्ट्रार यांच्यासमोर **०४/१२/२०२५** रोजी सूचीबद्ध करण्यात आले होते.

कारण, या माननीय न्यायाधिकरणाने, तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या **रु. २६८३५५५.५९/-** च्या कर्जाच्या वसुलीसाठीच्या अर्जावर (ओए) (अर्जासोबत कागदपत्रांच्या प्रती इत्यादी जोडलेल्या आहेत) कायद्याच्या कलम १९(४) अंतर्गत समन्स/नोटीस जारी केली आहे.

कायद्याच्या कलम १९ च्या उप-कलम (४) नुसार, तुम्हाला, प्रतिवादींना, खालीलप्रमाणे निर्देश दिले जातात:-

(i) समन्स बजावल्याच्या तीस दिवसांच्या आत कारण दाखवा की, मागितलेली दाद का मंजूर केली जाऊ नये;

(ii) मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ ए अंतर्गत अर्जदाराने निर्दिष्ट केलेल्या मालमत्ता आणि मालमत्तेव्यतिरिक्त इतर मालमत्ता किंवा मालमत्तेचे तपशील उघड करा;

(iii) मालमत्ता जप्तीच्या अर्जाची सुनावणी आणि निकालापर्यंत, तुम्हाला सुरक्षित मालमत्ता किंवा मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ ए अंतर्गत उघड केलेल्या अशा इतर मालमत्ता आणि मालमत्तेचा व्यवहार करण्यास किंवा त्यांची विल्हेवाट लावण्यास मनाई आहे;

(iv) तुम्ही न्यायाधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय, तुमच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त, विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही मार्गाने, ज्या मालमत्तांवर सुरक्षा हितसंबंध निर्माण केले आहेत आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ ए अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या किंवा उघड केलेल्या इतर मालमत्ता आणि मालमत्तेचे हस्तांतरण करणार नाही;

(v) तुम्ही व्यवसायाच्या सामान्य कामकाजात सुरक्षित मालमत्ता किंवा इतर मालमत्ता आणि मालमत्तेच्या विक्रीतून मिळालेल्या विक्री उत्पन्नाचा हिशेब देण्यास आणि असे विक्री उत्पन्न अशा मालमत्तांवर सुरक्षा हितसंबंध असलेल्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे असलेल्या खात्यात जमा करण्यास जबाबदार असाल.

तुम्हाला लेखी निवेदन दाखल करण्याचे, त्याची एक प्रत अर्जदाराला देण्याचे आणि **१७/०३/२०२६** रोजी सकाळी १०:३० वाजता रजिस्ट्रारसमोर हजर राहण्याचे निर्देश दिले जातात, अन्यथा तुमच्या अनुपस्थितीत अर्जावर सुनावणी होऊन निर्णय दिला जाईल.

**१०.१२.२०२५** रोजी माझ्या सही आणि सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्यासह दिनांकित

**टीप: जे लागू नाही ते खोडून टाका.**

शिक्का

**समन्स जारी करण्यास अधिकृत अधिकाऱ्याची सही**
**निबंधक**
**कर्ज वसुली न्यायाधिकरण, पुणे**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

मु.पो. शिर्डी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर पिन ४२३१०९
फोन नं. (०२४२३) २५८५००, २५८८५३ फॅक्स नं २५८८७०.
website - www.sai.org.in

**ई-निविदा सुचना**

श्री साईबाबा संस्थानचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागासाठी सन २०२६-२७ करीता (दि. ०१ एप्रिल, २०२६ ते दि. ३१ मार्च, २०२७ अखेर) दर्शन रांगेत मोफत वाटप होणारी सुटी बुंदी उक्ते मजुरी दराने तयार करणे, बुंदी पाकीटांवर मशिनव्दारे उत्पादन तारीख नमुद करुन संस्थानचे मागणीप्रमाणे अंदाजे ५० ग्रॅम वजनाच्या बूंदी पाकीटांची पॅकींग करुन काऊंटरपर्यंत पोहोच करणे व संस्थानचे उत्सव कालावधीत मिष्टान्न तयार करुन देणे इ. कामांसाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदेबाबत कामाचे स्वरुप, निकष, अटी शर्ती व ई- निविदेच्या माहितीसाठी www.sai.org.in / tender व www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर भेट द्यावी.

निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दिनांक ३०/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दिनांक १६/०२/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in उपलब्ध राहतील.

**गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**DGIPR 2025-26/5429**

**जाहीर नोटीस**

**(मौजे-पाली तर्फे वरेडी आणि मौजे-वडवली तर्फे वरेडी)**

सर्व सामान्य जनतेस, हितसंबंधीतास व स्थानिक लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, **मौजे पाली तर्फे वरेडी आणि मौजे वडवली तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड (महा.)** येथील मौजे पाली तर्फे वरेडी सर्व्हे नं. अनुक्रमे ६५/०६/अ-०-२६-२५, ६५/५/ब-१-०७-०, ६५/०५/क-१-०९-०, ६६/०१/अ -०७-५८-०३ आणि मौजे वडवली तर्फे वरेडी सर्व्हे नं. ६९ चे सर्व पोट हिस्सेचे क्षेत्र अनुक्रमे १/०-३६-०, २/०-०४-०, ४/०-१८-०, ५अ/०-४२-०, ५ब/०-४७-०, ६(६+७+२३-अ) १-४२-५, ७(६+७+२३-अ), १-४२-५, ८/०-१५-०, ११-अ/०-१३-०, ११-ब/०-१३-०, १२/०-९-०, १८/०-२२-०, १९/०-११-०, २०/०-५१-०, २१/०-२७-०, २२/०-१८-०, २३/०-१८-०, २४/०-२४-०, २६/०-५२-०, २७-अ/०-१०-०, २७-ब/०-१२-०, २८/०-७७-०, २९अ/०-८२-०, २९-ब/०-४०-० आणि ३०/०-१२-०, एकूण क्षेत्रापैकी श्री. प्रतिक कुमार यांचे ७६ टक्के क्षेत्र ज्याचा ७/१२ अभिलेखात सामाईक उल्लेख आलेला असून सदरची मिळकत ही सामाईक नसून ती प्रतिक कुमार यांची वैयक्तिक व खाजगी मिळकत आहे.

वर नमूद मिळकती या श्री. प्रतिक कुमार यांच्या मालकी हक्क व कब्जेताब्यात असून त्यांच्या हिस्स्याचे संपूर्ण क्षेत्र (७६ टक्के हिस्सा) आमच्या अशिलास विक्री करण्याचा व्यवहार केलेला असून त्या अनुषंघाने सदर मिळकती या निर्विवाद व निरजोखिम असल्याचा विश्वास श्री. प्रतिक कुमार यांनी आमच्या अशिलास दिलेला आहे त्या अनुषंघाने सदर मिळकतीच्या संपूर्ण हिस्साचे (७६ टक्के हिस्सा) नोंदणीकृत खरेदी खताचा दस्त नोंदणी करण्यापूर्वी श्री. प्रतिक कुमार यांचे अपरोक्ष त्यांचे कुलमुखत्यार बरोबर कोणीही काहीही व कसल्याही स्वरुपाचा व्यवहार केलेला असल्यास अशा हितसंबंधीतांनी त्यांच्या व्यवहारा संदर्भात ज्या काही हरकती, उजर व अक्षेप जसे की, मौखिक खरेदीचा व्यवहार, इसार पावती, बयाना, तारण, गहाण, बक्षिसपत्र, दानपत्र, भाडेपट्टा, लिव्ह, अ‍ॅण्ड लायसंन्स, लिज, फरोक्त, संपादन, वहिवाट, साठेकरार, चोळीबांगडी, पोटगी, वारसा, तसेच कोणत्याही शासकिय, निमशासकिय, सहकारी व खाजगी वित्त संस्था, वित्त व्यवसायिक बँक, सहकारी बँक, पतसंस्था व इतर खाजगी वित्त संस्था यांचा गहाण, तारण, कर्ज बोजा असल्यास अशा सर्व हितसबंधीतांनी त्यांच्या व्यवहाराच्या अनुषंगाने वर नमूद व्यवहाराच्या स्वरुपाने सर्व हरकतदारांनी तथा हितसंबंधांनी सदरची नोटीस प्रकाशीत झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर आपला उजर, अक्षेप तथा हरकत लेखी स्वरुपात कागदपत्रासह आमच्या कार्यालयात दाखल कराव्यात. मुदतीत अक्षेप, उजर, व हरकती न आल्यास त्या हितसबंधींतांनी हेतू पूरसर व जाणूनबुजून त्यांचा हक्क सोडून दिला आहे. हे गृहित धरुन आमचे आशिल यांचा व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य अक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. मुदत बाह्य आक्षेप आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. सबब ही जाहिर नोटीस जनहितार्थ प्रकाशित केलेली आहे.

**नोटीस देणारा तर्फे**

**दिनांक** : ३०/०१/२०२६ सही/-
**स्थळ** : कर्जत

**अ‍ॅड. काशिनाथ द. शिंदे**
स्पर्श इमारत, सी विंग, २०४, शेडुंग,
पो. अजिवली, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २२१,
भ्रमणध्वनी क्र. ९९८७५४५२८७/८८०५०६१३२४/९५५२५६५३०८

'शुभ श्रावणी' ही मालिका झी मराठीवर काही दिवसांपूर्वीच सुरू झाली आहे. या मालिकेची स्टारकास्ट अत्यंत तगडी आहे. बऱ्याच वर्षांनी लोकेश गुप्ते, आसावरी जोशी अशी नावे या मालिकेतून प्रेक्षकांना पाहायला मिळत आहेत. वल्लरी विराजसह सानिका काशीकर पुन्हा एकदा ही जोडी प्रेक्षकांना दिसत आहे. 'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेतही दोघी एकमेकींच्या विरोधात काम करत होत्या आणि पुन्हा एकदा 'मोक्षा' ही भूमिका सानिका वल्लरीच्या 'श्रावणी' या भूमिकेविरोधात साकारत आहे.

याच निमित्ताने सानिकाशी नवराष्ट्रने खास गप्पा मारल्या. पुन्हा एकदा नकारात्मक भूमिका साकारताना तोचतोचपणा येईल, असं वाटतंय का? अशा सर्व प्रश्नांची अगदी मनसोक्त उत्तरं दिली आहेत. सानिका उत्साहात म्हणाली, 'एका टिपिकल राजकारणी घराण्यात लाडात वाढलेली आहे मोक्षा आणि हीच भूमिका मी साकारत आहे.

# नैसर्गिक अभिनयातून मोक्षा साकारली

## -सानिका काशीकर



घरात जे काही चालू आहे, तिची आई जे काही करत आहे, तेच योग्य आहे, अशा वातावरणात वाढलेली आणि अत्यंत पैशाचा गर्व असणारी आणि आपणच जगात सर्वात सुंदर आहोत, असं समजणारी मोक्षा प्रचंड लाडावलेली आहे. सानिकाने सांगितले की, 'मोक्षासाठी तिची आई म्हणेल तेच योग्य आहे. लहानपणापासून ती जे पाहत आली आहे, तेच तिला योग्य वाटतंय, त्यामुळे अशी मोक्षा मी साकरत आहे आणि ही भूमिका करताना मजा येतेय.' सानिका म्हणाली, 'खरं तर मला जेव्हा या भूमिकेबाबत सांगण्यात आले तेव्हा थोडी भीती वाटली होती. लक्ष्मी किंवा सानिका या व्यक्तिरेखेतून नको दिसायला, असं वाटलं. मुळात टीव्हीवर काम करताना तुमच्या काही चुका झाल्या ना तर त्या सुधारायला संधी असते आणि त्यामुळे मोक्षाची भूमिका वेगळी कशी दिसेल यासाठी मी नैसर्गिक पद्धतीने जसा अभिनय करता येईल, तो करण्याचा प्रयत्न करत आहे.

– दिपाली नाफडे

**जाहीर नोटीस**

सर्वांस सूचित करण्यात येते कि, रुपेश प्रकाश लोहाडे आणि कल्याणी विजयकुमार जैन हे खालील दिलेली मालमत्ता सौरभ ओमप्रकाश खत्री आणि गौरव ओमप्रकाश खत्री ह्यांचे कडून विकत घेत आहेत व आमच्या पक्षकारांकडे गहाण ठेवत आहेत. विकणार ह्यांनी आमच्या पक्षकारांना आश्वासन दिले आहे कि संजीत ओमप्रकाश खत्री मयत दिनांक 11.06.2020 आणि ओमप्रकाश दलिचंद खत्री मयत दिनांक 17.05.२०२३ नंतर विकणार ह्यांचे ह्यांच्या व्यतिरिक्त त्यांचे इतर कोणीही वारस नाहीत व सदरहू मालमत्तेवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा अधिकार नाही.

मालमत्तेचे विवरण

तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, मे. दुय्यम निबंधक हवेली नंबर 1 ते 28, पुणे यांचे हद्दीतील तसेच पुणे महानगरपालिका हद्दीतील गाव कोंढवा खुर्द येथील मिळकत मौजे कोंढवा खुर्द येथील स. नं. 21/2/1अ पार्ट, 18/7+2ए / 1 आणि 18/ 7+8 ए / 2 /4, ( सिटीएस नं. 803 ) या मिळकतीमध्ये बांधण्यात आलेल्या रोझ परेड अपार्टमेंट मधील बी-2 या लिलॅक नावाच्या इमारती मधील नवव्या मजल्यावरील फ्लॅट नं. 904 यांसी क्षेत्र 104.05 चौ. मी. कारपेट (124.86 चौ. मी. बांधीव ), व लगतचे टेरेस क्षेत्र 13 चौ. मी. व एक मीटर रूम जवळचे बंदिस्त वाहन तळाचे क्षेत्र 15.39 चौ. मी. सह व 0.618 टक्के अविभक्त हिश्यासह.

तरी उपरोक्त मालमत्तेवर मयत संजीत ओमप्रकाश खत्री आणि मयत ओमप्रकाश दलिचंद खत्री यांचे इतर कोणी वारसदार अथवा इतर कोणाचा करार, गहाण, विक्री, बक्षिस इकोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क संबंध असल्यास पुराव्यानिशी नोटीस प्रसिद्ध झालेपासून 07 दिवसांचे आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

जर 07 दिवसांचे आत कोणाकडून कोणताही आक्षेप आला नाही तर खरेदी चा व गहाणाचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. 07 दिवसांचे नंतर आक्षेप आल्यास आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

पुणे, दिनांक ३०-०१-२०२६

**साजन सी डुड्डू, पत्ता : फ्लॅट नंबर ३५, वेद विहार कॉ-ऑ. सोसायटी लि. नगर रोड, पुणे ४११०२८**
**मो. नं. ७५८८२२०३५६**



# कोहरा २ ट्रेलर रीलीज

२०२३ ची क्राइम थ्रिलर वेब सिरीज 'कोहरा'चा सिक्वेल 'कोहरा सीझन २' चा ट्रेलर आला आहे. नेटफ्लिक्सने रिलीज केलेला २ मिनिटे १३ सेकंदांचा हा ट्रेलर पंजाबमधील धुक्याने व्यापलेल्या दलेरपुराची कहाणी सांगतो. यावेळी, यात एक नवीन खून रहस्य दाखवण्यात आले आहे. बरुणसोबती मागील सीझनमधील असिस्टंट सब-इन्स्पेक्टर अमरपाल गुरुंडीची भूमिका पुन्हा साकारत आहे. त्याची बदली दलेरपुरा येथे झाली आहे, जिथे त्याची नवीन बॉस मोना सिंग आहे, जिला सब-इन्स्पेक्टर धनवंत कौर म्हणूनही ओळखले जाते. ही कथा प्रीत बाजवा नावाच्या महिलेच्या हत्येभोवती फिरते. ट्रेलर जसजसा पुढे जातो, तसतसे रहस्य अधिकच गूढ होत जाते आणि अनेक दीर्घकाळापासून दडलेले रहस्य उलगडत जाते.

अमरपाल आणि धनवंत केवळ खुनीचा माग काढण्याचा प्रयत्न करत नाहीत तर त्यांच्या स्वतःच्या वैयक्तिक संघर्षांना आणि संघर्षांनाही तोंड देतात. 'कोहरा २' चे दिग्दर्शन सुदीप शर्मा आणि फैसल रहमान यांनी केले आहे. त्याची निर्मिती सौरभ मल्होत्रा, सुदीप शर्मा, मनुज मित्रा आणि टीना थरवानी यांनी केली आहे. ट्रेलरची सुरुवात एका गोठ्यात एका महिलेचा मृतदेह सापडल्याने होते. तिचे नाव प्रीत बाजवा (पूजा भामरा) असल्याचे निष्पन्न होते. कोणीतरी तिची निर्घृण हत्या केली आहे.

**Public Notice**

(Balan S., Advocate)

IN THE COURT OF 10th JT. CIVIL JUDGE (S.D.) THANE
(SMT. S. R. PATIL)
Regular Civil Suit No. 836/2015

Exh. 36

Mr. Shaikh Abdul Sattar Haji Mohammed Miya, .......Plaintiff
V/s
Mr. Gulam Abbass Kamruddin Kanchwala and another .......Defendant

To-
Mr Imdad Abbas Kanchwala,
Near Dargah Hazrath Qamer Ali Shah Darvesh,
Dargah Road, Khed Shivpuri,
Taluka Haveli, Dist. Pune.

WHEREAS the above named Plaintiff has instituted a suit against you and another for specific performance of a contract and injunction. You are hereby summoned to appear in this Court in person or by a Pleader duly instructed and able to answer all material questions relating the suit before the Civil Judge (S.D.) Thane on 9th February 2026 at 11.00 o'clock to answer and produce on that day all the documents which you intent to rely in support of your defense.

Take notice that in default of your appearance on the aforementioned day, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and seal of this Court, on this 25 day of 8, 2025.

SEAL

By Order
Superintendent
Sd/-
सहा. अधिक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय व. स्तर, ठाणे

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

એન - કે ડેઈલી ન્યુઝ ગુજરાત Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



# जगात तणाव, भारताची गती सुस्साट

## देशाच्या जीडीपीवाढीचा ७.२ टक्क्यांचा अंदाज



**दिल्ली, वृत्तसंस्था.** एकीकडे, ट्रम्पच्या शुल्काचा परिणाम, ग्रीनलँडवरून युरोपीय देशांशी संघर्ष आणि दुसरीकडे, इराण आणि अमेरिकेपासून रशिया आणि युक्रेनपर्यंत तणाव आहे. जग युद्ध, महागाई आणि मंदीच्या भीतीने झुंजत आहे. अनेक प्रमुख देश त्यांच्या वाढीबद्दल चिंतेत आहेत. अशा वातावरणात भारताच्या अर्थव्यवस्थेचे चित्र काय सांगते? अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज रोजी संसदेत सादर केलेल्या आर्थिक सर्वेक्षण २०२६ मध्ये संपूर्ण चित्र उघड झाले आहे. देशाचे हे वार्षिक 'आर्थिक अहवाल कार्ड' स्पष्टपणे दर्शवते की जागतिक तणाव असूनही भारताची गती अबाधित आहे. जीडीपीपासून रोजगार, शेती, महागाई आणि परकीय चलनापर्यंत, ते सामान्य माणसाशी संबंधित प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करते.

**भारताचा जीडीपी: कठीण काळातही मजबूत हालचाल :** आर्थिक सर्वेक्षणानुसार, पुढील आर्थिक वर्ष, आर्थिक वर्ष २७ मध्ये भारताचा जीडीपी वाढ ६.८% ते ७.२% दरम्यान असण्याची अपेक्षा आहे. जगभरातील अनेक देश मंद विकासदराचा सामना करत असताना हे घडले आहे. चालू आर्थिक वर्षात (आर्थिक वर्ष २६) वाढ ७.४% राहण्याची अपेक्षा आहे, जी आरबीआयच्या अंदाजापेक्षा थोडी जास्त आहे. हे स्पष्टपणे दर्शवते की भारतीय अर्थव्यवस्था अजूनही मजबूत पायावर आहे.

**महागाईवरील दिलासादायक वृत्त**

महागाई ही सामान्य माणसासाठी एक मोठी चिंता आहे. या आघाडीवरही या सर्वेक्षणातून दिलासा मिळतो. येत्या काळात महागाई नियंत्रणात राहील असे आरबीआय आणि आयएमएफ दोघांनाही वाटते. चांगली खरीप पीक आणि सुधारित रब्बी पेरणीमुळे अन्नधान्याच्या किमतींवर दबाव कमी झाला आहे. आरबीआयने आर्थिक वर्ष २६ साठीचा महागाईचा अंदाज २% पर्यंत कमी केला आहे. आर्थिक वर्ष २७ च्या पहिल्या सहामाहीत महागाई सुमारे ४% राहण्याची अपेक्षा आहे, जी लक्ष्य मर्यादेत आहे.

शेतीः मजबूत पीक, कमी महागाई

देशाच्या जवळजवळ अर्ध्या लोकसंख्येची शेतीवर अवलंबून आहे. म्हणूनच, या क्षेत्राचे आरोग्य महत्त्वाचे आहे. आर्थिक सर्वेक्षणानुसार, आर्थिक वर्ष २६ मध्ये कृषी वाढ ३.१% राहण्याची अपेक्षा आहे. २०२४-२५ मध्ये धान्य उत्पादन विक्रमी ३३२ दशलक्ष टनांवर पोहोचले. या चांगल्या कापणीचा थेट चलनवाढीवर परिणाम झाला आहे, ज्यामुळे अन्नधान्याच्या किमती अधिक महाग होण्यापासून रोखल्या गेल्या आहेत.

सरकारी कर्ज आणि तूट

सरकारने त्यांचे वित्तीय तूट कमी करण्याचे लक्ष्य वेळापत्रकापूर्वीच साध्य केले आहे. आर्थिक वर्ष २५ मध्ये ते जीडीपीच्या ४.८% होते, तर आर्थिक वर्ष २६ चे लक्ष्य ४.४% निश्चित केले आहे.

२०२५-२६ मध्ये जीडीपी वाढ ७.३% राहण्याचा अंदाज




आरबीआयने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी जीडीपी वाढ होण्याचा अंदाज

पाच वर्षांत किरकोळ महागाई ५.५% वरून ४.३% पर्यंत घसरली




२०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महागाईचा अंदाज आहे.

### वित्तीय तूट म्हणजे कमी उत्पन्न जास्त खर्च

**वित्तीय तूट आणि स्थिती (जीडीपी %)**

| | | |
|---|---|---|
| २०२५-२६ (लक्ष्य) | ४.४% | अंदाजित लक्ष्य |
| २०२४-२५ | ४.८% | साध्य (अंदाजापेक्षा चांगले) |
| २०२३-२४ | ५.६% | सुधारणा |
| २०२२-२३ | ६.४% | सुधारणा दिशेने |
| २०२१-२२ | ६.७१% | उच्च (कोविड प्रभाव) |

### नोकरी आणि रोजगाराच्या संधी वाढताहेत

भारतातील कामगार संख्या ५६० दशलक्षांपेक्षा जास्त आहे. सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की कर सुधारणा, सरलीकृत नियम आणि राज्यांनी केलेल्या कामगार सुधारणांमुळे औद्योगिक आणि सेवा क्षेत्रात भरती वाढली आहे. उल्लेखनीय म्हणजे, एकाच वर्षात उत्पादन क्षेत्राने ६% वाढ केली आहे. फक्त आर्थिक वर्ष २४ मध्ये या क्षेत्रात १० लाखांहून अधिक नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या. गिग वर्क, म्हणजेच फ्रीलांस आणि ॲप-आधारित काम, हे देखील उत्पन्नाचे एक प्रमुख स्रोत बनत आहे. तरुणांच्या कौशल्य आणि कॉर्पोरेट गरजांमधील दरी भरून काढण्यासाठी सरकार डिजिटल प्रणालीवर काम करत आहे.

**सर्वेक्षण : जागतिक अनिश्चितता हे प्रमुख कारण**

# एफपीआयच्या प्रवाहात यंदा अनेक चढ-उतार




**दिल्ली, वृत्तसंस्था.** २०२५-२६ या आर्थिक वर्षात एफपीआय अर्थात परकीय पोर्टफोलिओ गुंतवणुकीत अनेक चढ-उतार बघायला मिळाले. डिसेंबर २०२५ पर्यंत एकूण ३.९ अब्ज डॉलर्स बाजारातून काढण्यात आले, असे गुरुवारी संसदेत सादर केलेल्या आर्थिक सर्वेक्षणात म्हटले आहे. ही अस्थिरता वाढती अनिश्चितता आणि अमेरिका, तैवान आणि दक्षिण कोरियासारख्या एआय-केंद्रित बाजारपेठांकडे वाढत्या भांडवली वाटपामुळे असल्याचे सर्वेक्षणात म्हटले आहे. एकूणच, एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत एफपीआय भारतीय सिक्युरिटीजचे निव्वळ विक्रेते होते. या कालावधीत, त्यांनी इक्विटीजमधून पैसे काढताना भारतीय कर्ज सिक्युरिटीज खरेदी केल्या. इक्विटीजमधील विक्री मुख्यत्वे इतर प्रमुख बाजारपेठांच्या तुलनेत भारतीय इक्विटीजची तुलनेने कमकुवत कामगिरी, व्यापार आणि धोरणात्मक अनिश्चितता, भारतीय रुपयाचे अवमूल्यन आणि उच्च अमेरिकन बाँड उत्पन्नादरम्यान जागतिक जोखीम टाळणे यामुळे झाली, ज्यामुळे एफपीआय प्रवाहावर नकारात्मक परिणाम झाला, ज्यामुळे एफपीआय प्रवाहावर नकारात्मक परिणाम झाला. या घटकांमुळे भारतीय शेअर बाजारांबद्दल गुंतवणूकदारांची भावना कमकुवत झाली, विशेषतः माहिती तंत्रज्ञान (आयटी) आणि आरोग्यसेवा यासारख्या निर्यात-केंद्रित क्षेत्रांमध्ये, ज्यामुळे आर्थिक वर्ष २०२५-२६ (एप्रिल-डिसेंबर) दरम्यान सतत एफपीआय बाहेर पडत राहिले. गुरुवारी संसदेत सादर केलेल्या आर्थिक सर्वेक्षण २०२५-२६ नुसार, अमेरिका, तैवान आणि दक्षिण कोरिया सारख्या देशांमध्ये वाढत्या अनिश्चिततेमुळे आणि एआय-संबंधित वित्तीय गुंतवणुकीत वाढत्या रसामुळे या वर्षी एफपीआयचा प्रवाह मंदावला आहे. परिणामी, आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या सहामाहीत पेमेंट बॅलन्स (बीओपी) तूट ६.४ अब्ज डॉलर होती, तर आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या पहिल्या सहामाहीत २३.८ अब्ज डॉलर अधिशेष होता. सर्वेक्षणात असा अंदाज आहे की, बाँड मार्केटमध्ये एफपीआय गुंतवणुकीचा दृष्टिकोन सकारात्मक राहिला आहे, याला बाजार नियामक सेबी आणि भारत-अमेरिका व्यापार चर्चेने एफपीआय गुंतवणूक नियमांमध्ये शिथिलता आणली आहे.

## सोन्याच्या जागतिक मागणीचा मोठा विक्रम

**मुंबई, वृत्तसंस्था.** जागतिक सोन्याची मागणी २०२५ मध्ये ५,००० टनांपेक्षा जास्त होऊन नवीन सर्वोच्च पातळीवर पोहोचली आहे, अशी माहिती वर्ल्ड गोल्ड कौन्सिल (डब्ल्यूजीसी) ने गुरुवारी प्रसिद्ध केलेल्या अहवालात देण्यात आली आहे.

वर्ल्ड गोल्ड कौन्सिलच्या '२०२५ गोल्ड डिमांड ट्रेंड' या अहवालानुसार, २०२५ मध्ये एकूण सोन्याची मागणी ५,००२ टन या नवीन सर्वोच्च पातळीवर पोहोचली, जी गेल्या वर्षी ४,९६१.९ टन होती. अहवालात म्हटले आहे की, ही वाढ प्रामुख्याने गुंतवणूक मागणीत झालेल्या तीव्र वाढीमुळे झाली आहे, जी २०२५ मध्ये २,१७५.३ टनांवर पोहोचली, जी २०२४ मध्ये १,१८५.४ टन होती. चालू आर्थिक वर्षाच्या ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीत ग्राहकांची मागणी २ टक्क्यांनी वाढून १,३४५.३ टनांवर पोहोचली, जी मागील आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीत १,३१८.५ टन होती. २०२५ मध्ये सोन्याच्या मागणीत मोठी वाढ झाली आणि किमतीत मोठी वाढ झाली.

# अदाणी पॉवरचा निव्वळ नफा घटला



**दिल्ली, वृत्तसंस्था.** चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या तिसऱ्या तिमाहीत (ऑक्टोबर-डिसेंबर) अदाणी पॉवरचा एकत्रित निव्वळ नफा १५ टक्क्यांहून अधिक घसरून २,४८८ कोटी रुपये झाला. कंपनीने नफ्यात ही घट प्रामुख्याने मागील कालावधीत एक-वेळ उत्पन्न कमी झाल्यामुळे झाल्याचे म्हटले आहे. गुरुवारी कंपनीने जारी केलेल्या निवेदनानुसार, २०२५-२६ च्या तिसऱ्या तिमाहीत एकत्रित निव्वळ नफा (पीएटी) २,४८८ कोटी रुपये होता, तर २०२४-२५ च्या याच कालावधीत तो २,९४० कोटी रुपये होता. पुनरावलोकनाधीन तिमाहीत कंपनीचा एकूण महसूल १२,७१७ कोटी रुपये होता, जो मागील आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीत १३,४३४ कोटी रुपये होता. कंपनीच्या मते, कमी दर आणि इतर उत्पन्नात घट असूनही ही कामगिरी होती. लवकर आगमन आणि दीर्घकाळापर्यंतच्या पावसामुळे मागणीत व्यत्यय आला असला तरी, कंपनीची वीज विक्री २३.६ अब्ज युनिट्स (बीयू) इतकी होती. मागील आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत हा आकडा २३.३ अब्ज युनिट्स होता. या तिमाहीत, कंपनीने आसाममधील वीज वितरण कंपन्यांकडून ३,२०० मेगावॅटसाठी नवीन दीर्घकालीन वीज खरेदी करार (पीपीए) मिळवले.

# इथेनॉलवर भर अन्नसुरक्षेला धोका!

## आर्थिक सर्वेक्षणात मोठा इशारा

**दिल्ली, वृत्तसंस्था.** भारताच्या ऊर्जा सुरक्षा धोरणाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ असलेल्या इथेनॉल-मिश्रित इंधन कार्यक्रमामुळे देशाचे १.४४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त परकीय चलन वाचले आहे आणि ऑगस्ट २०२५ पर्यंत सुमारे २४.५ दशलक्ष टन कच्चे तेल वापरण्यात आले आहे, असे गुरुवारी संसदेत सादर केलेल्या आर्थिक सर्वेक्षणात म्हटले आहे.

परंतु या जलद विस्ताराचे अनपेक्षित परिणाम होत असल्याचा इशारा सर्वेक्षणात देण्यात आला आहे. मक्यावर आधारित इथेनॉलला अनुकूल असलेल्या सरकारी किंमत धोरणांमुळे शेतकरी डाळी आणि तेलबियांपासून दूर जात आहेत, ज्यामुळे दीर्घकालीन अन्न सुरक्षा आणि पोषणाबद्दल चिंता निर्माण होत आहे. भारत त्याच्या ई-२० मिश्रण लक्ष्याकडे काम करत असताना इथेनॉल कार्यक्रम पारंपारिक साखर-आधारित फीडस्टॉकच्या पलीकडे जाऊन अन्नधान्य, विशेषतः मक्याचा समावेश करण्यात आला आहे.

## आर्थिक सर्वेक्षणात काय म्हटले आहे

- २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून मक्याचे उत्पादन ४८ टक्क्यांनी वाढले आहे, जे २०२४-२५ या आर्थिक वर्षापर्यंत प्रति हेक्टर ३.७८ टनांपर्यंत पोहोचले आहे.
- तर सोयाबीन, सूर्यफूल, रेपसीड, शेंगदाणे आणि भरड धान्यांचे उत्पादन स्थिर राहिले आहे किंवा घटले आहे.
- सरकारी तेल कंपन्यांकडून खात्रीशीर खरेदी करून, सरकार कच्च्या मालाच्या प्रकारावर आधारित वार्षिक इथेनॉलचे दर निश्चित करते.
- आर्थिक वर्ष २०२१-२२ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ दरम्यान, मक्यावर आधारित इथेनॉलच्या किमती तांदूळ किंवा मोलॅसेसवर आधारित इथेनॉलपेक्षा दरवर्षी ११.७ टक्के वेगाने वाढल्या.



- त्याच कालावधीत, मक्याचे उत्पादन आणि लागवडीखालील क्षेत्र अनुक्रमे ८.७७ टक्के आणि ६.६८ टक्के वाढले.
- तथापि, डाळींचे उत्पादन आणि लागवडीखालील क्षेत्रात घट झाली, तर तेलबिया आणि इतर धान्यांमध्ये अनुक्रमे १.७ टक्के आणि २.९ टक्के वाढ झाली.

## सेन्सेक्स २२२ अंकांनी वाढला

# बाजारात तेजी कायम

**मुंबई, वृत्तसंस्था.** टाटा स्टील आणि लार्सन अँड टुब्रोमधील खरेदी आणि आर्थिक सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये पुढील आर्थिक वर्षासाठी ६.८-७.२ टक्के वाढीचा अंदाज वर्तवण्यात आल्यामुळे स्थानिक शेअर बाजार गुरुवारी वधारले. सेन्सेक्स २२२ अंकांनी वधारला, तर निफ्टीने ७६ अंकांनी वधारला. दुपारच्या सत्रात वाढलेल्या खरेदीमुळे बीएसईचा ३० शेअर्सचा बेंचमार्क निर्देशांक, सेन्सेक्स २२१.६९ अंकांनी किंवा ०.२७ टक्क्यांनी वाढून ८२,५६६.३७ वर बंद झाला. तथापि, सकाळच्या व्यवहारात तो ६३६.७४ अंकांनी घसरून ८१,७०७.९४ वर आला. दरम्यान, एनएसईचा ५० शेअर्सचा बेंचमार्क निफ्टी ७६.१५ अंकांनी म्हणजेच ०.३० टक्क्यांनी वाढून २५,४१८.९० वर बंद झाला.



**विदेशी बाजार :** इतर आशियाई बाजारपेठांमध्ये, दक्षिण कोरियाचा कोस्पी, जपानचा निक्केई, चीनचा शांघाय कंपोझिट आणि हाँगकाँगचा हँग सेंग वाढून बंद झाला. दुपारच्या व्यवहारात युरोपीय बाजारपेठा वाढून व्यवहार करत होत्या. अमेरिकन बाजारपेठा स्थिर स्थितीत बंद झाल्या.

**कच्चे तेल :** जागतिक तेल बेंचमार्क ब्रेंट क्रूड २.५० टक्क्यांनी वाढून $७०.११ प्रति बॅरलवर पोहोचला.

**रुपया :** अमेरिकन चलनाच्या तुलनेत रुपया प्रति डॉलर ९१.९७ (तात्पुरता) या विक्रमी नीचांकी पातळीवर बंद झाला.

# महापौर निवडणूक लांबणीवर पडणार?

## अजितदादांच्या निधनामुळे महायुतीची नोंदणी होऊ शकली नाही

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. मुंबई महानगरपालिका निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर, सर्वांचे लक्ष आता महापौरपदाच्या निवडणुकीवर लागले आहे. बुधवारी भाजप आणि शिंदे गटातील नगरसेवक कोकण भवन येथे नोंदणी करणार होते, पण अचानक उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधनामुळे ही नोंदणी रोखण्यात आली आहे.



ही नोंदणी पूर्ण होईपर्यंत महापौरपदाच्या निवडणुकीची तारीख जाहीर करता येणार नसल्याचे संबंधित अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. विशेषतः सर्व राजकीय पक्षांसाठी नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सात दिवसांच्या आत महापौरपदाची निवडणूक अनिवार्य असल्याचे विश्वसनीय सूत्राकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, शिंदे गटातील नगरसेवक कोकण भवन येथे नोंदणी करण्याची तयारी करण्याच्या होते. बुधवारी ५९ भाजप आणि ५९ शिंदे सेनेचे नगरसेवक संयुक्त गट तयार करून नोंदणी करणार होते. भाजप आणि शिंदे सेनेमध्ये कोणताही संघर्ष नाही आणि महापौर भाजपचाच होणार आहे, असे पक्षाच्या सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

### महापौर निवड लांबणीवर पडणार

- २२७ नगरसेवकांना महापौर निवडणुकीसाठी 'विशेष महासभा'ची सूचना देण्यात येणार आहे. नगरसेवकांना त्यांना पालिकेच्या बैठकीला उपस्थित राहण्याचे आमंत्रण देण्यात येणार आहे.
- उपमहापौरपदाची निवडणूक देखील महापौर निवडणुकीच्या दिवशीच होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. महापौरपदाची निवडणूक आता लांबणीवर पडणारा असल्याचे यावरून चित्र स्पष्ट होताना दिसत आहे.

# मोबाईल चोरट्यांचा धुमाकूळ



**ठाणे (वा.)** ठाणे रेल्वे स्थानकात प्रवाशांची क्षणभराची डुलकी चोरट्यांसाठी सुवर्णसंधी ठरत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. गेल्या अवघ्या दोन दिवसांत ठाणे रेल्वे स्थानकात झोप लागलेल्या प्रवाशांचे मोबाईल फोन चोरीला गेल्याच्या तीन घटना पोलिस ठाण्यात दाखल झाल्या असून यामध्ये तब्बल दीड लाख रुपयांचे मोबाईल फोन लंपास झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

मानपाडा येथील मनोरमा नगरमध्ये राहणारे ऋषिकेश पवार (२५) हे १३ जानेवारी रोजी चेंबूरहून ठाण्यात रात्री उतरले. फलाट क्रमांक दोनवर कल्याणच्या दिशेकडील कट्यावर बसले असताना त्यांना थकव्यामुळे डुलकी लागली.

# उत्तरेकडील शीत लहरीचा मुंबईवर झाला परिणाम



**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** उत्तरेकडील भागातून वाहणाऱ्या शीत लहरींचा प्रभाव मुंबईवर जाणवू लागल्याने शहर आणि उपनगरांत थंडीची झळ वाढली आहे. मंगळवारी मुंबईत शहरात आणि उपनगरात २२.६ अंश व २२.४ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले असताना बुधवारी पहाटे मात्र पारा उतरून शहरात १९.८ अंश सेल्सिअस आणि उपनगरात १७.८ अंश सेल्सिअस असा नोंदविण्यात आला. तसेच दिवसभर ढगाळ वातावरण राहिले असले, तरी सकाळच्या वेळेत हवेत गारवा जाणवत होता आणि थंड वारे वाहत होते.

हवामानातील या बदलामुळे मुंबईकरांना पुन्हा एकदा हिवाळ्याची आठवण झाली आहे. उत्तर भारतातील थंड हवामान प्रणालीचा परिणाम पश्चिम किनारपट्टीपर्यंत पोहोचल्याने तापमानात सौम्य घट झाली असून, पुढील काही दिवस सकाळ आणि रात्रीच्या वेळेत गारवा कायम राहण्याची शक्यता आहे.

## मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलल्या



**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याने राज्य सरकारने बुधवारी शासकीय सुट्टी जाहीर केली. तसेच मुंबई विद्यापीठाने ही दुपारच्या सत्रामध्ये होणाऱ्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. यासंदर्भात मुंबई विद्यापीठाकडून सर्व सलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, सीडीओई यांना सूचना देण्यात आली आहे.

मुंबई विद्यापीठाच्या सध्या हिवाळी सत्राच्या परीक्षा सुरू आहेत. त्यानुसार सर्व महाविद्यालये व परीक्षा केंद्रांवर परीक्षा घेण्यात येत आहेत. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी सकाळी विमान अपघातात निधन झाले. त्यामुळे राज्य सरकारने तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करत २८ जानेवारी रोजी शासकीय कार्यालयांना सुट्टी जाहीर केली. त्याअनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या सुरू असलेल्या दुपारच्या सत्रातील परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय जाहीर केला.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **गांव मौजे - लोहगाव ता. हवेली, जिल्हा पुणे** येथील जमीन मिळकत :- **सर्व्हे नंबर ८४ हिस्सा नं ३/९ मधील जाहीर नोटीसीचा विषय असलेले क्षेत्र १००० चौ फुट म्हणजेच ९२.९३ चौ मी व त्यावरील बांधलेल्या स्वप्नपुर्ती विला नं ए २ तळ मजला अधिक पहिला मजला यांसी क्षेत्र १८०० चौ फुट ही मिळकत यांसी चर्तुःसिमा खालीलप्रमाणे:- पूर्वेस :** १८ फुट अंतर्गत रस्ता, **दक्षिणेसः** विला नं ए १, **पश्चिमेस :** १५ फुट अंतर्गत रस्ता, **उत्तरेस :** सौ. विमल किशोर श्रीवास्तव यांची प्लॉट नं २२ ची मिळकत,

तिचे विद्यमान मालक **श्री राजा संदीप रॉय तर्फे कु मू म्हणून श्री. स्वप्नील तानाजी खांदवे** यांचे मालकीची असुन सदर मिळकत खरेदी संदर्भात आमचे अशिलांशी बोलणी होउन आमचे अशिलांकडून विसार स्विकारला आहे, तरी सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही काहीही **हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिन, लिज, साठेखत, खरेदीखत, करारनामा, वारसाहक्क वा अन्य प्रकारे हक्क व अधिकार** असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **८ दिवसांत** आमची खाली नमुद पत्त्यावर येऊन मुळ कागदपत्रांनिशी खात्री करून दयावी, मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे व कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यानी तो जाणीवपूर्वक सोडुन दिलेला आहे असे समजंण्यात येईल तदनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस, कळावे. पुणे, दि. २९/०१/२०२६

**ॲड. जमिर. अ. सय्यद**

ऑफीस क्र. २११, पहीला मजला, ऐ विंग, जय गणेश विश्व कॉम्पलेक्स, विश्रांतवाडी चौक, पुणे-१५ मो. ९८८१४३६१६७

**महावितरण — ई - निविदा सूचना**

नोंदणीकृत ई-निविदा एजन्सी/फर्म/कंपनीकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून, दोन बोली प्रणालीद्वारे, खाली नमूद केलेल्या कामासाठी महावितरणच्या संकेतस्थळावरून डिजिटल स्वाक्षरीसह ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

| क्र. | निविदा क्र. | कामाचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | EE/PAD/T-08/ 2025-26 | पद्मावती विभाग आर.पी.यू.सी सर्कलमध्ये एचटी ओव्हरहेड लाईन्स आणि भूमिगत केबलसच्या बिघाड देखभालीसाठी एजन्सींचे इम्पॅनेलमेंट |
| 2 | EE/PAD/T-09/ 2025-26 | पद्मावती विभाग आर.पी.यू.सी सर्कलमध्ये एलटी ओव्हरहेड लाईन्स, एलटी भूमिगत केबल्स आणि फ्यूज कॉलच्या ब्रेकडाउन देखभालीसाठी एजन्सींचे इम्पॅनेलमेंट. |
| 3 | EE/PAD/T-10/ 2025-26 | पद्मावती विभाग आर.पी.यू.सी सर्कलमधील वितरण ट्रान्सफॉर्मर केंद्राच्या बिघाड देखभालीसाठी एजन्सींचे इम्पॅनेलमेंट. |
| 4 | EE/PAD/T-11/ 2025-26 | पद्मावती विभाग आर.पी.यू.सी मंडळात नवीन कनेक्शन सोडण्यासाठी/भार वाढविण्यासाठी (आर.सी.आय आणि कृषी. वगळता इतर) पायाभूत सुविधा विकासासाठी एजन्सींचे इम्पॅनेलमेंट. |

वरील निविदा कागदपत्रे www.mahadiscom.in या आमच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी महावितरणचे अधिकृत संकेतस्थळ https://etender.mahadiscom.in/eatApp/ ला भेट द्यावी किंवा कार्यकारी अभियंता, पद्मावती विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर निविदा स्वीकृती/नकाराचा सर्व अधिकार हा अधोहस्ताक्षरीकडे राखीव राहील.

कार्यकारी अभियंता,
महा वि वि नि कंपनी, पद्मावती विभाग

PRO/PZ.NO. 204/2025-26.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर**
**ई-निविदा सुचना क्र. ३१ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदरांकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत रुपये | बयाणा रक्कम | निविदा संचाची फी रुपये | काम पुर्ण करण्याचा कालवधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिर्डी नगरपरिषद क्षेत्रात थिम पार्क उभारणे ता. राहाता जि. अहिल्यानगर (तज्ञ प्रकल्प सल्लागर (Porject Management_ Consultant) (PMC) नेमणुक करणे बाबत) (Post Tender Work) | ५९४५५०० | ६०००० | ११८० | २४ महिने (पावसाळयासह) |

**निविदेचे वेळापत्रक**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दिनांक ३०.०१.२०२६ ते ०६.०२.२०२६ |
| २. | निविदा उघडणे | :- | दिनांक :- ०९.०२.२०२६ कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, संगमनेर अहिल्यानगर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वा. |
| ३. | Online निविदेची "हार्ड कॉपी" सिलबंद लखोटयात सादर करण्याचा दिनांक | :- | कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, संगमनेर यांचे कार्यालयात दि. ०९.०२.२०२६ रोजी १७.०० पर्यंत किंवा त्यापुर्वी |

सविस्तर निविदा सुचना व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
The Details of works Provided in the websites as below.
१. www.mahapwd.com २. https://mahatenders.gov.in
(सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
3. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचे कार्यालयातील सुचना फलक
सदर कामाच्या सर्व किंवा एक निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्या/चे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

सही/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर

DGIPR 2025-26/5427

**पुणे महानगरपालिका, पुणे**
**निविदा प्रक्रिया कक्ष पाणीपुरवठा विभाग**
**निविदा जाहिरात - नविन कामे**

विक्री कालावधी दिनांक :- ३०-०१-२०२६ ०९:०० सकाळी ते ०६-०२-२०२६ २:३० दुपारी पर्यंत — जाहिरात क्र. २/१५९९ दि. २९/१/२६
स्वीकृती दिनांक :- ३०-०१-२०२६ ०९:०० सकाळी ते ०६-०२-२०२६ २:३० दुपारी पर्यंत — तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक :- ०९-०२-२०२६ ३:०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रु. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तिचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WATER_SUPPLY/2025/594 | पाणीपुरवठा | आगम मंदिर ते जैन मंदिर दरम्यान पावसाळी / ड्रेनेज लाईनच्या पाण्यामुळे दुषित होणाऱ्या पाण्याच्या लाईन बदलने | रु १३५९/- | रु ४२३१६४०/- | रु ४२३१६/- | ४ | तृप्ती देविदास फापळ ७२७६६७८२०७ |

अ) सदर कामांबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामाचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरुन फक्त ऑनलाईन पधतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पधतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाईन निविदा प्रक्रिया बाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र.अतिमआ(वि)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार रक्कम इ.सी.एस./आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फत स्विकारनेत येणार आहे.

सही/-
Satyajit Salekar
टेंडर लिपिक
पाणीपुरवठा, पुणे महानगरपालिका

सही/-
Satish Jadhav (Prabhari)
कार्यकारी अभियंता
पाणीपुरवठा, पुणे महानगरपालिका

**मुखेड नगर परिषद, मुखेड**
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड. जि. नांदेड**
दूरध्वनी क्र : 02461-222562. ईमेल आयडीः comukhed@gmail.com
जा.क्र. ६४/२०२६ दिनांक :- 29/01/2026

**जाहीर ई-निविदा सूचना**

मुख्याधिकारी नगर परिषद मुखेड जि.नांदेड यांच्या वतीने मुखेड नगर परिषद अंतर्गत दलित्तेतर योजने अंतर्गत शहरात न.प. मुखेड अंतर्गत मुखेड शहर प्रभाग क्रं.01 हनुमंत वडजे यांचे घर ते गौस पठाण यांचे घरापर्यंत सी.सी.रस्ता बांधकाम व आर.सी.सी. नाली बांधकाम करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागकडे नोंदणीकृत वर्गातील कंत्राटदाराकडून B1 निविदा सील बंद लिफाफामध्ये स्पर्धात्मक ई-निविदा महाराष्ट्र शासन www. mahatenders.gov.in संकेतस्थळावर कार्यालयीन वेळेत दि. 30-07-26 ते दि. 13-02-2026 पर्यंत मागवण्यात येत आहेत, सविस्तर जाहिरात अटी शर्ती माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे ई-निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे प्राप्त निविदा पैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी न.प. मुखेड यांना राखून ठेवला आहे.

स्वा/-
(रजिश जाधव)
मुख्याधिकारी
मुखेड नगर परिषद मुखेड

स्वा/-
(विजया देबडवार)
अध्यक्षा
मुखेड नगर परिषद मुखेड

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919





रंगीस्तान

# जेन झींचा नवा फंडा 'रेज बुकिंग'

जगनरेशन झेडची भाषा अन् त्यांची प्राथमिकता याबाबत सतत चर्चा होत असते. ते प्रत्येक परिस्थितीला एक विशिष्ट नाव देतात. आता ही जेन झी वर्कफोर्स म्हणून अनेक देशात कार्यरत आहे. तिथल्या त्यांच्या गंमत जमती अन् किस्से आपण सतत ऐकत असतो. तशीच एक नवीन संकल्पना जेन झी यांनी अस्तित्वात आणली आहे. ही संकल्पना आहे 'रेज बुकिंग'.

## रेज बुकिंग म्हणजे काय?





रेज बुकिंग ही अशीच हवेतून आलेली संकल्पना नाहीये. एका सर्व्हेमध्ये याबाबत धक्कादायक अशी आकडेवारी समोर आली आहे. अमेरिकेतील फेय ट्रॅव्हल्स या ट्रॅव्हल विमा प्लॅटफॉर्मने या रेज बुकिंग शब्दाचा वापर केला होता. त्यांच्या एका सर्वेनुसार प्रत्येक तीन व्यक्तीमधील एक व्यक्ती कामाच्या ठिकाणचा तणाव किंवा वर्कप्लेस बर्नआऊटपासून सुटका पाहिजे म्हणून अचानक सुट्टीचं प्लॅनिंग करत आहे. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर रेज बुकिंगचा अर्थ हा ऑफिसच्या तणावाला कंटाळून अचानक ट्रिप प्लॅन करणे. आजच्या घडीला २४ ते ४५ वर्षाचे तरुण व्हेकेशनला जाण्याकडे फक्त एक छंद म्हणून पाहत नाहीत तर रिफ्रेश होण्याचे आणि मानसिक स्थिती पुन्हा चांगली करण्यासाठीचा मार्ग म्हणून याच्याकडे पाहत आहे. ते हा प्रवास मजा म्हणून नाही तर शांततेच्या शोधात करतात.

## ट्रेंड चांगलाच वाढला

कल्पना करा की तुम्ही ऑफिसमध्ये बसला आहात आणि दुसऱ्या बाजूने क्लाइंटचा कॉल सुरू आहे. तुमच्यावर डेडलाईनचे प्रेशर आहे. त्यात तुमचा बॉस यावरून सारखं चिक-चिक करत आहे. अशावेळी राग आलेले तुम्ही थेट तुमचा फोन उचलता आणि थेट एखाद्या हिल स्टेशन किंवा नयनरम्य बीचच्या ठिकाणाचे तिकीट बुक करता. तुम्ही जर असे करत असाल तर तुम्ही असे करणारे एकटे नाहीत. सध्याच्या घडीला या रेज बुकिंगचा ट्रेंड चांगलाच वाढला आहे.



## आकडे काय सांगतात?

- भारतातील ट्रॅव्हल मार्केटशी संबंधीत आकडेवारी सांगते की गेल्या काही काळापासून शेवटच्या क्षणी बुकिंग करण्याचे प्रमाण हे ३० टक्क्यांनी वाढले आहे.
- आश्चर्याची गोष्ट म्हणजे लोकांच्या संख्येने फ्लाईट तिकीट हे रात्री ३ ते ४ वाजताच्या सुमारास बुक होत आहेत. यावेळी मनुष्य गाढ झोपेत असतो किंवा आपल्या करिअर आणि कामाच्या चिंतेत तरी बुडालेला असतो. तरूणांची हीच अस्वस्थता त्यांना थेट एअरपोर्ट किंवा रेल्वे स्टेशनवर घेऊन जात आहे.
- आजकालचे तरूण हे व्हेकेशनला जाण्यासाठी कोणत्या खास कारणांची वाट पाहत नाहीत. त्यांच्यासाठी फिरायला जाणं, ट्रॅव्हल करणं हा फक्त एक छंद नाहीये. त्यांच्यासाठी हा स्वत:ला बर्नआऊटपासून वाचवण्याचा एक मार्ग आहे.
- तज्ज्ञांच्या मते ऑफिसमध्ये सगळ्या गोष्टी बॉसच्या म्हणण्यानुसार सुरू असतात. त्यामुळे अशा या रेज बुकिंग किंवा ट्रिपचे बुकिंग या तरूणांना त्यांच्या त्यांच्या आयुष्यावर अजूनही कंट्रोल आहे याची जाणीव करून देते. ते स्वत: कुठं जायचं आहे याचा निर्णय घेऊ शकतात.

# पुरुषांचा 'सॉरी' बोलण्यास नकार

लव्हस्टेशन

कपल्समध्ये नेहमी भांडण- वाद होत असतात. भांडणानंतर एक पार्टनर सॉरी बोलून विषय सोडून देतो पण दुसरा मात्र सॉरी बोलायला संकोच करतो. सर्वसाधारणपणे महिला परिस्थिती पटकन समजून घेतात पण पुरुष मात्र स्वतः पुढाकार घेऊन माफी मागण्यासाठी संकोच करतात. कित्येकदा या सवयीमुळे चांगले नातेदेखील खराब होते.





**स्वत:ला चूकीचे मानत नाही**
पुरुष नेहमी हेच मानतात की त्यांनी काही चूक केली नाही मग ते माफी कोणत्या गोष्टीसाठी मागायची. जर त्यांची काही चूक केली असेल तरीही ते समजतात की जर त्यांनी माफी मागितली तर पार्टनरपेक्षा छोटे होतील. त्यांना पुन्हा विनाकारण माफी मागावी लागेल. अशावेळी त्यांनी तुम्हाला त्यांना सुरक्षित वाटू दिले पाहिजे आणि पुरुषांनीही आपली चूक मान्य केली पाहिजे.

**असुरक्षिततेची भीती :** काही पुरुष जोडीदारांच्या मनात असुरक्षिततेची भितीमुळे माफी मागत नाहीय त्यांना वाटते, माफी मागण्यामुळे कोणती नकारात्मक परिस्थिती येऊ नये असे त्यांना वाटते. याची भावनांच्या गुंतागुंतीमध्ये ते अडकलेले असतात आणि माफी मागावी की नाही हे ठरवू शकत नाही. ते विचार करतात की, माफी मागण्यासाठी कदाचित परिस्थिती त्यांच्या बाजूने राहणार नाही या भितीने ते ठरवू शकत नाही की कधी आणि कशी पार्टनरला सॉरी बोलावे. अशा वेळा स्वत:हून पुढाकार घेऊन ते यां ना प्रेमाने त्यांची चूक समजविण्याची गरज आहे.

**सॉरी न बोलता माफी मागणे :** काही पुरुषांना सॉरी बोलण्याऐवजी दुसऱ्या मार्गाने माफी मागितात. जसे की पार्टनरच्या आवडीचे काही गिफ्ट देऊन त्यांना खुश करतात. कधी कधी ते पार्टनरच्या जास्त काळजी घेऊन आपल्या भावना व्यक्त करतात. विशेष म्हणजे, महिलांना बिना बोलता माफी मागण्याची पध्दत खुप आवडते. त्या काही न बोलता त्यांच्या भावना समजून घेतात.

**अंहकारी स्वभाव :** तुमच्या पार्टनरचा स्वभाव असाही असू शकतो की त्यांनी कधीही आपल्या चूकीची माफी मागण्याची सवय नसते. त्यांना फक्त या गोष्टीचा अंहकार असतो की ते कधीही चूकत नाही. असे स्वभाव असलेले लोकांचे नाते दिर्घकाळ टिकत नाही. पार्टनरसोबत लवकर नाते खराब होऊ लागते. आपल्या पार्टनरच्या बेजबाबदारपणे वागतात. आपल्या पार्टनरच्या जबाबदाऱ्यांचा परिणाम तुमच्या नात्यावर पडू नये यासाठी त्यांना समजवा. **भावना व्यक्त करू न शकणे:** बहुतेक पुरुषांना ही सवय असते की ते आपल्या भावना व्यक्त करू शकत नाही. ते आपल्या भावना मोकळेपणाने कोणासोबत शेअर करू शकत नाही. मग ते त्यांचा जोडीदार असला तरी.

# मनाला शांतता देणारे 'चंद्र नमस्कार'

सूर्यनमस्कार जितके लोकप्रिय आहेत, तितके चंद्र नमस्कार मात्र प्रचलित नाहीत. त्यामुळे अनेकांना या योगप्रकाराची सविस्तर माहिती नसते. मात्र चंद्र नमस्कार हा शरीरासाठीच नव्हे, तर मानसिक आरोग्यासाठीही अतिशय शांत, सोपा आणि लाभदायक योगप्रकार मानला जातो.

## चंद्रनमस्कार म्हणजे काय?

जसे सूर्यनमस्कार सूर्याच्या तेजाला आणि उर्जेला समर्पित असतात, तसेच चंद्रनमस्कार हे चंद्राच्या शीतल, सौम्य आणि शांत ऊर्जेला समर्पित असलेला एक योगक्रम आहे. मात्र यामध्ये हा योगप्रकार सूर्यनमस्कारापेक्षा अगदी वेगळा आणि विरुद्ध आहे. चंद्रनमस्कारात, सूर्यनमस्कारासारख्या वेगवान हालचाली नसतात. या योगामध्ये हळू, सहज आणि लयीत होणाऱ्या हालचाली केल्या जातात. त्यामुळे शरीराला जास्त उत्तेजना न देता मनाला शांतता मिळते. दिवसभराच्या धावपळीनंतर किंवा संध्याकाळच्या वेळी मन आणि शरीर शांत करण्यासाठी चंद्र नमस्कार खूप उपयुक्त ठरतो.



## फायदे काय?



योगा

- नियमित चंद्र नमस्कार केल्याने मज्जासंस्थेवर चांगला परिणाम होतो. यामुळे तणाव, चिंता, अस्वस्थता आणि झोपेच्या असलेल्या व्यक्तींना आराम मिळण्यास मदत होते.
- चंद्रनमस्काराच्या हळू हालचालींमुळे आणि खोल श्वसनामुळे पॅरासिंपथेटिक नर्व्ह सिस्टीम सक्रिय होते. त्यामुळे मन शांत राहते आणि भावनिक संतुलन साधले जाते. या योगाभ्यासामुळे कंबर, पाठीचा कणा आणि पाय अधिक लवचिक होतात.
- देवी आसन, बाजूला वाकण्याची आसने यामुळे सांधे मोकळे होतात आणि पाठीच्या कण्याची हालचाल सुधारते.
- महिलांसाठी चंद्रनमस्कार विशेष फायदेशीर मानले जातात. यामुळे पेल्विक भाग सशक्त ठेवण्यास मदत करतो आणि मासिक पाळीतील वेदना कमी करण्यास उपयोगी ठरतो.
- पोटावर होणाऱ्या ताणामुळे पचनसंस्था सक्रिय होते, शरीरातील जडपणा कमी होतो आणि नैसर्गिक डिटॉक्सला चालना मिळते. नियमित सरावामुळे योग्य पोश्चर, देहभान आणि शरीराच्या आतील संतुलन विकसित होते.

## कसे करायचे चंद्र नमस्कार?

चंद्र नमस्कारांची सुरुवात ताडासनाने करायची असते. सरळ उभे राहा, पाय एकत्र ठेवा आणि छातीसमोर नमस्कार मुद्रेत हात जोडा. आता खोल श्वास घेत पाय थोडे रुंद ठेवा आणि देवी आसनात या. त्यानंतर गुडघे वाकवा, कंबर खेल ठेवा आणि हात बाजूला पसरवा. यानंतर शरीर उजव्या बाजूला झुकवा आणि दुसऱ्या बाजूला ताण द्या. उजवा पाय बाहेर वळवून त्रिकोणासन करा, मग पुढे पार्श्वकोणासनात जा. हळूहळू मागचा गुडघा जमिनीवर ठेवत लो-लंजमध्ये या आणि त्यानंतर सौम्य अर्धचंद्रासन करा.



# लग्नात फॉलो करा नवा ट्रेंड

फॅशन

भारतात लग्न हा केवळ एक विधी नसून एक उत्सव असतो. यानिमित्त नातेवाईक, मित्रमंडळी एकत्र येतात आणि आनंदाने वेळ घालवतात. या काळात हटके दिसावं अशी प्रत्येकाची इच्छा असते. परंतु त्यासाठी काय परिधान करावं, हा प्रश्न नेहमी पडतो. लग्नसमारंभादरम्यान आपला लूक आकर्षक दिसावा यासाठी एक उत्तम पर्याय म्हणजे शेरवानी होय. जर तुम्ही लग्नकार्यात शेरवानी घालायचा विचार करत असाल तर तुम्ही नक्की कोणत्या प्रकारची शेरवानी घालायला हवी.

## पारंपरिक शेरवानी

पांढऱ्या किंवा सोनेरी धाग्याच्या वर्कसह तुम्ही क्लासिक ब्लॅक कलरची फुल एम्ब्रॉयडरी केलेली शेरवानी घालू शकता. जर तुम्ही वधू किंवा वराचे भाऊ असाल, तर हा लूक तुमच्यावर छान दिसेल. हळदी, संगीत, तिलक यांसारख्या लग्नाआधीच्या कार्यांसाठी देखील पारंपरिक शेरवानीचे परिधान केले जाऊ शकते. तो काळी शेरवानी तुम्ही लग्नातही आनंदाने घालू शकता.

## बंद गळ्याची शेरवानी

जर तुम्ही वधू किंवा वराचे भाऊ किंवा वडील असाल तर ही शेरवानी तुमच्यासाठी सर्वोत्तम आहे. कारण तुम्ही ती आरामात घालू शकता. तुम्ही पांढऱ्या रंगाची सेल्फ प्रिंटेड डिझायनर शेरवानी घालू शकता किंवा मग काळ्या किंवा निळ्या रंगाची शेरवानीही निवडू शकता. हा ऑल टाइम फेव्हरेट लुक आहे, जो रॉयल लुक देतो.

## इंडो वेस्टर्न शेरवानी

जर तुम्ही अशा लोकांपैकी एक असाल,ज्यांना नवीन पद्धतीचे कपडे घालायला आवडतात, तर मग हा इंडो वेस्टर्न फ्युजन वेडिंग आउटफिट तुमच्यासाठी सर्वोत्तम आहे. तुम्ही पांढऱ्या किंवा काळ्या पँटसोबत तपकिरी बटण असलेली साधी शेरवानी घालू शकता. स्टायलिश लोफर्स किंवा ऑक्सफ 'च्या सेटसोबत हा पोशाख जोडून तुम्ही लग्नात डान्स फ्लोअरला रॉक करू शकता.



# घरातील कामांमुळे वाढतो मुलांचा आयक्यू

पॅरेंटिंग

आजच्या स्पर्धात्मक युगात प्रत्येक पालकाला आपले मूल सर्वात बुद्धिमान आणि स्मार्ट असावे असे वाटते. यासाठी आपण मोठी शाळेची फी भरतो आणि मुलांना महागड्या कोचिंग सेंटरमध्ये पाठवतो. मुलांची बुद्धिमत्ता आणि समज वाढवण्यासाठी महागड्या ट्यूशनची नाही, तर घरातील काही साध्या कामांची गरज असते. मानसशास्त्रज्ञांच्या मते मुलांचे मेंदू पुस्तकांपेक्षा अनुभवांमधून अधिक शिकतात. घरातील रोजच्या छोट्या-मोठ्या कामांचा मुलांच्या 'कॉग्निटिव्ह डेव्हलपमेंट' मध्ये मोठा वाटा असतो.



**किचनमध्ये मदत**
किचन म्हणजे फक्त स्वयंपाकघर नसून ते एक चालती-फिरती 'मॅथ्स लॅब' आहे. जेव्हा तुम्ही मुलांना चहामध्ये साखर घालायला, तांदूळ मोजायला किंवा भाज्या मोजायला सांगता, तेव्हा ते नकळत प्रमाण, मोजमाप आणि मोजणी शिकत असतात. अशा मोजण्याच्या आणि मिसळण्याच्या प्रक्रियेमुळे मुलांची 'लॉजिकल रिझनिंग'ची क्षमता विकसित होते.

**लॉन्ड्री सॉर्टिंग :** धुतलेल्या कपड्यांच्या ढिगातून मोज्यांची जोडी लावणे किंवा रंग आणि साइजप्रमाणे कपडे वेगळे करणे ही एक उत्तम मेंदूची कसरत आहे. ही क्रिया मुलांची पॅटर्न ओळखण्याची आणि वर्गीकरणाची क्षमता वाढवते, जी गणित आणि कोडिंग शिकण्याचा पाया आहे.

**बजेटिंग आणि खरेदी :** जेव्हा तुम्ही बाजारात जाता किंवा ऑनलाइन सामान मागवता, तेव्हा मुलांना सोबत बसवा. त्यांना खरेदीची यादी तयार करू द्या आणि किंमतींची तुलना करायला सांगा. यामुळे मुलांमध्ये निर्णय घेण्याची क्षमता आणि व्यवहार्य गणिताची समज विकसित होते. मर्यादित साधनांमध्ये योग्य निवड कशी करायची हे त्यांना कळते.

**झाडांची काळजी घेणे :** झाडांना पाणी देणे, माती तयार करणे आणि त्यांची वाढ पाहणे हे संयमाचे काम आहे. यामुळे मुलांची निरीक्षण क्षमता वाढते. निसर्गाशी जोडल्यामुळे तणाव कमी होतो आणि एकाग्रता वाढते, ज्याचा थेट परिणाम आयक्यूवर होतो.

**वस्तू दुरुस्त करणे :** घरात एखादे जुने खेळणे तुटले असेल किंवा एखादे छोटे गॅजेट बिघडले असेल, तर मुलांना तुमच्यासोबत ते जोडायला किंवा दुरुस्त करायला लावा.



# टूर पॅकेज बुक करतानाची काळजी

प्रवासाला निघण्यापूर्वी नियोजन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कम्फर्टेबल ट्रव्हासाठी अनेक जण पॅकेज बुक करणे पसंत करतात. अनेक ट्रॅव्हल कंपनी ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही पद्धतीने हे पॅकेज बुक करता येते. मात्र हे करताना काही गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे. काही टिप्स फॉलो करून तुम्ही बजेट फ्रेंडली चांगले ट्रॅव्हल पॅकेज बुक करू शकता.



## अतिरिक्त शुल्क तपासा

टूर पॅकेजमध्ये अनेकदा मूळ किंमत कमी दाखवून नंतर अतिरिक्त खर्च लादले जातात. लोक अनेकदा कमी किमतीचे टूर पॅकेज बुक करतात पण नंतर त्यांना अनेक शुल्क भरावे लागू शकतात. म्हणून टूर पॅकेज बुक करताना अतिरिक्त शुल्क तपासायला विसरू नका.

पर्यटन

## रिव्ह्यूज

पॅकेज बुक करण्यापूर्वी ट्रॅव्हल एजन्सीचे गुगल रिव्ह्यूज किंवा सोशल मीडियावरील फीडबॅक नक्की वाचा. एजन्सी अधिकृत आहे का? हे सर्व तपासा.



## कागदपत्रे आणि विमा

पॅकेज बुक करताना ट्रिपसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी तपासा. तसेच पॅकेजमध्ये समाविष्ट असलेले सामान आणि पासपोर्ट हरवण्याचा विमादेखील तपासा.

## डाएट

टूर पॅकेजमधील जेवणाच्या पर्यायांचा आढावा घ्या. नाही तर प्रवासादरम्यान तुमच्या खाण्यापिण्यावर परिणाम होऊ शकतो.

## लोकेशनची माहिती

टूर पॅकेज बुक करताना जिथे जाणार आहात तिथल्या परिस्थितीचा आणि आजूबाजूच्या ठिकाणांचा आढावा घ्या. राहण्याची सोय, प्रेक्षणीय स्थळांची माहिती घेऊनच पॅकेज बुक करा.

## हेही महत्त्वाचे

नेहमी पॅकेज बुक करण्यापूर्वी २-३ वेगवेगळ्या कंपन्यांचे दर तपासा आणि त्यांची तुलना करा. कधीकधी थेट हॉटेलशी संपर्क केल्यास एजंटपेक्षा स्वस्त डील मिळू शकते.

## आपले ASTRO

**तिथी : संवत्सर**
- राष्ट्रीय मिती १०, शके १९४७, विक्रम संवत्सर २०८२, उत्तरायण शिशिर ऋतू, माघ शुक्ल पक्ष द्वादशी ११:०९, नंतर त्रयोदशी
- **ता : ३० - १ - २०२६, शुक्रवार**
- **सूर्योदय :** ७:०१, **सूर्यास्त :** ६:०९
- **सूर्योदयकालीन नक्षत्र :** आर्द्रा २७:२७, योग - वैधृति १६:५८, नंतर विष्कंभ, करण-बालव ११:०९, नंतर कौलव २१:४७, पश्चात तैतिल
- **शुभ दिवस :** आजचा दिवस शुभ नाही
- **सण-उत्सव :** प्रदोष व्रत, महात्मा गांधी पुण्यतिथी, भीष्म द्वादशी
- **ग्रह गोचर :** सूर्य - मकर, चंद्र-मिथुन, मंगळ - मकर, बुध-मकर, गुरू -मिथुन, शुक्र- मकर, शनी - मीन, राहु - कुंभ, केतु - सिंह
- **राहुकाळ :** प्रात: १०:३० ते १२ पर्यंत
- **दिशा शूळ :** पश्चिम व नैऋत्य
- **आराधना :** भगवान हरिहर यांची पूजा व आराधना
- **उपासना :** आध्यात्मिक उन्नति,भूत पिशाच्च बाधा निवारण,इच्छित मनोरथ प्राप्ति, संतती सुख्यार्थ, अरिष्ट नाशार्थ उपवास व उपासना
- **खरेदीसाठी शुभ वेळ :** आज प्रात:पासून रात्रीपर्यंत आर्द्रा नक्षत्र आहे

## आजचे पंचांग





जे खरेदीसाठी शुभ नाही
- **शुभ अंक :** ६,३,९
- **शुभ रत्न :** शुक्र ग्रहासाठी स्फटिक व हीरा
- **शुभ रंग :** नीळा, लाल, गुलाबी
- **ग्रह पीडा हरण मंत्र :** शुक्र ग्रह दैत्यमंत्री गुरुस्तेषां प्राणदश्च महामतिः। प्रभुस्तारा ग्रहाणांच पीड़ां हरतु मे भृगुः।।
- **चौघडिया मुहूर्त**
- **दिन :** चंचल- प्रात:६:००, लाभ- ७:३०, अमृत - ९:००, काल - १०:३०, शुभ - दोप. १२:००, रोग - १:३०, उद्वेग - ३:००, चंचल - सायं ४:३०,
- **रात्री :** रोग -सायं ६:००,काल- रात्री ७:३०, लाभ-९:००, उद्वेग - १०:३०,शुभ- १२:००,अमृत- १:३०, चंचल- ३:००,रोग- प्रात: ४:३०
- **शुभमुहूर्त :** शुभ,लाभ, अमृत, चंचल,
- **अशुभ मुहूर्त :** रोग, काळ
- **मध्यम मुहूर्त :** उद्वेग

## आज ज्यांचा जन्मदिवस आहे

- वर्षाच्या सुरुवातीला, तुमच्या सामाजिक कार्यासाठी तुम्हाला मान्यता मिळेल. नवीन प्रकल्पांवर तुमचा सल्ला घेतला जाईल. वर्षाच्या मध्यात, तुम्हाला जमीन आणि इमारतीशी संबंधित बाबींमध्ये यश मिळेल आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तुम्हाला पाठिंबा मिळेल. वर्षाच्या शेवटी, राजकीय वाद होतील. व्यवसायात खूप धावपळ करावी लागेल. जवळच्या नातेवाईकामुळे मानसिक ताण येईल.
- मेष आणि वृश्चिक व्यवसायात यश असतील. वृषभ आणि तूळ राशींना राजकीय वादांना सामोरे जावे लागेल. कर्क राशीला जवळच्या नातेवाईकामुळे मानसिक ताण येऊ शकतो. मकर आणि कुंभ व्यवसायात व्यस्त असतील. धनु आणि मीन राशीला परस्पर तणावाचा सामना करावा लागू शकतो. सिंह राशीला जमीन आणि इमारतीशी संबंधित कामात यश मिळेल.

## व्यापार भविष्य

- माघ शुक्ल द्वादशी आर्द्रा नक्षत्राच्या प्रभावाने गुळ, खांड, साखर आदीच्या भावात पूर्ववत मागणी राहील. जीरे, धने, हळदच्या भावात मंदी राहील. तसेच आज ज्या कार्यामध्ये वस्तूंमध्ये भाव कमी राहतील, त्यात नंतर तेजी राहण्याची शक्यता आहे.

**भाग्यांक २६०७**

## आज जन्मलेल्या बालकांचे भविष्य

- आज जन्मलेले बालक निर्भय, धाडसी, महत्त्वाकांक्षी, मेहनती आणि न्यायप्रिय असेल. बालकाला क्रीडा क्षेत्रात खूप रस असेल. बालपणात त्याला आरोग्याबाबत त्रास होऊ शकतात, परंतु नंतर परिस्थिती सुधारेल. बालकाची प्रगती जन्मस्थानापासून दूर राहून होईल.

## SUDOKU ७२८९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 3 | 7 | | 1 | 5 | 4 | | 9 |
| | 8 | | | | | | 2 | |
| | | 1 | | 4 | 8 | | | 6 |
| | 6 | | | 9 | 7 | 1 | | |
| 7 | 2 | | | | | | 5 | 3 |
| | | 5 | 6 | 3 | | | 9 | |
| 5 | | | 8 | 2 | | 3 | | |
| | 4 | | | | | | 7 | |
| 1 | | 3 | 7 | 5 | | 2 | 6 | 8 |

MANGAL SENACHA, BANGALORE

- प्रत्येक ओळीत १ ते ९ अंक भरणे आवश्यक आहे. मात्र हे अंक क्रमवार असणे अनिवार्य नाही. उभ्या आणि आडव्या ओळीमध्ये ३३३ च्या वर्गात असावेत, अंकांची पुनरावृत्ती नको.
- आधीच्या अंकांच्या जागा बदलू शकत नाही.
- शून्य कोठ्याचे एकच उत्तर आहे.

नवराष्ट्र SUDOKU

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 9 | 4 | 1 | 7 | 2 | 6 | 3 | 8 |
| 6 | 8 | 1 | 4 | 3 | 5 | 2 | 7 | 9 |
| 2 | 3 | 7 | 8 | 9 | 6 | 1 | 4 | 5 |
| 9 | 2 | 3 | 7 | 5 | 1 | 4 | 8 | 6 |
| 4 | 7 | 6 | 9 | 2 | 8 | 5 | 1 | 3 |
| 1 | 5 | 8 | 3 | 6 | 4 | 9 | 2 | 7 |
| 8 | 6 | 2 | 5 | 4 | 3 | 7 | 9 | 1 |
| 7 | 1 | 5 | 2 | 8 | 9 | 3 | 6 | 4 |
| 3 | 4 | 9 | 6 | 1 | 7 | 8 | 5 | 2 |

ॐ ज्योतिषाचार्य पं.नारायणशंकर नाथुराम व्यास-कोतवाली बाजार, जबलपूर

## आजचे राशीफळ

**मेष :** मतभेद दूर झाल्याने संबंध दृढ होतील. अस्पष्ट वर्तन मित्रांना अस्वस्थ करेल. जुने काम पूर्ण होईल. अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** गमावलेले पैसे परत मिळण्याची शक्यता आहे. प्रियजनांच्या वागण्यामुळे निराशा होईल. व्यवसायात नफा होईल. मित्रांशी मतभेद होण्याची शक्यता आहे. तुम्हाला कठोर परिश्रम करावे लागतील.

**मिथुन :** सामाजिक कार्यात सहभागी असलेल्या लोकांकडून चांगले फायदे मिळतील. लक्झरी वस्तूंवर खर्च होण्याची शक्यता आहे. जमीन, इमारती आणि घराशी संबंधित समस्या सोडवल्या जातील आणि प्रतिष्ठा आणि प्रतिष्ठा वाढेल.

**कर्क :** तुमचा कामाच्या बाबतीत अनुकूल आश्वासन मिळेल. निष्काळजीपणा पूर्ण होण्यास प्रतिबंध करेल. दैनंदिन दिनचर्या नियमित असेल आणि तुम्हाला अधिक मेहनत करावी लागेल.

**सिंह :** दुविधेत निर्णय घेणे कठीण होईल. हरवलेली वस्तू सापडण्याची शक्यता आहे. कौटुंबिक दिनचर्या व्यवस्थित होईल. तुम्हाला अधिक मेहनत करावी लागेल. प्रलंबित कामे पूर्ण होण्याची शक्यता आहे.

**कन्या :** तुमचे स्वत:चे लोक समस्या निर्माण करण्याचा प्रयत्न करू शकतात. शुभ घटनांचा विचार केला जाईल. आदर वाढेल. एखाद्या विशिष्ट व्यक्तीकडून सल्ला घेणे फायदेशीर ठरेल.

**तूळ :** गट कार्यात सर्वांचा सल्ला फायदेशीर ठरेल. उद्योगांच्या आरोग्याबद्दल चिंता असेल. सुखसोयी आणि सुविधा वाढतील. सामाजिक कार्यात यश मिळेल. वैवाहिक बाबींचा विचार केला जाईल.

**वृश्चिक :** सहज संभाषणातून नवीन सुरुवात होऊ शकते. गरजा पूर्ण करण्यासाठी कर्ज घेणे शक्य आहे. जुनी प्रलंबित कामे पूर्ण होतील. योजनांचा विस्तार होईल. बाहेरील लोकांवर विश्वास ठेवू नका.

**धनु :** सरकारी बाबींमध्ये दुर्लक्ष केल्याने नुकसान होईल. विवाहाच्या चर्चेत यश मिळेल. अपूर्ण कामांना गती मिळेल. शिक्षण क्षेत्रात यश मिळेल. मनोरंजनाची साधने वाढतील.

**मकर :** धार्मिक कार्यक्रमांवर खर्च होईल. तुमची इच्छा नसली तरीही तुम्हाला लोकांकडून टीकेला सामोरे जावे लागू शकते. नियोजित कामे विलंबित होतील. वाद मिटतील.

**कुंभ :** कायदेशीर बाबी मजबूत राहतील. जवळच्या लोकांच्या वागण्यामुळे त्रास होईल. मानसिक अस्थिरता कायम राहील. नियमित कामे विस्कळीत होऊ शकतात.

**मीन :** सुविधांचा अभाव काम कठीण करेल. अनुभव फायदेशीर ठरेल. तुमच्या नोकरीत आणि सरकारी बाबींमध्ये तुम्हाला चांगली बातमी मिळेल. तुम्ही एखाद्या कर्जाबद्दल चिंतित असाल.

## शब्दकोडे क्र. 2996



आरक्षित रान 4) आरबिंदा, सुकुमार व सुंदर 5) मरण येईपर्यंत स्वत:ला शिक्षा करून घेणे 8) एक संकेतार्थी अव्यय 9) शोध, चौकशी 10) कोणत्या प्रकारचा 11) खरे, न्यायाचे 12) नीर, जल 14) आवरला न जाणारा, टाळता न येणारे 15) अंड्याच्या आतील पिवळा भाग 17) करूणा, दया 18)

**आडवी विधाने**— 1) गंध, दृष्ट लागू नये म्हणून लहान राहणे 3) भांडणाचे मूळ, खोडी मुलाच्या गालावर लावलेला 5) तन, शरीर 6) विडीचा झुरका काजळाचा ठिपका 19) दरबारी 7) धूळ, कण, पराग 8) जेथे (हिं) नवरत्न बाळगणारा एक 9) तन, माजलेले रान 10) ठळहात मुगलकालीन सम्राट 23) रचलेली 11) एक मित्रा पण चपळ प्राणी चिता 24) फकडणे, ताव्यात घेणे 12) खीर (सं.) 13) द्वाड, बंडखोर 25) ऋग्वेद सूक्तांतील मंत्र 26) मुलगा 14) लोखंड (सं) 16) आलिंगन, मिठी 27) शिक्षा (हिं) निश्चित नसलेले 17) ज्याच्याजवळ काहीच धनद्रव्य नाही असा 20) शरीरातील त्रिदोषांपैकी एक 21) पालेभाजीचा एक प्रकार 22) सूट, सवलत 26) मृत मुस्लिम व्यक्तिचे थडगे 27) मांक, जिंकणे 28) चहाटळ, वात्रट 29) शिजवून पातळ केलेली डाळ 30) गमन करणे

**उभी विधाने**— 1) संगीत मैफलीत वाद्य वादन करणारा 2) सारखे 3) जनावरांना चारा मिळण्यासाठी

मागील शब्दकोड्याचे उत्तर



anumeya -8446302691

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



# एमआयचा प्लेऑफवर डोळा

## दोन्ही संघांसाठी हा एक महत्त्वाचा सामना, फलंदाजांवर एमआयची भिस्त

**०८** गुणांसह गुजरात जायंट्स क्रमवारी दुसऱ्या स्थानी

**०६** गुण स्पर्धेत गतविजेत्या मुंबई इंडियन्स संघाचे आहे





**बडोदा, वृत्तसंस्था.** जेव्हा शुक्रवारी महिला प्रीमियर लीगमध्ये गतविजेते आणि दोन वेळा विजेते मुंबई इंडियन्स गुजरात जायंट्सशी भिडतील, तेव्हा प्लेऑफमध्ये आपले स्थान निश्चित करण्यासाठी दोन्ही संघांसाठी हा एक महत्त्वाचा सामना असेल. गुजरात जायंट्स हा सामना जिंकून सलग दुसऱ्यांदा महिला प्रीमियर लीग प्लेऑफमध्ये स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न करतील.

गुजरात जायंट्स सध्या आठ गुणांसह आणि -०.२७१ च्या नेट रन रेटसह पॉइंट टेबलमध्ये दुसऱ्या स्थानावर आहे. ते मुंबई इंडियन्स (सहा गुण, नेट रन रेट +०.१४६) आणि दिल्ली कॅपिटल्स (सहा गुण, नेट रन रेट -०.१६४) पेक्षा दोन गुणांनी पुढे आहेत.

गुजरात जायंट्सचे भवितव्य आता त्यांच्याच हातात आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्सवर विजय मिळवल्याने त्यांना डब्ल्यूपीएल प्लेऑफमध्ये स्थान मिळेल, तर विक्रमी फरकाने विजय मिळवल्याने ते थेट अंतिम फेरीत पोहोचू शकतात. तथापि, अगदी कमी पराभवामुळेही जायंट्सचा प्रवास संपुष्टात येऊ शकतो. जरी गुजरात जायंट्स शुक्रवारी मुंबई इंडियन्सकडून पराभूत झाले तरी त्यांना प्लेऑफमध्ये पोहोचण्याची थोडीशी संधी आहे, परंतु जर यूपी वॉरियर्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि त्यानंतर गुरुवारी दिल्ली कॅपिटल्सचा पराभव केला तरच ते शक्य होईल. गुजरात जायंट्सने मुंबई इंडियन्सविरुद्धचे त्यांचे मागील सर्व आठ सामने गमावले आहेत, ज्यामुळे कर्णधार ॲशले गार्डनरचे काम आणखी कठीण झाले आहे. संघ हा पराभवाचा सिलसिला संपवण्यासाठी दृढनिश्चयी असेल, परंतु मुंबई इंडियन्स देखील त्यांचा विक्रम सुधारण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाही. गुजरात जायंट्स सध्या चांगल्या फॉर्ममध्ये आहे. अनुभवी सोफी डेव्हिनच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्यांनी मागील सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचा तीन धावांनी पराभव केला. मुंबई इंडियन्सने मागील सामन्यात आरसीबीचा १५ धावांनी पराभव केला, ज्यामुळे त्यांचे मनोबल निश्चितच उंचावेल. मुंबई इंडियन्ससाठी मागील सामन्यात, नॅट सायव्हर-ब्रंटने या स्पर्धेच्या इतिहासातील पहिले शतक झळकावले. तिने हेली मॅथ्यूजसह संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. मॅथ्यूजनेही चेंडूने आपला ठसा उमटवला आणि तीन महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या. मुंबई इंडियन्सना या दोन परदेशी खेळाडूंकडून अशाच कामगिरीची अपेक्षा असेल.

**एमआयचा रन रेट सर्वोत्तम :** मुंबई इंडियन्ससाठी एक सकारात्मक पैलू म्हणजे प्लेऑफ स्थानाच्या शर्यतीत सर्व संघांमध्ये त्यांचा नेट रन रेट सर्वोत्तम आहे. अशा परिस्थितीत, जर गुण बरोबरीत राहिले तर मुंबई इंडियन्सचा फायदा होईल, तर जर गुजरात जायंट्सचा पराभव झाला तर त्यांना कठीण परिस्थितीचा सामना करावा लागेल. जर हरमनप्रीतचा संघ गुजरात जायंट्सविरुद्ध हरला तर त्यांना आशा करावी लागेल की दिल्ली त्यांच्या शेवटच्या लीग सामन्यात यूपी वॉरियर्सविरुद्ध हरेल. अशा परिस्थितीत, नेट रन रेट महत्त्वाचा असेल.

### असे आहेत दोन्ही संघ

गुजरात जायंट्स : ॲशले गार्डनर (कर्णधार), डॅनी व्याट-हॉज, बेथ मुनी (यष्टीरक्षक), भारती फुलमाली, शिवानी सिंग (यष्टीरक्षक), कनिका आहुजा, सोफी डिव्हाईन, किम गर्थ, अनुष्का शर्मा, आयुषी सोनी, काशवी गौतम, राजेश्वरी गायकवाड, जिंतिमणी कलिता, तनुजा कंवर, रेणुका सिंग ठाकूर, जॉर्जिया वेरेहम.

**मुंबई इंडियन्स :** हरमनप्रीत कौर (कर्णधार), पूनम खेमनार, हेली मॅथ्यूज, राहिला फिरदौस (यष्टीरक्षक), मिली इलिंगवर्थ, अमनजोत कौर, अमेलिया केर, नाटे सायव्हर-ब्रंट, सजीवना सजना, निकोला केरी, संस्कृती गुप्ता, सायका इशाक, शबनीम इस्माईल, क्रांती रेड्डी, वैष्णवी शर्मा, त्रिवेणी वशिष्ठ.

**अपयश :** एमबाप्पेचे दोन गोल व्यर्थ, बार्सिलोनाने घेतली आघाडी

# रिअल माद्रिदचा सहज पराभव



**लंडन, वृत्तसंस्था.** स्टार स्ट्रायकर कायलियन एमबाप्पेच्या दोन गोल असूनही, चॅम्पियन्स लीग फुटबॉल स्पर्धेत बेनफिकाविरुद्ध रियल माद्रिदचा ४-२ असा पराभव झाला. या सामन्यापूर्वी, रियल माद्रिद ३६ संघांच्या टेबलमध्ये तिसऱ्या स्थानावर होता, परंतु आता ते नवव्या स्थानावर घसरले आहे, शेवटच्या १६ मध्ये थेट प्रवेशापेक्षा एक स्थान खाली. इंज्युरी टाइमच्या आठव्या मिनिटाला बेनफिकाकडून युक्रेनियन गोलकीपर अनातोली ट्रुबिनने गोल केला. यामुळे बेनफिका गोल फरकात २४ व्या स्थानावर पोहोचला आणि प्लेऑफमध्ये त्यांचे स्थान निश्चित केले. अनातोलीने गोल केला तेव्हा रिअल माद्रिद नऊ खेळाडूंसह खेळत होता. काही मिनिटांपूर्वी, राऊल असेन्सियो आणि रॉड्रिगो यांना लाल कार्ड दाखवण्यात आले होते. स्पोर्टिंग लिस्बनने ॲथलेटिक बिल्बाओविरुद्ध ३-२ असा विजय मिळवला, ज्यामुळे रियल माद्रिद अव्वल आठ संघांमधून बाहेर पडला. स्पोर्टिंगने अनपेक्षितपणे लिव्हरपूल, टॉटेनहॅम, बार्सिलोना, चेल्सी आणि मँचेस्टर सिटीसह टॉप आठमध्ये स्थान मिळवले. टेबल-टॉपर्स आर्सेनलने कैरत अल्माटीला ३-२ असे हरवून सलग आठवा विजय नोंदवला.

# सेंथिलकुमार, चोत्राणी पुढील फेरीत दाखल



**दिल्ली, वृत्तसंस्था.** वॉशिंग्टन येथे झालेल्या स्क्वॅश ऑन फायर ओपनच्या पीएसए कांस्य स्तरावरील स्पर्धेत विद्यमान पुरुष राष्ट्रीय विजेता वेलावन सेंथिलकुमार आणि वीर चोत्राणी यांनी दमदार सुरुवात केली आणि पुढील फेरीत प्रवेश केला. जागतिक क्रमवारीत ४६ व्या क्रमांकावर असलेल्या सेंथिलकुमारने इंग्लंडच्या टॉम वॉल्शचा १२-१४, ११-८, ११-८, ११-६ असा पराभव केला. पुढील फेरीत त्याचा सामना जागतिक क्रमवारीत ११ व्या क्रमांकावर असलेल्या मेक्सिकोच्या लिओनेल कार्डेनासशी होईल. जागतिक क्रमवारीत ४९ व्या क्रमांकावर असलेल्या चोत्राणीने हंगेरीच्या बालाझ फार्कासचा ६-११, ९-११, ११-५, ११-९, ११-३ असा पराभव केला आणि आता त्याचा सामना फ्रान्सच्या चौथ्या मानांकित बॅप्टिस्ट मासोट्टीशी होईल.

# गुकेशचे दमदार पुनरागमन

### टाटा स्टील मास्टर्स : एरिगेसीचा आणखी एक पराभव



**विज्क आन झी, वृत्तसंस्था.** भारताचा अव्वल क्रमांकाचा खेळाडू अर्जुन एरिगेसी महत्त्वाच्या क्षणी जर्मनीच्या व्हिन्सेंट केमरच्या कौशल्याशी बरोबरी करू शकला नाही, आणि टाटा स्टील मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेत त्याला आणखी एक पराभव पत्करावा लागला. विश्वविजेता डी. गुकेशने मात्र तरुण खेळाडू यागिज कान एर्डोगमसविरुद्ध विजय मिळवून स्पर्धेत पुनरागमन केले. काळ्या मोहऱ्यांसह खेळताना, गुकेशने सामना जिंकला. त्याचे आता संभाव्य १० पैकी पाच गुण आहेत. काही दिवसांपूर्वीपर्यंत एरिगेईसी उत्कृष्ट फॉर्ममध्ये होता, परंतु या स्पर्धेत त्याने अपेक्षेनुसार कामगिरी केलेली नाही आणि तो गुणतालिकेत तळाशी आहे. त्याचे १० सामन्यांतून फक्त चार गुण आहेत.

स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात, भारताच्या आर. प्रज्ञानंदाने हान्स मोके निमनशी आपला सामना बरोबरीत सोडवला. मागील फेरीत गुकेशला पराभूत करणाऱ्या जर्मनीच्या मॅथियास ब्लूबॉमने अनिश गिरीला पराभूत करून आपला प्रभावी फॉर्म कायम ठेवला, तर नेदरलँडच्या जॉर्डन व्हॅन फॉरेस्टने जावोखिर सिंदारोव्हशी बरोबरी साधली.

# चेंडूने त्रास देतो सॅन्टनर

### ५ वेळा त्याने हिसकावून घेतला भारताकडून विजय



**निहार रंजन सक्सेना, नवराष्ट्र. गुवाहाटी.** न्यूझीलंडचा कर्णधार मिशेल सँटनरने स्वतःला सर्वात लहान फॉर्मेटमध्ये कदाचित सर्वोत्तम फिंगर स्पिनर म्हणून स्थापित केले आहे. हवेत त्याची धूर्तता आणि मैदानाबाहेर फलंदाजांना फसवण्याची क्षमता यामुळे हा डावखुरा फिरकी गोलंदाज सर्वात हुशार गोलंदाजांपैकी एक बनतो. सँटनरचा एकूण टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एक मजबूत रेकॉर्ड आहे. त्याने १२६ सामन्यांमध्ये २३.०८ च्या सरासरीने आणि ७.१९ च्या इकॉनॉमीने १३४ विकेट्स घेतल्या आहेत. या खेळाडूने त्याच्या शानदार कारकिर्दीत भारतीय फलंदाजांना विशेषतः अनेकदा त्रास दिला आहे. त्यांच्याविरुद्ध २५ सामन्यांमध्ये २२ विकेट्स घेतल्या आहेत. विशेषतः मिशेलने टी२० मध्ये पाच वेळा गोलंदाजी करताना टीम इंडियाला त्रास दिला आहे हे लक्षात घेता.

**२०२१ च्या टी२० वर्ल्डकपमध्ये एक दुर्मिळ, प्रभावी विकेटलेस स्पेल :** टी२० सामन्यात विकेटलेस स्पेलचे कौतुक होणे क्वचितच घडते, परंतु २०२१ च्या टी२० विश्वचषकात मिशेल सँटनरचे भारताविरुद्धचे चार किफायतशीर षटक हे असेच एक दुर्मिळ उदाहरण होते. भारताला बाद होण्याचा धोका होता. डावखुरा फिरकी गोलंदाजाने भारतीय फलंदाजांना रोखले आणि त्याच्या चार षटकांमध्ये फक्त १५ धावा दिल्या. सँटनरच्या उत्कृष्ट लाईन आणि लेंथचा सामना कोणताही भारतीय फलंदाज करू शकला नाही, कारण त्याने चारपेक्षा कमी इकॉनॉमी रेटने गोलंदाजी केली.

### २०१९ मधील खेळ बदलणारा षटक

न्यूझीलंड अनेकदा फिरकीपटूंसाठी एक दुःस्वप्न ठरले आहे, कारण मैदाने आदर्शांपेक्षा कमी आहेत. तरीही मिचेल सँटनरने २०१९ मधील मालिकेतील पहिल्या सामन्यात खेळ बदलणाऱ्या षटकाने भारतीय फलंदाजांना रोखण्याचे उत्कृष्ट काम केले. फलंदाजाने २१९ धावा काढल्यानंतर, न्यूझीलंडने सहाव्या षटकात भारताची धावसंख्या ५१/२ अशी केली होती. त्यानंतर सँटनरने आठव्या षटकात दोन विकेट घेत सामना उलटवला. या षटकात भारतीय फलंदाजांवर दबाव आला आणि ते १३९ धावांवर सर्वबाद झाले आणि सामना ८० धावांनी गमावला. सँटनरने त्याच्या चार षटकांमध्ये २/२४ अशी प्रभावी आकडेवारी दिली.

### २०२३ मध्ये भारतीय चाहत्यांना आश्चर्यचकित करणारी कामगिरी

२०२३ मध्ये रायपूर येथे झालेल्या न्यूझीलंडच्या पहिल्या टी२० मालिकेतील सामन्यात त्याने हे दाखवून दिले. फलंदाजीने १७६ धावा काढल्यानंतर, किवी संघ जलद विकेट्ससाठी उत्सुक होता, जेकब डफी आणि मायकेल ब्रेसवेल यांनी पहिल्या तीन षटकात दोन विकेट्स घेतल्या. तथापि, सँटनरने निर्णायक धक्का दिला. त्याने धावांचा पाठलाग करताना चौथ्या षटकात इन-फॉर्म शुभमन गिलला बाद केले, ज्यामुळे भारताची धावसंख्या १५/३ झाली. सँटनर डावात नंतर परतला आणि दीपक हुडाला १० धावांवर बाद करून न्यूझीलंडला २१ धावांनी संस्मरणीय विजय मिळवून दिला.

### टीम इंडियासाठी नवीनतम संकटे

मिचेल सँटनरची भारताविरुद्धच्या चालू टी२० मालिकेत आश्चर्यकारकपणे खराब सुरुवात झाली, त्याने पहिल्या तीन सामन्यांमध्ये फक्त एकच विकेट घेतली. चौथ्या लढतीत ३३ वर्षीय गोलंदाजाने संजू सॅमसन आणि हार्दिक पंड्या या धोकादायक जोडीला बाद केले आणि त्यानंतर जसप्रीत बुमराहलाही बाद केले. सँटनरने चार षटकांत २६ धावांत ३ बळी घेऊन न्यूझीलंडला ५० धावांनी विजय मिळवून दिला.

### नागपूरमध्ये टाकला २०१६ च्या टी २० विश्वचषकातील एक संस्मरणीय स्पेल

नागपूरच्या संथ खेळपट्टीवर, किवी संघ २० षटकांत फक्त १२६ धावा करू शकला. तरीही, सँटनरच्या चार षटकांत ११ धावांत ४ बळी घेऊन न्यूझीलंडने यजमानांना चकित केले आणि ४७ धावांनी विजय मिळवला. या डावखुऱ्या फिरकी गोलंदाजाने रोहित शर्मा, सुरेश रैना, एमएस धोनी आणि हार्दिक पंड्या यांना बाद करून टी२० इतिहासातील सर्वोत्तम स्पेलपैकी एक गोलंदाजी केली.

खेलरत्नसाठी वारंवार दुर्लक्ष, पद्मश्रीने पुसले आयुष्याचे दुःख

# १० वर्षे होती बेरोजगार : सविता

**२००३** गुण स्पर्धेत गतविजेत्या मुंबई इंडियन्स संघाचे आहे

**२००८** मध्ये पहिल्यांदा भारतीय संघात निवड



**दिल्ली, वृत्तसंस्था.** भारतीय संघात सामील झाल्यानंतरही, ती दहा वर्षे बेरोजगार राहिली आणि खेलरत्नसाठी वारंवार दुर्लक्षित झाली. परंतु भारतीय हॉकीची भिंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सविता पुनिया यांनी चिकाटी दाखवली. आता, पद्मश्री मिळाल्यानंतर, तिच्या कुटुंबाचे बलिदान व्यर्थ गेले नाही याचा तिला आनंद आहे.

३०० हून अधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळणारी पहिली महिला हॉकी गोलकीपर सविता म्हणाली, माझ्या कुटुंबाने माझा संघर्ष आणि यश पाहिले आहे, म्हणून त्यांना मलाही हा सन्मान मिळावा असे वाटत होते. पद्मश्रीसाठी निवड झाल्यानंतर, माझा संपूर्ण प्रवास मी जिथे सुरुवात केली होती आणि ज्या चढ-उतारांना तोंड द्यावे लागले त्याकडे परत जातो. तिने स्पष्ट केले की २००३ मध्ये, सातवीत शिकत असताना, गावातील सरकारी शाळेतील एका शिक्षकाच्या सूचनेवरून, तिचे वडील महेंद्र सिंग पुनिया तिला पहिल्यांदाच हॉकी ट्रायलसाठी सिरसा येथे घेऊन गेले, जिथे तिची निवड झाली. माझी आई संधिवाताने ग्रस्त होती आणि ती पूर्णपणे अंथरुणाला खिळलेली होती. मी स्वयंपाकघर सांभाळत असे आणि माझे वडील त्यांच्या नोकरीसह तिचे सर्व काम सांभाळत असत. अशा परिस्थितीत त्यांनी मला हॉकी खेळायला पाठवले. त्यावेळी मला ते समजले नव्हते, पण आता जेव्हा मी मागे वळून पाहते तेव्हा मला त्यांचे त्याग समजतात. तेही

### १८,००० रुपयांना कीट विकत घेतले

सविता म्हणाली, त्या वेळी माझ्या वडिलांनी १८,००० रुपयांना गोलकीपिंग किट विकत घेतली, जो त्यांचा दोन महिन्यांचा पगार होता. त्या दिवशी मी खूप रडले. कारण मला माहित होते की ते पैसे किती मोलाचे आहेत. त्या दिवशी, मी माझ्या पालकांसाठी भारतीय संघात स्थान मिळवण्याचा निर्णय घेतला. मला माझ्या वडिलांना परत भेट द्यायची होती. त्यानंतर सविताने गोलकीपिंगचे प्रशिक्षण सुरू केले आणि २००८ मध्ये पहिल्यांदाच तिची भारतीय संघात निवड झाली. भारतीय संघात निवड होणारी मी सिरसा येथील पहिली मुलगी होते. माझे आजोबा अशिक्षित होते, परंतु वयाच्या ६७ व्या वर्षी त्यांनी माझ्या बहिणीच्या मुलीकडून वाचायला शिकले जेणेकरून ते स्वतः बातम्या वाचू शकतील.

अशा वेळी जेव्हा मुला-मुलींमध्ये खूप भेदभाव होता. तिच्या आईच्या प्रकृतीमुळे, सविताला हॉस्टेलमध्ये राहायचे नव्हते आणि तिने हॉकी सोडण्याचा निर्णय घेतला. पण तत्कालीन प्रशिक्षक सुंदर सिंग खरब यांनी तिला गोलकीपर बनण्याचा सल्ला दिला, परंतु गोलकीपिंग किटची व्यवस्था करावी लागेल असे सांगितले.

# ऐतिहासिक खेळी जोकोविचचे ध्येय



**मेलबर्न, वृत्तसंस्था.** पुरुषांच्या टेनिस इतिहासातील सर्वात यशस्वी खेळाडू नोवाक जोकोविच ऑस्ट्रेलियन ओपनच्या उपांत्य फेरीत यानिक सिन्नरविरुद्ध चांगली कामगिरी करण्याचा दृढनिश्चयी आहे आणि इतिहास रचण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. विक्रमी २४ ग्रँड स्लॅम एकेरी जेतेपदे जिंकणारा जोकोविच सिनरविरुद्धच्या सामन्याबद्दलच्या प्रश्नांना उत्तर देत असताना एका प्रश्नाने त्याला अपमानित वाटले. जोकोविच वर्षातील पहिल्या ग्रँड स्लॅम स्पर्धेत विक्रमी ११ वे जेतेपद जिंकण्याचे लक्ष्य ठेवत आहे. जोकोविचला रॉजर फेडरर आणि राफेल नदाल अव्वल स्थानावर असताना टेनिसमधील त्याच्या काळाची तुलना आताच्या काळाशी करण्यास सांगितले गेले जेव्हा सिनर आणि कार्लोस अल्काराझने त्याला गेल्या दोन हंगामात कोणतेही ग्रँड स्लॅम जेतेपद जिंकण्यापासून रोखले आहे. जोकोविचने विचारले, मी यानिक आणि कार्लोसचा पाठलाग करत आहे. कोणत्या अर्थाने? मी नेहमीच पाठलाग करणारा आहे. माझा कधीही पाठलाग झालेला नाही. तुमच्या मते, मी राफा आणि रॉजरचा पाठलाग करायला सुरुवात केली आणि आता मी कार्लोस आणि यानिकचा पाठलाग करत आहे तेव्हाच्या घटनांकडे तुम्ही दुर्लक्ष करत आहात हे मला थोडे अपमानास्पद वाटते. कदाचित मी ग्रँड स्लॅम स्पर्धांमध्ये वर्चस्व गाजवत असताना सुमारे १५ वर्षांचा कालावधी असेल.

# सोफी ऑस्ट्रेलियाची कर्णधार

### भारताविरुद्धच्या मालिकेत करणार नेतृत्व



**सिडनी, वृत्तसंस्था.** पुढील महिन्यात होणाऱ्या एकदिवसीय विश्वविजेत्या भारताविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी स्पिन बॉलिंग अष्टपैलू सोफी मोलिनीची गुरुवारी ऑस्ट्रेलियन महिला संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली. या घरच्या मालिकेनंतर ती एलिसा हिलीची जागा घेऊन सर्व फॉरमॅटमध्ये कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारेल. भारताविरुद्ध खेळल्यानंतर हीलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याची घोषणा केली होती. ती भारताविरुद्ध तीन एकदिवसीय आणि एका कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाचे नेतृत्व करेल.

### ऑस्ट्रेलियाचा महिला संघ

टी-२० : सोफी मोलिनी (कर्णधार), ॲशले गार्डनर (उपकर्णधार), ताहलिया मॅकग्रा (उपकर्णधार), डार्सी ब्राउन, निकोला केरी, किम गार्थ, ग्रेस हॅरिस, फोबी लिचफिल्ड, बेथ मूनी, एलिस पेरी, मेगन शूट, ॲनाबेल सदरलँड, जॉर्जिया वॉल, जॉर्जिया वेअरहॅम.

**एकदिवसीय :** एलिसा हीली (कर्णधार), सोफी मोलिनी (उपकर्णधार), डार्सी ब्राउन, निकोला केरी, ॲशले गार्डनर, किम गार्थ, अलाना किंग, फोबी लिचफिल्ड, बेथ मूनी, ताहलिया मॅकग्रा, एलिस पेरी, ॲनाबेल सदरलँड, जॉर्जिया वोल, जॉर्जिया वेअरहॅम.

**कसोटी :** एलिसा हीली (कर्णधार), सोफी मोलोनी (उपकर्णधार), डार्सी ब्राउन, ॲशले गार्डनर, किम गार्थ, लुसी हॅमिल्टन, अलाना किंग, फोबी लिचफिल्ड, बेथ मूनी, ताहलिया मॅकग्रा, एलिस पेरी, ॲनाबेल सदरलँड, जॉर्जिया वोल, जॉर्जिया वेअरहॅम.

**दुबे म्हणाला** सुधारित मानसिकतेमुळे अर्धशतकी खेळी करण्यास मदत झाली

# मी विचार बदलल्यानेच सकारात्मक खेळ



**विशाखापट्टणम, वृत्तसंस्था.** भारतीय अष्टपैलू शिवम दुबेने वेगवान गोलंदाजीविरुद्ध उत्तम आरामदायी भावना दाखवली, विशाखापट्टणममधील एका आनंददायी रात्री न्यूझीलंडविरुद्ध २३ चेंडूत ६५ धावा केल्या. त्याने त्याच्या सुधारित मानसिकतेनेच एक चांगला क्रिकेटपटू बनवण्यास मदत झाल्याचे सांगितले.

दुबेने लेग-स्पिनर ईश सोधीला एका षटकात २९ धावा ठोकल्याने त्याचे लक्ष अधिक वेधून घेतले जाईल यात शंका नाही, परंतु वेगवान गोलंदाज जेकब डफी आणि मॅट हेन्री यांना मारलेले त्याचे तीन षटकारही तितकेच महत्त्वाचे होते. हे स्पष्ट संकेत होते की, तो आता फक्त फिरकीपटूंना लक्ष्य करत नाही तर वेगवान गोलंदाजांविरुद्ध मोठे फटकेही मारू शकतो. उच्च स्तरावर त्याच्या सातत्यपूर्ण खेळामुळे त्याला यात मदत झाली. हे सर्व माझ्या कठोर परिश्रमाचे परिणाम आहे. अशा परिस्थितीत सातत्याने सामने खेळणे आणि फलंदाजी करणे यामुळे माझी मानसिकता सुधारत आहे. त्यामुळे पुढे काय होणार आहे आणि गोलंदाज जेव्हा मला गोलंदाजी करतात तेव्हा ते काय विचार करतात हे मला समजू लागले आहे. दुबेने या मालिकेत नियमितपणे गोलंदाजी केली आहे, परंतु या सामन्यात त्याला चेंडू देण्यात आला नाही, कारण भारताने पाच प्रमुख गोलंदाजांना मैदानात उतरवले आणि अष्टपैलू हार्दिक पंड्यालाही गोलंदाजी करण्याची संधी मिळाली नाही. दुबे म्हणाला, हे माझ्या फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्हीची गुरुकिल्ली आहे. गौती भाई (गौतम गंभीर) आणि सूर्य भाई (सूर्यकुमार यादव) यांच्यामुळे मी गोलंदाजी करू शकतो. त्यांनी मला गोलंदाजी करण्याची संधी दिली आहे. म्हणून, जेव्हा तुम्ही गोलंदाजी करता तेव्हा तुम्ही थोडे चतुर बनता. मी त्यावरही काम करत आहे आणि काही अधिक कौशल्ये विकसित करण्याचा प्रयत्न करत आहे. दुबेने कबूल केले की, गेल्या काही महिन्यांत नियमित खेळण्याचा वेळ मिळाल्याने तो क्रिकेटपटू म्हणून खूप हुशार झाला आहे.

### खेळाडू स्वत:मध्ये सुधारणा करतात

- मी खूप मेहनत केली आहे. मला गोलंदाजी, फलंदाजी आणि सर्वकाही करण्याची संधी मिळाली आहे.
- तर, अनुभव नावाची एक गोष्ट आहे, आणि मी ती मिळवली आहे, आणि ती मला योग्य दिशेने घेऊन जात आहे.
- सर्व खेळाडू आणि संघ स्वत:मध्ये सुधारणा करत राहतात. मग मी कसा सारखा राहू शकतो?
- मी पुढच्या प्रत्येक सामन्यात थोडा चांगला आणि आणखी हुशार होण्याचा प्रयत्न करतो.
- दुबेचा असा विश्वास आहे की वेगवान गोलंदाजांविरुद्ध अधिक आरामात खेळल्याने त्याला विरोधी संघावर अधिक दबाव आणण्यास मदत होते.

निक्षेप बीमा और प्रत्यय गारंटी निगम
DEPOSIT INSURANCE AND CREDIT GUARANTEE CORPORATION
(भारतीय रिज़र्व बैंक के संपूर्ण स्वामित्व वाली सहायक) Wholly owned subsidiary of the Reserve Bank of India
DICGC Since 1961

अवसायकांकडून जमा केलेल्या विम्याच्या दाव्यांमधील अज्ञान आणि शोध न लागलेले ठेवीदार

डिपॉझिट इंशुरंस आणि क्रेडिट गारंटी कॉर्पोरेशन (डीआईसीजीसी) अवसायकांनी तयार केलेल्या विम्याच्या दाव्यांची पुर्तता डीआईसीजीसी कायदा, 1961 च्या कलम 17 आणि 18 मधील तर्तुदींनुसार करते. अवसायकांद्वारे अज्ञान (ठेवीदार ज्यांना मुख्य दाव्याच्या मंजुरीवेळी केव्हायसी कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे पैसे देण्यात आले नव्हते) / शोध न लागलेल्या (ज्या ठेविदरांच्या दाव्यांना मंजुरी देण्यात आली होती, पण ते वितरित झाले नाहीत आणि डीआयसीजीसीला परत देण्यात आले) चिन्हित करण्यात आलेल्या विमाधारक ठेवीदारांच्या दाव्यांसाठी डीआयसीजीसीकडून प्रावधान करण्यात आलं आहे. सहकार समितीचे रजिस्ट्रार आणि बँकांच्या (31 डिसेंबर 2015 आधी परिसमाप्त) अवसायकांना आदेश जारी करण्यात आला आहे की त्यांनी अशा ठेवीदारांना संपर्क करावा आणि, असतील तर, दावे डीआयसीजीसीकडे सादर करावे. ह्या बँकांच्या ठेवीदारांना सूचित करण्यात येत आहे की त्यांनी न लाभलेल्या दाव्यांसाठी ओळखपत्र/कागदपत्र देऊन संबंधित अवसायकांना संपर्क करावा. बँकांची यादी डीआयसीजीसीच्या संकेतस्थळावर www.dicgc.org.in उपलब्ध आहे.

"पैशाचे आमिष दाखविणाऱ्या ई-मेल/एसएमएस/फोन कॉल मुळे फसगत होऊ देऊ नका"

नवराष्ट्र CLASSIFIEDS
छोट्या जाहिराती, मोठा फायदा

कर्ज
■ समस्त भारत में प्रधानमंत्री मुद्रा योजना अंतर्गत गरीब मजदूर किसान, शिक्षित युवा बेरोजगार को मकान, दुकान पर्सनल, प्रापर्टी लघुउद्योग लोन आधारकार्ड, पेनकार्ड पर उपलब्ध 2% ब्याज 50% छुट सभी को 8178449080.

ज्योतिष
■ शक्ति चमत्कार देखें मात्र 11 घण्टों मे घर बैठे समाधान पाए, वशीकरण, मुठकरनी, लवमैरिज, किया- कराया, कारोबार, गृहक्लेश, सौतन- दुश्मन. पति- पत्नी अनबन. बाबा अकबर खान 8448179329 (प्रेमी/ प्रेमिका अवश्य फोन करें)

SBI भारतीय स्टेट बँक
केंद्रीय भरती आणि पदोन्नती विभाग, कॉर्पोरेट सेंटर, मुंबई
दूरध्वनी: ०२२-२२८२०४२७; इमेल: crpd@sbi.co.in
अर्जासाठी क्यूआर स्कॅन करा

सर्कल आधारित अधिकाऱ्यांची भरती (२०२५-२६)

भारतीय स्टेट बँकेमध्ये सर्कल बेस्ड ऑफिसर म्हणून नियमितपणे नियुक्तीसाठी पात्र भारतीय नागरिकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

एकुण रिक्त पदे : २२७३ (बॅकलॉग रिक्त पदांसह)

पात्रता निकष (वय, शैक्षणिक पात्रता इत्यादि), आवश्यक शुल्क व इतर तपशील यांसह ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची व ऑनलाईन फी भरण्याची लिंक बँकेच्या वेबसाईटवर https://sbi.bank.in/web/careers/current-openings येथे जाहिरात क्र. CRPD/CBO/२०२५-२६/१८ अंतर्गत उपलब्ध आहे. उमेदवारांना सल्ला देण्यात येतो की त्यांनी सविस्तर जाहिरात वाचावी आणि अर्ज करण्यापूर्वी व फी भरण्यापूर्वी त्यांची पात्रता व इतर तपशीलांची खात्री करून घ्यावी.

• ऑनलाइन अर्ज भरण्याची आणि शुल्क भरण्याची तारीख : २९.०१.२०२६ ते १८.०२.२०२६

काही शंका असल्यास, कृपया "CONTACT US" → "Post Your Query" या लिंकद्वारे लिहा, जी बँकेच्या वेबसाइट https://sbi.bank.in/web/careers/current-openings वर उपलब्ध आहे.

स्थान: मुंबई
दिनांक: ३०.०१.२०२६
महाव्यवस्थापक (आरपी आणि पीएम)

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



# सुप्रीम कोर्टमध्ये केस ते पार्किंग सर्व ऑनलाईन

## सीजेआयचा मोठा प्रशासकीय निर्णय

**दिल्ली, वृत्तसंस्था.** सुप्रीम कोर्टने आपल्या प्रशासनिक प्रणालीला डिजिटल बनवण्याच्या दिशेने मोठा पाऊल टाकले आहे. सीजेआय यांनी सांगितले की कोर्टमध्ये नवीन सुरक्षा एंट्री व्यवस्था आणि पार्किंग व्यवस्थापन प्रणाली लागू केली जात आहे, ज्यामुळे कोर्ट परिसरातील सुरक्षा आणि व्यवस्थापन अधिक प्रभावी होईल. सुप्रीम कोर्टने केस मॅनेजमेंटसाठी नवीन ऑनलाइन प्लॅटफॉर्म सुरु केला आहे. या प्रणालीद्वारे त्या प्रकरणांची माहिती मिळेल जी ट्रायल कोर्ट किंवा हायकोर्टमध्ये फक्त सुप्रीम कोर्टमध्ये सुनावणी किंवा आदेश लांबणीवर असल्यामुळे थांबलेली आहेत. या प्रणालीअंतर्गत ट्रायल कोर्ट, हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टपर्यंत जाणाऱ्या प्रकरणांचा संपूर्ण डेटा एकाच ठिकाणी उपलब्ध असेल. यामुळे हे समजेल की प्रकरण कुठे आणि का अडकले आहे. सीजेआय यांनी सांगितले की हा प्रशासनिक निर्णय वकील आणि प्रकरणकर्त्यांसाठी फायदेशीर ठरेल तसेच कोर्टच्या कामकाजात वेग वाढेल. गुरुवार रोजी सीजेआय यांनी बारच्या सदस्यांना संबोधित करताना सांगितले की केस मॅनेजमेंटसाठी नवीन आयटी तंत्रज्ञान वापरले जात आहे. सुप्रीम कोर्ट सर्व हायकोर्ट्सशी डिजिटल मार्गाने जोडत आहे, जेणेकरून सुप्रीम कोर्टमुळे निचली अदालतांमध्ये थांबलेली प्रकरणे ओळखता येतील.

### प्रशासनिक शुल्क एकाच प्लॅटफॉर्मवर

याशिवाय, सुप्रीम कोर्टमध्ये नवीन ऑनलाइन पेमेंट सिस्टम सुरु होत आहे. यामुळे वकील आणि प्रकरणकर्ते एओआर परीक्षा फी, क्रेच फी इत्यादी प्रशासनिक शुल्क एकाच प्लॅटफॉर्मवर जमा करू शकतील.



### तक्रारसुद्धा ऑनलाईन

- कोर्ट परिसरातील सुरक्षेला देखील महत्त्व दिले जात आहे. आता सुप्रीम कोर्टमध्ये पार्किंगसाठी ऑनलाइन अर्ज करता येईल, अर्जाची स्थिती ऑनलाईन पाहता येईल आणि नियम मोडल्यास तक्रारसुद्धा ऑनलाईन करता येईल.
- सीजेआय यांनी सांगितले की कोर्ट परिसरातील सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे ते जज असोत, वकील असोत किंवा सामान्य नागरिक. म्हणूनच नवीन एंट्री व्यवस्था आणि पार्किंग सिस्टम लागू केली जात आहे.

# ...तर विवाह नोंदणी केवळ औपचारिकता

### एका वर्षाआधी घटस्फोट रोखता येणार नाही

**दिल्ली, वृत्तसंस्था.** लग्नानंतर पती-पत्नी कधीच एकत्र राहत नसतील, तर विवाहाची नोंदणी ही केवळ औपचारिक बाब ठरते, असे स्पष्ट मत दिल्ली उच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे. अशा परिस्थितीत लग्नाच्या तारखेपासून एक वर्ष पूर्ण झाले नाही, या कारणावरून परस्पर संमतीने घटस्फोट नाकारता येणार नाही, असेही न्यायालयाने ठामपणे सांगितले. न्यायमूर्ती विवेक चौधरी आणि न्यायमूर्ती रेणू भटनागर यांच्या खंडपीठाने एका महिलेच्या याचिकेवर सुनावणी करताना हा महत्त्वाचा निर्णय दिला. संबंधित प्रकरणात कुटुंब न्यायालयाने हिंदू विवाह अधिनियम (एचएमए) कलम १४ अंतर्गत एक वर्षापूर्वी घटस्फोटासाठी संयुक्त अर्ज सादर करण्यास नकार दिला होता. याचिकेत नमूद करण्यात आले होते की, लग्नानंतर दोघेही कधीही एक दिवसही एकत्र राहिले नाहीत, विवाह कधीच पूर्ण झाला नाही आणि दोघेही आ पा प ल या पालकांच्या घरी वेगळे राहू लागले.



### 'लग्न वाचवण्यासाठी पुरेसे प्रयत्न झाले नाहीत'

कुटुंब न्यायालयाने मात्र 'लग्न वाचवण्यासाठी पुरेसे प्रयत्न झाले नाहीत' असे सांगत अर्ज फेटाळला होता. उच्च न्यायालयाने हे निरीक्षण फेटाळत म्हटले की, केवळ कागदोपत्री असलेला असा विवाह टिकवण्याचा आग्रह योग्य नाही. असा निर्णय पक्षकारांना अनावश्यक मानसिक अडचणीत टाकणारा ठरेल. त्यामुळे हे प्रकरण कलम १४ मधील अपवादात मोडते, असे नमूद करत न्यायालयाने दाम्पत्याला परस्पर संमतीने घटस्फोटासाठी संयुक्त याचिका दाखल करण्याची परवानगी दिली.

# लैंगिक अत्याचाराच्या प्रयत्नानंतर पती-पत्नी व चिमुकल्याची हत्या

## चेन्नईत तिहेरी हत्याकांड

**चेन्नई, वृत्तसंस्था.** तामिळनाडूची राजधानी चेन्नई येथे घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण राज्य हादरले आहे. बिहारमधील स्थलांतरित कामगार, त्याची पत्नी आणि दोन वर्षांच्या निष्पाप मुलाची निर्घृण हत्या करण्यात आली. मद्यपानाच्या पार्टीदरम्यान आरोपींनी महिलेवर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. तिने व पतीने प्रतिकार केल्याने संतापलेल्या आरोपींनी लोखंडी रॉडने हल्ला करून आधी पतीचा खून केला आणि नंतर कोणताही साक्षीदार उरू नये म्हणून पत्नी व चिमुकल्यालाही ठार मारले. मृतक कुटुंब तारामणी परिसरात राहत होते. अड्यार भागात रस्त्याच्या कडेला पोत्यात तरुणाचा मृतदेह आढळल्यानंतर प्रकरण उघडकीस आले. तपासादरम्यान तीन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. आरोपींच्या माहितीनुसार, बकिंगहॅम कालव्यातून मुलाचा मृतदेह सापडला असून महिलेचा शोध सुरू आहे.

# 'आर.के. फॅमिली ट्रस्ट' बनावट?

## कपूर कुटुंबीय संघर्ष शिगेला

**दिल्ली, वृत्तसंस्था.** दिवंगत उद्योगपती संजय कपूर यांच्या आकस्मिक निधनानंतर त्यांच्या सुमारे ३० हजार कोटी रुपयांच्या संपत्तीवरून आणि कौटुंबिक व्यवसायावरून वाद अधिक तीव्र झाला आहे. आता हा वाद थेट फॅमिली ट्रस्टपर्यंत पोहोचला आहे. संजय यांच्या आई राणी कपूर यांनी दिल्ली हायकोर्टात 'आर.के. फॅमिली ट्रस्ट' रद्द करण्याची याचिका दाखल केली आहे. या प्रकरणी गुरुवारी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने संजय यांची पत्नी प्रिया कपूर यांना समन्स बजावले आहेत. कोर्टाने सध्या ट्रस्टवर 'जैसे थे' स्थिती कायम ठेवण्याबाबत कोणताही अंतरिम आदेश दिलेला नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी २३ मार्च रोजी होणार आहे. राणी कपूर यांनी प्रिया कपूर, अभिनेत्री करिश्मा कपूर यांच्या मुलांसह एकूण २२ जणांविरोधात दावा दाखल केला आहे. याचिकेत असा आरोप करण्यात आला आहे की, प्रिया कपूर आणि करिश्मा कपूर यांच्या मुलांनी संगनमत करून बेकायदेशीर मार्गाने संपूर्ण मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी फसवणुकीचा ट्रस्ट तयार केला. राणी कपूर यांचा दावा आहे की, हा फॅमिली ट्रस्ट बनावट, अवैध आणि कायदेशीरदृष्ट्या अमान्य आहे. त्यांच्या माहितीशिवाय आणि संमतीशिवाय संपूर्ण मालमत्ता व कौटुंबिक वारसा त्या ट्रस्टमध्ये हस्तांतरित करण्यात आला. संजय कपूर यांचे मागील वर्षी १२ जून रोजी निधन झाले होते. त्यानंतर कपूर कुटुंबातील अंतर्गत वाद उघडपणे समोर आले आहेत.



### मालमत्तेचे हस्तांतरण थांबवा

राणी कपूर यांनी आरोप केला आहे की, संजय यांच्या मृत्यूनंतर प्रिया कपूर यांनी सोना ग्रुपशी संबंधित कंपन्यांमध्ये महत्त्वाची पदे स्वतःकडे घेतली आणि कोणताही निर्णय घेताना त्यांना ना माहिती दिली, ना सल्ला विचारला.

## Short News

### पाकिस्तानी घुसखोर ठार, बीएसएफची कारवाई

**गुरुदासपूर.** गुरुदासपूर जिल्ह्यातील भारत-पाकिस्तान सीमेवर बीएसएफने घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडला. कडाक्याच्या थंडी व दाट धुक्यात बीओपी घनियाजवळ एका पाकिस्तानी घुसखोराला जवानांनी इशारा दिला. तो न थांबल्याने गोळीबार करण्यात आला आणि घुसखोर ठार झाला. चौकशी सुरू आहे.

### आयजीआय विमानतळावर १० कोटींचा गांजा जप्त

**दिल्ली.** इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर कस्टम अधिकाऱ्यांनी बँकॉकहून आलेल्या भारतीय प्रवाशाकडून ९.८४ किलो गांजा जप्त केला. प्रवाशाला टर्मिनल ३ वर ताब्यात घेऊन तपासणी केली असता हिरव्या हँडबॅगमधील पॉलीबॅग्जमध्ये गांजा सापडला. जप्त पदार्थाची किंमत सुमारे ९.८३ कोटी रुपये, अटक एनडीपीएस कायद्यानुसार केली.

# चालत्या स्लीपर बसला आग; ३६ प्रवासी बचावले

## चालकासह सहा जण जखमी

**बंगळुरू, वृत्तसंस्था.** होसनगराहून शिवमोग्गा मार्गे बंगळुरूला जाणाऱ्या एका खाजगी स्लीपर बसला रात्री अचानक आग लागल्याने परिसरात खळबळ उडाली. होसनगरा तालुक्यातील अरसालू–सुदुरु परिसरात हा अपघात घडला. सुदैवाने बसमधील सर्व ३६ प्रवासी सुरक्षित बचावले; मात्र चालकासह सहा जण जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, चालकाच्या केबिनमधून अचानक धूर येऊ लागल्याचे दिसताच चालक घाबरला आणि बसवरील नियंत्रण सुटले. अनियंत्रित बस रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर आदळली व काही क्षणांतच तिने पेट घेतला. आग वाढताच प्रवाशांनी प्रसंगावधान राखत आपत्कालीन मार्गाचा वापर केला आणि जळत्या बसमधून उड्या मारून प्राण वाचवले. काही मिनिटांतच बस पूर्णपणे जळून खाक झाली. अपघातानंतर स्थानिक नागरिक व अन्य वाहनचालकांनी तत्काळ मदतकार्य केले. जखमींवर उपचार सुरू असून, रिपनपेट पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन गुन्हा नोंदवला आहे. आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाला सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



**दिलासा** ● लंडनच्या पातळीची सुविधा आता जयपूर एसएमएसमध्ये

# आशियातील पहिली डर्मेटॉलॉजी इन्स्टिट्यूट

**जयपूर, वृत्तसंस्था.** राजस्थानमधील सर्वात मोठ्या सरकारी रुग्णालय एसएमएसच्या चरक भवनामध्ये आशियातील पहिले डर्मेटॉलॉजी इन्स्टिट्यूट उघडले जाणार आहे. लंडननंतर अशा पातळीची सुविधा आता जयपूरमध्ये उपलब्ध होईल. हा केंद्र आधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिक दर्जाच्या यंत्रसामग्रीने सज्ज असेल, जिथे त्वचेच्या जवळजवळ सर्व रोगांचा आणि कॉस्मेटिक समस्या यांचा उपचार होईल. वृद्ध पुरुषांमध्ये दिसणाऱ्या काही विशिष्ट आरोग्य समस्या देखील येथे सोडवता येतील. चरक भवनाच्या पहिल्या मजल्यावर उभारण्यात येत असलेल्या या इंस्टिट्यूटवर सुमारे ७ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. उत्कृष्ट उपचार आणि स्वस्त दरांसह, या संस्थेची सुरुवात फेब्रुवारीत होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत जे रुग्ण खाजगी रुग्णालयात मोठा खर्च करत होते, त्यांना आता सरकारी रुग्णालयात दिलासा मिळेल.




### स्वस्त दर आणि कमी खर्च

₹ रुग्णांकडून फक्त यंत्रसामग्रीच्या देखभालीसाठी थोडे शुल्क घेतले जाईल. उपचाराची किंमत २०० रुपयांपासून १५०० रुपयांपर्यंत असेल, तर खाजगी रुग्णालयांमध्ये हीच किंमत लाखांपर्यंत पोहोचते.

### उपचारातील मुख्य फरक

- लेझर हेअर रिमूव्हल : खाजगी रुग्णालयात ४–५ हजार रुपये प्रति भेट, एसएमएसमध्ये सुमारे ७७० रुपये.
- जन्मजात काळे डाग हटवणे : खाजगीमध्ये ५०–७० हजार रुपये, येथे फक्त १५०० रुपये.
- फेसवरील काळे मुळे हटवणे : खाजगीमध्ये १०–३० हजार रु, येथे ८००–१००० रुपये.
- रेडिओ फ्रिक्वेन्सीने मुळे काढणे : खाजगीत ४–५ हजार रुपये, येथे मोफत.

### गंभीर रोगांवरही दिलासा

- सोरायसिस सारख्या रोगांसाठी फोटोथेरपी खाजगी केंद्रांमध्ये महाग, एसएमएसमध्ये मोफत उपलब्ध.
- केस झडणे उपचारासाठी आरआरपी थेरपी खाजगीत सुमारे ५५ हजार रुपये, येथे मोफत.

# सिरपप्रकरणी फरार शुभमची १.८५ कोटीची मालमत्ता जप्त

## कोडीन कफ सिरप रॅकेटप्रकरणी कारवाई

**गाजीपूर, वृत्तसंस्था.** उत्तर प्रदेशातील गाजीपुरमध्ये कोडीन कफ सिरपच्या अवैध व्यापारावर पोलिसांनी मोठी कारवाई केली. फरार आरोपी शुभम सिंहची १.८५ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. शुभम सिंह गाजीपूर येथील नित्यांश मेडिकल एजन्सीचा मालक असून, दीर्घकाळापासून फरार होता. जप्त केलेली मालमत्ता भुडकुडा येथील धीरजोतपूर गावात असून, ती आरोपीच्या आई नीलम देवीच्या नावावर होती. तपासात असे आढळले की, ही मालमत्ता अवैध व्यापारातून मिळालेल्या पैशातून खरेदी केली गेली होती. सदर कोतवालीत नित्यांश मेडिकल एजन्सीसह सहा मेडिकल फर्मविरुद्ध एफएसडीएच्या तक्रारीनुसार केस दाखल झाला आहे. पोलिसांनी सांगितले की, या रॅकेटशी संबंधित अनेक कन्साइनमेंट बांग्लादेश सीमेपासून जप्त झाले आहेत. आतापर्यंत अनेक आरोपी पकडले गेले असून, इतर संशयितांकडून चौकशी सुरू आहे. पोलिस रॅकेटशी संबंधित इतर लोकांवरही कठोर कारवाई करतील, असे एसपी ईरज राजा यांनी स्पष्ट केले.



**पावसाचा इशारा;** प्रवाशांनी सुरक्षिततेसाठी खबरदारी घेणे गरजेचे

# हिमाचलमध्ये बर्फवृष्टी, ९०० रस्ते बंद

**शिमला, वृत्तसंस्था.** उत्तर भारताच्या पर्वतीय भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून जोरदार बर्फवृष्टी सुरु आहे. हिमाचल प्रदेशापासून उत्तराखंडपर्यंतच्या डोंगराळ भागात बर्फाची पांढरी चादर पसरली आहे. पर्वत बर्फाने आच्छादित होऊन अतिशय सुंदर दिसत आहेत. औली, बद्रीनाथ आणि केदारनाथमध्येही मोठ्या प्रमाणात बर्फवृष्टी नोंदवली गेली आहे. हिमाचल आणि जम्मू-कश्मीरमध्येही जोरदार बर्फवृष्टी झाली आहे. हिवाळ्याचा थंड वारा आणि तापमानात घट सतत वाढत आहे. या बर्फवृष्टीमुळे पर्यटनाला उत्साह लाभला असला तरी, काही समस्याही निर्माण झाल्या आहेत. अनेक ठिकाणी वाहने बर्फात अडकली असून प्रवाशांना तासंतास रांगेत थांबावे लागले. हिमाचल प्रदेशात ट्रॅफिक जामची समस्या दिसून आली. सध्याच्या परिस्थितीत ८८५ रस्ते बंद असून, वाहतूक, वीज आणि पाण्याच्या पुरवठ्यावरही परिणाम झाला आहे. गेल्या २४ तासांत झालेल्या बर्फवृष्टी आणि पावसामुळे जनजीवन प्रभावित झाले आहे. भारत हवामान विभागाने आगामी दिवसांत जम्मू-कश्मीर आणि हिमाचल प्रदेशात पुन्हा जोरदार बर्फवृष्टी आणि पावसाचा इशारा दिला आहे. प्रवाशांनी सुरक्षिततेसाठी खबरदारी घेणे गरजेचे आहे.

### ६ फूट बर्फात अडकला होता जवान



जम्मू–काश्मीरच्या डोडा जिल्ह्यात मानवता आणि धैर्याचे प्रेरणादायी उदाहरण समोर आले. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, सुमारे ११,००० फूट उंचीवर मोर्चा टॉप परिसरात ५–६ फूट बर्फात अडकलेल्या भारतीय सेनेच्या २०हून अधिक जवानांना स्थानिक ग्रामीणांनी सुरक्षित बाहेर काढले. माइनस तापमानात ग्रामीणांनी १५ किमीचा कठीण पायी प्रवास करत बर्फ कापून मार्ग तयार केला.

# आता घराघरांत कचरा वर्गीकरण बंधनकारक

### १ एप्रिलपासून नवे घनकचरा नियम लागू

**दिल्ली, वृत्तसंस्था.** देशभरात १ एप्रिलपासून घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ लागू होणार असून, कचरा व्यवस्थापनाच्या पद्धतीत मोठा बदल घडणार आहे. गेल्या दहा वर्षांपासून लागू असलेल्या जुन्या नियमांची जागा हे नवे आणि अधिक कडक नियम घेणार आहेत. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने मंगळवारी या नियमांची अधिसूचना जारी केली. नव्या नियमांचा मुख्य उद्देश म्हणजे कचरा जिथे निर्माण होतो तिथेच त्याचे व्यवस्थापन करणे आणि पुनर्वापर वाढवणे. त्यानुसार, प्रत्येक घर, संस्था, गृहसंकुल, सरकारी इमारती, विद्यापीठे व खाजगी आस्थापनांना कचरा चार प्रकारांमध्ये वेगळा करणे बंधनकारक असेल.



यामध्ये ओला कचरा, सुका कचरा, सॅनिटरी कचरा आणि विशेष कचरा (ई-कचरा, बॅटऱ्या, ट्यूबलाइट) यांचा समावेश आहे.

### ओला कचरा स्वतःच्या परिसरातच कंपोस्ट करावा

मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण करणाऱ्या 'बल्क वेस्ट जनरेटर'साठी नियम अधिक कठोर आहेत. २० हजार चौरस मीटरपेक्षा मोठे क्षेत्रफळ, दररोज ४० हजार लिटरपेक्षा जास्त पाण्याचा वापर किंवा १०० किलोहून अधिक कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांना ओला कचरा स्वतःच्या परिसरातच कंपोस्ट किंवा बायोगॅसद्वारे प्रक्रिया करावी लागणार आहे. नियम न पाळणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईची तरतूद करण्यात आली असून, वेगळा न केलेला कचरा थेट लँडफिलवर टाकल्यास अतिरिक्त शुल्क आकारले जाईल.

# 'हे काश्मीर नाही, यांना मारून टाका'

**डेहराडून, वृत्तसंस्था.** डेहराडूनमध्ये दोन काश्मिरी मुलांना दुकानदाराने लोखंडी रॉडने मारहाण केली. जखमींचा आरोप आहे की, दुकानदाराला मुस्लिम आणि काश्मीरचे आहेत हे कळताच तो भडकला आणि शिवीगाळ करत मारहाण करू लागला. यावेळी दुकानाजवळ बसलेले काही इतर लोकही तिथे पोहोचले आणि मग सर्वांनी मिळून लाठी-काठी आणि लोखंडी रॉडने मारहाण करून दोन्ही मुलांना गंभीर जखमी केले. जखमीने सांगितले की, मारहाण करणाऱ्यांमध्ये दुकानदारासोबत एक महिलाही होती, यावेळी ते म्हणत होते- हे काश्मीर नाही, इथे काश्मिरी चालणार नाही, हे मुस्लिम आहेत, यांना जिवंत मारून टाका. तुम्ही पहलगाममध्ये आमच्या लोकांना मारले आहे, आता आम्ही तुम्हाला दाखवतो. ही घटना बुधवारी संध्याकाळी डेहराडूनच्या विकास नगरमध्ये घडली आहे, हल्ल्यात दानिश (१८) आणि त्याचा एक अल्पवयीन नातेवाईक जखमी झाला आहे. अल्पवयीनाचा हात तुटला आहे आणि डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. दानिशलाही अनेक ठिकाणी गंभीर दुखापती झाल्या आहेत.

### म्हणत काश्मिरी तरुणांवर अमानुष हल्ला

**प्रियकराला हायकोर्टाचा दणका**

# प्रेमसंबंध म्हणजे जोडीदाराच्या बदनामीचे लायसन्स नव्हे!

**रांची, वृत्तसंस्था.** प्रेमसंबंध असणे म्हणजे एका जोडीदाराला दुसऱ्याचे शोषण किंवा बदनामी करण्याचा परवाना मिळतो, असा गैरसमज दूर करत झारखंड उच्च न्यायालयाने एका तरुणाचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला आहे. पीडित महिलेचे अश्लील फोटो आणि बदनामीकारक मजकूर तिच्या नोकरीच्या संस्थेत पाठवून तिची प्रतिमा मलिन केल्याचा गंभीर आरोप आरोपीवर आहे. रिपोर्टनुसार, २०२१ मध्ये रांची येथील एका एअर होस्टेस ट्रेनिंग इनस्टिट्यूटमध्ये आरोपी आणि पीडितेची ओळख झाली. त्या वेळी आरोपी अकाउंटंट म्हणून कार्यरत होता. गेल्या तीन वर्षांपासून दोघांमध्ये प्रेमसंबंध होते. मात्र, नात्यात बिघाड झाल्यानंतर आरोपीने पीडितेच्या नावाने बनावट ई-मेल आयडी आणि सोशल मीडिया अकाउंट्स तयार करून तिचे अश्लील फोटो व बदनामीकारक मजकूर प्रसारित करण्यास सुरुवात केली. पीडितेच्या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना हे फोटो पाठवण्यात आले, तसेच तिच्या नावाने बनावट इंस्टाग्राम अकाउंट उघडून नातेवाईकांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवण्यात आल्या.



### वैयक्तिक रागातून आणि सूडबुद्धीने केलेला गुन्हा

न्यायमूर्ती संजय कुमार द्विवेदी यांच्या एकलपीठाने स्पष्ट केले की, परस्पर संमतीने संबंध असले तरी गोपनीयता आणि सन्मानाचा भंग केल्यास ते 'साधी मैत्री' ठरत नाही. वैयक्तिक राग आणि सूडबुद्धीने केलेला हा गुन्हा असल्याचे सकृतदर्शनी दिसत असून, तांत्रिक पुरावे व साक्षीदारांचे जबाब आरोपीविरोधात असल्याने अटकपूर्व जामीन नाकारणे योग्य असल्याचे न्यायालयाने ठामपणे नमूद केले.

# ४५ सेकंदांत विद्यार्थ्याला ३१ वेळा बेल्टने मारहाण

## तक्रार केल्याची दिली 'शिक्षा'

**भोपाळ, वृत्तसंस्था.** मध्य प्रदेशातील सिंग्रोली जिल्ह्यात शालेय विद्यार्थ्यांमधील वाढती हिंसा पुन्हा एकदा उघडकीस आली आहे. शिवीगाळ केल्याची तक्रार मुख्याध्यापकांकडे केल्याने एका विद्यार्थ्याला भररस्त्यात अमानुष मारहाण करण्यात आली. अवघ्या तीन दिवसांपूर्वी दहावीच्या विद्यार्थ्याला झालेल्या सामूहिक मारहाणीचे प्रकरण ताजे असतानाच ही दुसरी धक्कादायक घटना समोर आली आहे. पीडित ज्ञानेश विश्वकर्मा हा बारावीत शिकतो. २६ जानेवारीला काही वर्गमित्रांनी शिवीगाळ केल्यानंतर त्याने मुख्याध्यापकांकडे तक्रार केली. मुख्याध्यापकांनी आरोपी विद्यार्थ्यांना झापले; मात्र याच रागातून त्यांनी बदला घेण्याचा कट रचला. मंगळवारी दुपारी ज्ञानेश एकटा असल्याचे पाहून त्याला रस्त्यात अडवून जमिनीवर पाडले आणि ४५ सेकंदांत तब्बल ३१ वेळा बेल्टने मारहाण करत लाथाबुक्क्यांचा वर्षाव केला. हा प्रकार मोबाईलमध्ये कैद होऊन व्हायरल होताच खळबळ उडाली. निवास चौकी पोलिसांनी तक्रारीवरून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून आरोपींचा शोध सुरू आहे. शाळांतील हिंसाचार रोखण्यासाठी तातडीच्या कडक उपाययोजनांची मागणी होत आहे.

**प्रजासत्ताक दिन परेड** नौदलाच्या शिस्तबद्ध संचलनाने सर्वोच्च पुरस्कार पटकावला

# मार्चिंग सर्वोत्कृष्ट, महाराष्ट्राचा चित्ररथ अव्वल

**दिल्ली, वृत्तसंस्था.** प्रजासत्ताक दिन परेड २०२६ मधील विविध स्पर्धांचे विजेते बुधवारी जाहीर करण्यात आले. तिन्ही सेनांमधील मार्चिंग पथकांमध्ये भारतीय नौदलाच्या मार्चिंग पथकाने सर्वोत्कृष्ट ठरून सर्वोच्च पुरस्कार पटकावला. ऐतिहासिक कर्तव्य पथावर १४४ जवानांनी शिस्तबद्ध आणि प्रभावी संचलन सादर केले, याची विशेष दखल परीक्षकांनी घेतली. राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या चित्ररथांच्या स्पर्धेत महाराष्ट्राने अव्वल स्थान मिळवले. महाराष्ट्राच्या चित्ररथात गणेशोत्सवाला आत्मनिर्भरतेचे प्रतीक म्हणून सादर करण्यात आले होते. पारंपरिक वेशभूषेतील महिलांनी चित्ररथाच्या दोन्ही बाजूंनी लोकनृत्य सादर करत सांस्कृतिक वैभव दाखवले. तसेच मराठी चित्रपट व नाट्यसृष्टीचा वारसा, संगीतकार विष्णुपंत पागनीस यांच्या दुर्मिळ ध्वनिमुद्रणाचे चित्रण आणि स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित दृश्ये या चित्ररथात समाविष्ट होती. केंद्रीय मंत्रालये आणि विभागांच्या श्रेणीत संस्कृती मंत्रालयाचा 'वंदे मातरम'च्या १५० वर्षांच्या वारशाचा उत्सव साजरा करणारा चित्ररथ प्रथम क्रमांकावर राहिला. राज्यांच्या चित्ररथांमध्ये जम्मू-काश्मीर दुसऱ्या, तर केरळ तिसऱ्या क्रमांकावर राहिले.




### राज्यांच्या चित्ररथांमध्ये गुजरातचा पहिला क्रमांक

मायगव्ह पोर्टलवरील ऑनलाइन मतदानावर आधारित 'पॉप्युलर चॉइस' श्रेणीत तिन्ही सेवांमधील सर्वोत्तम मार्चिंग पथक म्हणून आसाम रेजिमेंटची निवड झाली. राज्यांच्या चित्ररथांमध्ये गुजरातने पहिला क्रमांक पटकावला, तर उत्तर प्रदेश आणि राजस्थान अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानी राहिले. पुरस्कार वितरण समारंभ ३० जानेवारी रोजी राष्ट्रीय रंगशाळा कॅम्पमध्ये होणार आहे.

# शबरीमला : उन्नीकृष्णन विशेष सरकारी वकील

**तिरुवनंतपुरम.** केरळ सरकारने शबरीमला मंदिरातील सोने चोरी प्रकरणात एन.के. उन्नीकृष्णन यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे. सरकारी आदेश बुधवारी जारी झाला. उन्नीकृष्णन द्वारपालका मूर्ती आणि श्रीकोविल (गर्भगृह) मधून चोरी संबंधित दोन खटल्यांमध्ये विशेष तपास पथकाच्या वतीने खटल्याचे नेतृत्व करतील. ते तपासादरम्यान कायदेशीर सल्ला देतील आणि आरोपपत्रांची बारकाईने तपासणी करून न्यायालयात दाखल करतील. त्रिशूरचे रहिवासी उन्नीकृष्णन यांना एप्रिल २०१६ मध्ये एका बलात्कार आणि खून प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहण्याचा अनुभव आहे. सध्या सरकारी वकिलांना आरोपपत्र दाखल करण्यात विलंबामुळे एका आरोपीला जामिन मिळाल्याचा दबाव भासत आहे.




Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

सदैव आपल्या वाचकांसोबत

पुणे

३० शुक्रवार
जानेवारी २०२६

epaper.navarashtra.com

/navarashtra

तापमान | कमाल ३०.८ °C / किमान १५.१ °C

# पुणे नवराष्ट्र प्लस

navarashtra.com



बारामतीमधील समीकरणे बदलणार?

आतील पानावर

# दादांना निरोप देताना फुटला अश्रूंचा बांध

## राजकीय, सामाजिक, सहकारी क्षेत्रावर पसरली शोककळा; सर्वपक्षीय नेत्यांची उपस्थिती





**बारामती, प्रतिनिधी.** महाराष्ट्राच्या राजकारणात निर्णायक नेतृत्व म्हणून ओळख निर्माण करणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अखेरचा निरोप बारामतीकरांसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या लाखो कार्यकर्त्यांनी साश्रू नयनांनी घेतला. अजितदादांचे अकाली निधन झाल्याचे वृत्त समजल्यापासून आज दुसऱ्या दिवशीही बारामती शहरासह तालुका तसेच इतर तालुक्यातील व्यवहार पूर्णपणे ठप्प होते.

त्यांच्या निधनाने राज्याच्या राजकीय, सामाजिक आणि सहकारी क्षेत्रावर गडद शोककळा पसरली असून, हजारो नागरिकांच्या डोळ्यांत अश्रू आणि मनात असंख्य आठवणी साठून राहिल्या.

विद्या प्रतिष्ठान शैक्षणिक संकुलाच्या विस्तीर्ण मैदानावर शासकीय सन्मानासह त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पहाटेपासूनच नागरिकांची गर्दी वाढत होती. कार्यकर्ते, समर्थक, शेतकरी, युवक आणि महिलांनी अंतिम दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. "अजित दादा अमर रहे"च्या घोषणा आणि शोकाकुल वातावरणामुळे प्रत्येकाच्या चेहऱ्यावर मोठी निराशा दिसत होती. एखादा कुटुंब प्रमुख गेल्यानंतर कुटुंबातील सदस्यांची जी अवस्था होते, ती अवस्था उपस्थित असणाऱ्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून येत होती . केंद्रीय मंत्री अमित शहा, नितीन गडकरी, रामदास आठवले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्यासह केंद्र व राज्य मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, खासदार, आमदार यांच्यासह मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी, यांनी पुष्पचक्र अर्पण करून अजितदादांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले. सकाळी अजित दादांचे पार्थिव शासकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयातून काटेवाडीत त्यांच्या घरी नेण्यात आले, त्यानंतर विद्या प्रतिष्ठानच्या क्रीडांगणावर तिरंग्यामध्ये लपेटून सजवलेल्या बसमध्ये अजित दादांचे पार्थिव आणण्यात आले. या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी लाखोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी पार्थिवाचे दर्शन घेतले, यानंतर दोन्ही पुत्र पार्थ व जय यांनी वडिलांच्या पार्थिवाचे अंतिम दर्शन घेऊन त्यांनी मुखाग्नी दिला . अजितदादा अमर रहे, या घोषणांनी वातावरण आणखी शोकाकुल झाले होते.

### संपूर्ण परिसरात वाहनांच्या लांबच्या लांब रांगा

बारामती शहरातील विविध रस्त्यांवर दोन दिवसांपासून वाहनांच्या लांब रांगा होत्या. तर अंत्यसंस्काराच्या दिवशी पहाटेपासूनच राज्यभरातून आलेल्या नागरिकांमुळे सगळे रस्ते वाहनांच्या गर्दीने फुलून गेले होते. बारामतीत येणाऱ्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अति दुःखाच्या भावना दिसून येत होत्या. यामध्ये राज्यातील तसेच केंद्रातील दिग्गज नेत्यांच्या चेहऱ्यावर देखील दुःखाचा तो भाव दिसत होता. केंद्रासह राज्यातील नेत्यांनी अजित दादांच्या पार्थिवाचे दर्शन घेतल्यानंतर, सुनिता पवार यांच्यासह पार्थ व जय पवार यांचे सांत्वन केले. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह खासदार सुप्रिया सुळे,श्रीनिवास पवार, राजेंद्र पवार, आमदार रोहित पवार, युग्नेद्र पवार व इतर सर्व पवार कुटुंबीय उपस्थित होते.

केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने त्यांच्या पार्थिवाला मानवंदना देण्यात आली. विरोधातील अनेकांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्व पक्षांच्या नेत्यांनी अजित पवार यांच्या कार्याचा गौरव माध्यमांशी बोलताना केला.

अजित पवार हे केवळ राजकारणी नव्हते, तर विकासाचे प्रतीक होते. बारामतीपासून महाराष्ट्रापर्यंत त्यांनी विकासाची ठोस पायाभरणी केली. सिंचन प्रकल्प, सहकारी संस्था, शिक्षण व्यवस्था आणि पायाभूत सुविधांमध्ये त्यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे. कठोर निर्णय, स्पष्ट भूमिका आणि प्रशासनावरची पकड ही त्यांच्या नेतृत्वाची ओळख होती.त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राने केवळ एक नेता नाही, तर संघर्षशील नेतृत्व, कार्यक्षम प्रशासक आणि जनतेशी नाते जपणारा लोकप्रतिनिधी गमावला आहे, अशा प्रतिक्रिया अनेक मान्यवरांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केल्या.

दरम्यान बारामती शहरातील सर्व व्यवहार पूर्णपणे दोन दिवसांपासून ठप्प आहेत. बारामती नगरपालिकेचे कामकाज देखील दुसऱ्या दिवशी बंद ठेवण्यात आले होते. शहरातील अनेक शाळा महाविद्यालय बंद ठेवण्यात आली होती. वैद्यकीय व्यवसाय वगळता अन्य सर्व व्यावसायिक दुकाने पूर्णपणे बंद होती. त्यामुळे बाहेरून आलेल्या नागरिकांचे मोठे हाल झाले, यामध्ये पोलीस कर्मचाऱ्यांचे हाल झाले. दरम्यान काही नागरिकांनी केळी व अल्पोपार पोलीस कर्मचाऱ्यांना दिला, तसेच काहींनी पाण्याच्या पाटलांचे वाटप केले. पेट्रोल पंप देखील बंद असल्याने वाहन चालकांची मोठी गैरसोय झाली.

# राष्ट्रवादीः एकत्र येण्याचा निर्णय कोण घेणार?

## शरद पवार यांच्या भूमिकेकडे लक्ष



**पुणे, शहर प्रतिनिधी** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रीकरणाच्या चर्चेला विराम मिळाला आहे. पुढील काळात दोन्ही पक्षाचे ज्येष्ठ नेते काय निर्णय घेणार यावर बरेच अवलंबुन राहणार आहे. अजित पवारांच्या निधनानंतर त्यांच्या शेवटच्या इच्छेबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अंकुश काकडे यांनी महत्त्वाचा खुलासा केला आहे. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पहिल्यांदाच राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र आले होते. त्यामुळे भविष्यात पक्षाचे विलीनीकरण होणार का, याबाबत चर्चा सुरू होती. मात्र या चर्चांना स्पष्ट दिशा मिळण्याआधीच अजित पवार यांचे निधन झाले.

अंकुश काकडे यांनी सांगितले की, निधनाच्या काही दिवस आधी अजित पवार दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गट पुन्हा एकत्र यावेत यासाठी प्रयत्नशील होते. "मी(अंकुश), विठ्ठलशेठ मणियार आणि श्रीनिवास पाटील साहेबांशी (शरद पवार) चांगले संबंध आहेत. तुमच्या वारंवार भेटीगाठी होतात. तुम्ही त्यांच्याशी बोला आणि दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासाठी प्रयत्न करा," असे अजितदादांनी त्यांना सांगितल्याचे काकडे यांनी नमूद केले. आपण आणि विठ्ठलशेठ सातत्याने प्रयत्न करत होतो; मात्र त्याला यश मिळाले नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री पवार यांच्या निधनामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये नेतृत्वाची मोठी पोकळी निर्माण झाली आहे. तसेच शरदचंद्र पवार हे देखील काही कारणास्तव गेल्या काही महीन्यापासून सक्रीय राजकारणापासून दुर राहत असल्याचे चित्र आहे. पुढील काळात शरद पवार आणि दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांकडून एकत्रिकरणासंदर्भात सकारात्मक पावले पडू शकतील.

### तुमच्या तोंडात साखर पडो

महापालिका निवडणुकांमध्ये प्रथमच दोन्ही गट भाजपाविरोधात एकत्र लढले. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये ही एकजूट स्पष्टपणे दिसली. त्यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतही दोन्ही गट एकत्र आले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलीनीकरणाची चर्चा अधिकच रंगली होती. पत्रकारांनी याबाबत विचारले असता अजित पवार यांनी "तुमच्या तोंडात साखर पडो" असे म्हणत सकारात्मक संकेत दिले होते.

**राजकारण : निवडणुकीनंतर अधिकृत घोषणा मात्र ९ फेब्रुवारी रोजी**

# महापौर मंगळवारीच स्पष्ट होणार

**पुणे, शहर प्रतिनिधी** पुण्याचा महापौर कोण ? हे ३ फेब्रुवारीलाच स्पष्ट होणार आहे. प्रत्यक्षात ९ फेब्रुवारीला निवडणुक झाल्यानंतर त्याची अधिकृत घोषणा केली जाईल.



महापालिका निवडणुक नुकतीच पार पडली आहे. भाजप हा सर्वाधिक जागा मिळविणारा पक्ष ठरला असुन, त्यांच्यात या पदासाठी कोणाला संधी दिली जाणार याविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे. यावेळी महापौर पदासाठी महिला (सर्वसाधरण ) हे आरक्षण पडले आहे. यामुळे ज्येष्ठ नगरसेविका रंजना टिळेकर, वर्षा तापकीर, मानसी देशपांडे, मंजुषा नागपुरे, स्मिता वस्ते आदींची नावे चर्चेत आहे. टिळेकर या विधान परीषद सदस्य योगेश टिळेकर यांच्या आई आहेत. तर देशपांडे या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या वहीनी आहेत. तर राष्ट्रीय स्वंयसेवक संघाकडून नागपुरे यांच्या नावाला पसंती दिली जाऊ शकते. तापकीर यापुर्वी स्थायी समितीच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत होत्या, परंतु त्यांना संधी मिळू शकली नव्हती. त्यामुळे त्या देखील या पदाच्या दावेदार ठरू शकतात.



दरम्यान, महापालिका प्रशासनाने निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. महापौर आणि उपमहापौर निवडणूक सोमवार ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. या पदांसाठी ३ फेब्रुवारी रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार आहे. त्यामुळे पुण्याच्या महापौर पदी कोण विराजमान होणार हे ३ फेब्रुवारीलाच स्पष्ट होणार आहे. सत्ताधारी भाजपकडून जो उमेदवार दिला जाईल, त्याचा विजय निश्चित आहे. तर भाजप हे उपमहापौर पद आरपीआयच्या पारड्यात घालणार का ? पक्षातील नाराजी दुर करण्यासाठी या पदाचा तडजोडीसाठी उपयोग करून घेणार हे लवकरच स्पष्ट होईल.

### स्थायी समितीसाठी १६ सदस्यही निवडले जाणार

पुणे महापालिका निवडणूक नुकतेच पार पडली. १६५ सदस्य असलेल्या महापालिकेत सर्वाधिक ११९ नगरसेवक भाजपचे आहेत. त्यामुळे महापौर आणि उपमहापौर भाजपचाच होणार आहे. महापौर व उपमहापौर निवडणुकीसाठी ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता विशेष सभेत जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या अध्यक्षतेखाली महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूक होणार आहे. या सभेच्या पत्रिकेवरच स्थायी समिती साठी १६ सदस्यांची नियुक्ती, तसेच इतर विषय समित्यांवर १३ सदस्यांची नियुक्ती करण्याचा विषय देखील घेण्यात आला आहे. दरम्यान , यंदा महापौर पद महिलांसाठी राखीव असल्याने उपमहापौर पदी शक्यतो पुरुष सदस्याला संधी दिली जाण्याची शक्यत वर्तविण्यात येत आहे.

**जीवनवाहिनी ● दररोज सव्वालाख प्रवाशांकडून लाभ; वर्षभरात ८६ कोटींहून अधिक उत्पन्न**

# ऑनलाईन तिकिटांकडे वाढता कल

**चंद्रकांत कांबळे । नवराष्ट्र**

**पुणे.** पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) बससेवेतून दररोज साधारणतः दहा ते अकरा लाख प्रवासी प्रवास करतात. यापैकी मोबाईल ॲप आणि स्कॅनरच्या माध्यमातून दररोज सुमारे १ लाख १० हजार प्रवासी ऑनलाईन तिकिट काढत असल्याची माहिती समोर आली आहे. यावरून पीएमपी प्रवाशांचा ऑनलाईन तिकिट प्रणालीकडे कल लक्षणीयरीत्या वाढल्याचे स्पष्ट होते.

जानेवारी ते डिसेंबर २०२५ या संपूर्ण वर्षभरात पीएमपीमार्फत एकूण ४ कोटी ७ लाख ३० हजार २५ प्रवाशांनी ऑनलाईन तिकिट काढले आहे. या ऑनलाईन तिकिट प्रणालीतून पीएमपीला ८६ कोटी ८० लाख ७६ हजार ४६० रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे. ऑनलाईन तिकिट काढण्याची प्रक्रिया अधिक सुलभ, जलद आणि सोयीस्कर झाल्यामुळे प्रवाशांचा कल ऑनलाईन पद्धतीकडे वाढत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.ऑनलाईन तिकीट प्रणालीमुळे वाहक आणि प्रवासी यांच्यात सुट्ट्या पैशांवरून होणारे वादही मोठ्या प्रमाणात कमी झाले आहेत. मोबाईल ॲप तसेच मशीन स्कॅनरद्वारे तिकीट काढता येत असल्याने प्रवाशांना रोख रक्कम जवळ ठेवण्याची गरज भासत नाही, याचा सकारात्मक परिणाम प्रवास अनुभवावर होत आहे.



### सुट्ट्या पैशाची अडचण कमी

ऑनलाईन तिकीट मोबाईल ॲप आणि मशीन स्कॅनच्या माध्यमातून काढणे सुलभ झाले आहे. त्यामुळे प्रवाशांचा कल ऑनलाईन तिकीट काढण्याकडे वाढत असल्याचे दिसून येते. सुट्ट्या पैशांमुळे येणाऱ्या अडचणी देखील कमी होत आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त प्रवाशांनी ऑनलाईन प्रणालीचा वापर करावा.

**-किशोर चौहान,**
जनसंपर्क अधिकारी, पीएमपी

### ऑनलाईन तिकीटातून मिळालेले उत्पन्न (२०२५)

| महिना | प्रवासी | उत्पन्न (रुपये) |
|---|---|---|
| जानेवारी | ३१,३७,२९९ | ५,३८,८९,७४६ |
| फेब्रुवारी | ३०,४९,०१५ | ५,१८,०६,८६९ |
| मार्च | ३५,१८,७१४ | ५,९५,९४,४०२ |
| एप्रिल | ३६,४३,७९४ | ६,११,८२,८५७ |
| मे | ३५,८४,६९५ | ६,०३,२३,१८६ |
| जून | ३०,३८,१६४ | ७,६२,६४,३७८ |
| जुलै | ३८,११,६६१ | ९,४०,५५,६१२ |
| ऑगस्ट | ३५,७४,४९१ | ८,७९,४९,२६० |
| सप्टेंबर | ३५,६०,०५९ | ८,५७,४७,८२७ |
| ऑक्टोबर | ३०,९५,००३ | ७,५१,६३,७६२ |
| नोव्हेंबर | ३३,४२,३३३ | ८,०९,०५,३२० |
| डिसेंबर | ३३,७४,७९७ | ८,११,९३,२४० |
| एकूण | ४,०७,३०,०२५ | ८६,८०,७६,४६ |

## Short News

### समन्वयक परीक्षेचे प्रवेशपत्र ऑनलाईन

**पुणे,** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्रप्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत प्राथमिक शिक्षकांमधून केंद्रप्रमुख पदावर नियुक्तीसाठी घेण्यात येणार असून, या परीक्षेचे प्रवेश पत्र ऑनलाइन उपलब्ध झाले आहेत.

# व्यापाऱ्यांकडून बंद पाळून अजितदादांना श्रद्धांजली

**पुणे, शहर प्रतिनिधी** पुणे शहरातील व्यापाऱ्यांनी बंद पाळत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहीली. उपनगरासह शहराच्या मध्यभागातील व्यापारी या बंदमध्ये सहभागी झाले होते. उपमुख्यमंत्री पवार यांचे बुधवारी अपघाती निधन झाले. राज्य सरकारने तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला. बुधवारीच जिल्ह्यातील अनेक भागात बंद पाळला गेला होता. तर पुण्यातील व्यापाऱ्यांनी गुरुवारी बंद पाळून श्रद्धांजली वाहीली. पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने गुरुवारी बाजार बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. तसेच दि पुना मर्चंटस चेंबरने देखील बंद पाळण्याचा निर्णय घेतला. गुरुवारी बाजार आवारात शुकशुकाट पाहण्यास मिळाला. सर्व व्यवहार ठप्प झाल्याने आर्थिक व्यवहार थांबले होते. काही दुकानदारांनी दुकाने पुर्ण वेळ बंद ठेवले तर काहींनी दुकान अर्धवट उघडून इतर काम उरकण्यावर भर दिला होता.



किराणा भुसार मालाच्या बाजारातील बहुतेक दुकाने बंद ठेवली गेली होती. त्याचप्रमाणे समितीच्या आवारातील भाजीपाला, फळे , फुले, केळी बाजारात आवक झाली नाही. बाजार समितीने बुधवारीच बंद होणार असल्याचे जाहीर केल्याने शेतकऱ्यांनी बाजार आवारात शेतमाल आणला नाही. शुक्रवारी मात्र बाजार नियमितपणे सुरु राहणार आहे.

# एनएमएमएस परीक्षेची उत्तरसूची जाहीर



**पुणे, शहर प्रतिनिधी** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना ही परीक्षा रविवार, २८ डिसेंबर २०२५ रोजी इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली होती. (एनएमएमएस) अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेची अंतिम उत्तरसूची जाहीर करण्यात आली आहे. अशी माहिती प्रसिद्धी पत्रकांद्वारे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली. या परीक्षेच्या एमएटी अन एसएटी विषयांच्या प्रश्नपत्रिकांवरील हरकती आणि आक्षेप ऑनलाइन पद्धतीने मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या हरकतींचा विषयतज्ज्ञांकडून अभ्यास करून आता अंतिम उत्तरसूची प्रसिद्ध करण्यात आली आहे. राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर पाहावी.

**संशयास्पद | कारवाईची टांगती तलवार; जिल्हा प्रशासनाचे शुद्धीकरण अभियान**

# राज्यातील ६८ हजार रेशनकार्ड रडारवर



**पुणे, शहर प्रतिनिधी** जिल्ह्यात तब्बल ६८ हजार संशयास्पद शिधापत्रिका प्रशासनाच्या रडारवर आल्या असून, येत्या काही दिवसांत या कार्डांवर कारवाईची तलवार लटकणार आहे. पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि पुणे ग्रामीण या तिन्ही भागांतील रेशनकार्डधारकांचा यात समावेश आहे. नियमानुसार घेण्यात आलेल्या रेशनकार्डीशिवाय अन्य रेशनकार्ड रद्द करण्यात येणार असून कार्डधारकांवर कारवाई करण्यात येईल.

### पार्श्वभूमी काय आहे?

- राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्यासाठी राज्य सरकारने शिधापत्रिकांचे शुद्धीकरण अभियान हाती घेतले आहे. अनेक वर्षांपासून रेशनिंग व्यवस्थेत मृत व्यक्तींची नावे, स्थलांतरित झालेले लाभार्थी, तसेच एकाच व्यक्तीच्या नावावर एकापेक्षा जास्त ठिकाणी रेशनकार्ड असल्याच्या तक्रारी येत होत्या. या गैरप्रकारांमुळे पात्र गरजू नागरिकांपर्यंत धान्य पोहोचण्यात अडथळे निर्माण होत होते.

### संशयास्पद कार्डे कशी सापडली?





आधार कार्ड क्रमांक, संगणकीय डेटाबेस आणि राज्यस्तरीय माहिती प्रणाली यांची पडताळणी करून जिल्हानिहाय संशयास्पद लाभार्थ्यांच्या याद्या तयार करण्यात आल्या. यात प्रामुख्याने

- मृत व्यक्तींची नावे अद्यापही कार्डावर असणे
- एकाच व्यक्तीचे नाव दोन ठिकाणी नोंदलेले असणे
- आधार व इतर कागदपत्रांमधील माहितीमध्ये तफावत

अशा बाबी समोर आल्या आहेत.

### पुढे काय होणार?

सध्या पुरवठा निरीक्षक प्रत्यक्ष घरोघरी जाऊन तपासणी करत आहेत. या पडताळणी अहवालाच्या आधारे कोणती नावे वगळायची, कोणती कार्डे रद्द करायची याचा अंतिम निर्णय तहसीलदार घेणार आहेत. योग्य कागदपत्रे सादर न करणाऱ्या लाभार्थ्यांचे रेशनकार्ड बंद होण्याची शक्यता आहे.

**अजितदादांची एक्झिट : कला क्षेत्रावर शोककळा; नाट्यप्रयोग थांबले**

# शहरातील सांस्कृतिक कार्यक्रम रद्द

**पुणे, शहर प्रतिनिधी** राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाच्या वृत्ताने संपूर्ण राज्यासह पुणे शहरातही तीव्र शोककळा पसरली आहे. जनसामान्यांशी तसेच सांस्कृतिक क्षेत्राशी अतूट नाते असलेल्या या नेत्याच्या जाण्याने शहरातील सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक जीवनावर मोठा परिणाम झाला असून येत्या काही दिवसांसाठी नियोजित असलेले बहुतांश कार्यक्रम रद्द किंवा स्थगित करण्यात आले आहेत.



शुक्रवार आणि शनिवारी शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्यप्रयोग, संगीत मैफिली तसेच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मात्र या दुःखद घटनेनंतर आयोजकांनी कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेतला. सध्या माघी गणपतीचे वातावरण असून त्यानिमित्ताने शहरातील अनेक भागांत भंडारे व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन झाले होते. मात्र, पुढील दोन दिवसांतील महत्त्वाचे कार्यक्रम रद्द झाल्याने उत्सवी वातावरणावर शोकाची छाया पसरली आहे.

मागील काही दिवसांपासून महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सांस्कृतिक क्षेत्रात चर्चा रंगल्या होत्या. विविध पॅनल्सकडून आपापली उद्दिष्टे, वचननामा आणि भावी दिशा मांडण्याची तयारी सुरू होती. मात्र दादांच्या निधनानंतर हे सर्व उपक्रम स्थगित करण्यात आले असून, काही दिवसांपासून तापलेले वातावरण अचानक शांत झाले आहे.

प्रजासत्ताक दिनानिमित्त मागील सोमवारी शहरात उत्साहाचे वातावरण होते. त्यानंतर पुढील पाच ते सहा दिवस विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेले कार्यक्रमही रद्द करण्यात आले. या अनिश्चिततेमुळे गुरुवारी शाळा व महाविद्यालये सुरू राहणार की नाही, याबाबत पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. परिणामी अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी दिसून आली.

### कलाकार, कलासंस्थांना दिले पाठबळ

अजितदादा पवार यांचा जनमाणसाशी असलेला थेट संवाद, विकासकामांबरोबरच कला-संस्कृतीला दिलेले प्रोत्साहन यामुळे सांस्कृतिक क्षेत्रात त्यांच्याविषयी विशेष आपुलकी होती. अनेक कार्यक्रमांना त्यांनी दिलेली उपस्थिती, कलाकारांशी साधलेला संवाद आणि सांस्कृतिक संस्थांना दिलेले पाठबळ आज अनेकांच्या आठवणींमध्ये जागे झाले आहे. त्यामुळेच अनेक आयोजकांनी कार्यक्रम रद्द केल्याचा निर्णय घेतला आहे.

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



# बारामतीमधील समीकरणे बदलणार?

## महाराष्ट्राच्या राजकारणावर शोककळा; सत्ताकारणातील निर्णायक पर्वाची अखेर

**पुणे, शहर प्रतिनिधी** महाराष्ट्राच्या राजकारणाला हादरवून टाकणाऱ्या घटनेत ज्येष्ठ नेते अजित पवार यांचे काल अपघाती निधन झाले. जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बारामतीत प्रचारसभेसाठी जात असताना हा दुर्दैवी अपघात झाला. त्यांच्या निधनाने केवळ एका प्रभावी नेत्याचेच नव्हे, तर महाराष्ट्राच्या सत्ताकारणातील एक निर्णायक पर्व अचानक थांबल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

निधनानंतर अवघ्या काही तासांत राज्यभरातून शोकभावना व्यक्त करण्यात आल्या. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांनी मतभेद बाजूला ठेवत अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. राजकीय वैचारिक संघर्ष असला तरी त्यांच्या कार्यक्षमता, निर्णयक्षमता आणि संघटनात्मक ताकदीबद्दल सर्वपक्षीय नेत्यांनी आदर व्यक्त केला. आज विद्या प्रतिष्ठान, बारामती येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. हजारो कार्यकर्ते, समर्थक आणि सामान्य नागरिकांनी अखेरचा निरोप दिला.



दरम्यान, अजित पवार यांच्या अचानक जाण्यामुळे बारामतीसह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली आखलेली रणनीती, उमेदवारांची बांधणी आणि प्रचाराची दिशा आता कोण सांभाळणार, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांच्या प्रभावाखाली असलेला मतदारवर्ग भावनिकदृष्ट्या कुठल्या दिशेने झुकतो, यावर आगामी निवडणुकांचे निकाल अवलंबून राहतील, असा अंदाज राजकीय अभ्यासक व्यक्त करत आहेत.

### स्थानिक राजकारणावर परिणामांची शक्यता

विश्लेषकांच्या मते, अजित पवार यांचे निधन हे केवळ व्यक्तीगत नुकसान नसून, ते एका सशक्त नेतृत्वाच्या अभावाची पोकळी निर्माण करणारे आहे. ही पोकळी तात्काळ भरून निघणे कठीण असून, त्याचा परिणाम आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर स्पष्टपणे जाणवेल. शोक, सहानुभूती आणि राजकीय वास्तव यांचा मेळ कसा बसेल, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### जिल्ह्यातील सर्वपक्षीय राजकीय प्रचार बंद

**पुणे.** महाराष्ट्राच्या राजकारणाला हादरवून टाकणाऱ्या घटनेनंतर पुणे जिल्ह्यातील राजकीय वातावरण पूर्णतः बदलले आहे. ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेला सर्वपक्षीय राजकीय प्रचार तात्काळ बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सत्ताधारी तसेच विरोधी पक्षांनीही हा निर्णय घेत राजकीय मतभेद बाजूला ठेवत शोकभावनेला प्राधान्य दिले आहे.

अजित पवार हे केवळ एका पक्षाचे नेते नव्हते, तर पुणे जिल्ह्याच्या आणि विशेषतः बारामती परिसराच्या राजकारणावर दीर्घकाळ प्रभाव टाकणारे नेतृत्व होते. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली शोककळा लक्षात घेता प्रचार सभा, रॅली, पदयात्रा, जाहीर मेळावे तसेच सोशल मीडियावरील प्रचार उपक्रमही दोन दिवसांसाठी स्थगित करण्यात आले आहेत. निवडणूक काळात असा सर्वपक्षीय संयम क्वचितच पाहायला मिळतो, अशी प्रतिक्रिया राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

### राजकीय अस्वस्थता, संभ्रम, चर्चा

दरम्यान, प्रचार बंद असला तरी कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता आणि संभ्रमाचे वातावरण आहे. निवडणुकीच्या ऐन तोंडावर घडलेल्या या घटनेमुळे अनेक पक्षांच्या रणनितींवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेषतः पुणे जिल्ह्यातील काही संवेदनशील मतदारसंघांमध्ये प्रचाराचा वेग अचानक थांबल्याने राजकीय समीकरणे नव्याने जुळवावी लागतील, असे संकेत मिळत आहेत.

# राज्याच्या विकासाचे अपरिमित नुकसान

**इंदापूर, (वा.)** राज्याच्या राजकारणात गेली सुमारे चार दशके अजितदादा पवार हे नाव सदैव अग्रभागी राहिले. पुणे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासात त्यांचे योगदान अतुलनीय आहे. अजितदादांच्या अचानक जाण्याने राज्याचे भरून न निघणारे, अपरिमित असे नुकसान झाले आहे, अशा शब्दांत राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदापासून राजकीय वाटचाल सुरू करणारे अजितदादा हे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची सखोल जाण असलेले नेते होते. सामान्य जनता व कार्यकर्त्यांशी त्यांची नाळ घट्ट जोडलेली होती. त्यामुळेच त्यांच्या नेतृत्वाला जनतेचा प्रचंड पाठिंबा लाभला. शेतकरी, कष्टकरी आणि समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नतीसाठी त्यांनी सत्तेचा सकारात्मक आणि प्रभावी वापर केला, असे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, अवघ्या आठ-दहा दिवसांपूर्वीच आमची भेट झाली होती. सुमारे पंधरा वर्षे राज्य मंत्रिमंडळात आम्ही एकत्र काम केले. ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक विषयाची त्यांना सखोल जाण होती.

### हर्षवर्धन पाटील यांची भावना

अजितदादांच्या आकस्मिक जाण्याने राज्याच्या राजकीय, सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. विकासाचा स्पष्ट दृष्टिकोन बाळगणाऱ्या या नेत्यामुळे सर्वसामान्यांच्या हिताच्या अनेक योजना प्रत्यक्षात उतरल्या. म्हणूनच 'काम करणारा नेता' अशी त्यांची ठसठशीत आणि लोकप्रिय प्रतिमा जनमानसात निर्माण झाली होती, असेही हर्षवर्धन पाटील यांनी नमूद केले.

# मुख्य बाजारपेठेत शुकशुकाट

## हडपसर : व्यापारी, दुकानदारांची संपूर्ण व्यवहार बंद ठेवून श्रद्धांजली

**हडपसर, (वा.)** प्रतिनिधी सर्व सामान्यांचे नेतृत्व म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जायचे ते अजित दादा अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने सर्व राज्यातील व पुणे शहरातील लोकांना दादा अकाली जाण्याने अतीव दुःख झाले. दादा जाण्याने अनेकांच्या डोळ्यात अश्रूंचे बांध फुटले. राज्याचा एक विकासाचा व्हिजन पुरुष हरपला याचे दुःख सर्वांनाच झाले. विमान अपघातात दादा गेल्याची मृत्यूची बातमीवर कोणाचा विश्वास ही बसत नव्हता, परंतु जसे जसे टेलिव्हिजन वर बातम्या यायला लागल्या त्या बातम्या पाहून अनेकांच्या डोळ्यात पाणी वाहु लागले.



### राजकीय कार्यकर्ते अन् राजकारणापलीकडे सामान्यही दुःखात

हडपसर भागात दुस-या दिवशी व्यापारी, दुकानदारांनी हडपसर मधील संपूर्ण बाजारपेठ बंद ठेवून अजित दादांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहिली. हडपसर मधील सोलापूर रोड, हडपसर गाव, गाडीतळ, माळवाडी, ससाणेनगर, मगरपट्टा रोड सर्व भागातील बाजारपेठेत दुकाने बंद असल्याने हडपसर मध्ये शुकशुकाट दिसत होता. अजित दादांना भावपूर्ण श्रध्दांजलीचे बोर्ड लावण्यात आलेले दिसत होते. सर्वांचे लाडके दादा, गोरगरिबांचा कामाचा माणुस गेल्याने हडपसरवासीय शोकसागरात दु:खात बुडून गेले होते. अजित दादा गेल्याचे पक्षातील कार्यकर्त्यांनाच नाहीतर पक्षाच्या पलीकडील सर्व सामान्य नागरीकांना दादा गेल्याचे दु:ख होते, हळहळ व्यक्त करीत होते. हडपसर भागात उपमुख्यमंत्री अजित दादांना शेवटची श्रध्दांजली म्हणून स्वयंस्फूर्तीने सर्व व्यवहार, दुकाने बंद ठेवले.

## दुःखावेग ● नेहमी सावलीसारखे बरोबर असणारे इम्तियाज मोमीन शोकसागरात

# सुरक्षारक्षक, कर्मचाऱ्यांना अश्रू अनावर

**बारामती, प्रतिनिधी** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सावलीप्रमाणे नेहमी बरोबर असणारे त्यांचे सुरक्षा रक्षक इम्तियाज मोमीन घटनास्थळी बराच वेळ रडत थांबले होते, अजितदादांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करतेवेळी त्यांनी जय पवार यांची गळाभेट घेऊन त्यांना अश्रू अनावर झाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार बारामतीत काही वेळातच बारामती विमानतळावर पोहोचणार होते. त्यामुळे अजितदादांच्या विमानाची वाट बारामती शहरातील विविध पदाधिकाऱ्यांसह शासकीय अधिकारी व त्यांचे सुरक्षा रक्षक देखील पाहत थांबले होते. विमानतळापासून धावपट्टी संपते, त्या ठिकाणाच्या अगदी जवळून स्फोटाचा आवाज आला, आणि त्यानंतर विमानतळावरील सर्व यंत्रणेची पळापळ सुरू झाली, यामध्ये अजित दादांबरोबर नेहमी सावलीप्रमाणे बरोबर असणारे त्यांचे सुरक्षारक्षक इम्तियाज मोमीन हे देखील होते. मोमीन घटनास्थळी पोहोचल्यानंतर, अजितदादा या अपघातात गेल्याचे कळाल्यानंतर , मोमीन अचानक खाली बसले, यावेळी राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनाही धक्का बसला. मोमीन यांच्यासह सर्वजण रडू लागले. दुपारी उशिरापर्यंत मोमीन, जळालेल्या विमानाच्या अवशेषाकडे बघून रडत होते, यावेळी माध्यमांनी त्यांना प्रतिक्रियेसाठी विचारणा देखील केली, मात्र ते प्रतिक्रिया देण्याच्या मनस्थितीत नव्हते, मोमीन यांच्याबरोबर त्यांचे दुसरे अंगरक्षक सहकारी देखील होते, ते देखील भावनाविवश झाले होते.



### स्वीय सहाय्यक धक्क्यात

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रत्येक सभेच्या ठिकाणी बाजूला उभे असणारे मोमीन यांना अनेक जण ओळखतात. अजितदादा गेल्याच्या धक्क्यातून ते अजून देखील सावरले नसल्याचे आज दुसऱ्या दिवशी स्पष्ट झाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यातील प्रत्येक जण हळहळत होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम पाहिलेले व सध्या बारामती एमआयडीसीच्या प्रमुख अधिकारी पदाची जबाबदारी असलेले हनुमंत पाटील हे देखील रडत होते.

## पूर्व हवेलीत शोककळा : जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी प्रचार करणारे उमेदवार निःशब्द

# लोणी, कदमवाकवस्ती, वडकीतील प्रचार ठप्प

**कदमवाकवस्ती (वा.)** राज्याचे उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाचे वृत्त वाऱ्यासारखे संपूर्ण महाराष्ट्रात पसरताच पूर्व हवेली परिसरातील लोणी काळभोर, कदमवाकवस्ती व वडकी येथे सुरू असलेला जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा प्रचार पूर्णतः ठप्प झाला. या दुःखद घटनेमुळे परिसरात तीव्र शोककळा पसरली आहे. अजित पवारांच्या निधनाची बातमी समजताच कोणत्याही राजकीय पक्षाच्या आवाहनाविना व्यापारी, छोटे-मोठे व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांनी स्वयंस्फूर्तीन आपले व्यवहार बंद ठेवले. सकाळपासून बाजारपेठा, दुकाने व आस्थापना कडकडीत बंद असून, रुग्णालये, मेडिकल व इतर अत्यावश्यक सेवा मात्र सुरू ठेवण यात आल्या आहेत. लोणी काळभोर, कदमवाकवस्ती व वडकीसह संपूर्ण परिसरात नागरिकांनी चौका-चौकात तसेच विविध पक्षीय कार्यालयांच्या आवारात एकत्र येत मूक श्रद्धांजली अर्पण केली.

या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी घरोघरी प्रचार करणारे उमेदवार व कार्यकर्तेही निशब्द झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. ५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या पुणे जिल्हा परिषद व हवेली पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत काल संपली होती. आजपासून प्रचाराला सुरुवात होणार होती.

# हातगाडी, स्टॉलधारकांचे व्यवसाय बंद

**पिंपरी, शहर प्रतिनिधी** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा अपघाती मृत्यू झाला. यामुळे पूर्ण महाराष्ट्र हळहळ व्यक्त करीत आहे, सर्वसामान्य हातगाडी, स्टॉल धारकाना अजितदादांबद्दल आपुलकी वाटत होती. महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पथविक्रेता समितीच्या वतीने आज केलेल्या आवाहनाला शहरातील विविध ठिकाणच्या हातगाडी, स्टॉल धारकानी उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्वयंस्फूर्तीने आपला व्यवसाय बंद ठेवला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अनेक वेळा आपल्या भाषणांमध्ये हॉकर्स झोन ही गरज आहे आणि या राबणाऱ्या हातगाडी, स्टॉल धारकांचे योग्य पुनर्वसन व्हावे ही त्यांची इच्छा होती. सन २०१७ मध्ये पिंपरी चिंचवड शहरामध्ये अजितदादांच्या हस्ते फेरीवाला प्रमाणपत्र वाटप करण्यात आले होते. महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघाच्या माध्यमातून अनेक वेळा अजितदादा यांच्याशी भेटून कायदा अंमलबजावणी बाबत चर्चा करण्यात आली होती. यामध्ये शहरातील सर्व पदाधिकाऱ्यांचा सहभाग होता. आज पिंपरी चिंचवड शहरातील अ, ब, क, ड, ई, फ, ग, ह या आठही प्रभागातील विक्रेत्यांनी आणि सर्व पदाधिकारी सभासद बांधव यांनी आपला व्यवसाय बंद ठेवून शोक व्यक्त केला आहे.

## Short News

### ब्रॉडवे एज्युकेशनतर्फे सिस्को कार्यशाळा

पुणे, शहर प्रतिनिधी. ब्रॉडवे एज्युकेशन हब, पुणे आणि के-बिट्स (KBits) यांच्या संयुक्त विद्यमाने सिस्को सर्टिफिकेशन कार्यशाळेचे आयोजन शुक्रवार, ३१ जानेवारी रोजी बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे करण्यात आले असल्याची माहिती ब्रॉडवे एज्युकेशन हबचे प्रतिनिधी अमित मेढेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. ब्रॉडवे एज्युकेशन हबने के-बिट्स यांच्या सहकार्याने सिस्को सर्टिफिकेशन प्रोग्राम सुरू केला असून, हा कार्यक्रम जागतिक कीर्तीचे सिस्को तज्ज्ञ खावर बट्ट यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहे. जगभरात मोजक्याच व्यावसायिकांकडे ही उच्च दर्जाची सिस्को पात्रता उपलब्ध असल्याने, या कार्यक्रमाचे महत्त्व अधिक वाढले आहे. या सर्टिफिकेशन मार्गिकेत सीसीएनए (प्रवेशस्तर) ते सीसीआयई (तज्ज्ञ स्तर) पर्यंत संपूर्ण सिस्को इकोसिस्टमचा समावेश करण्यात आला आहे. या कार्यक्रमामुळे विद्यार्थी तसेच आयटी क्षेत्रातील व्यावसायिकांना करिअरच्या संधी मिळतील.

# शहर अभियंतापदी अनिरूद्ध पावसकर यांची निवड

**पुणे, शहर प्रतिनिधी.** महापालिकेच्या अभियांत्रिकी श्रेणीतील सर्वोच्च पद असलेल्या शहर अभियंतापदासाठी पथ विभाग प्रमुख अनिरूद्ध पावसकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. त्याबाबतचे आदेश महापालिका आयुक्त व प्रशासक नवलकिशोर राम यांनी काढले आहेत.

यापूर्वी अध्यक्षतेखाली झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत हा निर्णय घेऊन त्यानंतर पाच डिसेंबर २०२५ रोजी शहर सुधारणा समितीच्या बैठकीत त्यावर शिक्कामोर्तब केले गेले. त्यामुळे विद्यमान शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांच्या सेवानिवृत्तीनंतर या पदावर कोण येणार याबाबतच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला होता. त्यानंतर १२ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेतही हा ठराव मान्य झाला. त्यावर २० जानेवारी २०२६ रोजी आयुक्त राम यांनी अंतिम शिक्कामोर्तब केले आहे. महापालिकेत आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, आरोग्य प्रमुख आणि शहर अभियंता ही चार पदे शासनमान्यतेची पदे आहेत.



महापालिकेतील सर्व अभियांत्रिकी विभागांवर शहर अभियंत्यांचे नियंत्रण असते. त्यामुळे या पदाला मोठे महत्त्व आहे. वाघमारे हे आज (३० जानेवारी) सेवानिवृत्त होणार आहेत. त्यामुळे त्यांच्या निवृत्तीनंतर पालिकेचा अधिकारी या पदावर येणार की राज्य सरकारच्या सेवेतील अधिकारी नियुक्त होणार याबाबतची चर्चा सुरू होती. पालिकेतील अधिकारीच या पदावर असला पाहिजे, असा मतप्रवाह होता.

# पिंपरी शहरात शोककळा, श्रद्धांजली

## व्यवहार ठप्प : कोणतेही आवाहन नसताना पाळला गेला शहरात बंद

**पिंपरी, शहर प्रतिनिधी** पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावणारे, विकासाचे प्रतीक मानले जाणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी अपघाती निधन झाले. या घटनेने केवळ पिंपरी-चिंचवडच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. गुरुवारी सकाळी त्यांच्यावर अत्यंसंस्कार करण्यात आले. अखेरचा निरोप देण्यासाठी राजकीय नेते, प्रशासकीय अधिकारी, कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

अजित पवार यांच्या निधनाची बातमी समजताच पिंपरी-चिंचवड शहर स्तब्ध झाले. "विकासपुरुष" म्हणून ओळख असलेल्या या नेत्याच्या जाण्याने शहर पोरके झाल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. त्यांच्या आठवणींना उजाळा देत गुरुवारी पिंपरी चिंचवड शहरातील व्यापाऱ्यांनी कोणतेही आवाहन नसतानाही स्वयंस्फूर्त बंद पाळला. हा बंद केवळ राजकीय नव्हता, तर एका आपुलकीच्या नेत्याविषयीची भावना व्यक्त करणारा होता. पिंपरी, चिंचवड बाजारपेठ, भोसरी, दिघी, चऱ्होली, मोशी, जाधववाडी, पुनावळे, वाकड, ताथवडे, रावेत, वाल्हेकरवाडी, अजमेरा, मोहननगर आदी परिसरांतील दुकाने, व्यापारी संकुले आणि बाजारपेठा पूर्णतः बंद होत्या. रस्त्यांवर नेहमीची वर्दळ नव्हती.



### चेहरा बदलण्यात योगदान

अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापनेपासून शहराच्या पायाभूत सुविधांवर विशेष लक्ष केंद्रित केले. प्रशस्त रस्ते, पाणीपुरवठा, औद्योगिक विकास, रोजगारनिर्मिती आणि शहरी नियोजन या क्षेत्रांत त्यांच्या निर्णयांनी शहराचा चेहरामोहरा बदलला. "काम आधी, राजकारण नंतर" ही त्यांची भूमिका अनेकांना प्रेरणादायी ठरली. त्यांच्या निधनानंतर शहरातील विविध ठिकाणी नागरिकांनी मेणबत्त्या पेटवून, फलक लावून श्रद्धांजली अर्पण केली.

# निवृत्त कर्नलवर बाउन्सरकडून हल्ला

**पुणे, शहर प्रतिनिधी** पुण्यातील घोरपडी कॅन्टोन्मेंट परिसरातील ओल्ड ग्रँट बंगला येथील वाद पुन्हा एकदा चर्चेत आला असून, या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या सेवानिवृत्त लेफ्टनंट कर्नल सुरेश पाटील यांच्यावर बाउन्सरमार्फत हल्ला झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्ह्याची नोंद करून तपास सुरू केला आहे.या संदर्भात बोलताना कर्नल सुरेश पाटील यांनी सांगितले की, ते सन १९९४ पासून कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या आदेशानुसार ओल्ड ग्रँट बंगला परिसरात वास्तव्यास आहेत. मात्र, अलीकडील काळात काही व्यक्तींनी त्यांना घर खाली करण्यासाठी सातत्याने दबाव आणण्यास सुरुवात केली होती. या वादाच्या पार्श्वभूमीवर २३ डिसेंबर रोजी आरोपी अनुराधा पांडे, रजनीत पांडे, परिष अंकेसरीया आणि सोहेल अंकेसरीया यांनी त्यांच्यावर हल्ला केला आहे.

## मध्य रेल्वे | शिर्डी, खडकी, दौंड व सोलापूर मार्गांवरील गाड्यांना मुदतवाढ

# विशेष गाड्यांच्या फेऱ्यांच्या कालावधीत वाढ

**पुणे, शहर प्रतिनिधी** प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वेने विशेष गाड्यांच्या फेऱ्यांचा कालावधी विशेष शुल्कासह वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या वाढीव फेऱ्यांतील गाड्या सध्याच्या मार्गावर, वेळापत्रकानुसार, रचनेनुसार तसेच ठरवलेल्या थांब्यांवर धावणार आहेत. प्रवाशांनी प्रवास सुरू करण्यापूर्वी संबंधित गाड्यांचे वेळापत्रक व थांब्यांची माहिती तपासून घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.



### वाढवलेल्या विशेष फेऱ्यांचा तपशील

**बिकानेर – साईनगर शिर्डी – बिकानेर साप्ताहिक विशेष (८ फेऱ्या)**

- गाडी क्रमांक ०४७१५ बिकानेर – साईनगर शिर्डी विशेष (प्रत्येक शनिवारी) ही गाडी ०७ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान ४ फेऱ्यांसाठी वाढवण्यात आली आहे.
- गाडी क्रमांक ०४७१६ साईनगर शिर्डी – बिकानेर विशेष (प्रत्येक रविवारी) ही गाडी ०८ फेब्रुवारी ते ०१ मार्च २०२६ दरम्यान ४ फेऱ्यांसाठी वाढवण्यात आली आहे.

**हिसार – खडकी – हिसार साप्ताहिक विशेष (८ फेऱ्या)**

- गाडी क्रमांक ०४७२५ हिसार – खडकी विशेष (प्रत्येक रविवारी) ही गाडी ०१ ते २२ फेब्रुवारी २०२६ दरम्यान ४ फेऱ्यांसाठी वाढवण्यात आली आहे.
- गाडी क्रमांक ०४७२६ खडकी – हिसार विशेष (प्रत्येक सोमवारी) ही गाडी ०२ ते २३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान ४ फेऱ्यांसाठी वाढवण्यात आली आहे.

### वाढीव फेऱ्यांसाठी आरक्षणाची माहिती

- गाडी क्रमांक ०४७१६, ०४७२६, ०९६२६ आणि ०९६२८ च्या वाढीव फेऱ्यांसाठी विशेष शुल्कासह आरक्षण
- ३० जानेवारी २०२६ रोजी सर्व पीआरएस केंद्रांवर तसेच आयआरसीटीसीच्या वेबसाइटवर सुरू होणार आहे.
- मध्य रेल्वेच्या या निर्णयामुळे फेब्रुवारी महिन्यात प्रवाशांना अतिरिक्त प्रवास सुविधा उपलब्ध होणार असून, गर्दीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

### अजमेर – सोलापूर – अजमेर साप्ताहिक विशेष (८ फेऱ्या)

- गाडी क्रमांक ०९६२७ अजमेर – सोलापूर विशेष (दर बुधवारी) ही गाडी ०४ ते २५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान ४ फेऱ्यांसाठी वाढवण्यात आली आहे.
- गाडी क्रमांक ०९६२८ सोलापूर – अजमेर विशेष (दर गुरुवारी) – ही गाडी ०५ ते २६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान ४ फेऱ्यांसाठी वाढवण्यात आली आहे.
- या निर्णयाचा लाभ प्रवाशांना होणार आहे.

### अजमेर–दौंड–अजमेर साप्ताहिक (८ फेऱ्या)

- गाडी क्रमांक ०९६२५ अजमेर – दौंड विशेष (प्रत्येक गुरुवारी) ही गाडी ०५ ते २६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान ४ फेऱ्यांसाठी वाढवण्यात आली आहे.
- गाडी क्रमांक ०९६२६ दौंड – अजमेर विशेष (प्रत्येक शुक्रवारी) ही गाडी ०६ ते २७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान ४ फेऱ्यांसाठी वाढवण्यात आली आहे.

# बाबा कल्याणी यांच्याकडून शोक

**पुणे, शहर प्रतिनिधी** अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या विकासात, विशेषतः सिंचन, शेती आणि ग्रामीण विकास क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. एक गतिमान आणि निर्णायक नेता अशी त्यांची ख्याती होती. त्यांची प्रशासकीय क्षमता आणि सार्वजनिक सेवेतील योगदान याचा जनमानसावर कायमचा प्रभाव पडला आहे. त्यांची उणीव प्रत्येक क्षणी सर्वांना निश्चित जाणवेल यात शंका नाही, अशी भावना कल्याणी ग्रुपचे बाबा कल्याणी, अमित कल्याणी यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्रातील बारामती येथे झालेल्या दुःखद विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांप्रति आम्ही मनापासून संवेदना व्यक्त करतो. भारत फोर्ज महाराष्ट्रातील जनतेसोबत एकजुटीने उभे आहे आणि या दुःखद घटनांमुळे प्रभावित झालेल्या प्रत्येकासाठी शक्ती, धैर्य आणि शांततेसाठी प्रार्थना करत आहोत, असे त्यांनी नमूद केले आहे. महाराष्ट्र भारत फोर्ज परिवार, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि एक दिग्गज नेते, अजित पवार यांच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त करत आहे. या दुःखाच्या काळात आम्ही त्यांचे कुटुंबीय - श्रीमती सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार आणि आप्तेष्ट यांच्या बरोबर आहोत, असे त्यांनी म्हटले आहे.

## श्रावी गोरडेने सर केला राजगड किल्ला

# चिमुरडीची उत्तुंग भरारी

**पुणे, शहर प्रतिनिधी** जिथे अनेक प्रौढांनाही चढाई करताना दमछाक होते, तिथे पुण्याच्या अवघ्या चार वर्षांच्या श्रावी शैलेश गोरडे हिने आपल्या जिद्द, आत्मविश्वास आणि सहनशक्तीच्या जोरावर ऐतिहासिक राजगड किल्ला यशस्वीपणे सर करून नवा आदर्श निर्माण केला आहे.

सिंहगड रोड येथील नांदेड सिटी परिसरातील रहिवासी असलेली श्रावी ही नांदेड सिटी पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेत आहे. तिने २३ जानेवारी रोजी ही धाडसी मोहीम पूर्ण केली. विशेष म्हणजे, श्रावीने कोणतीही शारीरिक मदत न घेता, कोणाच्याही खांद्यावर न बसता पूर्णतः स्वतःच्या पायाने राजगडाची चढाई आणि उतराई केली.

सकाळी ८.३० वाजता चढाईस सुरुवात करून १०.४५ वाजता ती गडावर पोहोचली. गडावर चोर दरवाजा, पद्मावती माची, पद्मावती तलाव आणि राणी वसा या ऐतिहासिक स्थळांना तिने भेट दिली.



### श्रावीची चिकाटी पाहून शिवप्रेमी भारावले

सकाळी ११ वाजता उतराईस सुरुवात करून दुपारी १२.५५ वाजता तिने आपला ट्रेक सुरक्षितपणे पूर्ण केला. अवघ्या ४ तास २५ मिनिटांत ही संपूर्ण मोहीम तिने यशस्वीरीत्या पूर्ण केली. श्रावीचे वडील शैलेश गोरडे आणि आई सायली गोरडे यांनी लहानपणापासूनच तिच्यावर स्वावलंबन, निसर्गप्रेम आणि शारीरिक सक्रियतेचे संस्कार घडवले आहेत. तिची चिकाटी पाहून शिवप्रेमींकडून कौतुक होत आहे.

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



# संशोधनाशिवाय आयुर्वेद अपूर्ण !

## बिहारचे राज्यपाल आरिफ मोहंमद खान; धन्वंतरी पुरस्कारांचे वितरण

▸ **पुणे, शहर प्रतिनिधी.** आयुर्वेद ही केवळ उपचारपद्धती नव्हे, तर भारतीय जीवनदृष्टी आहे. आधुनिक जीवनशैलीत आयुर्वेदाचे महत्व अधिकच वाढले आहे. जागतिक पातळीवर आयुर्वेदाला विश्वासार्हता मिळवून देण्यासाठी संशोधन, प्रमाणबद्धता आणि वैज्ञानिक दस्तऐवजीकरणावर भर देणे आवश्यक आहे,₹ असे प्रतिपादन बिहारचे राज्यपाल आरिफ मोहंमद खान यांनी केले.

विश्वानंद आयुर्वेद चिकित्सालय व गुरुकुलचे संचालक वैद्य अनिल बनसोडे यांनी 'आयुर्वेद प्रॅक्टिस कशी उभारावी व वाढवावी?' याबाबत प्रात्यक्षिकांसह विश्लेषण केले. श्री आयुर्वेद अँड हॉस्पिटलचे संचालक वैद्य प्रशांत दौंडकर-पाटील यांनी 'आयुर्वेद ओपीडी, हॉस्पिटल नोंदणी, ओपीडी व आयपीडी पंचकर्मासाठी कॅशलेस मेडिक्लेम एम्पॅनेलमेंट' याविषयी मार्गदर्शन केले. श्री धूतपापेश्वरचे सीईओ वैद्य रणजीत पुराणिक, आयुर्वेद व्यासपीठाचे माजी अध्यक्ष वैद्य संतोष नेवपूरकर, बागेवाडीकर आयुर्वेद रसशाळेचे संचालक वैद्य प्रशांत बागेवाडीकर, आयुष मंत्र्यांचे खासगी सचिव वैद्य जीवन बच्छाव यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. वैद्य हरीश पाटणकर व वैद्य प्रेरणा बेरी यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

भारतीय आयुर्वेद संस्थेचे कार्याध्यक्ष वैद्य प्रशांत दौंडकर-पाटील, सचिव संकेत खरपुडे, वैद्य सुकुमार सरदेशमुख, वैद्य राहुल शेलार, वैद्य प्रिया दौंडकर-पाटील, वैद्य सोनल सोमानी यांनी यशस्वी संयोजन केले. श्री आयुर्वेद अँड पंचकर्म हॉस्पिटल व वर्मा फाउंडेशनचे या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य लाभले.




### वैद्यांना 'आयुर्वेद गौरव' पुरस्काराने गौरविले

भारतीय आयुर्वेद संस्थेच्या वतीने आयोजित राष्ट्रीय आयुर्वेद संभाषा परिषद व राज्यस्तरीय धन्वंतरी पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते.शिवाजीनगर येथील कृषी महाविद्यालयाच्या डॉ. शिरामाने सभागृहात आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याच्या आरोग्य शिक्षण विभागाचे सहसचिव रामचंद्र धनावडे यांच्या हस्ते झाले. प्रसंगी आयुर्वेद क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी वैद्य रणजीत पुराणिक, वैद्य जीवन बच्छाव, वैद्य संतोष नेवपूरकर, वैद्य प्रशांत बागेवाडीकर यांना 'आयुर्वेद गौरव' पुरस्काराने गौरविण्यात आले.

> शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधणारी आयुर्वेदाची संकल्पना आजच्या तणावपूर्ण काळात अत्यंत उपयुक्त ठरत आहे. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेत आयुर्वेदाची भूमिका भविष्यात निर्णायक ठरू शकते. त्यामुळे आधुनिक विज्ञानाशी समन्वय साधत आयुर्वेदातील मूलतत्त्वे जपण्याची गरज असून, तरुण वैद्यांनी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करत संशोधनाकडे वळावे.
>
> – आरिफ मोहंमद खान, बिहारचे राज्यपाल

**व्यासपीठ** ● सिन्नरकर यांच्या क्लासेसमधील विद्यार्थ्यांचे प्रदर्शन

# विद्यार्थी कलाकृतींचे होणार प्रदर्शन

▸ **पुणे, शहर प्रतिनिधी.** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने शैला प्रदीप सिन्नरकर यांच्या रेग्युलर ड्रॉईंग क्लासेसमधील विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे भव्य चित्रप्रदर्शन रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ पासून बालगंधर्व कलादालन, पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन सकाळी १० वाजता प्रसिद्ध चित्रकार शेखर साने यांच्या हस्ते होणार असून, सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईनच्या डेप्युटी डायरेक्टर डॉ. प्रणिता रानडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. या प्रदर्शनात यंदा १३० विद्यार्थ्यांच्या दर्जेदार, सर्जनशील व आशयपूर्ण कलाकृती रसिकांना पाहायला मिळणार आहेत. पुणेकरांसाठी हे प्रदर्शन विनामूल्य खुले असणार आहे. सामाजिक जाणीव जागवणाऱ्या पाणी वाचवा, पृथ्वी वाचवा, सेव्ह टायगर, झाडे वाचवा, सोशल मीडिया, व्यसनमुक्ती, भारतीय सैन्याचा अभिमान अशा विविध विषयांवरील चित्रे हे या प्रदर्शनाचे खास आकर्षण ठरणार आहे.





### कलागुणांना प्रोत्साहन मिळणे अत्यावश्यक

याशिवाय पोर्ट्रेट्स, कॅनव्हास पेंटिंग, कॉफी पेंटिंग, म्युरल्स, निसर्गचित्रे, पेन्सिल शेडिंग तसेच स्थिरचित्रे अशा विविध प्रकारच्या कलाकृतींचा समावेश या प्रदर्शनात करण्यात आला आहे. शैला सिन्नरकर यांनी अभिनव कला महाविद्यालय, पुणे येथून ए.टी.डी./जी.डी. आर्टचे शिक्षण घेतले असून, त्या गेल्या २५ वर्षांपासून मॉडेल कॉलनी व सेनापती बापट रोड परिसरात ड्रॉईंग क्लासेस चालवत आहेत. तसेच त्या म्युरल्स, कॅनव्हास पेंटिंग, पेपर मॅशे, कॉफी पेंटिंग, पॉट मेकिंग आणि इको-फ्रेंडली गणपती कार्यशाळाही घेत आहेत. लहान मुले ही देशाची भावी पिढी असून त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे, कलेबद्दल आवड निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे, हाच या चित्रप्रदर्शनामागील उद्देश असल्याचे शैला सिन्नरकर यांनी सांगितले.

## Short News

### किरण शंकर लागू यांचे निधन



**पुणे, शहर प्रतिनिधी.** शिवाजीनगर येथील मॉर्डन महाविद्यालयाचे माजी क्रीडा संचालक, ज्येष्ठ क्रीडा शिक्षक व संघटक किरण शंकर लागू (वय ८०) यांचे निधन झाले. किरण लागू हे कुलवीर (स्काऊट) असून त्यांचे बास्केटबॉलमध्ये विशेष प्राविण्य होते. त्यांनी विविध ठिकाणी प्रशिक्षण देत अनेक खेळाडू घडवले. अनेक क्रीडा संघटनांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. विद्यार्थीप्रिय क्रीडा शिक्षक म्हणून त्यांची ओळख होती. प्रेमळ स्वभाव, ठाम निर्णयक्षमता आणि सतत नवीन गोष्टी शिकण्याची जिद्द ही त्यांची खास वैशिष्ट्ये होती. कलेच्या किंवा क्रीडा यशाबद्दल ते नेहमी प्रत्यक्ष भेटून किंवा फोन करून कौतुक करत असत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, नातवंडे परिवार आहे.

## आज शहरात

### शिबीर

- मोफत आर्युवेद सल्ला शिबीर, स्थळ – दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, जुनी बिल्डींग वेळ – स. १० ते दु. १

### पुस्तक प्रकाशन

- मानवतेसाठी लढणारा महात्मा,स्थळ – गांधीभवन, वेळ – स. १० :३० वा

### परिषद

- राईज इंडिया नेतृत्व परिषद, स्थळ – हॉटेल विवांता, वेळ – सायं ४ वा

### व्याख्यान

- भारतीय संस्कृतची मूळ तत्वे, स्थळ – गीता धर्म मंडळ, सदाशिव पेठ, वेळ – सायं ५ वा

### प्रकाशन

- गोष्ट तिरंगा ध्वजाची, स्थळ – एस.एम.जोशी सभागृह, वेळ – सायं ५ :३० वा

## # सहवेदना

### हेमा देशपांडे



**पुणे, शहर प्रतिनिधी.** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्र गुरुकुल येथे अनेक वर्षे गुरु सहायक म्हणून कार्यरत असलेल्या हेमा देशपांडे (वय ६३) यांचे बुधवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. देशपांडे यांच्या पार्थिवावर गुरुवारी (२९ जानेवारी) वैकुंठ स्मशानभूमी येथे सकाळी अकरा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

**सबलीकरण** ● एमओसी कॅन्सर केअरचे निवडक केंद्रांवर १,५०० महिलांसाठी लसीकरण

# 'निडर नारी सर्व्हायकल कॅन्सर पे भारी'

▸ **पुणे, शहर प्रतिनिधी.** एमओसी कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटरने महिलांमध्ये सर्व्हायकल कॅन्सरविषयी जनजागृती वाढवण्यासाठी 'निडर नारी – सर्व्हायकल कॅन्सर पे भारी' या विशेष मोहिमेची घोषणा केली आहे. महिलांमध्ये या आजाराविषयी असलेली भीती, मौन, सामाजिक संकोच आणि गैरसमज दूर करून, कोणताही अपराधभाव किंवा भीती न बाळगता स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य देण्यासाठी महिलांना सक्षम करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

या मोहिमेअंतर्गत एमओसी कॅन्सर केअरच्या निवडक केंद्रांवर १,५०० महिलांसाठी मोफत सर्व्हायकल कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. प्रतिबंधात्मक उपायांना प्रोत्साहन देतानाच, जनजागृती, शिक्षण आणि वेळेवर तपासणी यावर या उपक्रमाचा विशेष भर असल्याचे एमओसी कॅन्सर केअरने स्पष्ट केले आहे. या मोहिमेसाठी प्रसिद्ध भारतीय दूरदर्शन, चित्रपट व रंगभूमी अभिनेत्री स्पृहा जोशी यांनी पाठिंबा दिला आहे.



### महिलांना खुलेपणाने बोलणे अजूनही अवघड

विशेषतः ग्रामीण, निमशहरी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिलांसाठी सर्व्हायकल कॅन्सरविषयी खुलेपणाने बोलणे अजूनही अवघड मानले जाते. उपचारांचा संभाव्य खर्च, कुटुंबीयांच्या जबाबदाऱ्यांचे ओझे, गैरसमजाची भीती आणि सामाजिक लज्जा यामुळे अनेकदा महिलांचे स्वतःचे आरोग्य दुय्यम ठरते. ही मोहीम अशा सर्व अडथळ्यांना थेट आव्हान देत, महिलांच्या आरोग्याविषयी सकारात्मक, खुले आणि आधार देणारे संवाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

या उपक्रमाविषयी माहिती देताना एमओसी कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटरचे संचालक व सह-संस्थापक डॉ. प्रीतम कळसकर म्हणाले, "सर्व्हायकल कॅन्सर हा टाळता येण्याजोगा आजार असतानाही, महिलांना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करण्याची सवय समाजाने लावली आहे. यामुळे अनेक मौल्यवान जीव गमावले जात आहेत. 'निडर नारी – सर्व्हायकल कॅन्सर पे भारी' या मोहिमेद्वारे आम्ही हे मौन तोडू इच्छितो, सामाजिक संकोच दूर करू इच्छितो आणि महिलांना कोणतीही भीती किंवा लाज न बाळगता माहिती घेणे, तपासणी करणे व प्रतिबंधात्मक उपाय स्वीकारण्यासाठी सक्षम करू इच्छितो.

सर्व्हायकल कॅन्सर हा भारतीय महिलांमधील एक गंभीर सामाजिक आरोग्य प्रश्न असून, विविध वयोगटांमध्ये या आजाराचे प्रमाण वाढताना दिसत आहे. हा कॅन्सर टाळता येण्याजोगा असतानाही, अनेक महिलांमध्ये उशिरा निदान होत असल्याचे वास्तव समोर येत आहे. यामागे भीती, अपुरी माहिती, तपासणीस विलंब आणि वैद्यकीय मदत घेण्यास होणारा मानसिक संकोच ही प्रमुख कारणे आहेत. सामाजिक दबाव, गैरसमज आणि लज्जा यांमुळे अनेक महिला वेळेवर प्रतिबंधात्मक उपाय व तपासणीपासून दूर राहतात.

# नर्मदा केवळ नदी नाही, ती जीवनदायिनी माता

### प्रणव शास्त्री धानोरकर गुरुजी यांचे प्रतिपादन

▸ **पिंपरी, प्रतिनिधी.** नर्मदा ही केवळ नदी नसून ती जीवनदायिनी माता आहे. भक्तांना शांती, वैराग्य आणि आत्मज्ञान देणारी नर्मदा ही शिवकन्या असून, तिच्या पृथ्वी तलावर अवतरण्याने ऋषींची तपश्चर्या सफल झाली, दैत्यांचे बळ नष्ट झाले आणि मानवाला मोक्षाचा मार्ग प्राप्त झाला. त्यामुळेच पुराणांमध्ये नर्मदेला 'साक्षात मुक्तीदायिनी' असे संबोधले गेले आहे. प्रत्येकाने आयुष्यात किमान एकदा तरी नर्मदा परिक्रमा करावी, असे आवाहन हरिभक्तिपरायण श्री प्रणव शास्त्री धानोरकर गुरुजी यांनी केले. चिंचवड येथील नर्मदे हर संघ, पिंपरी–चिंचवड यांच्या वतीने नर्मदा जयंतीनिमित्त आयोजित नर्मदा पुराण कार्यक्रमात ते कथाकथन करताना बोलत होते. हा कार्यक्रम दि. २१ ते २५ जानेवारी या कालावधीत चिंचवड गावात भक्तिमय वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमास हैदराबाद येथील धर्मप्रचारिका डॉ. शिल्पा दीदी, अयोध्येचे प्रतिनिधी श्री विठ्ठल आनंद स्वामी, आळंदीचे महान संत अनंत मुळे महाराज, तसेच ह.भ.प. दिलीप महाराज ठाकरे यांच्यासह अध्यात्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रमुख पाहुण्या म्हणून माजी महापौर व नगरसेविका अपर्णा डोके यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नर्मदे हर संघाचे अध्यक्ष संदीप शिंदे यांच्यासह रवींद्र कोंढरे, रवींद्र मुळे, नाना भिसे, सुदाम वाणी, संतोष कदम, अपर्णा बोरकर, स्नेहा शिंदे, अरुणा रामेकर, दिपाली नेहरे आदी पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दीपस्तंभ पुरस्कारांचे दिमाखात झाले वितरण




### विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरव

▸ **पुणे, शहर प्रतिनिधी.** समाजातील शेवटच्या घटकापर्यंत समानता, सन्मान आणि संधी पोहोचवण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या दीपस्तंभ फाउंडेशन – मनोबल यांच्यासाठी यावर्षीचा प्रजासत्ताक दिन विशेष ठरला. जळगाव येथील मनोबल प्रकल्पात आयोजित कार्यक्रमात दिव्यांग विद्यार्थिनींच्या हस्ते ध्वजारोहण व दीपस्तंभ पुरस्कारांचे वितरण करत समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला.या प्रसंगी कोल इंडिया लिमिटेडच्या मनुष्यविकास अधिकारी व मनोबलच्या माजी विद्यार्थिनी परिधी वर्मा यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. साहित्य, सामाजिक व वैचारिक क्षेत्रातील दीर्घ योगदानाबद्दल सुप्रसिद्ध लेखक व वक्ते डॉ. अच्युत गोडबोले यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास चंद्रशेखर सेठ, यतेंद्र शहा, गोवा राज्य दिव्यांग आयुक्त कार्यालयातील ताहा सर तसेच बजाज फिनसर्वच्या वरिष्ठ अधिकारी दिक्षिता चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल गोवा राज्य दिव्यांग आयुक्तालयाला विवेकानंद पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच अजय मिनोचा, सी.ए. सोनाली कावेरी आणि सिद्धेश लोकरे यांना युवा पुरस्काराने गौरविण्यात आले.मार्गदर्शन करताना डॉ. अच्युत गोडबोले यांनी मूल्याधिष्ठित जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाची सांगता दिव्यांग विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर सांस्कृतिक सादरीकरणाने झाली. हा सोहळा सामाजिक समावेशन, संवेदनशीलता आणि जबाबदारीचा प्रभावी संदेश देणारा ठरला.

**ग्रंथसंपदा :** मोहन ठोंबरे यांच्या 'एक वचन : स्वतःला दिलेले' पुस्तकांचे प्रकाशन

# अधिकाऱ्याच्या प्रवासाचे दस्तऐवजीकरण

▸ **पिंपरी, प्रतिनिधी.** ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पुण्यात एका विशेष आणि दिमाखदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्याच्या सेवेत तीन दशकांहून अधिक काळ कार्यरत राहिलेले ज्येष्ठ सनदी अधिकारी मोहन ठोंबरे (भा.प्र.से., निवृत्त) यांच्या 'अ प्रॉमिस टू मायसेल्फ (इंग्रजी) आणि 'एक वचन : स्वतःला दिलेले' (मराठी) या दोन पुस्तकांचे प्रकाशन चिंचवड येथील ऑटो क्लस्टर थिएटर येथे मोठ्या उत्साहात पार पडले.या पुस्तकांचे अनावरण महाराष्ट्र शासनाचे माजी मुख्य सचिव जयंतकुमार बनठिया (भा.प्र.से., निवृत्त) आणि महाराष्ट्र राज्याचे कृषी आयुक्त सुरज मांढरे (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या सोहळ्यास प्रशासकीय, सामाजिक आणि बौद्धिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.



हे पुस्तक केवळ त्यांच्या वैयक्तिक आठवणींचा संग्रह नसून, प्रशासनाकडे मानवी मूल्यांवर आधारित जबाबदारी म्हणून पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन मांडते. प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात निर्णय घेताना येणाऱ्या अडचणी, प्रशासकीय चौकटीतील आव्हाने, त्यावर शोधलेले उपाय तसेच जनतेच्या अपेक्षा आणि सरकारी यंत्रणा यांचा साधलेला समतोल या पुस्तकातून प्रभावीपणे उलगडला आहे.

### नव्या पिढीसाठी दीपस्तंभ

"हे पुस्तक केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठीच नव्हे, तर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि सामाजिक कार्यात रस असलेल्या तरुण पिढीसाठी एक दीपस्तंभ ठरेल," असा विश्वास यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.ही दोन्ही पुस्तके ए.पी.के. पब्लिशर्स एल.एल.पी., पुणे यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आली असून, एका अनुभवी सनदी अधिकाऱ्याचा हा प्रेरणादायी जीवनप्रवास प्रशासन समजून घेणाऱ्या प्रत्येकासाठी मोलाचा ठेवा ठरणार आहे.

## वैष्णवीचे वक्तृत्व स्पर्धात मोठे यश

▸ **पुणे शहर प्रतिनिधी.** नांदगाव येथील (कै.) द्वारकाबाई तुकाराम सुकरे प्रतिष्ठानतर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत तुळसण येथील श्री निनाईदेवी विद्यालयातील वैष्णवी विनोद वीर हिने द्वितीय क्रमांक पटकावला.

मान्यवरांच्या हस्ते तिला प्रशस्तिपत्र, रोख रक्कम, स्मृतिचिन्ह देऊन तिचा गौरव केला. सांस्कृतिक विभाग प्रमुख व ज्येष्ठ शिक्षक आनंदराव जानुगडे यांनी तिला मार्गदर्शन केले.

# साधना केल्याशिवाय खरे सुख नाही

### आचार्य श्री राजरक्षितसूरी यांनी प्रवचनात भक्तांना दिला संदेश

▸ **पुणे, शहर प्रतिनिधी.** वानरापासून नर आणि नरापासून नारायण (भगवान) बनण्याची जी सुवर्णसंधी मनुष्याला मिळाली आहे, ती व्यर्थ घालवणे ही घोर मूर्खता असल्याचे परखड प्रतिपादन आचार्य श्री राजरक्षितसूरीजी यांनी केले. आपल्या प्रवचनात त्यांनी एक उदाहरण सांगत उपस्थितांना अंतर्मुख केले. एस.एस.सी.नंतर चार मित्र शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. शिक्षण पूर्ण करून परतल्यावर त्यांनी एक पार्टी ठेवली. मित्रांनी त्यांच्या शिक्षणाबद्दल विचारले असता, एकाने डॉक्टर झाल्याचे, दुसऱ्याने सी.ए. झाल्याचे, तर तिसऱ्याने इंजिनिअर झाल्याचे सांगितले. चौथा मात्र काहीच उत्तर देईना. खूप आग्रह केल्यावर तो म्हणाला, "मी तर फक्त टाईमपास करून आलो."हे ऐकून मित्रांनी त्याला समजावत सांगितले की, लाखो रुपये खर्च करून जर फक्त टाईमपास करायचाच होता, तर तो इथेही होऊ शकला असता. भांडणे तर कुत्र्याच्या जन्मातही होऊ शकली असती, लाथा-बुक्क्या गाढवाच्या जन्मातही मिळू शकल्या असत्या, संग्रह मधमाशीच्या जन्मातही करता आला असता आणि जेवण तर डुकराच्या जन्मातही मिळाले असते. मग मनुष्यजन्माचा उपयोग केवळ यासाठी का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.



**जनसेवा** दगडूशेठ ट्रस्टकडून चौथ्या वर्षीही सामाजिक बांधिलकी जपत आठवडाभराचे शिबिर

# रुग्णसेवा अभियानातून दिव्यांगांना कृत्रिम अवयव प्रदान

▸ **पुणे, शहर प्रतिनिधी.** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळाच्या पुढाकाराने जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत महाराष्ट्रातील १,७७१ दिव्यांगांना कृत्रिम अवयव देण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. थोरले बाजीराव पेशवे रस्त्यावरील हिराबाग कोठी येथील ट्रस्टच्या आरोग्य सेवा केंद्रात हे विशेष शिबीर आठवडाभर चालणार असून, या सामाजिक उपक्रमाचे हे चौथे वर्ष आहे.

टाटा ऑटोकॉम सिस्टिम्स, पिनॅकल इंडस्ट्रीज आणि भगवान महावीर विकलांग सहाय्यता समिती (जयपूर फूट), इंदौर यांच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटनप्रसंगी टाटा ऑटोकॉम सिस्टिम्स लि.चे व्हाईस चेअरमन डॉ. अरविंद गोयल, सुमती गोयल, पिनॅकल इंडस्ट्रीज लि.चे चेअरमन डॉ. सुधीर मेहता, तसेच ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



यावेळी बोलताना डॉ. सुधीर मेहता यांनी सामूहिक प्रयत्नांतूनच मोठे सामाजिक कार्य शक्य होते, असे सांगून कृत्रिम अवयव मिळाल्यानंतर दिव्यांगांनी आत्मविश्वासाने सक्रिय जीवन जगावे, असे आवाहन केले. भविष्यात पुण्यासह नागपूर व विदर्भातही अशा शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. अरविंद गोयल यांनी दिली. दिव्यांगांसाठी रोजगारनिर्मितीच्या दृष्टीनेही प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

### पोलिओग्रस्त लहान बालकांसाठी व्हीलचेअर

प्रास्ताविकात महेश सूर्यवंशी यांनी सांगितले की, या शिबिरासाठी पुण्यासह लातूर, परभणी, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, अहिल्यानगर, धाराशिव तसेच गोवा राज्यातून दिव्यांग सहभागी झाले आहेत. आतापर्यंत ट्रस्टच्या माध्यमातून ७,००० हून अधिक दिव्यांगांना कृत्रिम अवयव देण्यात आले आहेत. या शिबिरात जयपूर फूट, व्हीलचेअर, कुबड्या, काठ्या, कॅलिपर देण्यात येत असून, पोलिओग्रस्त लहान बालकांसाठी विशेष व्हीलचेअर देणे हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे.



# शहरात राष्ट्रीय पेटॅलिस्ट दिन उत्साहात साजरा




▸ **पुणे, शहर प्रतिनिधी.** क्राफ्टिझन फाउंडेशन यांच्या वतीने राष्ट्रीय पेटॅलिस्ट दिन पुण्यातील एन. एस. फडके सभागृह येथे अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात पुणे व सातारा येथील भागीदार संस्थांचा सहभाग लाभला. एकूण ८ भागीदार संस्था आणि ४० पेक्षा अधिक बौद्धिक दिव्यांग व्यक्ती या उपक्रमात सक्रियपणे सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमादरम्यान विविध मनोरंजक, प्रोत्साहनपर आणि प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. बौद्धिक दिव्यांग व्यक्तींनी या सर्व उपक्रमांमध्ये मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. त्यांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी कार्यक्रमाच्या शेवटी चषक व सन्मानचिन्हांचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमात क्राफ्टिझन फाउंडेशनच्या तलशी, तसेच शिवरुद्र लुपने, रमण टेकाळे, भारत राहुट, प्रिया, सिद्धी आणि क्राफ्टिझन फाउंडेशनची संपूर्ण टीम सक्रियपणे सहभागी झाली होती. क्राफ्टिझन फाउंडेशनच्या संचालिका मयुरा बालसुब्रमणियन यांनी पेटॅलिस्ट दिनानिमित्त व्हिडिओ संदेशाद्वारे सहभागींना शुभेच्छा दिल्या व कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. उपस्थित सर्व दिव्यांग सहभागी व भागीदार संस्थांनी क्राफ्टिझन फाउंडेशन आणि बजाज यांच्या उपजीविका कार्यक्रमासाठी मिळालेल्या सहकार्याबद्दल व सातत्यपूर्ण प्रोत्साहनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. बौद्धिक दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या कौशल्यांना व्यासपीठ देण्यासाठी हा कार्यक्रम एक प्रेरणादायी उपक्रम ठरला.

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



# स्पार्क स्पोर्टीव्ह संघाला विजेतेपद

## युवराज पाटीलच्या शतकी खेळीच्या जोरावर आर्यन्स अकॅडमीचा पराभव

**पुणे, शहर प्रतिनिधी** स्पोर्ट्सफिल्ड मॅनेजमेंट यांच्या वतीने आयोजित चौथ्या 'स्पोर्ट्सफिल्ड मान्सून लीग' अजिंक्यपद १४ वर्षांखालील ३०-३० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट अॅकॅडमी संघाने दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात युवराज पाटीलच्या शतकी खेळीच्या जोरावर स्पार्क संघाने आर्यन्स क्रिकेट अॅकॅडमीचा २२४ धावांनी एकतर्फी पराभव केला.लोणी येथील आर्यन्स क्रिकेट अॅकॅडमी मैदानावर पार पडलेला अंतिम सामना ४० षटकांचा होता. प्रथम फलंदाजी करताना स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट अॅकॅडमी संघाने ४० षटकांत ९ गडी गमावून ३०४ धावांचा भक्कम डोंगर उभा केला.
संघाकडून युवराज पाटील याने ८३ चेंडूत १६ चौकारांच्या मदतीने १०१ धावा करत अफलातून खेळी साकारली. त्याला सर्वेश रासकर याने ५६ धावा करून उत्तम साथ दिली. या जोडीने दुसऱ्या विकेटसाठी ९६ चेंडूत ११९ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचत मोठ्या धावसंख्येचा पाया घातला. याशिवाय हित कारीया (२८ धावा) आणि ऋत्विक पारेख (२२ धावा) यांनीही मोलाचे योगदान दिले.




### आर्यन्सच्या समर्थ पोकळेची एकाकी झुंज

या आव्हानासमोर गटसाखळी फेरीत अव्वल ठरलेला आर्यन्स क्रिकेट अॅकॅडमी संघ ८० धावांत गारद झाला. समर्थ पोकळे याने ३७ धावा करत एकाकी झुंज दिली; मात्र इतर कोणताही फलंदाज टिकू शकला नाही. स्पार्क संघाकडून आधान प्रसाद याने ३, तर सर्वेश रासकर याने २ गडी बाद करत गोलंदाजीत वर्चस्व गाजवले.स्पर्धेचे पारितोषिक वितरण प्रशिक्षक विनायक रेणूसे, मयूर सामंत आणि हर्षल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. स्पोर्ट्सफिल्ड मॅनेजमेंटचे अमित काळे व सनी मारवाडी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर आभार प्रदर्शन सनी मारवाडी यांनी केले. विजेत्या स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट अॅकॅडमी व उपविजेत्या आर्यन्स क्रिकेट अॅकॅडमी संघांना करंडक व पदके प्रदान करण्यात आली.

### वैयक्तिक पारितोषिके

**स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू :** समर्थ पोकळे

(४०० धावा व १० विकेट – आर्यन्स क्रिकेट अॅकॅडमी)

**सर्वोत्कृष्ट फलंदाज :** आयुष गोसावी

(२९६ धावा –आर्यन्स क्रिकेट अॅकॅडमी)

**सर्वोत्कृष्ट गोलंदाज :** आधान प्रसाद

(१० विकेट – स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट अॅकॅडमी)

**सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक :** हित कारीया

(३ झेल, ३ धावबाद – स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट अॅकॅडमी)

**सर्वोत्कृष्ट यष्टीरक्षक :** अव्दिका जाधव (योगेश इलेव्हन – ८ बाद)

**उदयोन्मुख खेळाडू (मुलगा) :** राजवीर होले (विजय क्रिकेट अॅकॅडमी)

**उदयोन्मुख खेळाडू (मुलगी) :** गौरी पंचवारा (योगेश इलेव्हन)

**फेअरप्ले पुरस्कार :** अष्टपैलू स्पोर्ट्स संघ

---

**अॅथलेटिक्स :** मुलींच्या गटात एमईएस बाल शिक्षण स्कूलचे वर्चस्व

# सेंट व्हिन्सेंटचा मुलांच्या गटात दबदबा

**पुणे, शहर प्रतिनिधी** पाषाण येथील लोयोला हायस्कूलच्या अॅथलेटिक ट्रॅकवर सुरू असलेल्या रियुनियन अॅथलेटिक्स स्पर्धेच्या (टीआरएसी-७६) आंतरशालेय अॅथलेटिक्स स्पोर्ट्स मीटमध्ये दुसऱ्या दिवशी मुलांच्या गटात सेंट व्हिन्सेंट हायस्कूलच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत वर्चस्व गाजवले. सेंट व्हिन्सेंट हायस्कूलच्या एच.एस. मुलांच्या संघाने १७ वर्षांखालील गटात तीन, १४ वर्षांखालील गटात चार आणि १२ वर्षांखालील गटात एक अशी एकूण आठ विजेतेपदे पटकावत गुणतालिकेत आघाडी घेतली.
मुलींच्या गटात एमईएस बाल शिक्षण स्कूल संघाने आपले वर्चस्व कायम राखले. या संघाने १२ वर्षांखालील गटात एक, १४ वर्षांखालील गटात तीन आणि १७ वर्षांखालील गटात दोन अशी एकूण सहा विजेतेपदे मिळवली.यजमान लोयोला हायस्कूल संघानेही उल्लेखनीय कामगिरी केली. लोयोला संघाने १२ वर्षांखालील गटात तीन, तसेच १९ वर्षांखालील गटात मुले आणि मुलींच्या प्रत्येकी एक अशी एकूण तीन विजेतेपदे पटकावली.२०० मीटर धावणे (मुले) या प्रकाराच्या अंतिम फेरीत लोयोला हायस्कूलच्या अनुष देवकर याने २५.२३ सेकंद अशी सर्वोत्तम वेळ नोंदवत प्रथम क्रमांक पटकावला.



### क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

लोयोला शाळेच्या विश्वजीत मुंडे याने २६.९९ सेकंदांसह दुसरा, तर अंश दुर्गे याने २९.१३ सेकंदांसह तिसरा क्रमांक मिळवला.२०० मीटर धावणे (मुली) या प्रकारात यजमान लोयोला हायस्कूलच्या इंग्रिड मॅन्युएल हिने २९.९६ सेकंद वेळेसह अव्वल स्थान पटकावले. द कल्याणी स्कूलच्या अमोलिका आचार्य हिने ३४.०८ सेकंदांसह दुसरा क्रमांक मिळवला, तर सेंट फेलिक्स हायस्कूलच्या अख्तर शेख हिने ४८.३० सेकंदांसह तिसरे स्थान पटकावले.स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी मुले आणि मुलींच्या गटात प्रत्येकी दहा, अशा एकूण २० स्पर्धा यशस्वीपणे पार पडल्या. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमधील क्रीडागुणांना व्यासपीठ मिळत असून, स्पर्धेला शालेय क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

## चॅम्पियन्स क्लब अव्वल

**पुणे,** वरिष्ठ गट कराटे अजिंक्यपद स्पर्धा २०२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत क्लबच्या खेळाडूंनी ११ सुवर्ण व ६ रौप्य पदकांची कमाई केली. या स्पर्धेत सुवर्णपदक विजेते म्हणून प्रेम धनभाव, प्रसाद अवघडे, निखिल सोनकाटळे, आदित्य घसाडे, हर्ष सोलंकर यांनी प्रथम क्रमांक मिळवले. तसेच राष्ट्रीय स्पर्धेसाठी या खेळाडूंची निवड झाली.

## फोनपे लिमिटेड'चे 'यूडीआरएचपी'

**पुणे, शहर प्रतिनिधी** डिजिटल पेमेंट सेवा, डिजिटल वितरण सेवा आणि वित्तीय सेवा यांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करणाऱ्या फोनपे लिमिटेड या तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीने 'सेबी'कडे आपला 'यूडीआरएचपी-१' दाखल केला आहे. कंपनी प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून ग्राहक पेमेंट, व्यापारी पेमेंट, कर्ज वितरण तसेच विमा वितरण या सेवा पुरविते. याशिवाय कंपनीने दोन नवीन प्लॅटफॉर्म विकसित केले असून त्यांचा वेगाने विस्तार करत आहे. यातील एक आहे Share.Market हा या कंपनीचा स्टॉक ब्रोकिंग आणि म्युच्युअल फंड वितरणासाठीचा प्लॅटफॉर्म आहे. दुसरा आहे इंडस अॅपस्टोअर. सर्व प्लॅटफॉर्म पुरस्कारप्राप्त आणि उच्च क्षमतेच्या तंत्रज्ञानावर आधारित आहेत.

---

## पुणे विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलल्या

**पुणे, शहर प्रतिनिधी** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी निधनामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने हिवाळी सत्रातील परीक्षांच्या वेळापत्रकात बदल केला आहे. विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या बुधवार, दि. २८ आणि २९ रोजी नियोजित असलेल्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.या स्थगित करण्यात आलेल्या परीक्षांचे पुनर्नियोजन करण्यात येणार असून, त्याबाबतचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येईल, असे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दि. २८ आणि २९ या दोन दिवसांतील विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा पुढील तारखांना घेण्यात येणार असून, त्याचे स्वतंत्रपणे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात येईल.
यासंदर्भात माहिती देताना परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर व सूचना फलकांवर प्रसिद्ध होणाऱ्या पुढील आदेशांकडे लक्ष ठेवावे.विद्यापीठाच्या या निर्णयामुळे संबंधित सर्व महाविद्यालये, परीक्षा केंद्रे तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनींना आवश्यक ती पूर्वतयारी करण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळणार आहे.

---

**जोगळेकर मेमोरियल** ● यार्डीचा ९ गडी राखून पराभव; मंगेश पाटीलच्या नाबाद ९८ धावा

# केपीआयटी संघाचे आयटी कपवर वर्चस्व

**पुणे, शहर प्रतिनिधी** आयडीयाज-अ-सास कंपनी यांच्या वतीने आयोजित २०व्या अंकुर जोगळेकर मेमोरियल आंतर आयटी कप क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत केपीआयटी संघाने दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात मंगेश पाटील (नाबाद ९८) याच्या वादळी फलंदाजीच्या जोरावर केपीआयटी संघाने यार्डी संघाचा ९ गडी राखून पराभव केला.पीसीएमसी येथील व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट अकादमी मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात यार्डी संघाने प्रथम फलंदाजी स्वीकारली. यार्डी संघाने २० षटकांत ६ बाद १६१ धावा केल्या. संघाकडून प्रीतम गुजारेने ४४ धावा, सौरभ जळगावकरने २९ धावा, जीवन गोसावीने १७ धावा, प्रद्युम्न महाजनने १७ धावा, तर आशू शेखने १५ धावा करत संघाच्या धावसंख्येत मोलाची भर घातली.




### इतर वैयक्तिक पारितोषिके

**सर्वोत्कृष्ट गोलंदाज:** शिवराम गावडे

**मोस्ट व्हॅल्यूएबल प्लेअर:** ओंकार गायकवाड

या स्पर्धेमुळे आयटी क्षेत्रातील खेळाडूंना आपले क्रिकेट कौशल्य सादर करण्याची उत्तम संधी मिळाली असून, स्पर्धेला प्रेक्षकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### केपीआयटी संघाची आक्रमक सुरुवात; १४.३ षटकांत जिंकला सामना

आव्हानाचा पाठलाग करताना केपीआयटी संघाने आक्रमक सुरुवात केली. केपीआयटी संघाने अवघ्या १४.३ षटकांत १ बाद १६२ धावा करत सामना सहज जिंकला. मंगेश पाटीलने ४६ चेंडूंमध्ये ११ चौकार व ६ षटकारांच्या मदतीने नाबाद ९८ धावांची खेळी साकारत सामन्यावर वर्चस्व गाजवले. त्याला शुभम झापडेकरची १९ चेंडूंतील ९ चौकार व १ षटकारासह ४५ धावांची दमदार साथ लाभली.
सोमेश मर्दानेने नाबाद १८ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केले. स्पर्धेतील विजेत्या केपीआयटी संघाला करंडक व ५०,००० रुपये, तर उपविजेत्या यार्डी संघाला करंडक व ३०,००० रुपये रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभ आयडीयाज-अ-सास कंपनीच्या मल्लिका जेम्स यांच्या हस्ते पार पडला.

---

## आंतरशालेय स्पर्धेत समर्थ कर्वे, वरद जाधव यांना सुवर्णपदक

### शाळांतील ६५० खेळाडूंचा सहभाग

**पुणे, शहर प्रतिनिधी** महाराष्ट्रीय मंडळाच्या वतीने आयोजित आंतरशालेय मैदानी स्पर्धेत लांब उडी प्रकारात समर्थ कर्वे आणि वरद जाधव यांनी उत्कृष्ट कामगिरी करत अनुक्रमे १० वर्षांखालील आणि १२ वर्षांखालील गटात अव्वल क्रमांक मिळवत सुवर्णपदक पटकावले. मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत १० वर्षांखालील मुलांच्या लांब उडी प्रकारात समर्थ कर्वे याने ३.८० मीटर उडी मारून प्रथम क्रमांक मिळवला. श्रेयस पन्हाळकर याने ३.७५ मीटर उडीसह दुसरा क्रमांक पटकावला, तर विश्वजीत जगदाळे आणि वरद खाडे यांनी प्रत्येकी ३.७२ मीटर उडी मारत संयुक्तपणे तिसरा क्रमांक मिळवला.
१२ वर्षांखालील मुलांच्या लांब उडी प्रकारात वरद जाधव याने ४.२५ मीटर उडी मारून प्रथम क्रमांक पटकावला. कौस्तुभ कदम याने ४.१८ मीटर उडीसह दुसरा क्रमांक मिळवला, तर ऋग्वेद भोपाटे याने ४.०४ मीटर उडीसह तिसरा क्रमांक मिळवला.या स्पर्धेत ३५ शाळांतील ६५० खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. स्पर्धेत ८ वर्षांखालील वयोगटासाठी ५० मीटर धावणे, ५० मीटर लांब उडी व रिले शर्यत; १० वर्षांखालील वयोगटासाठी ८० मीटर धावणे, लांब उडी व रिले शर्यत; तसेच १२ वर्षांखालील वयोगटासाठी १०० मीटर धावणे, लांब उडी व रिले धावणे या क्रीडाप्रकारांचा समावेश आहे. विजेत्या खेळाडूंना पदके व प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली.

---

## Short News

### फ्युचर स्टार क्रिकेट अकादमीची आगेकूच

**पुणे.** एकदिवसीय सोळा वर्षा खालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत फ्युचर स्टार क्रिकेट अकादमी, जेट्स ७ स्पोर्टस या संघांनी विजयी सुरुवात केली. वडकी येथील रॉक २७ स्पोर्टस क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत सलामीच्या लढतीत हर्ष शिंदे (२-३३ व ७२ धावा) याने केलेल्या सुरेख अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर फ्युचर स्टार क्रिकेट अकादमी संघाने केपी क्रिकेट अकादमी संघाचा ३ गडी राखून पराभव करत विजयी सलामी दिली. दुसऱ्या सामन्यात यज्ञेश झाल्टे (५-१४) याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर जेटस ७ स्पोर्टस संघाने एपी संघावर १५५ धावांनी दणदणीत विजय मिळवला.

### बास्केटबॉल स्पर्धेत स्पार्क्सचा विजय

**पुणे.** मेहता बास्केटबॉल अॅकॅडमी यांच्या वतीने आयोजित केएमबीए, बास्केटबॉल स्पर्धेत मुलीच्या गटात स्पार्क्स, एसेस या संघांनी आपापल्या प्रतिस्पधी संघांचा पराभव करून विजयी सलामी दिली, एबिल कैंसल रॉयल टॉवर्स, भोसले नगर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत मुलींच्या गटात सलामीच्या लढतीत स्पार्क्स संघाने लिंक्स संघाचा ३८-३१ असा पराभव करून विजयी सलामी दिली. विजयी संघाकडून अरिशा पिंपोल्डकर (८ गुण), मानसी कावा (४ गुण), अंजली लोणारी (४ गुण), स्पृहा कर्वे (४ गुण) यांनी कामगिरी बजावली.

---

## सहजा यमलापल्लीला वाईल्ड कार्डद्वारे मुख्य ड्रॉमध्ये प्रवेश

**पुणे, शहर प्रतिनिधी** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना (एमएसएलटीए) यांच्या वतीने आयोजित एल अँड टी मुंबई ओपन डब्लूटीए १ लाख २५ हजार डॉलर महिला टेनिस स्पर्धेत भारताची अव्वल मानांकित टेनिसपटू सहजा यमलापल्ली हिला मुख्य ड्रॉमध्ये वाईल्ड कार्डद्वारे थेट प्रवेश देण्यात आला आहे. ही प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय स्पर्धा मुंबई येथे २ ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडणार आहे.घरच्या मैदानावर होणाऱ्या या डब्लूटीए स्पर्धेत सहजा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रतिस्पर्धी खेळाडूंविरुद्ध आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी सज्ज आहे. २०२५ मध्ये सहजा हिने आयटीएफ स्पर्धेत मेक्सिकोच्या जेसिका गोमेजा हिच्या साथीत महिला दुहेरीत उपांत्य फेरी गाठली होती. तसेच पुण्यात झालेल्या बिली जीन किंग कप स्पर्धेत आशिया-ओशनिया गट १ मध्ये भारतीय संघाला दुसरे स्थान मिळवून देण्यात तिने महत्त्वाची भूमिका बजावली होती. बेंगळुरू येथे झालेल्या प्ले-ऑफ सामन्यांमध्येही ती भारतीय संघाचा भाग होती.या संधीबाबत सहजा म्हणाली, "एमएसएलटीएने मला वाईल्ड कार्ड दिल्याबद्दल मी मनापासून आभारी आहे. घरच्या मैदानावर डब्लूटीए स्पर्धा खेळणे माझ्यासाठी अत्यंत खास आहे. प्रत्येक सामना जिद्दीने खेळत मी शंभर टक्के योगदान देईन. स्पर्धेत शक्य तितके पुढे जाणे हेच माझे ध्येय आहे." गतवर्षीच्या अनुभवाबद्दल बोलताना सहजाने आपल्या खेळात, विशेषतः सर्व्हिसमध्ये सुधारणा केल्याचे नमूद केले. दबावाखाली सातत्य राखणे आणि योग्य वेळी आक्रमक खेळ करणे यावर अधिक भर दिल्याचे तिने सांगितले.



---

**कल्याणी इन्स्टिट्यूट :** रूबी हॉल क्लिनिकमध्ये थेरपी

# रोबोटिक एचआयएफयू सुरू

**पुणे, शहर प्रतिनिधी** रूबी हॉल क्लिनिकने प्रादेशिक कर्करोग उपचार क्षेत्रात ऐतिहासिक पाऊल टाकत भारतीय उपखंडातील पहिली रोबोटिक हाय-इंटेन्सिटी फोकस्ड अल्ट्रासाऊंड थेरपी सुरू केली आहे. प्रोस्टेट कॅन्सरसाठीची ही अत्याधुनिक व नॉन-इनवेसिव्ह उपचार पद्धत रूबी हॉल क्लिनिकमध्ये नव्याने स्थापन करण्यात आलेल्या कल्याणी इन्स्टिट्यूट ऑफ रोबोटिक एचआयएफयू थेरपी येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अत्याधुनिक सुविधेचे उद्घाटन रूबी हॉल क्लिनिकचे नेतृत्व डॉ. पी. के. ग्रँट, डॉ. सायमन ग्रँट आणि डॉ. हिमेश गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कल्याणी कुटुंबाचे प्रतिनिधी डॉ. बाबा कल्याणी, सुनीता कल्याणी तसेच भारत फोर्जचे अमित कल्याणी उपस्थित होते.
या उद्घाटनप्रसंगी फोकल वन संस्थेचे आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ प्रो. पास्कल (युनिव्हर्सिटी ऑफ टुलूज), डॉ. डॅमियन, तसेच संस्थेचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रायन यांचीही विशेष उपस्थिती होती.यावेळी बोलताना रूबी हॉल क्लिनिकचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. पी. के. ग्रँट म्हणाले की, "रूबी हॉल क्लिनिकमध्ये भारतीय उपखंडातील पहिली रोबोटिक एचआयएफयू थेरपी सुरू होणे हा कॅन्सर उपचार क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. रुग्णांना अनेक वर्षे प्रतीक्षा करावी लागू नये, यासाठी प्रगत, परिणामकारक आणि अर्थपूर्ण वैद्यकीय तंत्रज्ञान शक्य तितक्या लवकर उपलब्ध करून देणे ही आमची कायमची बांधिलकी आहे."क्लिनिकल दृष्टिकोन मांडताना रूबी हॉल क्लिनिकचे सल्लागार यूरो-ऑन्कोलॉजिस्ट व रोबोटिक सर्जरीचे संचालक डॉ. हिमेश गांधी यांनी सांगितले की, "फोकल वन® रोबोटिक एचआयएफयू थेरपीमुळे प्रोस्टेट कॅन्सरच्या उपचारांमध्ये अचूकता, सुरक्षितता आणि रुग्णांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा साधता येते. ही उपचार पद्धत शस्त्रक्रियेशिवाय, कमी दुष्परिणामांसह प्रभावी उपचार देण्यास सक्षम आहे."



---

# बुल्स संघाची विजयी घोडदौड कायम



### केएमबीए बास्केटबॉल लीग

**पुणे, शहर प्रतिनिधी** कर्णा मेहता बास्केटबॉल अकॅडमी (केएमबीए) यांच्या वतीने आयोजित केएमबीए बास्केटबॉल लीग स्पर्धेत मुलांच्या गटात बुल्स संघाने आपली विजयी आगेकूच कायम राखत सलग दुसऱ्या विजयाची नोंद केली. भोसले नगर येथील एबिल कॅसल रॉयल टॉवर्स येथे सुरू असलेल्या या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात मुलांच्या गटात बक्स संघाने जॅझ संघाचा ३७-३२ असा पराभव केला. बक्स संघाकडून वीर दाढा याने १० गुण, आरव मेहता याने ७ गुण, तर नीव सोमाई, जय थापर, विआन जैन आणि संविद नारकर यांनी प्रत्येकी ४ गुण मिळवत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. दुसऱ्या सामन्यात बुल्स संघाने दमदार कामगिरी करत स्पर्स संघाचा ४०-३४ असा पराभव केला. बुल्स संघाकडून उज्वल शैजू याने १० गुण मिळवत आघाडी घेतली. त्याला अजय राजेश्वर, तनश गुप्ता आणि निवान सावंत यांनी प्रत्येकी ६ गुणांची साथ दिली. तसेच आदिव अग्रवाल याने ४ गुण नोंदवले.

---

**अष्टपैलू खेळ** उपांत्य फेरीत दमदार विजय; विजेतेपदासाठी रंगणार थरारक लढत

# व्हीएसएन व बिस्मार्ट संघ अंतिम फेरीत

**पुणे, शहर प्रतिनिधी** इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडियाच्या वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल (डब्ल्युआयआरसी), पुणे शाखेच्या वतीने आयोजित १३ व्या 'व्हिएसएन सीए क्रिकेट लीग' (सीएसीएल) २०२६ स्पर्धेत व्हिएसएन सुपरकिंग्ज आणि बीस्मार्ट या संघांनी उपांत्य फेरीत विजय मिळवत अंतिम फेरीत धडक मारली आहे. व्हिएसएन सुपरकिंग्ज संघाने एमएसीए इलेव्हनचा, तर बीस्मार्ट संघाने सीए मॅव्हरीक्सचा पराभव केला. सहकारनगर येथील ल. रा. शिंदे हायस्कूल मैदानावर झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात आकाश कोयले याच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर व्हिएसएन सुपरकिंग्ज संघाने एमएसीए इलेव्हनचा ५ गडी राखून पराभव केला.




### आकाशने अवघ्या ७ चेंडूत फटकारले ४ षटकार

प्रथम फलंदाजी करणाऱ्या एमएसीए इलेव्हन संघाने १० षटकांत ४ गडी गमावून ५५ धावा केल्या. तेजस बन्सल याने नाबाद २४ धावा करत संघाचा डाव सावरला. व्हिएसएन सुपरकिंग्जकडून सचिन भट, आकाश कोयले, किरण गोरगोटे व प्रविण नलावडे यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.या माफक लक्ष्याचा पाठलाग करताना व्हिएसएन सुपरकिंग्ज संघाने ६.२ षटकांत ५ गडी गमावून विजय मिळवला. आकाश कोयले याने अवघ्या ७ चेंडूत ४ षटकारांच्या मदतीने २६ धावा करत सामन्याचे चित्र पालटले. प्रविण नलावडे याने नाबाद २३ धावा करत संघाचा विजय निश्चित केला.दुसऱ्या उपांत्य फेरीत कर्णधार साहील पारख याच्या अष्टपैलू खेळीमुळे बीस्मार्ट संघाने सीए मॅव्हरीक्स्चा २० धावांनी पराभव केला.

### अंतिम फेरीत रंगतदार सामना होणार

प्रथम फलंदाजी करताना बीस्मार्ट संघाने १० षटकांत ७ गडी गमावून ९४ धावा केल्या. सलामीवीर लवकर बाद झाल्यानंतर किशन जैन (३३ धावा), अमोद बेंद्रे (२८ धावा) आणि साहील पारख (१५ धावा) यांनी संघाचा डाव सावरला.प्रत्युत्तरात सीए मॅव्हरीक्स संघ १० षटकांत ७४ धावांवर गारद झाला. जयेश राजपाल (२१ धावा) व अभिषेक पिसे (१७ धावा) यांनी थोडा प्रतिकार केला. बीस्मार्टकडून यश शहा आणि साहील पारख यांनी प्रत्येकी २ गडी बाद करत संघाचा अंतिम फेरीतील प्रवेश निश्चित केला.आता स्पर्धेच्या विजेतेपदासाठी व्हिएसएन सुपरकिंग्ज आणि बीस्मार्ट यांच्यात अंतिम फेरीत रंगतदार सामना होणार आहे.

---

**उत्पादन धोरण भक्कम :** ग्लोबल-फॉर-लोकल संकल्पनेस चालना

# नवीन ग्रीनफिल्ड प्लांटमुळे मदत

**पुणे, शहर प्रतिनिधी** मोल्डिंग सोल्यूशन्सने ब्रँड् मॅनेर, फोबोहा, सिन्वेन्टिव्ह, थर्मोप्ले, गॅमाफ्लक्स आणि प्रियामस यांच्या सहकार्याने भारतातील आपल्या नवीन ग्रीनफिल्ड उत्पादन प्लांटचे अधिकृत उद्घाटन केले आहे. या माध्यमातून कंपनीने आपल्या आंतरराष्ट्रीय उत्पादन व सेवा उपस्थितीत लक्षणीय वाढ केली असून, हा प्लांट कंपनीच्या दीर्घकालीन जागतिक धोरणाचा महत्त्वाचा भाग ठरला आहे.
इंजेक्शन मोल्डिंग उपयोजनांसाठी भारत ही जगातील सर्वात मोठ्या व वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांपैकी एक आहे. नवीन प्लांटमुळे मोल्डिंग सोल्यूशन्स भारतातील ग्राहकांच्या अधिक जवळ पोहोचली असून, शाश्वत विकासासाठी भक्कम पाया घातला आहे. या गुंतवणुकीचा उद्देश वितरणासाठी लागणारा कालावधी कमी करणे, उत्पादन क्षमता वाढवणे आणि सेवा पातळीमध्ये सुधारणा करणे हा आहे. सिन्वेन्टिव्ह ब्रँडच्या माध्यमातून अचूक मोल्डेड घटकांची वाढती मागणी लक्षात घेता, वैद्यकीय, आरोग्यसेवा, एफएमसीजी आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रांमध्येही झपाट्याने विस्तार करण्याची संधी कंपनीला उपलब्ध झाली आहे.
कंपनीच्या नेतृत्वानुसार, चीन वगळता आशियासाठी भारत हे मोल्डिंग सोल्यूशन्सचे प्रमुख उत्पादन व सेवा केंद्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. यामुळे पुरवठा साखळी अधिक स्थिर होईल आणि आयातीवरील अवलंबन कमी होईल. या संदर्भात मोल्डिंग सोल्यूशन्सचे अध्यक्ष मार्सेलो वेंडेमियाटी म्हणाले, "भारत ही आमच्या जागतिक विकासातील सर्वात महत्त्वाची बाजारपेठ आहे. या नवीन प्लांटमुळे वितरण कालावधी कमी होईल, स्थिरता वाढेल आणि प्रांतातील ग्राहकांसोबत तांत्रिक सहकार्य अधिक सक्षम होईल, तसेच आम्ही आमच्या जागतिक दर्जाच्या मानकांचे काटेकोर पालन करू."




Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



बाजारपेठ बंद; अजित दादांसाठी साश्रूनयनांनी एकवटला जनसागर; ओतूर परिसराशी होते जिव्हाळ्याचे नाते

# जुन्नर तालुक्यात पसरली शोककळा

**ओतूर,** राज्याच्या राजकारणातील एक धडाडीचे व्यक्तिमत्त्व, विकासकामांचा झंझावात आणि जनसामान्यांचे नेते उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुःखद वृत्ताने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला. बारामती विमानतळ येथे झालेल्या दुर्दैवी विमान दुर्घटनेत दादांचे निधन झाल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि संपूर्ण जुन्नर तालुक्यासह ओतूर परिसरात शोककळा पसरली. आपल्या नेत्याला अखेरचा सलाम करण्यासाठी ओतूरची बाजारपेठ बंद ठेवली असून, प्रत्येक नागरिकाच्या डोळ्यांत अश्रू पाहायला मिळत आहेत.

अजितदादांचे जुन्नर तालुक्याशी आणि विशेषतः ओतूर परिसराशी जिव्हाळ्याचे नाते होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच ओतूरमधील व्यापाऱ्यांनी, दुकानदारांनी आणि टपरीधारकांनी स्वतःहून आपले व्यवहार बंद केल्याची माहिती ओतूर किराणा दुकान व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नितीन पन्हाळे यांनी दिली.

ओतूर बस स्थानक परिसर, मुख्य बाजारपेठ आणि नगर कल्याण रस्त्यावर शुकशुकाट पसरला आहे. हॉटेल, दुकाने आणि खाजगी संस्थांनीही ओतूर कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात देखील आडतदार व्यापाऱ्यांनी देखील आपला शोक व्यक्त करण्यासाठी फलक लावून व्यवहार बंद ठेवले आहेत. केवळ दवाखाने आणि औषधांची दुकाने सुरू ठेवली आहेत. ओतूर हे अजितदादांचे अत्यंत जवळचे आणि आवडीचे ठिकाण. दरम्यान सकाळी त्यांच्या निधनाची बातमी समजताच कार्यकर्त्यांना अश्रू अनावर झाले. सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी एकत्र येत ₹एक पर्व संपले₹ असा नेता पुन्हा होणे नाही₹अशा भावना व्यक्त केल्या. अजितदादांच्या शब्दाला प्रशासनात असलेले वजन आणि त्यांनी जुन्नर तालुक्यासाठी दिलेला विकासनिधी यामुळे येथील जनतेचे त्यांच्यावर विशेष प्रेम होते. ₹दादांच्या निधनाने राजकारणातील एका युगाचा अंत झाला आहे,₹ अशा शब्दांत ओतूरमधील ज्येष्ठ सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांनी श्रद्धांजली वाहिली. अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांनी दादांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून साश्रू नयनांनी अभिवादन केले.






## शब्दाला जागणारा आमचा आधारवड हरपला

अजितदादा म्हणजे कार्यकर्त्यांसाठी केवळ एक नेता नव्हते, तर तो एक मोठा आधार होता. ओतूरमधील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी एकत्र येत दादांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी अनेक कार्यकर्त्यांना आपल्या भावना व्यक्त करताना शब्द सुचत नव्हते. दादांच्या 'शिस्त' आणि 'कामाच्या पद्धती'च्या आठवणी काढताना अनेकांना भरून आले. ₹दादांकडे कोणतेही काम घेऊन गेले की ते कधीच रिकाम्या हाताने परत पाठवत नसत. प्रशासनावर त्यांची असलेली पकड आणि शब्दाला जागणारा नेता आज आम्ही गमावला आहे, 'आमचा आधारवड हरपला', अशा शब्दांत एका ज्येष्ठ कार्यकर्त्याने आपल्या भावना व्यक्त केल्या.

## गावागावात ठिकठिकाणी प्रतिमेला पुष्पहार अर्पण

ओतूरच्या मुख्य चौकात सर्वपक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत शोकसभा आयोजित करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेससह शिवसेना, भाजप, काँग्रेस आणि इतर मित्रपक्षांच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी दादांच्या आठवणींना उजाळा दिला. राजकीय मतभेद विसरून आज संपूर्ण ओतूर एकवटलेले दिसले. ₹पक्ष कोणताही असो, पण राज्याच्या विकासाचा इंजिनिअर हरपला आहे,₹ अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. दरम्यानओतूर परिसरातील डुंबरवाडी, खामुंडी, उंब्रज, धोलवड, ठिकेकर वाडी, रोहोकडी, आंबेगव्हान, पाचघर, उदापुर, डिंगोरे, पिंपळगाव जोगा, धालेवाडी, नेतवड आणि कोळवाडी यांसारख्या ग्रामीण भागातही या घटनेचे तीव्र पडसाद उमटले. शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांनीही कामे थांबवून आपल्या लाडक्या नेत्याला श्रद्धांजली वाहिली. जुन्नर तालुक्याच्या विकासासाठी, विशेषतः कुकडी प्रकल्पाच्या पाण्यासाठी दादांनी घेतलेले कष्ट इथला शेतकरी कधीही विसरू शकणार नाही, अशा भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहेत. दरम्यान जुन्नर तालुक्यातील विविध गावागावात ठिकठिकाणी दादांचे मोठे फोटो लावून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात येत आहेत.

# खेड तालुका पत्रकार संघाच्यावतीने श्रद्धांजली



**राजगुरुनगर (वा.)** खेड तालुका पत्रकार संघाच्यावतीने उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विमान अपघातात अजित पवार यांचे दुर्दैवी निधन झाल्याची बातमी समोर येताच संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली. स्पष्टवक्ते, परखड आणि प्रभावी नेतृत्व असलेले एक सच्चे लोकनेतृत्व हरपल्याने राज्याच्या राजकारणात व समाजकारणात न भरून येणारी मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर खेड तालुका पत्रकार संघाच्या वतीने खेड पंचायत समितीच्या आवारातील पत्रकार संघाच्या कार्यालयात श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी दिवंगत नेत्याच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दोन मिनिटांचे मौन पाळत श्रद्धांजली वाहिली. श्रद्धांजली सभेस खेड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश आंधळे, माजी अध्यक्ष महेंद्र शिंदे, बाळासाहेब सांडभोर, सुनील थिगळे, किरण खुडे, राजेंद्र लोथे, रामचंद्र सोनवणे, नाझीम इनामदार, प्रभाकर जाधव, आशोक कोरडे आदी उपस्थित होते.

## Short News

### व्यंकटेश कृपा कारखान्यात एक दिवस गाळप ठेवले बंद



**शिक्रापूर,** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याने जातेगाव बुद्रुक (ता. शिरूर) येथील व्यंकटेश कृपा शुगर मिल्स साखर कारखान्यात एक दिवसाचे पूर्ण काम बंद करत कारखान्याच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून शोक व्यक्त करत उपमुख्यमंत्री पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यावेळी महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्रातील एक आधारवड व साखर कारखान्यांचा आधारस्तंभ हरपला असल्याच्या भावना व्यंकटेश कृपा शुगर मिल्सच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त करत अजित पवार यांच्या निधनाने फक्त पवार कुटुंबीयांवर नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरल्याचे मत अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

# आंबेगाव तालुक्यातील गावांमध्ये पाळला बंद



### उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

**पारगाव शिंगवे,** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याने आंबेगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये शोककळा पसरली होती. अजित दादांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. पारगाव तसेच अनेक गावांमध्ये बंद पाळण्यात आला. आंबेगाव आंबेगाव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यक्रमानिमित्त तसेच विकासकामानिमित्त ते सतत येत होते त्यांनी आंबेगाव तालुक्यात विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला होता. यामुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकास कामे झाली त्यांच्या त्यांच्या जाण्याने आंबेगाव तालुक्यातील नागरिकांनी शोक व्यक्त केला व त्यांच्या आठवणीला उजाळा देण्यात आला.

**आठवणींना उजाळा** ● दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा स्पष्टवक्तेपणा अन् हशा

# ठेकेदार व्हा, अन्यथा राजकारण करा

**सासवड(वा.)** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार त्यांच्या स्पष्टवक्तेपणा बद्दल प्रसिध्द होते. रोखठोक स्वभाव आणि भिडस्तपणा यामुळे त्यांच्या समोर येताना प्रत्येक नेता आणि कार्यकर्ता विचार करूनच येत असायचा. जे बोलायचे ते समोरासमोर आणि पुन्हा त्याची समजूत काढून त्याच्या मनातील आपल्याबद्द असलेला राग काढून मोकळे व्हायचे. ही त्यांची खासियत होती. त्यामुळेच कोणताही कार्यकर्ता त्यांच्यावर कधीच नाराज होत नव्हता. जागतिक सायकल स्पर्धेच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री अजित पवार नुकतेच पुरंदर तालुक्यातील सासवड येथे आले होते स्पर्धेला सुरुवात झाल्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयाला भेट दिली. यावेळी राष्ट्रवादीचे पदाधिकारी डॉ. दिगंबर दुर्गाडे , संभाजीराव कुंजीर, जालिंदर कामठे, विजय कोलते, माणिकराव झेंडे तसेच इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. त्यावेळी जालिंदर कामठे हे अजित पवार यांना पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीतील राष्ट्रवादीच्या उमेदवारांची ओळख करून देत होते. उमेदवारांचा परिचय करून घेतज्ञ्न दादा त्याची वैयक्तिक, व्यावसायिक माहितीही घेत होते. त्यावेळी बोलताना तुमच्यापैकी ठेकेदार कोण आहे का? असा प्रश्न विचारला. अचानक आलेल्या प्रश्नाने सर्वच गोंधळले आणि हशाही झाला. त्यावर कामठे यांनी कोणी ठेकेदार नाही असे सांगितले. मात्र एकमेव संतोष निगडे हे ठेकेदार असल्याचे त्यांनी स्वतःहून सांगितले. मी ठेकेदार आहे मात्र उमेदवार माझी पत्नी आहे. हे सांगतानाही त्यांचा गोंधळ उडाला होता. उडालेला गोंधळ पाहून अजित पवार यांच्यासह उपस्थित सर्व खळखळून हसले. त्यावर अजित पवार यांनी एक प्रेमळ सल्ला दिला. मित्रानो एकतर ठेकेदार व्हा आणि चांगली कामे करा अन्यथा राजकारणात या आणि लोकांची सेवा करा. राजकारणी अन् ठेकेदार एकच व्यक्ती असेल तर कामाचा दर्जा राहत नाही. मी माझ्या बारामतीमध्ये लोकांना नेहमी हेच सांगत असतो. अजित दादा यांनी असा सल्ला दिल्यावर ठेकेदार असलेले संतोष निगडे यांनी सांगितले की, दादा इथून पुढे तुम्ही सांगताल तसेच करायला मी तयार आहे. तुम्ही मी म्हणत असाल तर आज पासूनच ठेकेदारी बंद करून लोकांची सेवा करतो. हे ऐकल्यावर दादांनी, अरे मी तुला ठेकेदारी बंद करायला नाही सांगितले. कर पण प्रामाणिकपणे कर असे सांगून निगडे यांची फिरकी घेतली. यावेळी सर्वांनीच हसून दाद दिली.



### मुक्त संवाद साधला

सासवड मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यालय सुरू झाल्यानंतर त्यांची ही पहिलीच भेट होती यावेळी त्यांनी सर्वांशी मुक्त संवाद साधला मात्र नियतीच्या मनात वेगळेच होते अजित पवारांची शेतकऱ्याला दिलेली भेट अखेरची ठरली त्यांनी दिलेला सल्ला प्रत्येकाच्या मनात कायम घर करून राहिला.

# अजितदादांच्या जाण्याने इंदापूर तालुका शोकाकुल

**इंदापूर,(वा.)** नेतृत्व हरपलं… पण इंदापूरच्या विकासावर उमटलेली अजितदादांची छाप अढळ आहे. इंदापूर तालुक्याच्या जडणघडणीत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या अचानक जाण्याने संपूर्ण तालुका पोरका झाला असून शहरापासून ग्रामीण भागापर्यंत शोककळा पसरली आहे. अजितदादांचे इंदापूरशी नाते केवळ राजकीय नव्हते, तर मातीशी, माणसाशी आणि विकासाशी घट्ट जोडलेले होते. छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदापासून सुरू झालेली अजितदादांची राजकीय वाटचाल सहा वेळा उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचली. बारामतीप्रमाणेच इंदापूरमध्ये विद्या प्रतिष्ठानची स्थापना करून शिक्षणाचा पाया भक्कम केला. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना खंबीर साथ देत इंदापूर तालुक्याच्या विकासासाठी हजारो कोटी रुपयांचा निधी अजितदादांच्या माध्यमातून उपलब्ध झाला.व्यापारी बांधवांच्या मागणीची तत्काळ दखल घेत शिरसोडी ते करमाळा तालुक्यातील कुगावदरम्यान सुमारे साडेतीनशे कोटी रुपयांच्या पुलाला मंजुरी देण्यात आली. या पुलाचे काम सध्या वेगाने सुरू आहे. नगर परिषद निवडणुकीदरम्यान इंदापूर शहरातील बाबा चौकात झालेली अजितदादांची शेवटची सभा आजही नागरिकांच्या स्मरणात आहे. त्यांच्या भावनिक आवाहनाला मान देत इंदापूर नगर परिषद प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात आली.अजितदादांच्या निधनाची बातमी समजताच इंदापूर शहर व तालुक्यातील हजारो नागरिक बारामतीकडे रवाना झाले. शेवटच्या दर्शनासाठी विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर प्रचंड जनसागर उसळला. पक्षभेद विसरून आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अजितदादा आपल्यात नसल्याचं दुःख स्पष्टपणे दिसून येत होतं.

### आयुष्यभर खंत

"विश्वास बसत नाही की दादा आता आमच्यात नाहीत. दादांनी माझ्यावर आणि माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांवर अपार प्रेम केलं, माया केली. जिथे जिथे शक्य होईल तिथे माझ्यासारख्या कार्यकर्त्याला संधी मिळावी यासाठी त्यांनी नेहमीच प्रयत्न केले. त्यांच्या त्या ऋणातून मी कधीच मुक्त होऊ शकणार नाही. हे दुःख आयुष्यभर सोबत राहणारं आहे," असे अत्यंत भाऊक होत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. अजितदादांच्या मार्गदर्शनानुसार इंदापूर नगरपरिषदेच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहू, मात्र हा विकास प्रत्यक्ष पाहण्यासाठी, सूचना देण्यासाठी दादा आता आमच्यासोबत नसतील, ही खंत आयुष्यभर मनात राहील, असे भावनिक शब्दांत नगराध्यक्ष भरत शहा यांनी श्रद्धांजली अर्पण केली. आज संपूर्ण इंदापूर तालुका शोकसागरात बुडाला आहे. सोशल मीडियावर, चौकाचौकांत आणि घराघरांत अजितदादांच्याच आठवणींना उजाळा दिला जात आहे. अजितदादा गेले असले तरी इंदापूरच्या विकासासाठी त्यांनी दिलेला शब्द, त्यांची कार्यशैली आणि जनतेच्या मनातले स्थान कधीही पुसले जाणार नाही.

तालुक्यात सर्वत्र हळहळ; उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत वाहिली श्रद्धांजली

# शिरूरमध्ये सर्वपक्षीय पदाधिकारी, नागरिक गहिवरले

**रांजणगाव गणपती,** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे शिरुर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेससह सर्वपक्षीय पदाधिकारी व सर्वसामान्य नागरिकांनी जुन्या आठवणींना उजाळा देत अनेक पदाधिकाऱ्यांना गहिवरुन आले. उपमुख्यमंत्री पवार व शिरुरकरांचा विशेष स्नेह होता. उपमुख्यमंत्री पवार यांचे मुंबईहुन बारामतीला येत असताना बारामतीजवळील विमान अपघातात दुर्देवी निधन झाले. पवार यांचे अकाली निधन झाल्याची बातमी शिरुर तालुक्यासह सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली, त्यानंतर शिरुर शहर व तालुक्यातील बहुतांश गावातील छोटी - मोठी बंद ठेवून पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. पवार यांनी सर्वप्रथम १९९१ मध्ये आपल्या राजकारणाचा श्री गणेशा करत बारामती लोकसभा निवडणूक लढविली, त्यावेळी शिरुर विधानसभा मतदासंघ हा बारामती लोकसभा मतदासंघाला जोडला होता त्यामुळे या मतदारसंघातील या निवडणुकीच्या निमित्ताने पवार हे प्रचारसभेला आले होते. त्यानंतर पवार व शिरुकरांचे नाते अधिक दृढ झाले. तालुक्याचे माजी आमदार सूर्यकांत पलांडे, पोपटराव गावडे,स्व. बाबुराव पाचर्णे, ॲड. अशोक पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रवींद्र काळे, मानसिंग पाचुंदकर,दादा पाटील फराटे, मोनिका हरगुडे,आबाराजे मांढरे व शशिकांत दसगुडे यांसह अनेक सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे पवार यांच्याशी जिव्हाळाचे संबंध होते. २ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या शिरुर नगरपरिषदेच्या निवडणूकीसाठी प्रचार सभेच्या निमित्ताने आले होते, यावेळी शिरुरच्या नगराध्यक्ष पदासह नगरपरिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा फडकवा, त्यानंतर शिरुर शहराचा उर्वरित सर्वांगीण विकास हा बारामती शहरासारखा विकास घडवू असे सांगितल्याने त्याचा परिणाम नगरपरिषद निवडणूक निकालावर होत नगराध्यक्ष ऐश्वर्या पाचर्णे यांच्यासह सात नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडून आले.ही पवार यांची शिरुर तालुक्यातील अखेरची भेट ठरली.

पवार यांचे अकाली निधन झाल्यामुळे तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांसह सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांच्या समवेतच्या काही आठवणींना उजाळा देत आपल्या अश्रूना मोकळी वाट करुन दिली.



### कार्यकर्त्यांना ताकद देणारा नेता गमावल्याचे दु:ख

माझे १९९१ मध्ये अजित पवार हे झालेल्या लोकसभेच्या पोट निवडणुकीपासून संबंध होते. 'कामाचा माणूस' या शब्दात शिरुरचे माजी आमदार सूर्यकांत पलांडे यांनी श्रद्धांजली वाहिली. उपमुख्यमंत्री अजित पवारांमुळे माझ्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्त्यांला बाजार समितीच्या उपसभापती पदासह पुणे जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी काम करण्याची मोठी संधी मिळाली. याकाळात उपमुख्यमंत्री पवार यांच्याशी माझा अतिशय जवळून संबंध आला. राजकारणात सर्वसामान्य कार्यकर्त्यांना ताकद देणारा नेता गमावल्याचे खूप मोठे दु:ख असल्याचे आंबेगाव शिरुर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर यांनी सांगत आपल्या अश्रूना मोकळी वाट करुन दिली.

# कार्यकर्त्याला मोठेपणाने वागवणारे नेतृत्व हरपले

### शरद बुट्टे पाटील यांची भावना; अजित पवार यांना वाहिली श्रद्धांजली

**चाकण, (वा.)** "छोट्या कार्यकर्त्यालाही प्रोत्साहन देणारे, कडक स्वभावामागे अपार प्रेम जपणारे आणि शब्दांइतकेच कृतीत ठाम असलेले नेतृत्व आज हरपले आहे," अशा शब्दांत माजी जिल्हा परिषद सदस्य शरद बुट्टे पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. बुट्टे पाटील म्हणाले की, महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना १९९८ साली त्यांनी सुरू केलेल्या मासिकाच्या पहिल्या अंकाच्या प्रकाशनासाठी अजित पवार स्वतः वराळे (ता. खेड) येथे आले होते. माजी आमदार स्व. नारायणराव पवार यांनी त्यांची ओळख करून दिली होती. त्या काळात अजित पवार आमदार तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष होते. या कार्यक्रमाची व्यवस्था अत्यंत साधी होती, तरीही अजितदादांनी माझे संपूर्ण भाषण ऐकले आणि कार्यक्रमाला पूर्ण वेळ दिला. सडपातळ शरीरयष्टी, स्पष्ट विचार आणि शिस्तप्रिय स्वभाव तेव्हाच जाणवला." ते पुढे म्हणाले, "गेली २७ वर्षे आमचे संबंध प्रेमाचे व जिव्हाळ्याचे राहिले. मी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला, तेव्हाही दादांनी मला शांतपणे बोलण्यासाठी वेळ दिला. पक्ष सोडल्यानंतरही त्यांनी कधी दुरावा निर्माण केला नाही; उलट नेहमीच आपुलकीने वागवले."



# 'दादा' नावाचे वादळ शांत : दिलीप वळसे पाटील

**मंचर,** महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धगधगतं नेतृत्व आमचे 'दादा' आज आपल्यात नाहीत, ही वार्ता पचवणं खरोखरच कठीण आहे. कधीकधी नियती इतकी क्रूर असू शकते की, आयुष्यात पहिल्यांदाच एखादी बातमी 'फेक न्यूज' ठरावी असं मनापासून वाटू लागतं, अशी प्रतिक्रिया आमदार दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचीमहाराष्ट्राच्या कल्याणासाठी, विकासासाठी आणि इथल्या मातीतील शेवटच्या माणसाच्या प्रगतीसाठी रात्रंदिवस धावणारी ती पावलं अशी अचानक थांबतील, असं स्वप्नातही कोणाला वाटलं नव्हतं. काळाने आपल्यावर झडप घातली आणि एका पहाडासारख्या व्यक्तिमत्वाचा अंत झाला, ज्याने राज्याच्या सामाजिक आणि राजकीय परिघात एक कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण केली आहे.



**श्रद्धांजली** अजित पवारांचे योगदान कधीच विसरू शकणार नसल्याची भावना

# नारायणपूर देवस्थानच्या विकासाला गती

**सासवड (वा.)** मुख्यमंत्री अजित पवार यांच्यामुळे श्री क्षेत्र नारायणपूर येथील देवस्थानचा कायापालट होण्यास सुरुवात झाली आहे. त्यांनी दिलेल्या भरघोस निधीमुळे येथील विकासकामांचे चित्र थोड्या दिवसात आणखी वेगळे पाहायला मिळणार आहे. मंदिराची विकासकामे मार्गी लागणार आहेत. मात्र दुर्दैवाने आज अजित पवार आपल्यात नाहीत ही कल्पनाच मनाला पटणारी नाही. त्यांच्या जाण्यामुळे मोठे दुःख झाले आहे. ही उणीव कधीही भरून निघणार नाही. आपले योगदान नारायणपूर देवस्थान आणि ग्रामस्थ कधीच विसरू शकणार नाहीत अशा शब्दात नारायणपूर येथील दत्त मंदिराची व्यवस्थापक भरत नाना क्षीरसागर यांनी अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे

मागील वर्षे नारायणपूर येथील मंदिराचे सदगुरू नारायण महाराज यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. महाराजांचे निधन झाले त्या दिवशी माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे बारामतीकडून पुण्याकडे जात असताना त्यांना निधनाची माहिती मिळताच दोघांनीही महाराजांचे अंत्यदर्शन घेतले. त्यानंतर काही दिवसातच उपमुख्यमंत्री अजित पवार नारायणपूर मध्ये दाखल झाले. श्री दत्त मूर्तीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी महाराजांचे शिष्य आणि वारसदार असलेले सद्गुरु टेंबे स्वामी महाराज तसेच व्यवस्थापक भारत नाना क्षीरसागर यांची भेट घेऊन सांत्वन केले.





### तातडीने निधी केला जाहीर

यावेळी त्यांनी उपस्थित असलेले डॉ. दिगंबर दुर्गाडे, डॉ. उमेशकुमार डोंगरे , रामभाऊ बोरकर, रामदास मेमाणे, औपचारिक चर्चा करताना मंदिरातील व्यवस्था सुख सुविधा यांची माहिती घेऊन देवस्थान साठी आणखी काय आवश्यक आहे का ? याची विचारणा केली. त्यावेळी श्री दत्त मंदिरा शेजारी श्री नारायणेश्वर मंदिर तसेच पार्किंग समस्या, इतर विकास कामांसाठी निधीची आवश्यकता असल्याचे सांगितले. त्यावर अजित पवार यांनी तातडीने नारायणेश्वर मंदिरासाठी सहा कोटी रुपये, श्री दत्त मंदिराच्या परिसरात पार्किंगसाठी पाच कोटी रुपये, रस्त्यासाठी तीन कोटी रुपये, दत्त मंदिर रस्त्यासाठी एक कोटी रुपये देण्याची जाहीर केले. तसेच एक ॲम्ब्युलन्स, कचरा उचलण्यासाठी घंटागाडी तातडीने देतो असे सांगितले होते. यातील अनेक कामे मार्गी लागत असून थोड्या दिवसात मंदिराचे रुपडे पालटणार आहे. दादा नारायणपूरला एकदाच आले पण सर्वांचे सोने करून गेले. त्यांची मदत देवस्थान कधीच विसरू शकणार नाही, अशी भावना मंदिराचे टेंबे स्वामी महाराज आणि भरत क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे.

जुन्नरमध्ये ठिकठिकाणी त्यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त

# आजी-माजी आमदारांनी वाहिली श्रद्धांजली

**नारायणगाव,** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर अनेक ठिकाणी शोककळा व्यक्त करण्यात आली. यामध्ये जुन्नर तालुक्यात ठीक ठिकाणी त्यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त करण्यात आली. नारायणगाव येथे आज सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास आमदार शरद सोनवणे यांनी शोक व्यक्त करत श्रद्धांजली वाहिली.. यावेळी उपसरपंच योगेश पाटे, संतोष वाजगे, सचिन वाळुंज, आशिष फुलसुंदर अजित वाजगे विकास तोडकरी तसेच शेकडो ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

माजी आमदार अतुल बेनके यांच्या निवासस्थानी शोकसभा घेण्यात आली. यावेळी माजी आमदार अतुल बेनके यांच्यासह शिवसेना संपर्कप्रमुख दिलीप बामणे, जिल्हा बँकेच्या संचालिका पूजा बुट्टे पाटील, विनायक तांबे, बाजीराव ढोले , गुलाब नेहरकर, देवराम लांडे , सुप्रिया लेंडे, वैभव काळे राहुल गावडे, जयसिंग आवटी, कल्पना काळे तसेच शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी सर्वांनाच अश्रू अनावर झाले.



### विघ्नहर कारखान्याच्यावतीने पाळला बंद

विघ्नहर सहकारी साखर कारखान्यांच्या वतीने कारखाना आज पूर्ण दिवस बंद ठेवून अजित पवार यांना श्रद्धांजली देण्यात आली. ही घटना अत्यंत दुःखद आणि मनाला चटका लावणारी आहे. या दुःखद प्रसंगी कारखाना कार्यस्थळी विघ्नहर कारखान्याचे व्हाइस चेअरमन अशोक घोलप यांनी विघ्नहर परिवाराच्या वतीनं शोक व्यक्त करत, संपूर्ण कारखाना बंद ठेऊन स्व.अजितदादांना आदरांजली वाहिली.

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



# पूर्वप्राथमिक शिक्षणाचा कायदा लवकरच येणार

## शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांची माहिती

पुणे, शहर प्रतिनिधी शालेय व्यवस्थेला शिस्त लावण्यासाठी नर्सरी, ज्युनिअर केजी आणि सिनिअर केजी या पूर्व प्राथमिक शाळा शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारित आणणारे विधेयक येत्या विधीमंडळ अधिवेशनात संमत होणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी स्पष्ट केले. त्याच बरोबर शिक्षण विभागाने शाळाबाबत प्राधान्यक्रम निश्चित केला आहे. त्यानुसार पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छता, इमारत, शिक्षण सुविधा मैदाने यांचा समावेश आहे तसेच येत्या वर्षाभरात राज्यातील वीज नसलेल्या शाळा टप्प्याटप्प्याने सौर ऊर्जेने प्रकाशमान होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

ते महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या बालभारती हीरक महोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रमाला उपस्थित होते त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. पूर्व प्राथमिक विधेयक मंजूर झाल्यानंतर या शाळांवर सरकारचे थेट नियंत्रण राहणार असून, शिक्षणाचा दर्जा, विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि पालकांची होणारी आर्थिक लूट थांबवण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे भुसे यांनी सांगितले. खासगी शाळांची आरटीई अंतर्गतची शुल्क प्रतिपूर्ती सुमारे २२०० कोटींवर थकली असल्याची कबुली त्यांनी दिली. ही रक्कम टप्प्याटप्प्याने देण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. आर्थिक अडचणीत सापडलेल्या शाळांना दिलासा देत विद्यार्थ्यांचे शिक्षण विस्कळीत होऊ नये, हा सरकारचा हेतू असल्याचे भुसे यांनी नमूद केले.

**२२०० कोटी रुपये आरटीईचे थकीत**

### विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता



शासनाच्या निर्णयानुसार किती प्राथमिक शाळा सकाळी ९ वाजता भरतात याचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यानंतर सरकारच्या निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतील. पुण्यातील सिंहगड स्प्रिंग डेल शाळेबाबत पालकांनी उपस्थित केलेल्या तक्रारींची सविस्तर माहिती घेतली जाईल. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेत आवश्यक निर्णय घेण्यात येतील, असेही भुसे यांनी स्पष्ट केले.

### शाळांवर येणार सौरऊर्जा प्रकल्प

शालेय शिक्षण विभागाला निधी कमी पडणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी आश्वासित केले आहे. राज्यातील येत्या वर्षभरात वीज नसलेल्या शाळांवर सोलर प्रकल्प लावून, त्या सौर ऊर्जेने प्रकाशमान केल्या जाणार आहेत. काही शाळांमध्ये इंटरनेट, संगणक अशा सुविधा नसतील. त्याही पुरवण्याचा प्राधान्याने प्रयत्न केला जाणार, असे दादा भुसे यांनी सांगितले.

---

**सत्कार : माधव भांडारी यांचे आवाहन; सकल ब्राह्मण समाजाकडून नवनिर्वाचितांचा सन्मान**

# ब्राह्मण समाजाने राजकारणात सक्रिय उतरावे

पुणे, शहर प्रतिनिधी सर्व जाती, संप्रदाय व पंथातील समाजघटकांना सोबत घेत आपल्या संघटनकौशल्याचा प्रभावी उपयोग करत ब्राह्मण समाजाने समाजकारणाबरोबरच सक्रीय राजकारणातही सहभागी व्हावे, असे आवाहन भाजपाचे ज्येष्ठ नेते माधव भांडारी यांनी केले. सकल ब्राह्मण समाज, पुणे शहर यांच्या वतीने पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत विजयी झालेल्या ब्राह्मण नगरसेवकांच्या सन्मान व अभिनंदन सोहळ्यात ते बोलत होते.

या वेळी भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, कर्हाबडे ब्राह्मण संघाच्या अध्यक्षा मुक्ता चांदोरकर, समन्वयक भालचंद्र कुलकर्णी उपस्थित होते. पुणे महानगरपालिकेतील नवनिर्वाचित नगरसेवक पुनित जोशी, कुणाल टिळक, स्वरदा बापट, मंजुश्री खर्डेकर, मिताली सावळेकर, ज्योत्स्ना कुलकर्णी, निवेदिता एकबोटे तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील मंदार देशपांडे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.



भांडारी म्हणाले, समाजातून पुढे आलेल्या नेतृत्वाचा सन्मान म्हणजे समाजाच्या संघटनशक्तीचा गौरव होय. राजकारणाकडे सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक असून, सुसंस्कृत, सक्षम व प्रामाणिक नेतृत्व घडविण्यासाठी ब्राह्मण समाजाने राजकारणात सक्रीय सहभाग घ्यावा. बुद्धिमत्ता, चिकाटी व प्रामाणिकपणाच्या जोरावर समाजाने सर्व घटकांना आपलेसे करावे, असेही त्यांनी नमूद केले.

### कार्यकर्त्यांचा पुढाकार

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्वश्री मंदार रेडे, विश्वनाथ भालेराव, मकरंद माणकीकर, मनोज तारे, ईशानी जोशी, पद्मा जोशी, ऋषिकेश सुमंत, सुनिल पारखी, राजेंद्र कुलकर्णी, नीता पारखी, माधुरी कुलकर्णी, मनोज पांचारीया आदींनी परिश्रम केले. विश्वजीत देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

भालचंद्र कुलकर्णी यांनी ब्राह्मण समाजाच्या विविध मागण्यांचा उल्लेख करत, पुण्यात भव्य परशुराम भवन उभारणे, पुणे रेल्वे स्थानकास थोरले बाजीराव पेशवे यांचे नाव देणे, दादोजी कोंडदेव यांच्या पुतळ्याची पुनर्स्थापना, तसेच शनिवारवाडा व पर्वती देवस्थानच्या नूतनीकरणासाठी शासन व महापालिकेने पुढाकार घ्यावा, अशी मागणी केली.

---

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या हिवाळी सत्राचा निकाल जाहीर

पुणे, शहर प्रतिनिधी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील हिवाळी सत्र २०२५ परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. त्यांचे निकाल जाहीर झाले असून, सदर परीक्षा प्रथम वर्ष मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स (एमसीए) (२०२० पॅटर्न) द्वितीय वर्ष मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स (एमसीए) (२०२० पॅटर्न) या अभ्यासक्रमांचे निकाल विद्यापीठाच्या https://onlineresults.unipune.ac.in/Result/Dashboard/Defaull या संकेतस्थळावर पाहता येणार आहेत. ही माहिती परीक्षा आणि मूल्यमापन मंडळ प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी प्रसिद्धीपत्रका मधून दिली.

---

# आणखी एक 'ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह'ची घटना!

### ट्रकच्या धडकेत सायलस्वार ठार

### मद्यधुंद ट्रक चालक अटकेत

पुणे, शहर प्रतिनिधी वाहतूक पोलिसांची कारवाई वाढत असली तरीही शहरात पुन्हा पुन्हा मध्यधुंद अवस्थेत वाहन चालवून अपघात होण्याच्या घटना सतत घडतच आहेत. जेधे चौकात मद्यधुंद चालकाने भरधाव ट्रकने धडक देऊन सायकलस्वार ज्येष्ठ नागरिकाचा जीव घेतल्याची घटना पुन्हा एकदा घडली आहे. ट्रकचालकाने मद्यप्राशन केल्याचे उघडकीस आले असून, पोलिसांनी ट्रक चालकाला अटक केली.

विश्वनाथ शंकर साळुंखे (वय ६८, रा. जय भवानीनगर, जनता वसाहत, पर्वती पायथा) असे मृत्यू झालेल्या सायकलस्वाराचे नाव आहे. याप्रकरणी ट्रक चालक दत्तात्रय यादव मोरे (वय ३५, रा. चौखंडी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) याला अटक करण्यात आली. याबाबत पोलिस कर्मचारी नेताजी वासुदेव यांनी स्वारगेट पोलिसांत तक्रार दिली आहे.




पोलिसांच्या माहितीनुसार, सायकलस्वार विश्वनाथ साळुंखे हे मंगळवारी (२७ जानेवारी) रात्री पावणेदहाच्या सुमारास स्वारगेट येथील देशभक्त केशवराव जेधे चौकातून निघाले होते. त्यावेळी भरधाव ट्रकने सायकलस्वार साळुंखे यांना धडक दिली. अपघातात ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. ट्रक चालक मोरे याला ताब्यात घेण्यात आले. वैद्यकीय तपासणीत ट्रक चालक मोरे याने मद्यप्राशन केल्याचे उघडकीस आले. अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक कोतकर करत आहेत.

---

## Short News

### वाहन परवान्यासाठी पूर्वनियोजित वेळेत बदल

पुणे, ज्या अर्जदारांनी सारथी व वाहन प्रणालीवर परवाने व वाहनासंबंधी (आयडीटीआर, आळंदी रोड व विखे कार्यालय येथे) दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजीची पूर्वनियोजित वेळ घेतलेली आहे. अशा अर्जदारांनी दिनांक २९ जानेवारी ते २६ फेब्रुवारी यापैकी कोणत्याही दिवशी कार्यालयीन बेळेत उपस्थित राहून आपले अर्ज सादर करावे, अशा अर्जदारांची दिनांक २८ जानेवारी रोजीची अपॉइंटमेंट ग्राहय धरली जाणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्यामुळे दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी शासकीय सुट्टी जाहिर करण्यात आलेली होती. तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये ३ दिवस शासकीय दुखवटा जाहिर करण्यात आले आहे. असे प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे, यांच्याकडून कळवण्यात आले आहे.

---

**घरफोडी ● ४७ लाख ८१ हजारांचा सोन्या-चांदीचा ऐवज आरोपीकडून जप्त**

# आंतरराज्य टोळीचा म्होरक्या जेरबंद

पुणे, शहर प्रतिनिधी खेड राजगुरूनगर येथील होलेवाडी येथील व्यापाऱ्याच्याी घरात घरफोडी करून ६८ लाखांचा ऐवज चोरी करणाऱ्या आंतराज्यीय टोळीच्या म्होरक्यापला स्थाानिक गुन्हेस शाखा आणि खेड पोलिसांनी बेड्या ठोकल्या . त्याटच्याकडून चोरी गेलेल्या ऐवजापैकी ५५ तोळे सोन्याचे दागिने, ८३० ग्रॅम चांदी, गुन्ह्या तील कार असा ४७ लाख ८१ हजारांचा ऐवज जप्ते करण्यात आला आहे.

रिझवान निजामुद्दीन शेख (वय ४२, रा. सरकरपूर थाना, स्कुलल, ब्लॉक दिल्ली मुळ रा. फिरोजपुर, बिजनौर, उत्तरप्रदेश) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याबाबत खेड येथील व्यापारी मोतीलाल कांतीलाल गदीया (रा. श्री अपार्टमेंट, पाबळरोड, होलेवाडी, राजगुरूनगर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हात दाखल करण्यात आला होता. ही कामगिरी पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल्लर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थातनिक गुन्हे, शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर, खेड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुभाष चव्हा ण यांच्यो पथकाने ही कारवाई केली. पुढील तपास खेड पोलिस करत आहे.




हा गुन्हाच खेड शहरात भरवस्ती्मध्ये घडला होता. तसेच यामध्ये मोठ्या प्रमाणावर ऐवज चोरी गेला असल्यारने स्थाानिक गुन्हे् शाखेसह खेड पोलिसांनी तपास सुरू केला होता. पोलिसांना मिळालेल्याा सीसीटिव्हीड फुटेजवरून आरोपी हे पांढ्या रंगाच्या कारमध्ये नाशिकच्या् बाजूने जाताना दिसून आले. त्यानुसार पोलिसांनी तब्बयल १२० किलोमिटरपर्यंतचे सीसीटिव्ही धुंडाळले. आरोपीची माहिती घेताना पथकातील अमंलदार दिपक साबळे, संदीप वार, अक्षय नवले यांना माहिती मिळाली की, आंतरराज्यीदय टोळीतील सराईत गुन्हेगार रिझवान शेख यानेच त्याटच्या साथीदाराच्याी मदतीने हा गुन्हा केल्यागचे निष्पन्न झाले.

### स्थानिक गुन्हे शाखा, खेड पोलिसांची संयुक्त कामगिरी

गुन्ह्यात उत्तर भारतातील सराईत टोळी असून ती टोळी कारचा वापर करून महाराष्ट्रात येऊन बंद घरे फोडून चोरी करून पुन्हात उत्तअर भारतात निघून जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले. रिझवान शेख याचा स्थाचनिक गुन्हे शाखेच्याट पथकाने दिल्लीअ व उत्तर परदेशा जाऊन सलग ६ दिवस आरोपीचा शोध घेतला. आरोपी सराईत असल्योने तो वेळोवेळी ठावठिकाणा बदलून राहत होता. त्यालमुळे आरेपी मिळून येण्यासाठी पथकाला खून मेहनत घ्यावी लागली. आरोपी रिझवान शेख हा गुजारात वरून मुंबईकडे जात असलयाची माहिती मिळाली. नंतर तो पुण्यात आल्यालनंतर त्याहला पुणे-नाशिक महामार्गावरून ताब्यात घेत अटक करण्यात आली.

---

# सरपंच सासू आणि पतीला अटक

**सोरतापवाडी हुंडाबळी : बेकायदेशीर गर्भपात प्रकरणी तपास वेगाने**

पुणे, शहर प्रतिनिधी ऊरळीमधील सोरतापवाडी येथील विद्यमान महिला सरपंचाच्या घरात घडलेल्या 'हुंडाबळी' प्रकरणात उरुळी कांचन पोलिसांनी सरपंच सुनीता कारभारी चौधरी व पती रोहन कारभारी चौधरी यांना अटक केली. विवाहित महिलेचा बळजबरीने गर्भपात केल्याचाही आरोप असून, त्या अनुषंगाने पुणे ग्रामीण पोलीस सखोल तपास करत आहेत.

दीप्ती रोहन चौधरी (वय ३०) या विवाहितेने हुंड्यासाठी होणाऱ्या मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या (दि .२४) केली होती. याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात सरपंच आणि विवाहित महिलेची सासू सुनीता चौधरी, पती रोहन चौधरी, सासरे कारभारी चौधरी व दीर रोहित चौधरी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मृत विवाहितेच्या आईने तक्रार दिली आहे.



### होत होता माहेरून पैसे आणण्यासाठी छळ

दीप्तीला माहेरून पैसे आणण्यासाठी सातत्याने दबाव टाकण्यात येत असल्याचे, तसेच गर्भपातासाठी जबरदस्ती करण्यात आल्याची कुटुंबीयांची तक्रार आहे. त्याअनुषंगाने आता उरुळी कांचन पोलीस तपास करीत आहेत. पोलिसांनी दोघांना अटक केली असून, उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. ग्रामीण पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे करत आहेत.

---

# शेअर ट्रेडिंगच्या आमिषाने तरुणाला ६१ लाखांचा गंडा

पुणे, शहर प्रतिनिधी शेअर ट्रेडींगमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी तरूणाला तब्बल ६१ लाखांचा गंडा घातला आहे. ही घटना १६ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२५ कालावधीत वाघोलीत घडली आहे. याप्रकरणी संबंधिताने सायबर पोलिसांत तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदाराला १६ ऑगस्टला सायबर चोरट्यांनी फोन केला. शेअर ट्रेडींगमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, अशी बतावणी केली. ६१ लाख रूपयांची गुंतवणूक केल्यानंतरही त्यांना परतावा मिळाला नाही. याप्रकरणी वरिष्ठ निरीक्षक स्वप्नाली शिंदे तपास करीत आहेत.

---

# उद्योग समस्यांवर लवकरच तोडगा

**आश्वासन : महावितरण-उद्योग संघटनांची संयुक्त बैठक**

पिंपरी, शहर प्रतिनिधी फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन आणि भोसरी महावितरण कार्यालय यांची संयुक्त बैठक यशस्वीरित्या पार पडली. या बैठकीत एमआयडीसी परिसरातील लघु व मध्यम उद्योगांना भेडसावणाऱ्या वीजपुरवठा व वीजबिलांशी संबंधित विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उद्योजकांच्या समस्यांवर लवकरच तोडगा काढला जाईल असे आश्वासन महावितरण अधिकाऱ्यांनी दिले.

उद्योगांसाठी वीजबिल भरण्यासाठी पूर्वीची हप्ता योजना पुन्हा सुरू करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच मध्य प्रदेशात राबविण्यात येणाऱ्या समाधान योजनेच्या धर्तीवर वीजबिलावरील विलंब शुल्क व दंडात मोठ्या प्रमाणात सवलत देणारी, कायमस्वरूपी व उद्योगपूरक योजना महाराष्ट्रात लागू करावी, अशी मागणी उद्योजकांनी केली. सध्या राज्यात लागू असलेली अभय (अम्नेस्टी) योजना मर्यादित कालावधीसाठी व कठोर अटींची असल्याने उद्योगांना अपेक्षित दिलासा मिळत नसल्याचेही बैठकीत नमूद करण्यात आले.

### संघटनेने मांडल्या विविध मागण्या

महिला उद्योजकांसाठी विशेष सवलत व सबसिडी योजना राबवाव्यात, तसेच औद्योगिक परिसरात उद्योग तक्रार निवारण केंद्रांची उभारणी करावी, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय नवीन फिडर परिसरातील ओव्हरहेड केबल, मनुष्यबळाची कमतरता, पावसाळ्यातील अडचणी आदी तांत्रिक मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाली. फोरमचे अध्यक्ष अभय भोर यांनी उद्योजकांच्या समस्या सविस्तर मांडल्या. महावितरणच्या मुख्य कार्यकारी अभियंत्यासह अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून उद्योजकांशी समन्वय साधत समस्या लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन दिले.

---

# मौजमजेसाठी दुचाकी चोरणारे अल्पवयीन ताब्यात

### वानवडीतून चोरलेल्या तीन दुचाकी जप्त

पुणे, शहर प्रतिनिधी मौजमजेसाठी दुचाकी चोरणाऱ्या दोन अल्पवयीनांना वानवडी पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून ३ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. ही कारवाई पोलिस उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक भाऊसाहेब जाधव, पोलिस निरीक्षक संगीता जाधव, सहायक निरीक्षक उमांकात महाडिक, उपनिरीक्षक अल्फाज शेख, दया शेगर, महेश गाढवे, अमोल पिलाणे, अतुल गायकवाड यांनी केली.

पोलिसांचे पथक रामटेकडी औद्योगिक वसाहत भागात गस्त घालत असताना दोन तेथे थांबल्या मुलांकडे चोरीची दुचाकी असल्याची माहिती आशिष कांबळे, बालाजी वाघमारे यांना मिळाली. पोलिसांनी सापळा लावून दोघांना ताब्यात घेतले. दोघांची चौकशी केली असता त्यांनी दुचाकी चोरल्याची कबुली दिली. त्यापैकी दोघांनी वानवडी परिसरातून एक दुचाकी काही दिवसांपूर्वी चोरली होती.

---

**स्वस्त धान्य वितरण : ई-पॉस मशीन अद्ययावत होताच वाटपाला सुरुवात**

# ५ फेब्रुवारीपासून धान्य वितरण

पिंपरी, शहर प्रतिनिधी शहरातील शिधापत्रिकाधारकांना येत्या ५ फेब्रुवारीपासून फेब्रुवारी महिन्याचे धान्य वितरण सुरू होणार आहे. शहरातील सर्व स्वस्त धान्य दुकानांमध्ये आवश्यक धान्याचा साठा उपलब्ध झाला असून, वितरणासाठीची तयारी पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत रेशनकार्डधारकांना गहू, तांदूळ आणि साखर वेळेत मिळावी, यासाठी प्रशासनाकडून नियोजन करण्यात आले आहे. सध्या ई-पॉस मशीन अद्ययावत करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, ती पूर्ण झाल्यानंतरच फेब्रुवारी महिन्याचे धान्य वाटप सुरू करण्यात येणार आहे. यामुळे वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



### रेशनवर आता ज्वारी मिळणार नाही

दरम्यान, जानेवारी महिन्यापासून धान्य वाटप पद्धतीत बदल करण्यात आला असून, यापूर्वी दिली जाणारी ज्वारी आता बंद करण्यात आली आहे. यापुढे सर्वसाधारण रेशनकार्डधारकांना केवळ गहू, तांदूळ आणि साखरच दिली जाणार आहे. नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात धान्य वितरणास विलंब झाल्याने नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. याबाबत कोणतीही अडचण अथवा तक्रार असल्यास संबंधित पुरवठा कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

---

# बुधवारपेठेत नऊ महिलांसह दहा बांगलादेशी पकडले

पुणे, शहर प्रतिनिधी बेकायदेशिररित्या बुधवार पेठेते वास्त्व्यास असलेल्या दहा बांगलादेशी महिला व पुरूषांना फरासखाना पोलिसांनी शोधून काढत त्यांना ताब्यात घेतले. सपना बेगम, मुन्नी अख्तर, छैती अख्तर सुमैया, सिमा अख्तर, बिथी खातून, साथे बेगम, शिमला खातून, यास्मिन अख्तर, शमीमा अख्तर आणि सलीम शेख अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत.

ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक वैभव गायकवाड, उपनिरीक्षक अरविंद शिंदे, पुजा जाधव, अमंलदार नितीन तेलंगे, महेश पवार, तानाजी नांगरे यांच्या पथकाने केली. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी अवैधरित्याक बांगलादेशी महिला व पुरूष यांचा शोध घेऊन त्यां च्या वर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. पोलिस उपायुक्त कृषीकेश रावले, फरासखानाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रशांत भस्मे, निरीक्षक उत्तम नामवाडे यांया मार्गदर्शनात पथक तयार करून कारवाईचे आदेश देण्यात आले होते.

उपनिरीक्षक अरविंद शिंदे यांना बुधवार पेठेतील डिस्कोत बिल्डींग येथे काही बांगलादेशी अनाधिकृतपणे वास्ताव्यास असल्याची माहिती माहिती मिळाली. त्यानुसार छापा टाकून कारवाई करण्यात आली. यावेळी १० बांगलादेशींना ताब्यात घेण्यात आले. हते भारतात लपून वास्तव्य करीत असल्याबचे निष्पन्न झाले.

---

**कोर्टाची पायरी | उत्पन्न लपविणाऱ्या पतीला कौटुंबिक न्यायालयाचा दणका**

# परतावा शून्य दाखवूनही भरावी लागणार पोटगी

पुणे, शहर प्रतिनिधी पत्नीला पोटगी द्यायला लागू नये म्हणून एका पतीने चांगलाच खटाटोप केला. पण, न्यायालयाच्या निदर्शनास हा प्रकार आल्यानंतर न्यायालयाने पतीला चांगलाच दणका दिला. न्यायालयीन खटल्यात प्राप्तिकराचा परतावा शून्य दाखवीत या प्रतिज्ञापत्रासोबत बँक खात्याचे स्टेटमेंट जोडण्यास टाळाटाळ केली. न्यायालयाने उत्पन्न लपविल्याचा ठपका ठेवत पत्नीला दरमहा दहा हजार रुपये अंतरिम पोटगी देण्याचा आदेश कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश शुभांगी यादव यांनी दिला. एका दाव्यात पोटगी सुरू असतानाही पत्नी आणि मुलासाठी दरमहा दहा हजार रुपये देण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे.



सुनिल आणि शुभांगी (नावे बदललेली) या जोडप्याला तन्मय (नाव बदललेलं आहे) नावाचा मुलगा आहे. आई आणि मुलगा सुनिलच्याच घरामध्ये स्वतंत्र मजल्यावर राहतात. त्यामुळे, न्यायालयाने यापूर्वीच राहण्यासाठीचा खर्च लागू न करता पोटगी मंजूर केली. त्यानंतर, वाढलेल्या महागाईच्या पार्श्वभूमीवर मुलाच्या खर्चाचा भार वाढल्याने तिने ॲड. संग्राम जाधव यांच्यामार्फत अंतरिम पोटगी मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला. न्यायालयात प्रकरण दाखल करण्यापूर्वी मागील सात वर्षांपासून सुनिल हा प्राप्तीकराचा रिटर्न दाखल करत होता. मात्र, न्यायालयात खटला दाखल झाल्यापासून त्याने ते शून्य दाखविले. तसेच प्रतिज्ञापत्रासोबत बँक खात्याचे स्टेटमेंट न जोडल्याने सुरेश हा उत्पन्न लपवित असल्याचा दावा ॲड. जाधव यांनी पत्नीमार्फत केला.

सुरेश विविध मालमत्ता आणि चारचाकी घरातील दुसऱ्या व्यक्तीच्या नावे करून त्याचा उपभोग घेत असल्याचा पुरावा पत्नीने न्यायालयात सादर केला. त्यासाठी पतीच्या सोशल मिडीयावरील खात्याचा आधार घेत त्याचे फोटोज तसेच कामाला चारचाकी घेऊन जात असल्याचे सीसीटीव्ही फुटेज न्यायालयासमोर आणले. पतीप्रमाणे पत्नीला देखील दर्जेदार जीवनशैलीप्रमाणे जगण्याचा अधिकार असल्याचे नमूद करत न्यायालयाने अंतरिम पोटगीचा पत्नीचा अर्ज मंजूर केला.

> उत्पन्न लपवून जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आणि मार्गदर्शक आहे. न्यायालयाने कागदोपत्री दाखविलेल्या उत्पन्नापेक्षा प्रत्यक्ष जीवनशैलीला अधिक महत्त्व दिले, हे स्वागतार्ह आहे. हा निकाल समाजासाठी एक सकारात्मक संदेश देणारा आहे.
>
> – ॲड. संग्राम जाधव, पत्नीचे वकील

---

# पीएमआरडीएने वाढवली घरांच्या लॉटरीची मुदत

### २० फेब्रुवारीपर्यंत अर्ज करता येणार

पुणे, विशेष प्रतिनिधी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) घर खरेदीची इच्छा असलेल्या नागरिकांसाठी दिलासादायक निर्णय घेतला आहे. पेठ क्र. १२ तसेच पेठ क्र. ३०-३२ येथील सदनिकांच्या लॉटरीसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणीची मुदत वाढवण्यात आली असून, आता नागरिकांना २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत. यापुर्वी ही मुदत २७ जानेवारी होती.

पीएमआरडीएने पेठ क्र. १२ मधील ३४० तसेच पेठ क्र. ३०-३२ मधील ४९३ अशा एकूण ८३३ शिल्लक सदनिकांसाठी १४ डिसेंबर २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध केली होती. या सदनिकांसाठी ऑनलाइन नोंदणीची मूळ अंतिम मुदत २७ जानेवारी २०२६ होती. मात्र, अधिकाधिक नागरिकांना या गृहनिर्माण योजनेचा लाभ घेता यावा आणि त्यांच्या घराचे स्वप्न साकार व्हावे, या उद्देशाने प्रशासनाने अर्ज करण्याची मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

### लाभ घेण्याचे आवाहन

या मुदतवाढीचा लाभ घेऊन जास्तीत जास्त नागरिकांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा, असे आवाहन पीएमआरडीएच्या सहआयुक्त (जमीन व मालमत्ता विभाग) पूनम मेहता यांनी केले आहे. अर्ज प्रक्रियेसंदर्भात काही अडचण असल्यास किंवा अधिक माहितीसाठी नागरिकांनी पीएमआरडीएच्या ०७९३५४८३०४२ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

---

# बिबवेवाडीत तरुणाचा खुनाचा प्रयत्न; हल्लेखोर पसार

पुणे, शहर प्रतिनिधी बिबवेवाडीत एका तरुणावर दुचाकीवरुन आलेल्या तिघांनी तीक्ष्ण शस्त्राने वार केल्याची घटना घडली. पुर्ववैमन्यासातून ही घटना घडल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. भरतसिंह मानसिंह जोधा राठोड (वय ४३, रा. अजिंक्य अपार्टमेंट, सुखसागरनगर, कात्रज, मूळ रा. बिनमार, जि. जालोर, राजस्थान) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत राठोड यांचा भाऊ सोमसिह यांनी तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, भरतसिंह मंगळवारी रात्री सुखसागनर येथून निघाले होते. यावेळी दुचाकीवरुन आलेल्या तिघांनी त्यांना अडवले व शिवीगाळ करुन त्यांच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. पोलिस निरीक्षक सूरज बेंद्रे तपास करत आहेत.

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919






जुन्नर तालुक्यात पसरली शोककळा

आतील पानावर

# दादांना निरोप देताना फुटला अश्रूंचा बांध

## राजकीय, सामाजिक, सहकारी क्षेत्रावर पसरली शोककळा; सर्वपक्षीय नेत्यांची उपस्थिती









**बारामती, प्रतिनिधी.** महाराष्ट्राच्या राजकारणात निर्णायक नेतृत्व म्हणून ओळख निर्माण करणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अखेरचा निरोप बारामतीकरांसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या लाखो कार्यकर्त्यांनी साश्रू नयनांनी घेतला. अजितदादांचे अकाली निधन झाल्याचे वृत्त समजल्यापासून आज दुसऱ्या दिवशीही बारामती शहरासह तालुका तसेच इतर तालुक्यातील व्यवहार पूर्णपणे ठप्प होते.

त्यांच्या निधनाने राज्याच्या राजकीय, सामाजिक आणि सहकारी क्षेत्रावर गडद शोककळा पसरली असून, हजारो नागरिकांच्या डोळ्यांत अश्रू आणि मनात असंख्य आठवणी साठून राहिल्या.

विद्या प्रतिष्ठान शैक्षणिक संकुलाच्या विस्तीर्ण मैदानावर शासकीय सन्मानासह त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पहाटेपासूनच नागरिकांची गर्दी वाढत होती. कार्यकर्ते, समर्थक, शेतकरी, युवक आणि महिलांनी अंतिम दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. "अजित दादा अमर रहे"च्या घोषणा आणि शोकाकुल वातावरणामुळे प्रत्येकाच्या चेहऱ्यावर मोठी निराशा दिसत होती. एखादा कुटुंब प्रमुख गेल्यानंतर कुटुंबातील सदस्यांची जी अवस्था होते, ती अवस्था उपस्थित असणाऱ्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून येत होती . केंद्रीय मंत्री अमित शहा, नितीन गडकरी, रामदास आठवले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्यासह केंद्र व राज्य मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, खासदार, आमदार यांच्यासह मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी, यांनी पुष्पचक्र अर्पण करून अजितदादांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले. सकाळी अजित दादांचे पार्थिव शासकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयातून काटेवाडीत त्यांच्या घरी नेण्यात आले, त्यानंतर विद्या प्रतिष्ठानच्या क्रीडांगणावर तिरंग्यामध्ये लपेटून सजवलेल्या बसमध्ये अजित दादांचे पार्थिव आणण्यात आले. या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी लाखोच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी पार्थिवाचे दर्शन घेतले, यानंतर दोन्ही पुत्र पार्थ व जय यांनी वडिलांच्या पार्थिवाचे अंतिम दर्शन घेऊन त्यांनी मुखाग्नी दिला . अजितदादा अमर रहे, या घोषणांनी वातावरण आणखी शोकाकुल झाले होते.

केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने त्यांच्या पार्थिवाला मानवंदना देण्यात आली. विरोधातील अनेकांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्व पक्षांच्या नेत्यांनी अजित पवार यांच्या कार्याचा गौरव माध्यमांशी बोलताना केला.

अजित पवार हे केवळ राजकारणी नव्हते, तर विकासाचे प्रतीक होते. बारामतीपासून महाराष्ट्रापर्यंत त्यांनी विकासाची ठोस पायाभरणी केली. सिंचन प्रकल्प, सहकारी संस्था, शिक्षण व्यवस्था आणि पायाभूत सुविधांमध्ये त्यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे. कठोर निर्णय, स्पष्ट भूमिका आणि प्रशासनावरची पकड ही त्यांच्या नेतृत्वाची ओळख होती.त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राने केवळ एक नेता नाही, तर संघर्षशील नेतृत्व, कार्यक्षम प्रशासक आणि जनतेशी नाते जपणारा लोकप्रतिनिधी गमावला आहे, अशा प्रतिक्रिया अनेक मान्यवरांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केल्या.

दरम्यान बारामती शहरातील सर्व व्यवहार पूर्णपणे दोन दिवसांपासून ठप्प आहेत. बारामती नगरपालिकेचे कामकाज देखील दुसऱ्या दिवशी बंद ठेवण्यात आले होते. शहरातील अनेक शाळा महाविद्यालय बंद ठेवण्यात आली होती. वैद्यकीय व्यवसाय वगळता अन्य सर्व व्यावसायिक दुकाने पूर्णपणे बंद होती. त्यामुळे बाहेरून आलेल्या नागरिकांचे मोठे हाल झाले, यामध्ये पोलीस कर्मचाऱ्यांचे हाल झाले. दरम्यान काही नागरिकांनी केळी व अल्पोपार पोलीस कर्मचाऱ्यांना दिला, तसेच काहींनी पाण्याच्या पाटलांचे वाटप केले. पेट्रोल पंप देखील बंद असल्याने वाहन चालकांची मोठी गैरसोय झाली.

### संपूर्ण परिसरात वाहनांच्या लांबच्या लांब रांगा

बारामती शहरातील विविध रस्त्यांवर दोन दिवसांपासून वाहनांच्या लांब रांगा होत्या. तर अंत्यसंस्काराच्या दिवशी पहाटेपासूनच राज्यभरातून आलेल्या नागरिकांमुळे सगळे रस्ते वाहनांच्या गर्दीने फुलून गेले होते. बारामतीत येणाऱ्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अति दुःखाच्या भावना दिसून येत होत्या. यामध्ये राज्यातील तसेच केंद्रातील दिग्गज नेत्यांच्या चेहऱ्यावर देखील दुःखाचा तो भाव दिसत होता. केंद्रासह राज्यातील नेत्यांनी अजित दादांच्या पार्थिवाचे दर्शन घेतल्यानंतर, सुनिता पवार यांच्यासह पार्थ व जय पवार यांचे सांत्वन केले. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह खासदार सुप्रिया सुळे,श्रीनिवास पवार, राजेंद्र पवार, आमदार रोहित पवार, युगेंद्र पवार व इतर सर्व पवार कुटुंबीय उपस्थित होते.

# सुरक्षारक्षकाला दुसऱ्या दिवशीही अश्रू अनावर

## इम्तियाज मोमीन बुडाले शोकसागरात



**बारामती, प्रतिनिधी.** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सावलीप्रमाणे नेहमी बरोबर असणारे त्यांचे सुरक्षा रक्षक इम्तियाज मोमीन घटनास्थळी बराच वेळ रडत थांबले होते, अजितदादांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करतेवेळी त्यांनी जय पवार यांची गळाभेट घेऊन त्यांना अश्रू अनावर झाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार बारामतीत काही वेळातच बारामती विमानतळावर पोहोचणार होते. त्यामुळे अजितदादांच्या विमानाची वाट बारामती शहरातील विविध पदाधिकाऱ्यांसह शासकीय अधिकारी व त्यांचे सुरक्षा रक्षक देखील पाहत थांबले होते. विमानतळापासून धावपट्टी संपते, त्या ठिकाणाच्या अगदी जवळून स्फोटाचा आवाज आला, आणि त्यानंतर विमानतळावरील सर्व यंत्रणेची पळापळ सुरू झाली, यामध्ये अजित दादांबरोबर नेहमी सावलीप्रमाणे बरोबर असणारे त्यांचे सुरक्षारक्षक इम्तियाज मोमीन हे देखील होते. मोमीन घटनास्थळी पोहोचल्यानंतर, अजितदादा या अपघातात गेल्याचे कळाल्यानंतर , मोमीन अचानक खाली बसले, यावेळी राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनाही धक्का बसला. मोमीन यांच्यासह सर्वजण रडू लागले. दुपारी उशिरापर्यंत मोमीन, जळालेल्या विमानाच्या अवशेषाकडे बघून रडत होते, यावेळी माध्यमांनी त्यांना प्रतिक्रियेसाठी विचारणा देखील केली, मात्र ते प्रतिक्रिया देण्याच्या मनस्थितीत नव्हते, मोमीन यांच्याबरोबर त्यांचे दुसरे अंगरक्षक सहकारी देखील होते, ते देखील भावनाविवश झाले होते.

### ताफ्यातील प्रत्येक जण हळहळला

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रत्येक सभेच्या ठिकाणी बाजूला उभे असणारे मोमीन यांना अनेक जण ओळखतात. अजितदादा गेल्याच्या धक्क्यातून ते अजून देखील सावरले नसल्याचे आज दुसऱ्या दिवशी स्पष्ट झाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यातील प्रत्येक जण हळहळत होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम पाहिलेले व सध्या बारामती एमआयडीसी च्या प्रमुख अधिकारी पदाची जबाबदारी असलेले हनुमंत पाटील हे देखील रडत होते.

## Short News

### जिल्ह्यात सर्वपक्षीय राजकीय प्रचार बंद

**पुणे.** महाराष्ट्राच्या राजकारणाला हादरवून टाकणाऱ्या घटनेनंतर पुणे जिल्ह्यातील राजकीय वातावरण पूर्णतः बदलले आहे. ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेला सर्वपक्षीय राजकीय प्रचार तात्काळ बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सत्ताधारी तसेच विरोधी पक्षांनीही हा निर्णय घेत राजकीय मतभेद बाजूला ठेवत शोकभावनेला प्राधान्य दिले आहे. अजित पवार हे केवळ एका पक्षाचे नेते नव्हते, तर पुणे जिल्ह्याच्या आणि विशेषतः बारामती परिसराच्या राजकारणावर दीर्घकाळ प्रभाव टाकणारे नेतृत्व होते. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली शोककळा लक्षात घेता प्रचार सभा, रॅली, पदयात्रा, जाहीर मेळावे तसेच सोशल मीडियावरील प्रचार उपक्रमही दोन दिवसांसाठी स्थगित करण्यात आले आहेत. निवडणूक काळात असा सर्वपक्षीय संयम क्वचितच पाहायला मिळतो, अशी प्रतिक्रिया राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

### अस्वस्थता, संभ्रम, चर्चा

दरम्यान, प्रचार बंद असला तरी कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता आणि संभ्रमाचे वातावरण आहे. निवडणुकीच्या ऐन तोंडावर घडलेल्या या घटनेमुळे अनेक पक्षांच्या रणनितींवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेषतः पुणे जिल्ह्यातील काही संवेदनशील मतदारसंघांमध्ये प्रचाराचा वेग अचानक थांबल्याने राजकीय समीकरणे नव्याने जुळवावी लागतील, असे संकेत मिळत आहेत.

# अजितदादांच्या निधनाने राज्याचे अपरिमित नुकसान

## हर्षवर्धन पाटील यांनी वाहिली श्रद्धांजली

**इंदापूर,(वा.)** राज्याच्या राजकारणात गेली सुमारे चार दशके अजितदादा पवार हे नाव सदैव अग्रभागी राहिले. पुणे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासात त्यांचे योगदान अतुलनीय आहे. अजितदादांच्या अचानक जाण्याने राज्याचे भरून न निघणारे, अपरिमित असे नुकसान झाले आहे, अशा शब्दांत



राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदापासून राजकीय वाटचाल सुरू करणारे अजितदादा हे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची सखोल जाण असलेले नेते होते. सामान्य जनता व कार्यकर्त्यांशी त्यांची नाळ घट्ट जोडलेली होती. त्यामुळेच त्यांच्या नेतृत्वाला जनतेचा प्रचंड पाठिंबा लाभला. शेतकरी, कष्टकरी आणि समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नतीसाठी त्यांनी सत्तेचा सकारात्मक आणि प्रभावी वापर केला, असे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, अवघ्या आठ-दहा दिवसांपूर्वीच आमची भेट झाली होती. सुमारे पंधरा वर्षे राज्य मंत्रिमंडळात आम्ही एकत्र काम केले. ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक विषयाची त्यांना सखोल जाण होती. ठाम निर्णयक्षमता, प्रदीर्घ प्रशासकीय अनुभव आणि जनतेच्या प्रश्नांची खोल समज यामुळे त्यांच्या कामाची तडफ राज्याने नेहमी अनुभवली. अभ्यासू वृत्तीच्या जोरावर त्यांनी विधिमंडळातही आपल्या कार्याचा ठसा उमटवला. रोखठोकपणा आणि दिलदारपणा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खास वैशिष्ट्य होते.

### 'काम करणारा नेता' अशी जनमाणसात प्रतिमा

अजितदादांच्या आकस्मिक जाण्याने राज्याच्या राजकीय, सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. विकासाचा स्पष्ट दृष्टिकोन बाळगणाऱ्या या नेत्यामुळे सर्वसामान्यांच्या हिताच्या अनेक योजना प्रत्यक्षात उतरल्या. म्हणूनच 'काम करणारा नेता' अशी त्यांची ठसठशीत आणि लोकप्रिय प्रतिमा जनमानसात निर्माण झाली होती, असेही हर्षवर्धन पाटील यांनी नमूद केले.

# ओतूर शहरातील नागरिक हेलावले

## अजित पवारांना सर्वपक्षीय नेते, ग्रामस्थांचा साश्रु नयनांनी निरोप

**ओतूर, (वा.)** उपमुख्यमंत्री अजित पवार यांना ओतूर शहरात भावपूर्ण वातारवणात निरोप देण्यात आला. ओतूरमधील जुने बस स्थानक परिसरातील ग्रामीण रुग्णालयासमोर लावण्यात आलेल्या एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून हजारो ओतूरकरांनी आपल्या लाडक्या नेत्याचे अंत्यदर्शन घेतले. यावेळी ₹अमर रहे, अमर रहे, अजित दादा अमर रहे...₹ अशा गगनभेदी घोषणांनी संपूर्ण ओतूर शहर आणि परिसर दुमदुमून गेला होता. अजित दादांच्या निधनाची बातमी समजताच ओतूरसह संपूर्ण जुन्नर तालुक्यावर शोककळा पसरली. दादांचे ओतूरशी असलेले नाते अत्यंत जिव्हाळ्याचे होते. विकासाचा ध्यास आणि शब्दाचा पक्का नेता म्हणून त्यांची ओळख असल्याने, आज त्यांना निरोप देताना अबालवृद्धांचे डोळे पाणावले होते. ग्रामीण रुग्णालय परिसरात जमलेल्या शेकडो कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर आपल्या आधारवड हरपल्याचे दुःख स्पष्टपणे जाणवत होते.

अंत्यविधीच्या ठिकाणी होणारी गर्दी लक्षात घेता, ओतूरमधील कार्यकर्त्यांनी आणि प्रशासनाने जुन्या बस स्थानकासमोर एलईडी स्क्रीनची व्यवस्था केली होती. या स्क्रीनवर जसे दादांचे पार्थिव दिसले, तसे उपस्थित जनसमुदायाला अश्रू अनावर झाले.

### सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेऊन राजकारण



पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मोहित ढमाले म्हणाले, " दादांनी नेहमीच सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून राजकारण केले. कार्यकर्त्यांच्या खांद्यावर हात ठेवून त्याची विचारपूस करणारा असा मोठा नेता पुन्हा होणे नाही." माजी जिल्हा परिषद सदस्य अंकुश आमले म्हणाले, "अजित दादा पवार यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धगधगते आणि स्पष्टवक्ते पर्व संपले आहे. ओतूरच्या मातीने आज आपला एक खंदा पुरस्कर्ता गमावला आहे." राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जेष्ठ नेते विनायक तांबे म्हणाले की, अजित दादा आज शरीराने आपल्यात नसले तरी त्यांनी केलेली विकास कामे आणि कार्यकर्त्यांची जोडलेली मोठी साखळी यांच्या माध्यमातून ते कायम स्मरणात राहतील दादांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणातील एक सुवर्णयोग संपले आहे यांची उणीव कधीही भरून काढता येणार नाही.

महिला, ज्येष्ठ नागरिक आणि तरुणांनी या स्क्रीनसमोर उभे राहून हात जोडून आपल्या लाडक्या नेत्याला श्रद्धांजली वाहिली. दरम्यान अजित दादांच्या निरोपासाठी ओतूरमधील सर्वपक्षीय नेते एकाच व्यासपीठावर आले होते. राजकारणातील गट-तट बाजूला सारून शिवसेना, भाजप, उबाठा,कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी दादांच्या आठवणींना उजाळा दिला.

### एका शब्दावर कामे मार्गी

'दादा म्हणजे प्रशासनाचा कणा होते, त्यांच्या एका शब्दावर कामे मार्गी लागत,' अशा भावना ओतूर गावच्या सरपंच छाया तांबे यांनी व्यक्त केल्या. ओतूरच्या ग्रामीण रुग्णालयाचे सक्षमीकरण असो वा परिसरातील सिंचनाचे प्रश्न, दादांनी नेहमीच ओतूरला झुकते माप दिले, याची आठवण कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तुषार थोरात यांनी करून दिली.

# लोणी, कदमवाकवस्ती, वडकीतील प्रचार ठप्प

**कदमवाकवस्ती (वा.)** राज्याचे उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाचे वृत्त वाऱ्यासारखे संपूर्ण महाराष्ट्रात पसरताच पूर्व हवेली परिसरातील लोणी काळभोर, कदमवाकवस्ती व वडकी येथे सुरू असलेला जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा प्रचार पूर्णतः ठप्प झाला. या दुःखद घटनेमुळे परिसरात तीव्र शोककळा पसरली आहे. अजित पवारांच्या निधनाची बातमी समजताच कोणत्याही राजकीय पक्षाच्या आवाहनाविना व्यापारी, छोटे-मोठे व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने आपले व्यवहार बंद ठेवले. सकाळपासून बाजारपेठा, दुकाने व आस्थापना कडकडीत बंद असून, रुग्णालये, मेडिकल व इतर अत्यावश्यक सेवा मात्र सुरू ठेवण्यात आल्या आहेत. लोणी काळभोर, कदमवाकवस्ती व वडकीसह संपूर्ण परिसरात नागरिकांनी चौका-चौकात तसेच विविध पक्षीय कार्यालयांच्या आवारात एकत्र येत मूक श्रद्धांजली अर्पण केली.

या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी घरोघरी प्रचार करणारे उमेदवार व कार्यकर्तेही निशब्द झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. ५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या पुणे जिल्हा परिषद व हवेली पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत काल संपली होती. आजपासून प्रचाराला सुरुवात होणार होती.

## शोककळा — हजारोंच्या उपस्थितीत उपमुख्यमंत्री अजित पवारांसाठी शोकसभा

# चाकणमध्ये बंद ठेवून वाहिली श्रद्धांजली

**चाकण शहर, (वा.)** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या अचानक झालेल्या निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्रासह पुणे जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. विशेषतः खेड तालुका आणि चाकण शहरासाठी हा मोठा धक्का असून, जनतेने आपला जिव्हाळ्याचा नेता गमावल्याची भावना व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर चाकण शहरवासीयांच्या वतीने महात्मा फुले मार्केट यार्ड येथून श्रद्धांजली पदयात्रेचे आयोजन करण्यात आले, तसेच आदरांजली म्हणून चाकण शहर बंद ठेवण्यात आले. ही पदयात्रा शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत बसस्थानक परिसरात पोहोचली. तेथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. शोकसभेत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करत नागरिकांनी आपल्या दुःखद भावना व्यक्त केल्या.

शोकसभेत बोलताना विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी, उद्योजक तसेच नागरिकांनी अजितदादा पवार यांचे खेड तालुक्यावर असलेले विशेष प्रेम आणि त्यांचे विकासात्मक योगदान अधोरेखित केले. खेड तालुक्यातील औद्योगिक विकास, चाकण औद्योगिक वसाहतीचा विस्तार, रोजगारनिर्मिती, पाणीपुरवठा योजना, कचरा व्यवस्थापन, रस्ते, आरोग्य व शिक्षण सुविधा यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचे मान्यवरांनी सांगितले.



### समस्या ऐकून घेणारे नेतृत्व होते

चाकण शहरातील सध्या सुरू असलेल्या तीव्र वाहतूक कोंडीच्या प्रश्नाकडे अजितदादा पवार यांनी अत्यंत गांभीर्याने लक्ष दिले होते. काही दिवसांपूर्वी त्यांनी पहाटेच प्रत्यक्ष पाहणी करून रस्ता रुंदीकरणासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला होता. अजितदादा पवार हे पक्षभेद न करता सर्वसामान्य कार्यकर्ते, नागरिक, शेतकरी व उद्योजकांच्या समस्या ऐकून घेणारे नेतृत्व होते. कोणत्याही पक्षातील कार्यकर्ता असो, त्यांच्या प्रश्नाला ते त्वरित प्रतिसाद देत असल्याचे अनेकांनी आवर्जून नमूद केले. त्यामुळेच "चाकण गावचे पालकत्व हरपले" अशी भावना शोकसभेत वारंवार व्यक्त होत होती.

### मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय एकत्र

- शोकसभेनंतर अजितदादा पवार यांना अखेरची आदरांजली वाहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय एकत्र आला होता. परिसरात शोकाकुल वातावरण होते.
- तर "अजितदादा अमर रहें" अशा भावना व्यक्त केल्या जात होत्या.
- अजितदादा पवार यांच्या निधनाने एक धडाडीचे, निर्णयक्षम व विकासाभिमुख नेतृत्व हरपल्याची भावना चाकण शहरासह संपूर्ण खेड तालुक्यात व्यक्त होत असून, त्यांच्या कार्याची आठवण जनतेच्या मनात कायम राहील, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# अवसरी खुर्द येथे शोकसभा



**मंचर, (वा.)** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानिमित्त अवसरी खुर्द ता.आंबेगाव येथे शोकसभा आयोजित करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष ॲड. विष्णुकाका हिंगे यांनी आपल्या पुण्यामधील शैक्षणिक जीवनात अजित पवार यांनी कसे सहकार्य केले. त्यानंतर अनेक वेळा राजकीय पदांची संधी दिली. त्याबद्दल दादांचे सर्वसामान्य बद्दलची तळमळ व्यक्त केली व अनेक प्रसंग विशद केले. शोकसभेत सरपंच वैभव वायळ, माजी सरपंच कल्याण शिंदे, शरद शिंदे, प्रवीण टेमकर,मयूर पतसंस्थेचे अध्यक्ष हरिदास रामवत, निलेश देमकर, धनंजय ढुमणे, राजू भोर, संजय वायाळ यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

# महिला सक्षमीकरण महत्वाचे : जगदाळे



## दिवे गराडेमध्ये भाजपा उमेदवारांचा प्रचार शिगेला

**सासवड (वा.)** जिल्हा परिषदेच्या माध्यमातून गावागावात कोट्यावधी रुपयांची विकास कामे करणे शक्य आहे. दुर्दैवाने मागील काळामध्ये ज्यांना सत्ता मिळाली त्यांना लोकांची कामे पोचलीच नाहीत त्याच्यामुळे लोकांचे प्रश्न तसेच राहिले, ज्यांना मिळालेल्या संधीचे सोने करता आले नाही त्या लोकांना आता मत मागायचा अधिकार राहिला नाही, अशा शब्दात दिवे गराडे मतदार संघातील भाजपच्या उमेदवार दिव्या जगदाळे यांनी कोडीत येथील सभेत विरोधकांवर जोरदार प्रहार केले. गावातील स्थानिक विकास कामे करतानाच महिला सक्षमीकरण हे धोरण राबवायचे आहे, असे आश्वासन जगदाळे यांनी दिले. पुरंदर तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपच्या उमेदवारांनी चांगलीच आघाडी घेतली आहे. दिव्या जगदाळे या भाजपच्या जिल्हा परिषदेच्या उमेदवार असून ललिता कटके या पंचायत समितीच्या उमेदवार आहेत. कोडीत येथे भाजपच्या दोन्ही उमेदवारांचे स्वागत केले. यावेळी प्रहार संघटनेच्या महिलाध्यक्षा सुरेखा ढवळे यांच्यासह कोंडीत, चांबळी, भिवरी, बोपगाव, गराडे आणि परिसरातील मतदार उपस्थित होते. भाजपचे संजय कामठे म्हणाले की, पुरंदर परिसरातील अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. या निवडणुकीत दोन्ही उमेदवार सक्षम असल्याने त्यांच्याकडून आमच्या प्रश्नांची सोडवणूक होईल याची खात्री आहे. त्यामुळेच जगदाळे आणि कटके यांना निवडून द्यावे, असे आवाहन कामठे यांनी केले.

CMYK

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



# संशोधनाशिवाय आयुर्वेद अपूर्ण !

## बिहारचे राज्यपाल आरिफ मोहंमद खान; धन्वंतरी पुरस्कारांचे वितरण

**पुणे, शहर प्रतिनिधी.** आयुर्वेद ही केवळ उपचारपद्धती नव्हे, तर भारतीय जीवनदृष्टी आहे. आधुनिक जीवनशैलीत आयुर्वेदाचे महत्व अधिकच वाढले आहे. जागतिक पातळीवर आयुर्वेदाला विश्वासार्हता मिळवून देण्यासाठी संशोधन, प्रमाणबद्धता आणि वैज्ञानिक दस्तऐवजीकरणावर भर देणे आवश्यक आहे,₹ असे प्रतिपादन बिहारचे राज्यपाल आरिफ मोहंमद खान यांनी केले.

विश्वानंद आयुर्वेद चिकित्सालय व गुरुकुलचे संचालक वैद्य अनिल बनसोडे यांनी 'आयुर्वेद प्रॅक्टिस कशी उभारावी व वाढवावी?' याबाबत प्रात्यक्षिकांसह विश्लेषण केले. श्री आयुर्वेद अँड हॉस्पिटलचे संचालक वैद्य प्रशांत दौंडकर-पाटील यांनी 'आयुर्वेद ओपीडी, हॉस्पिटल नोंदणी, ओपीडी व आयपीडी पंचकर्मासाठी कॅशलेस मेडिक्लेम एम्पॅनेलमेंट' याविषयी मार्गदर्शन केले. श्री धूतपापेश्वरचे सीईओ वैद्य रणजीत पुराणिक, आयुर्वेद व्यासपीठाचे माजी अध्यक्ष वैद्य संतोष नेवपूरकर, बागेवाडीकर आयुर्वेद रसशाळेचे संचालक वैद्य प्रशांत बागेवाडीकर, आयुष मंत्र्यांचे खासगी सचिव वैद्य जीवन बच्छाव यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. वैद्य हरीश पाटणकर व वैद्य प्रेरणा बेरी यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

भारतीय आयुर्वेद संस्थेचे कार्याध्यक्ष वैद्य प्रशांत दौंडकर-पाटील, सचिव संकेत खरपुडे, वैद्य सुकुमार सरदेशमुख, वैद्य राहुल शेलार, वैद्य प्रिया दौंडकर-पाटील, वैद्य सोनल सोमानी यांनी यशस्वी संयोजन केले. श्री आयुर्वेद अँड पंचकर्म हॉस्पिटल व वर्मा फाउंडेशनचे या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य लाभले.




### वैद्यांना 'आयुर्वेद गौरव' पुरस्काराने गौरविले

भारतीय आयुर्वेद संस्थेच्या वतीने आयोजित राष्ट्रीय आयुर्वेद संभाषा परिषद व राज्यस्तरीय धन्वंतरी पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते.शिवाजीनगर येथील कृषी महाविद्यालयाच्या डॉ. शिरामाने सभागृहात आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याच्या आरोग्य शिक्षण विभागाचे सहसचिव रामचंद्र धनावडे यांच्या हस्ते झाले. प्रसंगी आयुर्वेद क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी वैद्य रणजीत पुराणिक, वैद्य जीवन बच्छाव, वैद्य संतोष नेवपूरकर, वैद्य प्रशांत बागेवाडीकर यांना 'आयुर्वेद गौरव' पुरस्काराने गौरविण्यात आले.

> शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधणारी आयुर्वेदाची संकल्पना आजच्या तणावपूर्ण काळात अत्यंत उपयुक्त ठरत आहे. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेत आयुर्वेदाची भूमिका भविष्यात निर्णायक ठरू शकते. त्यामुळे आधुनिक विज्ञानाशी समन्वय साधत आयुर्वेदातील मूलतत्त्वे जपण्याची गरज असून, तरुण वैद्यांनी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करत संशोधनाकडे वळावे.
>
> – आरिफ मोहंमद खान, बिहारचे राज्यपाल

**व्यासपीठ** ● सिन्नरकर यांच्या क्लासेसमधील विद्यार्थ्यांचे प्रदर्शन

# विद्यार्थी कलाकृतींचे होणार प्रदर्शन

**पुणे, शहर प्रतिनिधी.** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने शैला प्रदीप सिन्नरकर यांच्या रेग्युलर ड्रॉईंग क्लासेसमधील विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे भव्य चित्रप्रदर्शन रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ पासून बालगंधर्व कलादालन, पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन सकाळी १० वाजता प्रसिद्ध चित्रकार शेखर साने यांच्या हस्ते होणार असून, सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईनच्या डेप्युटी डायरेक्टर डॉ. प्रणिता रानडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. या प्रदर्शनात यंदा १३० विद्यार्थ्यांच्या दर्जेदार, सर्जनशील व आशयपूर्ण कलाकृती रसिकांना पाहायला मिळणार आहेत. पुणेकरांसाठी हे प्रदर्शन विनामूल्य खुले असणार आहे. सामाजिक जाणीव जागवणाऱ्या पाणी वाचवा, पृथ्वी वाचवा, सेव्ह टायगर, झाडे वाचवा, सोशल मीडिया, व्यसनमुक्ती, भारतीय सैन्याचा अभिमान अशा विविध विषयांवरील चित्रे हे या प्रदर्शनाचे खास आकर्षण ठरणार आहे.





### कलागुणांना प्रोत्साहन मिळणे अत्यावश्यक

याशिवाय पोर्ट्रेट्स, कॅनव्हास पेंटिंग, कॉफी पेंटिंग, म्युरल्स, निसर्गचित्रे, पेन्सिल शेडिंग तसेच स्थिरचित्रे अशा विविध प्रकारच्या कलाकृतींचा समावेश या प्रदर्शनात करण्यात आला आहे. शैला सिन्नरकर यांनी अभिनव कला महाविद्यालय, पुणे येथून ए.टी.डी./जी.डी. आर्टचे शिक्षण घेतले असून, त्या गेल्या २५ वर्षांपासून मॉडेल कॉलनी व सेनापती बापट रोड परिसरात ड्रॉईंग क्लासेस चालवत आहेत. तसेच त्या म्युरल्स, कॅनव्हास पेंटिंग, पेपर मॅशे, कॉफी पेंटिंग, पॉट मेकिंग आणि इको-फ्रेंडली गणपती कार्यशाळाही घेत आहेत. लहान मुले ही देशाची भावी पिढी असून त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे, कलेबद्दल आवड निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे, हाच या चित्रप्रदर्शनामागील उद्देश असल्याचे शैला सिन्नरकर यांनी सांगितले.

## Short News

### किरण शंकर लागू यांचे निधन



**पुणे, शहर प्रतिनिधी.** शिवाजीनगर येथील मॉर्डन महाविद्यालयाचे माजी क्रीडा संचालक, ज्येष्ठ क्रीडा शिक्षक व संघटक किरण शंकर लागू (वय ८०) यांचे निधन झाले. किरण लागू हे कुलवीर (स्काऊट) असून त्यांचे बास्केटबॉलमध्ये विशेष प्राविण्य होते. त्यांनी विविध ठिकाणी प्रशिक्षण देत अनेक खेळाडू घडवले. अनेक क्रीडा संघटनांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. विद्यार्थीप्रिय क्रीडा शिक्षक म्हणून त्यांची ओळख होती. प्रेमळ स्वभाव, ठाम निर्णयक्षमता आणि सतत नवीन गोष्टी शिकण्याची जिद्द ही त्यांची खास वैशिष्ट्ये होती. कलेच्या किंवा क्रीडा यशाबद्दल ते नेहमी प्रत्यक्ष भेटून किंवा फोन करून कौतुक करत असत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, नातवंडे परिवार आहे.

## आज शहरात

### शिबीर

- मोफत आर्युवेद सल्ला शिबीर, स्थळ – दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, जुनी बिल्डींग वेळ – स. १० ते दु. १

### पुस्तक प्रकाशन

- मानवतेसाठी लढणारा महात्मा,स्थळ – गांधीभवन, वेळ – स. १० :३० वा

### परिषद

- राईज इंडिया नेतृत्व परिषद, स्थळ – हॉटेल विवांता, वेळ – सायं ४ वा

### व्याख्यान

- भारतीय संस्कृतची मूळ तत्वे, स्थळ – गीता धर्म मंडळ, सदाशिव पेठ, वेळ – सायं ५ वा

### प्रकाशन

- गोष्ट तिरंगा ध्वजाची, स्थळ – एस.एम.जोशी सभागृह, वेळ – सायं ५ :३० वा

## # सहवेदना

### हेमा देशपांडे

**पुणे, शहर प्रतिनिधी.** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्र गुरुकुल येथे अनेक वर्षे गुरु सहायक म्हणून कार्यरत असलेल्या हेमा देशपांडे (वय ६३) यांचे बुधवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. देशपांडे यांच्या पार्थिवावर गुरुवारी (२९ जानेवारी) वैकुंठ स्मशानभूमी येथे सकाळी अकरा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.



**सबलीकरण** ● एमओसी कॅन्सर केअरचे निवडक केंद्रांवर १,५०० महिलांसाठी लसीकरण

# 'निडर नारी सर्व्हायकल कॅन्सर पे भारी'

**पुणे, शहर प्रतिनिधी.** एमओसी कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटरने महिलांमध्ये सर्व्हायकल कॅन्सरविषयी जनजागृती वाढवण्यासाठी 'निडर नारी – सर्व्हायकल कॅन्सर पे भारी' या विशेष मोहिमेची घोषणा केली आहे. महिलांमध्ये या आजाराविषयी असलेली भीती, मौन, सामाजिक संकोच आणि गैरसमज दूर करून, कोणताही अपराधभाव किंवा भीती न बाळगता स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य देण्यासाठी महिलांना सक्षम करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

या मोहिमेअंतर्गत एमओसी कॅन्सर केअरच्या निवडक केंद्रांवर १,५०० महिलांसाठी मोफत सर्व्हायकल कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. प्रतिबंधात्मक उपायांना प्रोत्साहन देतानाच, जनजागृती, शिक्षण आणि वेळेवर तपासणी यावर या उपक्रमाचा विशेष भर असल्याचे एमओसी कॅन्सर केअरने स्पष्ट केले आहे. या मोहिमेसाठी प्रसिद्ध भारतीय दूरदर्शन, चित्रपट व रंगभूमी अभिनेत्री स्पृहा जोशी यांनी पाठिंबा दिला आहे.



### महिलांना खुलेपणाने बोलणे अजूनही अवघड

विशेषतः ग्रामीण, निमशहरी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिलांसाठी सर्व्हायकल कॅन्सरविषयी खुलेपणाने बोलणे अजूनही अवघड मानले जाते. उपचारांचा संभाव्य खर्च, कुटुंबीयांच्या जबाबदाऱ्यांचे ओझे, गैरसमजाची भीती आणि सामाजिक लज्जा यामुळे अनेकदा महिलांचे स्वतःचे आरोग्य दुय्यम ठरते. ही मोहीम अशा सर्व अडथळ्यांना थेट आव्हान देत, महिलांच्या आरोग्याविषयी सकारात्मक, खुले आणि आधार देणारे संवाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

या उपक्रमाविषयी माहिती देताना एमओसी कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटरचे संचालक व सह-संस्थापक डॉ. प्रीतम कळसकर म्हणाले, "सर्व्हायकल कॅन्सर हा टाळता येण्याजोगा आजार असतानाही, महिलांना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करण्याची सवय समाजाने लावली आहे. यामुळे अनेक मौल्यवान जीव गमावले जात आहेत. 'निडर नारी – सर्व्हायकल कॅन्सर पे भारी' या मोहिमेद्वारे आम्ही हे मौन तोडू इच्छितो, सामाजिक संकोच दूर करू इच्छितो आणि महिलांना कोणतीही भीती किंवा लाज न बाळगता माहिती घेणे, तपासणी करणे व प्रतिबंधात्मक उपाय स्वीकारण्यासाठी सक्षम करू इच्छितो.

सर्व्हायकल कॅन्सर हा भारतीय महिलांमधील एक गंभीर सामाजिक आरोग्य प्रश्न असून, विविध वयोगटांमध्ये या आजाराचे प्रमाण वाढताना दिसत आहे. हा कॅन्सर टाळता येण्याजोगा असतानाही, अनेक महिलांमध्ये उशिरा निदान होत असल्याचे वास्तव समोर येत आहे. यामागे भीती, अपुरी माहिती, तपासणीस विलंब आणि वैद्यकीय मदत घेण्यास होणारा मानसिक संकोच ही प्रमुख कारणे आहेत. सामाजिक दबाव, गैरसमज आणि लज्जा यांमुळे अनेक महिला वेळेवर प्रतिबंधात्मक उपाय व तपासणीपासून दूर राहतात.

# नर्मदा केवळ नदी नाही, ती जीवनदायिनी माता

### प्रणव शास्त्री धानोरकर गुरुजी यांचे प्रतिपादन

**पिंपरी, प्रतिनिधी.** नर्मदा ही केवळ नदी नसून ती जीवनदायिनी माता आहे. भक्तांना शांती, वैराग्य आणि आत्मज्ञान देणारी नर्मदा ही शिवकन्या असून, तिच्या पृथ्वी तलावर अवतरण्याने ऋषींची तपश्चर्या सफल झाली, दैत्यांचे बळ नष्ट झाले आणि मानवाला मोक्षाचा मार्ग प्राप्त झाला. त्यामुळेच पुराणांमध्ये नर्मदेला 'साक्षात मुक्तीदायिनी' असे संबोधले गेले आहे. प्रत्येकाने आयुष्यात किमान एकदा तरी नर्मदा परिक्रमा करावी, असे आवाहन हरिभक्तिपरायण श्री प्रणव शास्त्री धानोरकर गुरुजी यांनी केले. चिंचवड येथील नर्मदे हर संघ, पिंपरी-चिंचवड यांच्या वतीने नर्मदा जयंतीनिमित्त आयोजित नर्मदा पुराण कार्यक्रमात ते कथाकथन करताना बोलत होते. हा कार्यक्रम दि. २१ ते २५ जानेवारी या कालावधीत चिंचवड गावात भक्तिमय वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमास हैदराबाद येथील धर्मप्रचारिका डॉ. शिल्पा दीदी, अयोध्येचे प्रतिनिधी श्री विठ्ठल आनंद स्वामी, आळंदीचे महान संत अनंत मुळे महाराज, तसेच ह.भ.प. दिलीप महाराज ठाकरे यांच्यासह अध्यात्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रमुख पाहुण्या म्हणून माजी महापौर व नगरसेविका अपर्णा डोके यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नर्मदे हर संघाचे अध्यक्ष संदीप शिंदे यांच्यासह रवींद्र कोंढरे, रवींद्र मुळे, नाना भिसे, सुदाम वाणी, संतोष कदम, अपर्णा बोरकर, स्नेहा शिंदे, अरुणा रामेकर, दिपाली नेहरे आदी पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दीपस्तंभ पुरस्कारांचे दिमाखात झाले वितरण




### विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरव

**पुणे, शहर प्रतिनिधी.** समाजातील शेवटच्या घटकापर्यंत समानता, सन्मान आणि संधी पोहोचवण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या दीपस्तंभ फाउंडेशन – मनोबल यांच्यासाठी यावर्षीचा प्रजासत्ताक दिन विशेष ठरला. जळगाव येथील मनोबल प्रकल्पात आयोजित कार्यक्रमात दिव्यांग विद्यार्थिनींच्या हस्ते ध्वजारोहण व दीपस्तंभ पुरस्कारांचे वितरण करत समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला.या प्रसंगी कोल इंडिया लिमिटेडच्या मनुष्यविकास अधिकारी व मनोबलच्या माजी विद्यार्थिनी परिधी वर्मा यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. साहित्य, सामाजिक व वैचारिक क्षेत्रातील दीर्घ योगदानाबद्दल सुप्रसिद्ध लेखक व वक्ते डॉ. अच्युत गोडबोले यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास चंद्रशेखर सेठ, यतेंद्र शहा, गोवा राज्य दिव्यांग आयुक्त कार्यालयातील ताहा सर तसेच बजाज फिनसर्वच्या वरिष्ठ अधिकारी दिक्षिता चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल गोवा राज्य दिव्यांग आयुक्तालयाला विवेकानंद पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच अजय मिनोचा, सी.ए. सोनाली कावेरी आणि सिद्धेश लोकरे यांना युवा पुरस्काराने गौरविण्यात आले.मार्गदर्शन करताना डॉ. अच्युत गोडबोले यांनी मूल्याधिष्ठित जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाची सांगता दिव्यांग विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर सांस्कृतिक सादरीकरणाने झाली. हा सोहळा सामाजिक समावेशन, संवेदनशीलता आणि जबाबदारीचा प्रभावी संदेश देणारा ठरला.

**ग्रंथसंपदा :** मोहन ठोंबरे यांच्या 'एक वचन : स्वतःला दिलेले' पुस्तकांचे प्रकाशन

# अधिकाऱ्याच्या प्रवासाचे दस्तऐवजीकरण

**पिंपरी, प्रतिनिधी.** ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पुण्यात एका विशेष आणि दिमाखदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्याच्या सेवेत तीन दशकांहून अधिक काळ कार्यरत राहिलेले ज्येष्ठ सनदी अधिकारी मोहन ठोंबरे (भा.प्र.से., निवृत्त) यांच्या 'अ प्रॉमिस टू मायसेल्फ (इंग्रजी) आणि 'एक वचन : स्वतःला दिलेले' (मराठी) या दोन पुस्तकांचे प्रकाशन चिंचवड येथील ऑटो क्लस्टर थिएटर येथे मोठ्या उत्साहात पार पडले.या पुस्तकांचे अनावरण महाराष्ट्र शासनाचे माजी मुख्य सचिव जयंतकुमार बनठिया (भा.प्र.से., निवृत्त) आणि महाराष्ट्र राज्याचे कृषी आयुक्त सुरज मांढरे (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या सोहळ्यास प्रशासकीय, सामाजिक आणि बौद्धिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

हे पुस्तक केवळ त्यांच्या वैयक्तिक आठवणींचा संग्रह नसून, प्रशासनाकडे मानवी मूल्यांवर आधारित जबाबदारी म्हणून पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन मांडते. प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात निर्णय घेताना येणाऱ्या अडचणी, प्रशासकीय चौकटीतील आव्हाने, त्यावर शोधलेले उपाय तसेच जनतेच्या अपेक्षा आणि सरकारी यंत्रणा यांचा साधलेला समतोल या पुस्तकातून प्रभावीपणे उलगडला आहे.



### नव्या पिढीसाठी दीपस्तंभ

"हे पुस्तक केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठीच नव्हे, तर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि सामाजिक कार्यात रस असलेल्या तरुण पिढीसाठी एक दीपस्तंभ ठरेल," असा विश्वास यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.ही दोन्ही पुस्तके ए.पी.के. पब्लिशर्स एल.एल.पी., पुणे यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आली असून, एका अनुभवी सनदी अधिकाऱ्याचा हा प्रेरणादायी जीवनप्रवास प्रशासन समजून घेणाऱ्या प्रत्येकासाठी मोलाचा ठेवा ठरणार आहे.

### वैष्णवीचे वक्तृत्व स्पर्धात मोठे यश

**पुणे शहर प्रतिनिधी.** नांदगाव येथील (कै.) द्वारकाबाई तुकाराम सुकरे प्रतिष्ठानतर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत तुळसण येथील श्री निनाईदेवी विद्यालयातील वैष्णवी विनोद वीर हिने द्वितीय क्रमांक पटकावला.

मान्यवरांच्या हस्ते तिला प्रशस्तिपत्र, रोख रक्कम, स्मृतिचिन्ह देऊन तिचा गौरव केला. सांस्कृतिक विभाग प्रमुख व ज्येष्ठ शिक्षक आनंदराव जानुगडे यांनी तिला मार्गदर्शन केले.

# साधना केल्याशिवाय खरे सुख नाही

### आचार्य श्री राजरक्षितसूरी यांनी प्रवचनात भक्तांना दिला संदेश

**पुणे, शहर प्रतिनिधी.** वानरापासून नर आणि नरापासून नारायण (भगवान) बनण्याची जी सुवर्णसंधी मनुष्याला मिळाली आहे, ती व्यर्थ घालवणे ही घोर मूर्खता असल्याचे परखड प्रतिपादन आचार्य श्री राजरक्षितसूरीजी यांनी केले. आपल्या प्रवचनात त्यांनी एक उदाहरण सांगत उपस्थितांना अंतर्मुख केले. एस.एस.सी.नंतर चार मित्र शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. शिक्षण पूर्ण करून परतल्यावर त्यांनी एक पार्टी ठेवली. मित्रांनी त्यांच्या शिक्षणाबद्दल विचारले असता, एकाने डॉक्टर झाल्याचे, दुसऱ्याने सी.ए. झाल्याचे, तर तिसऱ्याने इंजिनिअर झाल्याचे सांगितले. चौथा मात्र काहीच उत्तर देईना. खूप आग्रह केल्यावर तो म्हणाला, "मी तर फक्त टाईमपास करून आलो."हे ऐकून मित्रांनी त्याला समजावत सांगितले की, लाखो रुपये खर्च करून जर फक्त टाईमपास करायचाच होता, तर तो इथेही होऊ शकला असता. भांडणे तर कुत्र्याच्या जन्मातही होऊ शकली असती, लाथा-बुक्क्या गाढवाच्या जन्मातही मिळू शकल्या असत्या, संग्रह मधमाशीच्या जन्मातही करता आला असता आणि जेवण तर डुकराच्या जन्मातही मिळाले असते. मग मनुष्यजन्माचा उपयोग केवळ यासाठी का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.



**जनसेवा** दगडूशेठ ट्रस्टकडून चौथ्या वर्षीही सामाजिक बांधिलकी जपत आठवडाभराचे शिबिर

# रुग्णसेवा अभियानातून दिव्यांगांना कृत्रिम अवयव प्रदान

**पुणे, शहर प्रतिनिधी.** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळाच्या पुढाकाराने जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत महाराष्ट्रातील १,७७१ दिव्यांगांना कृत्रिम अवयव देण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. थोरले बाजीराव पेशवे रस्त्यावरील हिराबाग कोठी येथील ट्रस्टच्या आरोग्य सेवा केंद्रात हे विशेष शिबीर आठवडाभर चालणार असून, या सामाजिक उपक्रमाचे हे चौथे वर्ष आहे.

टाटा ऑटोकॉम सिस्टिम्स, पिनॅकल इंडस्ट्रीज आणि भगवान महावीर विकलांग सहाय्यता समिती (जयपूर फूट), इंदौर यांच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटनप्रसंगी टाटा ऑटोकॉम सिस्टिम्स लि.चे व्हाईस चेअरमन डॉ. अरविंद गोयल, सुमती गोयल, पिनॅकल इंडस्ट्रीज लि.चे चेअरमन डॉ. सुधीर मेहता, तसेच ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. सुधीर मेहता यांनी सामूहिक प्रयत्नांतूनच मोठे सामाजिक कार्य शक्य होते, असे सांगून कृत्रिम अवयव मिळाल्यानंतर दिव्यांगांनी आत्मविश्वासाने सक्रिय जीवन जगावे, असे आवाहन केले. भविष्यात पुण्यासह नागपूर व विदर्भातही अशा शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. अरविंद गोयल यांनी दिली. दिव्यांगांसाठी रोजगारनिर्मितीच्या दृष्टीनेही प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.



### पोलिओग्रस्त लहान बालकांसाठी व्हीलचेअर

प्रास्ताविकात महेश सूर्यवंशी यांनी सांगितले की, या शिबिरासाठी पुण्यासह लातूर, परभणी, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, अहिल्यानगर, धाराशिव तसेच गोवा राज्यातून दिव्यांग सहभागी झाले आहेत. आतापर्यंत ट्रस्टच्या माध्यमातून ७,००० हून अधिक दिव्यांगांना कृत्रिम अवयव देण्यात आले आहेत. या शिबिरात जयपूर फूट, व्हीलचेअर, कुबड्या, काठ्या, कॅलिपर देण्यात येत असून, पोलिओग्रस्त लहान बालकांसाठी विशेष व्हीलचेअर देणे हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे.



# शहरात राष्ट्रीय पेटॅलिस्ट दिन उत्साहात साजरा




**पुणे, शहर प्रतिनिधी.** क्राफ्टिझन फाउंडेशन यांच्या वतीने राष्ट्रीय पेटॅलिस्ट दिन पुण्यातील एन. एस. फडके सभागृह येथे अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात पुणे व सातारा येथील भागीदार संस्थांचा सहभाग लाभला. एकूण ८ भागीदार संस्था आणि ४० पेक्षा अधिक बौद्धिक दिव्यांग व्यक्ती या उपक्रमात सक्रियपणे सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमादरम्यान विविध मनोरंजक, प्रोत्साहनपर आणि प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. बौद्धिक दिव्यांग व्यक्तींनी या सर्व उपक्रमांमध्ये मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. त्यांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी कार्यक्रमाच्या शेवटी चषक व सन्मानचिन्हांचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमात क्राफ्टिझन फाउंडेशनच्या तलशी, तसेच शिवरुद्र लुपने, रमण टेकाळे, भारत राहुट, प्रिया, सिद्धी आणि क्राफ्टिझन फाउंडेशनची संपूर्ण टीम सक्रियपणे सहभागी झाली होती. क्राफ्टिझन फाउंडेशनच्या संचालिका मयुरा बालसुब्रमणियन यांनी पेटॅलिस्ट दिनानिमित्त व्हिडिओ संदेशाद्वारे सहभागींना शुभेच्छा दिल्या व कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. उपस्थित सर्व दिव्यांग सहभागी व भागीदार संस्थांनी क्राफ्टिझन फाउंडेशन आणि बजाज यांच्या उपजीविका कार्यक्रमासाठी मिळालेल्या सहकार्याबद्दल व सातत्यपूर्ण प्रोत्साहनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. बौद्धिक दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या कौशल्यांना व्यासपीठ देण्यासाठी हा कार्यक्रम एक प्रेरणादायी उपक्रम ठरला.

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



# भावपूर्ण श्रद्धांजली

महाराष्ट्र
राज्याचे लाडके,
उपमुख्यमंत्री तथा
पुणे जिल्ह्याचे
पालकमंत्री

## स्व. अजितदादा पवार साहेब



यांना दु:खद
भावपूर्ण
श्रद्धांजली..!



**शोकाकुल**

**श्री. असोसीएट् इन्फ्रा व्हेंचर लिमिटेड** (पिंपळे सौदागर जि. पुणे)

**श्री. मंगेश येंधे / श्री. आनंद डुंबरे**

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



### बाजारपेठ बंद; अजित दादांसाठी साश्रूनयनांनी एकवटला जनसागर; ओतूर परिसराशी होते जिव्हाळ्याचे नाते

# जुन्नर तालुक्यात पसरली शोककळा

**ओतूर,** राज्याच्या राजकारणातील एक धडाडीचे व्यक्तिमत्त्व, विकासकामांचा झंझावात आणि जनसामान्यांचे नेते उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुःखद वृत्ताने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला. बारामती विमानतळ येथे झालेल्या दुर्दैवी विमान दुर्घटनेत दादांचे निधन झाल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि संपूर्ण जुन्नर तालुक्यासह ओतूर परिसरात शोककळा पसरली. आपल्या नेत्याला अखेरचा सलाम करण्यासाठी ओतूरची बाजारपेठ बंद ठेवली असून, प्रत्येक नागरिकाच्या डोळ्यांत अश्रू पाहायला मिळत आहेत.

अजितदादांचे जुन्नर तालुक्याशी आणि विशेषतः ओतूर परिसराशी जिव्हाळ्याचे नाते होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच ओतूरमधील व्यापाऱ्यांनी, दुकानदारांनी आणि टपरीधारकांनी स्वतःहून आपले व्यवहार बंद केल्याची माहिती ओतूर किराणा दुकान व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नितीन पऱ्हाळे यांनी दिली. ओतूर बस स्थानक परिसर, मुख्य बाजारपेठ आणि नगर कल्याण रस्त्यावर शुकशुकाट पसरला आहे. हॉटेल, दुकाने आणि खाजगी संस्थांनीही ओतूर कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात देखील आडतदार व्यापाऱ्यांनी देखील आपला शोक व्यक्त करण्यासाठी फलक लावून व्यवहार बंद ठेवले आहेत. केवळ दवाखाने आणि औषधांची दुकाने सुरू ठेवली आहेत. ओतूर हे अजितदादांचे अत्यंत जवळचे आणि आवडीचे ठिकाण. दरम्यान सकाळी त्यांच्या निधनाची बातमी समजताच कार्यकर्त्यांना अश्रू अनावर झाले. सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी एकत्र येत ₹एक पर्व संपले₹ असा नेता पुन्हा होणे नाही₹अशा भावना व्यक्त केल्या. अजितदादांच्या शब्दाला प्रशासनात असलेले वजन आणि त्यांनी जुन्नर तालुक्यासाठी दिलेला विकासनिधी यामुळे येथील जनतेचे त्यांच्यावर विशेष प्रेम होते. ₹दादांच्या निधनाने राजकारणातील एका युगाचा अंत झाला आहे,₹ अशा शब्दांत ओतूरमधील ज्येष्ठ सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांनी श्रद्धांजली वाहिली. अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांनी दादांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून साश्रू नयनांनी अभिवादन केले.






### शब्दाला जागणारा आमचा आधारवड हरपला

अजितदादा म्हणजे कार्यकर्त्यांसाठी केवळ एक नेता नव्हते, तर तो एक मोठा आधार होता. ओतूरमधील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी एकत्र येत दादांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी अनेक कार्यकर्त्यांना आपल्या भावना व्यक्त करताना शब्द सुचत नव्हते. दादांच्या 'शिस्त' आणि 'कामाच्या पद्धती'च्या आठवणी काढताना अनेकांना भरून आले. ₹दादांकडे कोणतेही काम घेऊन गेले की ते कधीच रिकाम्या हाताने परत पाठवत नसत. प्रशासनावर त्यांची असलेली पकड आणि शब्दाला जागणारा नेता आज आम्ही गमावला आहे, 'आमचा आधारवड हरपला', अशा शब्दांत एका ज्येष्ठ कार्यकर्त्याने आपल्या भावना व्यक्त केल्या.

### गावागावात ठिकठिकाणी प्रतिमेला पुष्पहार अर्पण

ओतूरच्या मुख्य चौकात सर्वपक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत शोकसभा आयोजित करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेससह शिवसेना, भाजप, काँग्रेस आणि इतर मित्रपक्षांच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी दादांच्या आठवणींना उजाळा दिला. राजकीय मतभेद विसरून आज संपूर्ण ओतूर एकवटलेले दिसले. ₹पक्ष कोणताही असो, पण राज्याच्या विकासाचा इंजिनिअर हरपला आहे,₹ अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. दरम्यानओतूर परिसरातील डुंबरवाडी, खामुंडी, उंब्रज, धोलवड, ठिकेकर वाडी, रोहोकडी, आंबेगव्हान, पाचघर, उदापुर, डिंगोरे, पिंपळगाव जोगा, धालेवाडी, नेतवड आणि कोळवाडी यांसारख्या ग्रामीण भागातही या घटनेचे तीव्र पडसाद उमटले. शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांनीही कामे थांबवून आपल्या लाडक्या नेत्याला श्रद्धांजली वाहिली. जुन्नर तालुक्याच्या विकासासाठी, विशेषतः कुकडी प्रकल्पाच्या पाण्यासाठी दादांनी घेतलेले कष्ट इथला शेतकरी कधीही विसरू शकणार नाही, अशा भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहेत. दरम्यान जुन्नर तालुक्यातील विविध गावागावात ठिकठिकाणी दादांचे मोठे फोटो लावून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात येत आहेत.

## खेड तालुका पत्रकार संघाच्यावतीने श्रद्धांजली



**राजगुरुनगर (वा.)** खेड तालुका पत्रकार संघाच्यावतीने उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विमान अपघातात अजित पवार यांचे दुर्दैवी निधन झाल्याची बातमी समोर येताच संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली. स्पष्टवक्ते, परखड आणि प्रभावी नेतृत्व असलेले एक सच्चे लोकनेतृत्व हरपल्याने राज्याच्या राजकारणात व समाजकारणात न भरून येणारी मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर खेड तालुका पत्रकार संघाच्या वतीने खेड पंचायत समितीच्या आवारातील पत्रकार संघाच्या कार्यालयात श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी दिवंगत नेत्याच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दोन मिनिटांचे मौन पाळत श्रद्धांजली वाहिली. श्रद्धांजली सभेस खेड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश आंधळे, माजी अध्यक्ष महेंद्र शिंदे, बाळासाहेब सांडभोर, सुनील थिगळे, किरण खुडे, राजेंद्र लोथे, रामचंद्र सोनवणे, नाझीम इनामदार, प्रभाकर जाधव, आशोक कोरडे आदी उपस्थित होते.

## Short News

### व्यंकटेश कृपा कारखान्यात एक दिवस गाळप ठेवले बंद



**शिक्रापूर,** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याने जातेगाव बुद्रुक (ता. शिरूर) येथील व्यंकटेश कृपा शुगर मिल्स साखर कारखान्यात एक दिवसाचे पूर्ण काम बंद करत कारखान्याच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून शोक व्यक्त करत उपमुख्यमंत्री पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्रातील एक आधारवड व साखर कारखान्यांचा आधारस्तंभ हरपला असल्याच्या भावना व्यंकटेश कृपा शुगर मिल्सच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त करत अजित पवार यांच्या निधनाने फक्त पवार कुटुंबीयांवर नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरल्याचे मत अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

## आंबेगाव तालुक्यातील गावांमध्ये पाळला बंद



### उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

**पारगाव शिंगवे,** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याने आंबेगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये शोककळा पसरली होती. अजित दादांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. पारगाव तसेच अनेक गावांमध्ये बंद पाळण्यात आला. आंबेगाव आंबेगाव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यक्रमानिमित्त तसेच विकासकामानिमित्त ते सतत येत होते त्यांनी आंबेगाव तालुक्यात विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला होता. यामुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकास कामे झाली त्यांच्या त्यांच्या जाण्याने आंबेगाव तालुक्यातील नागरिकांनी शोक व्यक्त केला व त्यांच्या आठवणीला उजाळा देण्यात आला.

### आठवणींना उजाळा • दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा स्पष्टवक्तेपणा अन् हशा

# ठेकेदार व्हा, अन्यथा राजकारण करा

**सासवड(वा.)** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार त्यांच्या स्पष्टवक्तेपणा बद्दल प्रसिध्द होते. रोखठोक स्वभाव आणि भिडस्तपणा यामुळे त्यांच्या समोर येताना प्रत्येक नेता आणि कार्यकर्ता विचार करूनच येत असायचा. जे बोलायचे ते समोरासमोर आणि पुन्हा त्याची समजूत काढून त्याच्या मनातील आपल्याबद्द असलेला राग काढून मोकळे व्हायचे. ही त्यांची खासियत होती. त्यामुळेच कोणताही कार्यकर्ता त्यांच्यावर कधीच नाराज होत नव्हता. जागतिक सायकल स्पर्धेच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री अजित पवार नुकतेच पुरंदर तालुक्यातील सासवड येथे आले होते स्पर्धेला सुरुवात झाल्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयाला भेट दिली. यावेळी राष्ट्रवादीचे पदाधिकारी डॉ. दिगंबर दुर्गाडे , संभाजीराव कुंजीर, जालिंदर कामठे, विजय कोलते, माणिकराव झेंडे तसेच इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. त्यावेळी जालिंदर कामठे हे अजित पवार यांना पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीतील राष्ट्रवादीच्या उमेदवारांची ओळख करून देत होते. उमेदवारांचा परिचय करून घेतइन्ज दादा त्याची वैयक्तिक, व्यावसायिक माहितीही घेत होते. त्यावेळी बोलताना तुमच्यापैकी ठेकेदार कोण आहे का? असा प्रश्न विचारला. अचानक आलेल्या प्रश्नाने सर्वच गोंधळले आणि हशाही झाला. त्यावर कामठे यांनी कोणी ठेकेदार नाही असे सांगितले. मात्र एकमेव संतोष निगडे हे ठेकेदार असल्याचे त्यांनी स्वतःहून सांगितले. मी ठेकेदार आहे मात्र उमेदवार माझी पत्नी आहे. हे सांगतानाही त्यांचा गोंधळ उडाला होता. उडालेला गोंधळ पाहून अजित पवार यांच्यासह उपस्थित सर्व खळखळून हसले. त्यावर अजित पवार यांनी एक प्रेमळ सल्ला दिला. मित्रानो एकतर ठेकेदार व्हा आणि चांगली कामे करा अन्यथा राजकारणात या आणि लोकांची सेवा करा. राजकारणी अन् ठेकेदार एकच व्यक्ती असेल तर कामाचा दर्जा राहत नाही. मी माझ्या बारामतीमध्ये लोकांना नेहमी हेच सांगत असतो. अजित दादा यांनी असा सल्ला दिल्यावर ठेकेदार असलेले संतोष निगडे यांनी सांगितले की, दादा इथून पुढे तुम्ही सांगताल तसेच करायला मी तयार आहे. तुम्ही मी म्हणत असाल तर आज पासूनच ठेकेदारी बंद करून लोकांची सेवा करतो. हे ऐकल्यावर दादांनी, अरे मी तुला ठेकेदारी बंद करायला नाही सांगितले. कर पण प्रामाणिकपणे कर असे सांगून निगडे यांची फिरकी घेतली. यावेळी सर्वांनीच हसून दाद दिली.



### मुक्त संवाद साधला

सासवड मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यालय सुरु झाल्यानंतर त्यांची ही पहिलीच भेट होती यावेळी त्यांनी सर्वांशी मुक्त संवाद साधला मात्र नियतीच्या मनात वेगळेच होते अजित पवारांची शेतकऱ्याला दिलेली भेट अखेरची ठरली त्यांनी दिलेला सल्ला प्रत्येकाच्या मनात कायम घर करून राहिला.

## अजितदादांच्या जाण्याने इंदापूर तालुका शोकाकुल

**इंदापूर,(वा.)** नेतृत्व हरपलं... पण इंदापूरच्या विकासावर उमटलेली अजितदादांची छाप अढळ आहे. इंदापूर तालुक्याच्या जडणघडणीत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या अचानक जाण्याने संपूर्ण तालुका पोरका झाला असून शहरापासून ग्रामीण भागापर्यंत शोककळा पसरली आहे. अजितदादांचे इंदापूरशी नाते केवळ राजकीय नव्हते, तर मातीशी, माणसाशी आणि विकासाशी घट्ट जोडलेले होते. छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदापासून सुरू झालेली अजितदादांची राजकीय वाटचाल सहा वेळा उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचली. बारामतीप्रमाणेच इंदापूरमध्ये विद्या प्रतिष्ठानची स्थापना करून शिक्षणाचा पाया भक्कम केला. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना खंबीर साथ देत इंदापूर तालुक्याच्या विकासासाठी हजारो कोटी रुपयांचा निधी अजितदादांच्या माध्यमातून उपलब्ध झाला.व्यापारी बांधवांच्या मागणीची तत्काळ दखल घेत शिरसोडी ते करमाळा तालुक्यातील कुगावदरम्यान सुमारे साडेतीनशे कोटी रुपयांच्या पुलाला मंजुरी देण्यात आली. या पुलाचे काम सध्या वेगाने सुरू आहे. नगर परिषद निवडणुकीदरम्यान इंदापूर शहरातील बाबा चौकात झालेली अजितदादांची शेवटची सभा आजही नागरिकांच्या स्मरणात आहे. त्यांच्या भावनिक आवाहनाला मान देत इंदापूर नगर परिषद प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात आली.अजितदादांच्या निधनाची बातमी समजताच इंदापूर शहर व तालुक्यातील हजारो नागरिक बारामतीकडे रवाना झाले. शेवटच्या दर्शनासाठी विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर प्रचंड जनसागर उसळला. पक्षभेद विसरून आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अजितदादा आपल्यात नसल्याचं दुःख स्पष्टपणे दिसून येत होतं.

### आयुष्यभर खंत

"विश्वास बसत नाही की दादा आता आमच्यात नाहीत. दादांनी माझ्यावर आणि माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांवर अपार प्रेम केलं, माया केली. जिथे जिथे शक्य होईल तिथे माझ्यासारख्या कार्यकर्त्याला संधी मिळावी यासाठी त्यांनी नेहमीच प्रयत्न केले. त्यांच्या त्या ऋणातून मी कधीच मुक्त होऊ शकणार नाही. हे दुःख आयुष्यभर सोबत राहणारं आहे," असे अत्यंत भाऊक होत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. अजितदादांच्या मार्गदर्शनानुसार इंदापूर नगरपरिषदेच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहू, मात्र हा विकास प्रत्यक्ष पाहण्यासाठी, सूचना देण्यासाठी दादा आता आमच्यासोबत नसतील, ही खंत आयुष्यभर मनात राहील, असे भावनिक शब्दांत नगराध्यक्ष भरत शहा यांनी श्रद्धांजली अर्पण केली. आज संपूर्ण इंदापूर तालुका शोकसागरात बुडाला आहे. सोशल मीडियावर, चौकाचौकांत आणि घराघरांत अजितदादांच्याच आठवणींना उजाळा दिला जात आहे. अजितदादा गेले असले तरी इंदापूरच्या विकासासाठी त्यांनी दिलेला शब्द, त्यांची कार्यशैली आणि जनतेच्या मनातले स्थान कधीही पुसले जाणार नाही.

### तालुक्यात सर्वत्र हळहळ; उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत वाहिली श्रद्धांजली

# शिरूरमध्ये सर्वपक्षीय पदाधिकारी, नागरिक गहिवरले

**रांजणगाव गणपती,** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे शिरुर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेससह सर्वपक्षीय पदाधिकारी व सर्वसामान्य नागरिकांनी जुन्या आठवणींना उजाळा देत अनेक पदाधिकाऱ्यांना गहिवरुन आले. उपमुख्यमंत्री पवार व शिरुरकरांचा विशेष स्नेह होता. उपमुख्यमंत्री पवार यांचे मुंबईहुन बारामतीला येत असताना बारामतीजवळील विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. पवार यांचे अकाली निधन झाल्याची बातमी शिरुर तालुक्यासह सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली, त्यानंतर शिरुर शहर व तालुक्यातील बहुतांश गावातील छोटी - मोठी बंद ठेवून पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. पवार यांनी सर्वप्रथम १९९१ मध्ये आपल्या राजकारणाचा श्री गणेशा करत बारामती लोकसभा निवडणूक लढविली, त्यावेळी शिरुर विधानसभा मतदासंघ हा बारामती लोकसभा मतदासंघाला जोडला होता त्यामुळे या मतदारसंघातील या निवडणुकीच्या निमित्ताने पवार हे प्रचारसभेला आले होते. त्यानंतर पवार व शिरुरकरांचे नाते अधिक दृढ झाले. तालुक्याचे माजी आमदार सूर्यकांत पलांडे, पोपटराव गावडे,स्व. बाबुराव पाचर्णे, ॲड. अशोक पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रवींद्र काळे, मानसिंग पाचुंदकर,दादा पाटील फराटे, मोनिका हरगुडे,आबाराजे मांढरे व शशिकांत दसगुडे यांसह अनेक सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे पवार यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध होते. २ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या शिरुर नगरपरिषदेच्या निवडणूकीसाठी प्रचार सभेच्या निमित्ताने आले होते, यावेळी शिरुरच्या नगराध्यक्ष पदासह नगरपरिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा फडकवा, त्यानंतर शिरुर शहराचा उर्वरित सर्वांगीण विकास हा बारामती शहरासारखा विकास घडवू असे सांगितल्याने त्याचा परिणाम नगरपरिषद निवडणूक निकालावर होत नगराध्यक्ष ऐश्वर्या पाचर्णे यांच्यासह सात नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडून आले.ही पवार यांची शिरुर तालुक्यातील अखेरची भेट ठरली.

पवार यांचे अकाली निधन झाल्यामुळे तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांसह सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांच्या समवेतच्या काही आठवणींना उजाळा देत आपल्या अश्रूना मोकळी वाट करुन दिली.



### कार्यकर्त्यांना ताकद देणारा नेता गमावल्याचे दुःख

माझे १९९१ मध्ये अजित पवार हे झालेल्या लोकसभेच्या पोट निवडणुकीपासून संबंध होते. 'कामाचा माणूस' या शब्दात शिरुरचे माजी आमदार सूर्यकांत पलांडे यांनी श्रद्धांजली वाहिली. उपमुख्यमंत्री अजित पवारांमुळे माझ्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्त्यांला बाजार समितीच्या उपसभापती पदासह पुणे जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी काम करण्याची मोठी संधी मिळाली. याकाळात उपमुख्यमंत्री पवार यांच्याशी माझा अतिशय जवळून संबंध आला. राजकारणात सर्वसामान्य कार्यकर्त्यांना ताकद देणारा नेता गमावल्याचे खूप मोठे दुःख असल्याचे आंबेगाव शिरुर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर यांनी सांगत आपल्या अश्रूना मोकळी वाट करुन दिली.

## कार्यकर्त्याला मोठेपणाने वागवणारे नेतृत्व हरपले

### शरद बुट्टे पाटील यांची भावना; अजित पवार यांना वाहिली श्रद्धांजली

**चाकण, (वा.)** "छोट्या कार्यकर्त्यालाही प्रोत्साहन देणारे, कडक स्वभावामागे अपार प्रेम जपणारे आणि शब्दांइतकेच कृतीत ठाम असलेले नेतृत्व आज हरपले आहे," अशा शब्दांत माजी जिल्हा परिषद सदस्य शरद बुट्टे पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. बुट्टे पाटील म्हणाले की, महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना १९९८ साली त्यांनी सुरू केलेल्या मासिकाच्या पहिल्या अंकाच्या प्रकाशनासाठी अजित पवार स्वतः वराळे (ता. खेड) येथे आले होते. माजी आमदार स्व. नारायणराव पवार यांनी त्यांची ओळख करून दिली होती. त्या काळात अजित पवार आमदार तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष होते. या कार्यक्रमाची व्यवस्था अत्यंत साधी होती, तरीही अजितदादांनी माझे संपूर्ण भाषण ऐकले आणि कार्यक्रमाला पूर्ण वेळ दिला. सडपातळ शरीरयष्टी, स्पष्ट विचार आणि शिस्तप्रिय स्वभाव तेव्हाच जाणवला." ते पुढे म्हणाले, "गेली २७ वर्षे आमचे संबंध प्रेमाचे व जिव्हाळ्याचे राहिले. मी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला, तेव्हाही दादांनी मला शांतपणे बोलण्यासाठी वेळ दिला. पक्ष सोडल्यानंतरही त्यांनी कधी दुरावा निर्माण केला नाही; उलट नेहमीच आपुलकीने वागवले."



## 'दादा' नावाचे वादळ शांत : दिलीप वळसे पाटील

**मंचर,** महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धगधगतं नेतृत्व आमचे 'दादा' आज आपल्यात नाहीत, ही वार्ता पचवणं खरोखरच कठीण आहे. कधीकधी नियती इतकी क्रूर असू शकते की, आयुष्यात पहिल्यांदाच एखादी बातमी 'फेक न्यूज' ठरावी असं मनापासून वाटू लागतं, अशी प्रतिक्रिया आमदार दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचीमहाराष्ट्राच्या कल्याणासाठी, विकासासाठी आणि इथल्या मातीतील शेवटच्या माणसाच्या प्रगतीसाठी रात्रंदिवस धावणारी ती पावलं अशी अचानक थांबतील, असं स्वप्नातही कोणाला वाटलं नव्हतं. काळाने आपल्यावर झडप घातली आणि एका पहाडासारख्या व्यक्तिमत्वाचा अंत झाला, ज्याने राज्याच्या सामाजिक आणि राजकीय परिघात एक कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण केली आहे.



### श्रद्धांजली | अजित पवारांचे योगदान कधीच विसरू शकणार नसल्याची भावना

# नारायणपूर देवस्थानच्या विकासाला गती

**सासवड (वा.)** मुख्यमंत्री अजित पवार यांच्यामुळे श्री क्षेत्र नारायणपूर येथील देवस्थानचा कायापालट होण्यास सुरुवात झाली आहे. त्यांनी दिलेल्या भरघोस निधीमुळे येथील विकासकामांचे चित्र थोड्या दिवसात आणखी वेगळे पाहायला मिळणार आहे. मंदिराची विकासकामे मार्गी लागणार आहेत. मात्र दुर्दैवाने आज अजित पवार आपल्यात नाहीत ही कल्पनाच मनाला पटणारी नाही. त्यांच्या जाण्यामुळे मोठे दुःख झाले आहे. ही उणीव कधीही भरून निघणार नाही. आपले योगदान नारायणपूर देवस्थान आणि ग्रामस्थ कधीच विसरू शकणार नाहीत अशा शब्दात नारायणपूर येथील दत्त मंदिराची व्यवस्थापक भरत नाना क्षीरसागर यांनी अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे

मागील वर्षे नारायणपूर येथील मंदिराचे सदगुरू नारायण महाराज यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. महाराजांचे निधन झाले त्या दिवशी माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे बारामतीकडून पुण्याकडे जात असताना त्यांना निधनाची माहिती मिळताच दोघांनीही महाराजांचे अंत्यदर्शन घेतले. त्यानंतर काही दिवसातच उपमुख्यमंत्री अजित पवार नारायणपूर मध्ये दाखल झाले. श्री दत्त मूर्तीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी महाराजांचे शिष्य आणि वारसदार असलेले सद्गुरु टेंबे स्वामी महाराज तसेच व्यवस्थापक भारत नाना क्षीरसागर यांची भेट घेऊन सांत्वन केले.



### तातडीने निधी केला जाहीर

यावेळी त्यांनी उपस्थित असलेले डॉ. दिगंबर दुर्गाडे, डॉ. उमेशकुमार डोंगरे , रामभाऊ बोरकर, रामदास मेमाणे, औपचारिक चर्चा करताना मंदिरातील व्यवस्था सुख सुविधा यांची माहिती घेऊन देवस्थान साठी आणखी काय आवश्यक आहे का ? याची विचारणा केली. त्यावेळी श्री दत्त मंदिरा शेजारी श्री नारायणेश्वर मंदिर तसेच पार्किंग समस्या, इतर विकास कामांसाठी निधीची आवश्यकता असल्याचे सांगितले. त्यावर अजित पवार यांनी तातडीने नारायणेश्वर मंदिरासाठी सहा कोटी रुपये, श्री दत्त मंदिराच्या परिसरात पार्किंगसाठी पाच कोटी रुपये, रस्त्यासाठी तीन कोटी रुपये, दत्त मंदिर रस्त्यासाठी एक कोटी रुपये देण्याची जाहीर केले. तसेच एक ॲम्ब्युलन्स, कचरा उचलण्यासाठी घंटागाडी तातडीने देतो असे सांगितले होते. यातील अनेक कामे मार्गी लागत असून थोड्या दिवसात मंदिराचे रुपडे पालटणार आहे. दादा नारायणपूरला एकदाच आले पण सर्वांचे सोने करून गेले. त्यांची मदत देवस्थान कधीच विसरू शकणार नाही, अशी भावना मंदिराचे टेंबे स्वामी महाराज आणि भरत क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे.

### जुन्नरमध्ये ठिकठिकाणी त्यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त

## आजी-माजी आमदारांनी वाहिली श्रद्धांजली

**नारायणगाव,** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर अनेक ठिकाणी शोककळा व्यक्त करण्यात आली. यामध्ये जुन्नर तालुक्यात ठीक ठिकाणी त्यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त करण्यात आली. नारायणगाव येथे आज सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास आमदार शरद सोनवणे यांनी शोक व्यक्त करत श्रद्धांजली वाहिली.. यावेळी उपसरपंच योगेश पाटे, संतोष वाजगे, सचिन वाळुंज, आशिष फुलसुंदर अजित वाजगे विकास तोडकरी तसेच शेकडो ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

माजी आमदार अतुल बेनके यांच्या निवासस्थानी शोकसभा घेण्यात आली. यावेळी माजी आमदार अतुल बेनके यांच्यासह शिवसेना संपर्कप्रमुख दिलीप बामणे, जिल्हा बँकेच्या संचालिका पूजा बुट्टे पाटील, विनायक तांबे, बाजीराव ढोले , गुलाब नेहरकर, देवराम लांडे , सुप्रिया लेंडे, वैभव काळे राहुल गावडे, जयसिंग आवटी, कल्पना काळे तसेच शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी सर्वांनाच अश्रू अनावर झाले.



### विघ्नहर कारखान्याच्यावतीने पाळला बंद

विघ्नहर सहकारी साखर कारखान्यांच्या वतीने कारखाना आज पूर्ण दिवस बंद ठेवून अजित पवार यांना श्रद्धांजली देण्यात आली. ही घटना अत्यंत दुःखद आणि मनाला चटका लावणारी आहे. या दुःखद प्रसंगी कारखाना कार्यस्थळी विघ्नहर कारखान्याचे व्हाइस चेअरमन अशोक घोलप यांनी विघ्नहर परिवाराच्या वतीनं शोक व्यक्त करत, संपूर्ण कारखाना बंद ठेऊन स्व.अजितदादांना आदरांजली वाहिली.

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

सदैव आपल्या वाचकांसोबत

पुणे

३० शुक्रवार जानेवारी २०२६

epaper.navarashtra.com

/navarashtra

तापमान | कमाल ३४° C / किमान २४.२° C

# पश्चिम महाराष्ट्र

नवराष्ट्र प्लस

navarashtra.com



संशयास्पद हालचालींवर बारीक लक्ष

आतील पानावर

# दादांनी विट्याशी कायम जपला ऋणानुबंध!

## अजित पवारांची 'ती' भेट ठरली शेवटची; बलवडी परिसरात दुकाने बंद ठेवून श्रद्धांजली

▶ **विटा. (वा.)** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघाताने निधन झाले. या घटनेने विटेकर जनतेशी चाळीस वर्षांपासून असलेल्या ऋणानुबंध काळाच्या पडद्याआड गेला. सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेच्या निवडणूकीच्या प्रचार सभेस जाण्यापूर्वी विटा शहरात कार्यकर्त्यांनी अजित पवार यांचे जोरदार स्वागत केले होते. अजित पवार यांची ती शेवटची भेट होती. अजित पवार यांच्या जाण्याने खानापूर तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. बलवडी परिसरात सर्व दुकाने बंद ठेऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

स्व. आमदार अनिल बाबर यांचे आणि अजित पवार यांचे गेली अनेक वर्षांपासून आपुलकीचे संबंध होते. १९९० पासून आमदार बाबर व अजित पवार यांचा स्नेह होता. पवार यांनी मतदारसंघातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावले होते. दोन वर्षांपूर्वी अनिल बाबर यांचे निधन झाल्यानंतर बाबर कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी पवार गार्डी येथे आले होते. माजी आमदार सदाशिवराव पाटील यांच्या निवासस्थानीही भेट दिली होती.

राष्ट्रवादीच्या विभाजनानंतर माजी नगराध्यक्ष वैभव पाटील यांनी अजित पवार यांना साथ दिली. दरम्यान, केदारवाडी (ता. वाळवा) येथे पाटील समर्थकांनी जोरदार स्वागत केले होते. त्या स्वागताने अजित पवार भारावले होते. वैभव पाटील यांचे सतत अजित पवार यांच्याकडे जाणे असायचे. ते कार्यकर्त्यांना सतत प्रोत्साहन देत असत. राज्याच्या हितासाठी कार्यरत असणारे नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेल्याने हळहळ व्यक्त होत आहे.



### कठीण प्रसंगात साथ, शब्दाला जागणारा नेता

अजित पवार यांचे आणि अनिल बाबर (भाऊ) यांचे चांगले संबंध होते. मी विधानसभेच्या निवडणुकीत भेटायला गेलो होतो. त्यावेळी त्यांनी माझा सत्कार केला. आणि सांगितले की, वडिलांच्या पेक्षा जास्त मताधिक्याने तू विजयी झाला आहेस. चांगलं काम करत राहा. सहकार्य केले जाईल. दिलेल्या शब्दाला ते जागले. अनेक वेळा त्यांच्याकडे जाण्याचा प्रसंग आला. प्रत्येक वेळेस आपुलकीने चौकशी केली. भाऊंच्या निधनानंतर ते घरी आले होते. वडिलकीच्या नात्याने सांत्वन केले. धीर दिला. कठिण प्रसंगात ते आमच्या सोबत होते. आठ दिवसांपूर्वी मला फोन आला. त्यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत राजेंद्र देशमुख (अण्णा) यांच्याशी युती करा, असे सांगितले त्याप्रमाणे आम्ही त्यांना सोबत घेतले, अशा शब्दात खानापूर विधानसभा मतदार संघाचे आमदार सुहास बाबर यांनी आठवणी जागविल्या.

### तीन पिढ्यांपासून पाटील कुटुंबाशी जपले नाते

अजित पवार आणि आमच्या कुटुंबाचे तीन पिढ्यांपासून संबंध होते. हणमंतराव पाटील, सदाशिवराव पाटील यांचा शरद पवार व अजित पवार यांच्याशी ऋणांनुबंध होता. मध्यंतरी राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर आम्ही अजित पवार यांच्याबरोबर जाण्याचा निर्णय घेतला. त्यांचे केदारवाडी येथे जोरदार स्वागत केले. त्यानंतर सतत त्यांच्याकडे कामानिमित्त जाणं झालं. त्यांनी वेळोवेळी मदत केली. प्रशासनावर कमांड असलेले नेतृत्व होते. त्यांच्या अनेक गुण शिकता आले. ते कधीही न विसरता येणार आहेत. मध्यंतरी विट्यात आल्यानंतर त्यांनी आवर्जून 'पुण्याई' निवासस्थानी भेट दिली. कुटुंबियांतील सर्वांनी दिलखुलास गप्पा मारल्या होत्या, अशा भावना विट्याचे माजी नगराध्यक्ष वैभव पाटील व्यक्त केल्या.

# दख्खनच्या राजासाठी दिला २६० कोटी निधी

## जोतिबाच्या भाविक-भक्तांत हळहळ



▶ **वारणानगर, (वा.)** महाराष्ट्रासह आसपासच्या राज्याचे कुलदैवत, लोकदैवत असलेल्या दख्खनच्या राजा श्री जोतिबा देवस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नियोजन विभागाकडून २६० कोटी रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली होती. त्यांच्या अकाली निधनाने भाविक भक्तांतून हळहळ व्यक्त होत आहे.

लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री क्षेत्र जोतिबा मंदिर (कोल्हापूर) येथील सर्वसमावेशक विकास आराखड्यासाठी २५९ कोटी ५९ लाख रुपये खर्चास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील नियोजन विभागाने प्रशासकीय मान्यता देवून तसा शासन निर्णय दि.२८ मे २०२५ नियोजन विभागाने जारी केला होता.या विकास आराखड्यातील अंमलबजावणी व संनियंत्रणाची जबाबदारी कोल्हापूरचे जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपवण्यात आली असून ३१ मार्च २०२७ पर्यंत प्रकल्पाची अंमलबजावणी होणार पूर्ण होणार आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयामागे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा कारणीभूत ठरला आहे.

### मंदिर परिसराचा विकास आराखडा

श्री क्षेत्र जोतिबा हे राज्यातील एक ऐतिहासिक व धार्मिक श्रद्धास्थान असून, त्याचा विकास करण्यासाठी शासनाने विविध पातळ्यांवर व्यापक विचार करून आराखडा तयार केला आहे. सात महिन्यापूर्वी अजित पवार यांनी श्री जोतिबा देवस्थानच्या विकासासाठी निधी दिला. बुधवारी (दि. २८) त्यांचे निधन झाले. त्यामुळे पवार यांच्या निधनाचा चटका भाविक भक्तांना लागला. यापुढे श्री जोतिबा देवस्थानच्या विकासात अजित पवार याचे नाव कायम भक्तांच्या मनात राहणार आहे.

## करवीर तालुक्यातील कार्यकर्त्याने मुख्यमंत्रीपदासाठी घातले होते साकडे

# लाडक्या नेत्यासाठी केली देवबाने प्रतिज्ञा

▶ **भोगावती, (वा.)** नेते कार्यकर्त्यांच्या प्रेमामुळे अजरामर होतात. अजित पवार असेच एक करारी, कणखर पण तितकेच मायाळू नेतृत्व म्हणून ओळखले जात. वरिष्ठांमध्ये आत्मविश्वासाने वावरणारे आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या मनात आधारवड म्हणून उभे राहणारे हे नेतृत्व कार्यकर्त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणारे होते. कडक शिस्तीबरोबरच कोमल मन जपणारे अजित पवार कार्यकर्त्यांशी आपुलकीने वागणारे नेते होते. अशाच हजारो निष्ठावान कार्यकर्त्यांपैकी एक म्हणजे कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील कुर्डू गावचे देवबा शंकर पाटील (वय ४८). देवबांचे अजित पवार यांच्यावरील प्रेम केवळ राजकीय नव्हते, तर ते भावनिक आणि आत्मियतेचे होते. देवबा भोगावती साखर कामगार कर्मचारी संघटनेचा नूतन पदाधिकारी म्हणून कार्यरत होता. भोगावती साखर कारखाण्याचे संचालक व माजी अध्यक्ष धैर्यशील पाटील कौलवकर यांच्या माध्यमातून देवबाची ओळख अजित पवार यांच्या बरोबर झाली. तेंव्हापासून देवबा अजित पवार यांचे नेतृत्व मानत. प्रचारसभा असो, दौरे असोत किंवा कोणतेही संघटनात्मक काम असो, देवबा नेहमी पुढे असायचे. पदरमोड करून, वेळेची पर्वा न करता, कोणतीही अपेक्षा न ठेवता त्यांनी आपलं सर्वस्व आपल्या लाडक्या नेतृत्वासाठी अर्पण केलं.

अजित पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावेत, ही देवबांची केवळ राजकीय इच्छा नव्हती, तर ती एक भक्तीभावाची प्रतिज्ञाच होती. त्यासाठी त्यांनी परमेश्वराकडे साकडं घातलं. स्वतःच्या पायात चप्पल न घालण्याचा निर्धार केला. कुठेही अनवाणी फिरताना लोक विचारायचे, देवबा, पायात चप्पल का नाही, तेव्हा अत्यंत नम्रपणे देवबा म्हणायचा, ज्या दिवशी अजित पवार मुख्यमंत्री होतील, त्या दिवशीच पायात चप्पल घालीन. हा त्याग कुठल्याही पदासाठी नव्हता, कुठल्याही प्रसिद्धीसाठी नव्हता तर तो होता अजित पवार यांच्यावरील निखळ प्रेमाचा, निष्ठेचा आणि विश्वासाचा.

### प्रत्येक दौऱ्यात उपस्थिती हमखास

अजित पवार यांच्या कोल्हापूर जिल्ह्याच्या प्रत्येक दौऱ्यात देवबांची उपस्थिती हमखास असायची. मोठ्या गर्दीतून अजित पवार देवबा दिसले की, अरे देवबा, कसा आहेस, असे विचायचे. आपुलकीचा शब्द त्यांच्यासाठी आयुष्यभराचं समाधान ठरायचा. तो एक क्षणच देवबांसाठी सगळ्या कष्टाचं फळ असायचा.

### अकाली मृत्यूची बातमी कळताच ढसाढसा रडला

देवबा पाटील हजारो कार्यकर्त्यांचं प्रतीक आहेत, ज्यांनी अजित पवार या आपल्या नेत्यावर अपार प्रेम केलं. देवबाला अजित पवार यांनी रोजी रोटीचा मार्ग दिला. त्यांच्या अकाली निधनाची बातमी कळताच देवबा घायकुळीला येऊन ढसाढसा रडू लागला.



विंग (ता. कराड) येथील चित्रकार बाबा पवार यांनी साकारलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे व्यक्तिचित्र

# पन्हाळ्यातील गोलिवडेला येण्याचे स्वप्न राहिले अधुरेच

## शरद पवारांच्या आजोळी अजित पवार यांच्या निधनाने सन्नाटा

▶ **वारणानगर, (वा.)** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्यानंतर खासदार शरद पवार, अनंतराव पवार यांच्या मामाचे गाव म्हणजे आजोळी कोल्हापूर जिल्ह्यातील गोलिवडे (ता. पन्हाळा) येथे सन्नाटा पसरला.

अजित पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. यामुळे पवारांच्या आजोळी गोलिवडे गावात देखील शोकाकुल वातावरण झाले. अजित पवार यांच्या निधनाची बातमी समजताच संपूर्ण गावाने हळहळ व्यक्त केली. शिवाय दिवसभर गाव बंद ठेवून गावकऱ्यांनी सायंकाळी शोकसभा घेत नातवाप्रती अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून तीन दिवसाचा गावात दुखवटा जाहीर केला.



### काकांनी निधी दिलेल्या गावाला देणार होते भेट

शरद पवार यांनी आपल्या आजोळी गोलिवडे गावाला भेट दिली होती त्यानंतर गावात प्राथमिक शाळा इमारतीच्या उभारणीसह विकासासाठी भरघोस निधी दिला होता. अजित पवार यांनी देखील गावाला भेट देणार असल्याचे सांगितले होते. मात्र त्यांच्या अपघाती निधनाने काकांच्या आजोळी गोलिवडे गावाला यायचे त्यांचे स्वप्न अपूर्ण राहिल्याच्या भावना यावेळी गावकऱ्यांनी व्यक्त केल्या.

पवार कुटुंबीयांच्या दुःखात गोलिवडे ग्रामस्थ सहभागी असून लवकरच अजित पवार यांच्या कुटुंबीयांना सांत्वनपर भेट घेणार असल्याचे गावकऱ्यांनी सांगितले.

# कुंभी मध्यम प्रकल्पाचे केले होते जलपूजन

▶ **गगनबावडा, (वा.)** उपमुख्यमंत्री अजित पवार सन २००० साली गगनबावडा तालुक्यातील कुंभी मध्यम प्रकल्पाच्या पाणी पूजन समारंभास आले होते. यावेळी तालुक्याचे नेते पी. जी. शिंदे यांची त्यांनी महादेव हरी शिंदे संघात भेट घेतली होती, अशी आठवण राष्ट्रवादी गटाचे युवक काँग्रेसचे (अजित पवार गट) गनबावडा तालुकाध्यक्ष विवेकानंद सणगर यांनी जागविली.

यावेळी आमदार विनय कोरे, तत्कालीन माजी मंत्री दिग्विजय खानविलकर व माजी खासदार निवेदिता माने उपस्थित होत्या. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणासह सामाजिक क्षेत्रात देखील मोठी पोकळी निर्माण झाली आहे. 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' याप्रमाणे त्यांची १७ ते १८ तास काम करण्याची पद्धत होती. त्यांना लोकांप्रती तळमळ होती, आजच्या अपघातात माळावर पडलेले सर्व कागद याची साक्ष देत आहेत. अजित पवार यांचे असे अकाली जाणे मनाला खूप चटका लावणारे आहे, असे सणसर म्हणाले.

# यशवंतभूमी गहिवरली; प्रीतिसंगम झाला स्तब्ध

## दादांच्या आठवणींनी कराड-पाटणला हुंदका



▶ **राजेंद्र मोहिते । नवराष्ट्र.** स्वर्गीय मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही यशवंतभूमी राज्याला दिशा देणाऱ्या नेतृत्वाची साक्षीदार राहिली आहे. याच भूमीत रुजलेल्या यशवंत विचारधारेचा वारसा पुढे नेणारे, सहा वेळा राज्याचे उपमुख्यमंत्रीपद भूषवलेले, परखड व स्पष्टवक्ते आणि जनतेच्या मनातील नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे अजित पवार यांच्या अपघाती निधनाने यशवंतभूमी कराडसह प्रीतिसंगमही अक्षरशः गहिवरून गेला आहे.

राजकारणाला समाजकारणाची भक्कम जोड देत, अनेक दशके राज्याच्या राजकारणावर आपला ठसा उमटवत दादागिरी करणारा हा लोकनेता काळाच्या पडद्याआड गेल्याची वेदना कराड आणि पाटण तालुक्यातील जनतेसह राजकीय वर्तुळात तीव्रपणे जाणवत आहे. अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देताना अनेक दिग्गज नेत्यांचे शब्द गहिवरून आले. परखडपणा हा अजित पवार यांचा स्वभाव नव्हे, ती त्यांची ओळख होती. एकदा एखादे वक्तव्य केल्यानंतर 'मी असे बोललोच नाही' असे त्यांनी कधीही म्हटले नाही. चूक झाली, तर ती मान्य करण्याची आणि आत्मपरीक्षण करण्याची तयारी हीच त्यांच्या राजकारणाची खरी ताकद होती. याच यशवंतभूमीत त्यांनी कधी आत्मक्लेश व्यक्त केला होता, ही आठवण आजही प्रीतिसंगमाच्या साक्षीने जिवंत आहे. कितीही व्यस्त दौरा असो, यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती व पुण्यतिथीला त्यांच्या समाधीस्थळी नतमस्तक झाल्याशिवाय अजित पवार यांना कधीच चैन पडत नसे. हा ऋणानुबंध कराड कधीही विसरणार नाही.

### अनुभवांची शिदोरी, नवी स्वप्ने कोसळली

अजित पवार यांनी कराड व पाटण तालुक्यातील असंख्य कार्यकर्त्यांना केवळ पदे दिली नाहीत, तर ओळख, आत्मविश्वास आणि उभारी दिली. त्यांच्या राजकीय प्रवासाच्या सुरुवातीपासून खांद्याला खांदा लावून चाललेल्या अनेक ज्येष्ठ नेत्यांना अजित पवार यांच्या आठवणींनी अक्षरशः गहिवरून टाकले. आठवणी सांगताना पाणावलेल्या डोळ्यांच्या कडा पुसणारी ती दृश्ये उपस्थितांसाठी हृदय पिळवटून टाकणारी ठरली. तर दुसरीकडे, अजित पवार यांच्यावर अक्षरशः जीव ओतणारे तरुण कार्यकर्तेही भावनांना आवरू शकले नाहीत. 'आमचा आधारवड हरपलाश्र अशी भावना त्यांच्या प्रत्येक शब्दातून आणि अश्रूंमधून व्यक्त होत होती. जुन्या अनुभवांची शिदोरी आणि नव्या आशांची स्वप्ने एकाच वेळी कोसळल्याचे भावनिक चित्र यावेळी पाहायला मिळाले.

### कराडमधील 'विरंगुळा' केवळ वास्तू नव्हे, तर वैचारिक प्रेरणास्थान

यशवंतराव चव्हाण यांचे कराडमधील 'विरंगुळा' हे निवासस्थान अजित पवार यांच्यासाठी केवळ वास्तू नव्हती, तर वैचारिक प्रेरणास्थान होते. अजित पवार यांनी अनेकदा येथे भेट देत यशवंतराव चव्हाण यांच्या जपून ठेवलेल्या आठवणींमध्ये स्वतःला गुंतवून घेतले होते. त्या आठवणींमधूनच त्यांनी नेतृत्वाची दिशा आणि जबाबदारीची जाणीव अधिक पक्की केली होती, असे अनेकांना आज आठवले. विरंगुळ्यालगत असलेल्या वेणूताई चव्हाण स्मारकातही अजित पवार यांचा नेहमीचा वावर असे. त्या वास्तूंशी असलेला त्यांचा जिव्हाळा, आदर आणि भावनिक नाते आठवणींच्या कप्प्यात अधिक खोलवर साठवले गेले आहे. आज त्या वास्तूंनाही अजित पवार यांच्या पावलांची चाहूल नाही, ही जाणीव कराडच्या मनाला अधिकच हळवे करून गेली आहे.

# कार्यकर्त्यांना ताकद देणाऱ्या नेत्याला मुकला महाराष्ट्र

## माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी दिला आठवणीना उजाळा

▶ **करमाळा, (वा.)** उपमुख्ममंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी निधनाची धक्कादायक बातमी समजताच संपूर्ण राजकीय वर्तुळासह सहकार क्षेत्रात शोककळा पसरली. करमाळा तालुक्याशी त्यांचा कायम स्नेह राहिला. नेहमी प्रशासनावर ठाम वचक ठेवणारे, कार्यकर्त्यांना ताकद देणारे आणि निर्णयक्षम नेतृत्वाला महाराष्ट्र मुकला असल्याची भावना माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी व्यक्त केली.

जगताप म्हणाले, अजित पवार आणि मी समवयस्क होतो. आमचे मैत्रीचे आणि अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. विशेष म्हणजे आमचा राजकारणातील प्रवेशही जवळपास एकाच काळात झाला. मी १९९० साली विधानसभेवर तर अजित पवार १९९१ साली लोकसभेवर निवडून आले. कार्यकर्त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहणारा नेता म्हणून अजित पवार यांची ओळख होती. त्यांच्यासारखा नेता पुन्हा होणे नाही, अशी भावना जगताप यांनी व्यक्त केली.

### सहकारात प्रचंड दरारा, प्रशासनावर होता वचक

खासदार शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेला तो काळ आठवताना जगताप म्हणाले, त्या काळात मी, जयंत पाटील, सुभाष कुल यांच्यासह अनेक तरुण कार्यकर्ते एकत्र काम करत होतो. महाराष्ट्र सरकार असो, राज्य सहकारी बँक असो किंवा संपूर्ण सहकार क्षेत्र अजित पवार यांचा प्रचंड दरारा होता. प्रशासनावर त्यांचा ठाम वचक सर्वश्रूत होता.

### करमाळा तालुका मदत विसणार नाही

आपले वैयक्तिक अनुभव सांगताना जगताप म्हणाले, मी दोन वेळा आमदार असताना, सोलापूर डीसीसी बँकेच्या निवडणुकीदरम्यान आणि आदिनाथ संस्थेचा चेअरमन असताना, शिखर बँकेच्या माध्यमातून अजित पवार यांनी केलेली मोलाची मदत करमाळा तालुक्यातील जनता कधीही विसरणार नाही. त्यांच्या निधनाने सहकार, प्रशासन आणि राजकारण या तिन्ही क्षेत्रांमध्ये न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे.



अ‍ॅक्शनमोड

## जिल्हाधिकाऱ्यांचे आरोग्य विभागाला महिनाभरात कारवाईचे निर्देश

# जिल्ह्यातील बोगस डॉक्टरमुक्त गावे जाहीर करा

▶ **कोल्हापूर, (जि. प्र.)** सर्वसामान्यांची होणारी फसवणूक, आरोग्याशी चाललेला खेळ आणि कायद्याचे उल्लंघन करून जे कोणी चुकीच्या पद्धतीने उपचार करत असतील, त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिले. प्रत्येक गावोगावी आणि शहरांमध्ये विशेष मोहिम राबवून अशा बोगस डॉक्टरांवर कारवाई करावी. जिल्ह्यातून बोगस डॉक्टर ही संकल्पनाच हद्दपार करून गावे 'बोगस डॉक्टरमुक्त' असल्याचे आरोग्य विभागाने जाहीर करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बोगस डॉक्टर विरोधी समितीच्या सभेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रशांत वाडीकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. फारुख देसाई यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रत्येक तहसील कार्यालय, पंचायत समिती, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र या ठिकाणी बोगस डॉक्टरांविरुद्ध तक्रार देण्यासाठी तक्रार पेटीची व्यवस्था करून त्यातील तक्रारींची दैनंदिन तपासणी करावी, सार्वजनिक ठिकाणी, गल्लीबोळांमध्ये, वर्तमानपत्रांत किंवा भिंतींवर दिल्या जाणाऱ्या बोगस उपचारांच्या जाहिरातींची पडताळणी करून संबंधितांवर तातडीने कारवाई करा, अशी सूचना जिल्हाधिकारी येडगे यांनी केली.



### आवश्यक वैद्यकीय पदवी नसणाऱ्यावर गुन्हे दाखल करा

आवश्यक पदवी किंवा वैद्यकीय कौशल्य नसताना कोणी उपचार करत असेल तर पोलिस विभाग आणि अन्न व औषध प्रशासनाच्या मदतीने त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत, आरोग्य विभागातील क्षेत्रीय स्तरावरील सर्व अधिकाऱ्यांनी ही जबाबदारी गांभीर्याने घेऊन एक महिना तपासणी मोहिम राबवावी, गावपातळीवर पोलिस पाटलांना प्रशिक्षित करून बोगस डॉक्टरांबाबत माहिती मिळवावी, फेब्रुवारी महिन्यात ही कारवाई अधिक तीव्र करावी, असे जिल्हाधिकारी येडगे यांनी नमूद केले.

### फसवणूक झाल्यास परवाना रद्द करणार

या मोहिमेत प्रत्यक्ष जाहिरातींसोबतच सोशल मीडियावर प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचीही तपासणी करण्यात येणार आहे. शहरातील परवानाधारक दवाखान्यांमध्येही चुकीच्या पद्धतीने किंवा नियमांचे उल्लंघन करून उपचार दिले जातात का, याची खातरजमा करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. ओपीडीच्या वेळा सोडून पहाटे किंवा रात्री उशिरा रुग्णांना गोपनीयरीत्या बोलावून चुकीच्या पद्धतीने उपचार करणे किंवा त्यांची फसवणूक करणे असे प्रकार आढळल्यास, संबंधित डॉक्टरांचे परवाने रद्द करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत.

# पहिल्या दिवशी एकही अर्ज नाही

▶ **इचलकरंजी, (वा.)** इचलकरंजी महानगरपालिका महापौर आणि उपमहापौर निवडीसाठी अर्ज दाखल करण्याच्या गुरुवारी पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल झाला नाही. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या सभागृहात निवडीसाठी विशेष सभा होणार आहे. महापौरपदावर आपलीच वर्णी लागण्यासाठी तब्बल २७ जण इच्छुक आहेत. महानगरपालिका निवडणुकीत सर्वाधिक ४३ जागा जिंकलेल्या भाजपचा महापौर होणार हे निश्चित आहे. भाजपा व महायुतीतील घटक पक्षांसह विरोधी आघाडीचेही गट नेते निवडले गेले आहेत. इचलकरंजीचा पहिला महापौर होण्याचा मान कोणाला मिळणार याची चर्चा रंगली आहे. पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी महापौर आणि उपमहापौर निवडीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यामध्ये २९ जानेवारी ते ६ फेब्रुवारी या कालावधीत महापौर, उपमहापौर पदासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे.

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



# जगात सर्वोत्तम भारतीय संविधान

## राजुसा भुमकर यांचे प्रतिपादन; प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रम

▶ सोलापूर, (जि. प्र.) भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधान असून ते प्रत्येक नागरिकाला हक्क व कर्तव्यांची जाणीव करून देते. विद्यार्थ्यांनी संविधानातील मूल्ये अंगीकारून शिस्तप्रिय, कर्तव्यनिष्ठ व देशभक्त नागरिक घडले पाहिजे, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी राजुसा भुमकर यांनी केले.
प्रजासत्ताक दिन सहस्त्रार्जून शैक्षणिक संकुलात मोठ्या उत्साहात कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष संजीवसा बिद्री होते. तर सहस्त्रार्जुन शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजुसा भुमकर यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. राष्ट्रगीताने व महाराष्ट्र गीताने संपूर्ण शाळा परिसर भारावून गेला.
संकुलाचे संस्थापक अध्यक्ष कै. बाबुरावसा दत्तात्रयसा भुमकर यांच्या स्मरणार्थ घेण्यात आलेल्या शहर स्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते झाले.



### वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांची नावे

प्रथम : मानसी थोरात (विरतपस्वी प्रशाला), द्वितीय : सृष्टी वाघोले (सिद्धेश्वर कन्या प्रशाला), तृतीय : स्नेहा कोरे (सहस्त्रार्जुन प्रशाला), उत्तेजनार्थ : जरीना शेख (संभाजीराव शिंदे प्रशाला), प्राचिता बाळुडगी (आसावा प्रशाला). कार्यक्रमाचे अध्यक्ष संजीवसा बिद्री यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सव नसून लोकशाही, समता, स्वातंत्र्य व बंधुता या मूल्यांची आठवण करून देणारा दिवस आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच नैतिक मूल्यांची जोपासना करावी.

याप्रसंगी व्यासपीठावर शैक्षणिक संस्था व शालेय समितीचे अध्यक्ष राजुसा भुमकर, संस्थेचे सचिव जयकुमारसा कोल्हापुरे, शैक्षणिक संस्थेचे सचिव गजाननसा गोयल, संस्थेचे सदस्य भरतकुमारसा शालगर, सुरेशसा बिद्री, गणेशसा दामजी, संजीवसा रंगरेज, श्रीरामसा पवार, शैक्षणिक संस्थेचे सदस्य तुकारामसा पवार, सामाज सेवक ज्ञानेश्वरसा पवार यांच्यासह प्रशालेचे मुख्याध्यापक भगवंत उमदीकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मंजुषा काशीद, इंग्रजी विभाग मुख्याध्यापिका सविता हातवळणे, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी बिराजदार व शेळगी प्राथमिक आरोग्य केंद्राचे सेविका ताठे व मठपती आदी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांनी सादर केली देशभक्तीपर गीते, भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रम

विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमास शिक्षकवृंद, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी देशसेवेसाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प घेण्यात आला. सूत्रसंचालन सहशिक्षक अनिल गायकवाड यांनी केले. आभार सहशिक्षक सोमन्ना मलकारी यांनी मानले. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांना लाडू वाटप करण्यात येऊन कार्यक्रमाचे समारोप करण्यात आले.

संवाद : डॉ. वडगबाळकर; मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त उपक्रम

# भाषा : व्यक्तिमत्त्व विकासाचे साधन

▶ सोलापूर, (जि. प्र.) भाषा हे केवळ संवादाचे माध्यम नसून ते व्यक्तिमत्व विकासाचे एक प्रभावी साधन आहे. आपल्या जीवनात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व असून तिचा समृद्ध वारसा जोपासणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन मसाप सोलापूर शाखेच्या अध्यक्षा डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर यांनी केले.
येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. हा कार्यक्रम दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या सभागृहात उत्साहात पार पडला.
मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे औचित्य साधून डी.बी.एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय (मराठी विभाग), डी.पी.बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, डी.जी.बी. दयानंद लॉ कॉलेज, डी.ए.व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.
यावेळी 'मसाप'जुळे सोलापूरचे अध्यक्ष आणि जिल्हा मराठी भाषा सदस्य पद्माकर कुलकर्णी, कार्याध्यक्ष किशोर चंडक, सदस्य प्रा.भीमगोंडा पाटील, कवी मारुती कटकधोंड यांच्यासह महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विविध पदाधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
प्रास्ताविक डी. बी. पी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर यांनी प्रास्ताविक करून उपक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. परिचय मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. डी. आर. गायकवाड यांनी करून दिला. सूत्रसंचालन कवयित्री वंदना कुलकर्णी यांनी केले. आभार प्रा. डॉ. आर. व्ही. शिंदे यांनी मानले.




### मराठीच्या संवर्धनासाठी योगदानाचे आवाहन

कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे प्रशासक प्राचार्य डॉ. व्ही. पी. उबाळे यांनी अध्यक्षीय मनोगतात मराठी भाषेच्या संवर्धनावर भर दिला. 'मराठी भाषा टिकवण्यासाठी आणि ती पुढच्या पिढीपर्यंत समृद्ध स्वरूपात पोहोचवण्यासाठी प्रत्येकाने वैयक्तिक स्तरावर योगदान देणे आवश्यक आहे,' असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी, प्राचार्य डॉ. एस. व्हि. शिंदे आणि प्राचार्य डॉ. एस. जे. गायकवाड यांनी आपले शुभेच्छा संदेश दिले.

# धोरण निश्चितीमुळे गुणवत्ता वाढीस

## शैक्षणिक : सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. महानवर यांचे प्रतिपादन

▶ सोलापूर, (जि. प्र.) कोणत्याही संस्थेची प्रगती ही त्या संस्थेच्या धोरणांवर अवलंबून असते. विद्यापीठाचा विकास साधताना आपण विद्यार्थी हाच केंद्रबिंदू मानला आहे. विद्यार्थ्यांना केवळ पदवी न देता त्यांना जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी सक्षम करणे हे ध्येय आहे धोरण निश्चितीमुळे विद्यापीठाच्या सर्वांगीण गुणवत्ता वाढीस मोठी मदत होणार आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.
विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठी आणि जागतिक दर्जाची गुणवत्ता गाठण्यासाठी स्पष्ट धोरणांची आवश्यकता असते. हेच उद्दिष्ट समोर ठेवून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने तयार केलेल्या धोरण पुस्तिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते पार पडले.
कुलगुरू महानवर म्हणाले, आगामी काळात विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानासाठी इंडस्ट्रियल व्हिजिट म्हणजेच औद्योगिक भेटींचे मोठ्या प्रमाणावर आयोजन केले जाईल.




### विद्यापीठाचा दर्जा उंचावण्यासाठी धोरण पुस्तिका मार्गदर्शक

डॉ. कांबळे म्हणाले, आयक्यूएसीच्या माध्यमातून विद्यापीठाचा दर्जा उंचावण्यासाठी ही धोरण पुस्तिका मार्गदर्शक ठरेल, विद्यापीठाने तयार केलेली ही धोरण पुस्तिका म्हणजे केवळ एक दस्तऐवज नसून, ती भविष्यातील प्रगतीची 'ब्लू प्रिंट' आहे. यामध्ये संशोधन, क्रीडा, सांस्कृतिक कार्य आणि पायाभूत सुविधांच्या विकासाबाबतही निश्चित दिशा ठरवण्यात आली आहे, असे डॉ. कांबळे यांनी नमुद केले.

आढावा ● प्रोस्टेट कॅन्सर सर्वेक्षण करण्याच्या जिल्हाधिकारी येडगे यांच्या सूचना

# जिल्ह्यात शंभर टक्के लसीकरणाचे निर्देश

▶ कोल्हापूर, (प्र.) पुरुषांमध्ये वाढता प्रोस्टेट कॅन्सरचा धोका लक्षात घेता, जिल्ह्यात ६० वर्षांवरील नागरिकांचे घरोघरी जाऊन केल्या जाणाऱ्या सर्वेक्षणात तसेच विविध आरोग्य शिबिरांमधून तपासणी करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिल्या. त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या नियमित लसीकरण समन्वय समितीच्या बैठकीत त्यांनी आवश्यक माहिती संकलित करून बाधितांना वेळेत उपचार उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले.
वाढत्या रुग्णसंख्येवर चिंता व्यक्त करताना जिल्हाधिकारी येडगे म्हणाले की, प्रोस्टेट कॅन्सरचे निदान वेळेत झाल्यास तो पूर्णपणे बरा होऊ शकतो, त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय आणि उपचारांवर भर देणे आवश्यक आहे. या बैठकीस जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रशांत वाडीकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. फारुख देसाई यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जागतिक स्तरावर प्रोस्टेट कॅन्सरचे प्रमाण वेगाने वाढत असून, भारतात दरवर्षी ३३ ते ४२ हजार नवीन रुग्णांची नोंद होत आहे. विशेषतः शहरी भागात गेल्या २५ वर्षांत या आजाराचे प्रमाण ७५ ते ८५ टक्क्यांनी वाढल्याने प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याचे ठरवले आहे. जिल्ह्यात सध्या प्रति एक लाख लोकसंख्येमागे चार ते आठ नवीन रुग्ण आढळत आहेत.



### आशा स्वयंसेविकांच्या कामगिरीचे केले कौतुक

दरम्यान, जिल्ह्यातील लसीकरण मोहिमेचा आढावा घेताना जिल्हाधिकाऱ्यांनी आशा स्वयंसेविकांच्या कामगिरीचे कौतुक केले. आशा कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे लसीकरणात कोल्हापूर जिल्हा राज्यात अग्रस्थानी आहे. हे यश टिकवून ठेवण्यासाठी ज्या कुटुंबांचा लसीकरणाला विरोध आहे, अशांचे समुपदेशन करून १०० टक्के उद्दिष्ट गाठण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. लसीकरण मोहिमेला अधिक गती देण्यासाठी ग्रामपंचायत पातळीवर राबविल्या जाणाऱ्या विविध शासकीय अभियानांमध्ये 'लसीकरण' हा विषय अविभाज्य भाग म्हणून जोडण्याचे निर्देशही त्यांनी दिले. जिल्ह्यात डिसेंबर २०२५ पर्यंत ७४ टक्के लसीकरण पूर्ण झाले असून उर्वरित उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# विद्यार्थ्याने प्रामाणिकपणे परत केली सोन्याची चेन

## मान्यवरांच्या हस्ते आवदूत पाटीलचा गौरव



▶ भोगावती (वा.) कौलव (ता. राधानगरी) येथील आवदूत धनाजी पाटील या तेरा वर्षीय विद्यार्थ्याने आपल्याला सापडलेली पाऊण तोळे वजनाची सोन्याची चेन प्रामाणिकपणे परत दिली. त्याबद्धल आवदूतचा बाळासाहेब पाटील हायस्कूलमध्ये मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.
आवदूत धनाजी पाटील हा कौलव येथील बाळासाहेब पाटील कौलवकर हायस्कूलमध्ये इयत्ता सातवीमध्ये शिकत आहे. रविवारी (दि. २५) रोजी सुट्टीच्या दिवशी दुपारी आवदूत आपल्या मित्रांच्या सोबत गावशेजारील भोगावती नदीमध्ये आंघोळीसाठी गेला होता. नदीच्या तीरावर पाण्यात खेळत असताना त्याच्या पायात सोन्याची चेन सापडली. त्याने चेन सोबत घरी आणली. दरम्यान कौलव गावातील सागर गणपती पाटील यांची चेन गहाळ झाल्याने शोधाशोध सुरू होती. सात ग्रॅम वजनाची एक लाख रुपये किंमतीची चेन अवधूत पाटील व त्याची आई यांनी प्रामाणिकपणे सागर पाटील यांना कोणतीही अपेक्षा न करता परत दिली

राष्ट्रप्रेम : सीईओ जंगम यांच्या हस्ते जिल्हा परिषद प्रांगणात ध्वजवंदन

# झेडपीत प्रजासत्ताक दिन उत्साहात

▶ सोलापूर, (जि. प्र.) सोलापूर जिल्हा परिषदेत भारत देशाचा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पुजन करून ध्वजवंदन करण्यात आले.
यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे प्रकल्प संचालक चंद्रकांत जगताप, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, सामान्य प्रशासन विभागाच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) सूर्यकात भुजबळ, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, शिक्षणाधिकारी (माध्यमिक सचिन जगताप, शिक्षणाधिकारी कादर शेख, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता सप्ताळे, गटविकास अधिकारी यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. या प्रसंगी सीईओ कुलदीप जंगम यांनी सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. स्वीय सहाय्यक सुधाकर माने देशमुख, कक्ष अधिकारी अविनाश गोडसे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचालन मेहताब शेख यांनी केले.

### देवकरण प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी सादर केले राज्यगीत





प्रारंभी हरीभाई देवकरण प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी राज्यगीत सादर केले. त्यानंतर जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी कुष्ठरोग निर्मूलनाची शपथ दिली. सीईओ कुलदीप जंगम व अभिज्ञा किरण ठोके या बालिकेच्या हस्ते हवेत तिरंगा रंगाचे फुगे सोडून उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. जिल्हा परिषद मुख्यालयात सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांचे पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# निवडणूक आयोगाच्या नियमावलीचे पालन करा

## जिल्हाधिकारी अमोल येडगे यांचे आवाहन

▶ कोल्हापूर, (प्र.) जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ अंतर्गत राजकीय जाहिराती प्रसिद्ध करताना राज्य निवडणूक आयोगाच्या नियमावलीचे काटेकोरपणे पालन करावे. आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या किंवा विनापरवानगी आढळणाऱ्या जाहिरातींवर कडक कारवाई करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी 'माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती'च्या बैठकीत केल्या.
जिल्हाधिकारी म्हणाले, उमेदवारांच्या वतीने सोशल मीडियाद्वारे कोणत्याही प्रकारचे विनापरवाना 'पेड बूस्टिंग' किंवा पेड जाहिरात प्रसिद्ध होता कामा नये. अशा प्रसिद्धीचा खर्च संबंधित उमेदवारांच्या निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करावा. निवडणूक लढवणाऱ्या सर्व उमेदवारांनी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रचार करताना आदर्श आचारसंहितेचे पालन करणे अनिवार्य आहे. निवडणूक प्रचाराच्या अनुषंगाने उमेदवार, राजकीय पक्ष आणि त्यांचे प्रतिनिधी विविध माध्यमांचा वापर करून प्रचार करत असतात. होर्डिंग्ज, फ्लेक्स, एलएडी प्रचार वाहने तसेच रिक्षा यांसाठी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर 'एक खिडकी' योजनेतून आवश्यक परवानग्या घ्याव्यात.

### माध्यम कक्ष सक्रिय

आचारसंहिता कालावधीत उमेदवारांकडून प्रचारासाठी 'पेड न्यूज' प्रसारित होण्याची शक्यता असते. यावर लक्ष ठेवण्यासाठी कोल्हापूर जिल्हा माहिती कार्यालयात विशेष माध्यम कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. हा कक्ष सर्व प्रकारच्या बातम्यांची पडताळणी करून पैशांच्या मोबदल्यात दिलेल्या बातम्यांची दखल घेईल. यात विविध मुद्रित माध्यमांसह पोर्टल, यूट्यूब चॅनेलचा समावेश आहे. याप्रकरणी संबंधित उमेदवारांना नोटीस देऊन विचारणा केली जाईल. 'पेड न्यूज' सिद्ध झाल्यास त्याचा खर्च उमेदवाराच्या प्रचार खर्चात धरला जाईल आणि नियमानुसार आचारसंहिता भंगाची कारवाई देखील केली जाईल.

### नियमावलीचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्या

सोशल मीडियावर प्रचार करताना निवडणूक आयोगाच्या नियमावलीचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. यामध्ये टीव्ही, केबल नेटवर्क, केबल चॅनेल्स, चित्रपटगृहे, खासगी एफएम वाहिन्या, सार्वजनिक ठिकाणी करण्यात येणारे दृकश्राव्य प्रदर्शन, मोठ्या प्रमाणात पाठवले जाणारे एसएमएस व व्हॉइस मेसेजेस, विविध समाजमाध्यमे आणि इंटरनेट वेबसाइट्सवरील जाहिरातींचा समावेश होतो. या माध्यमांवर प्रसिद्धी करण्यापूर्वी मजकूर प्रमाणित करून घेणे बंधनकारक आहे. या नियमावलीचे पालन न करता मजकूर प्रसारित केल्याचे किंवा आक्षेपार्ह आशय आढळल्यास आयोगाचा अवमान केल्याप्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल. इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींच्या पूर्व प्रमाणीकरणासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावा.

## Short News

### हज यात्रेनिमित्त शिबिर

कोल्हापूर. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, हज कमिटी ऑफ इंडिया व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हज यात्रा-२०२६ अंतर्गत सेवा रुग्णालय कसबा बावडा व इंदिरा गांधी जनरल हॉस्पिटल इचलकरंजी येथे वैद्यकीय तपासणी व लसीकरण शिबिराचे आयोजन केले आहे. राज्य स्तरावरून लसीचा पुरवठा झाला आहे. यंदा जिल्ह्यातील हज यात्रेकरूंची २९९ इतकी संख्या आहे.

# रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत विविध कार्यक्रम

▶ कोल्हापूर, (प्र.) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार रस्ते सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्याच्या अनुषंगाने कोल्हापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत रस्ता सुरक्षा अभियान दि. १ ते दि. ३१ जानेवारी या कालावधीत आयोजित केले आहे. या कालावधीत प्रादेशिक परिवहन विभागातर्फे विविध कार्यक्रम आयोजन केले आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय व कोल्हापूर बाईकिंग कम्युनिटी यांच्या संयुक्त विद्यमाने दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले. दुचाकीस्वारांना हेल्मेट वापराबाबत जनजागृती करणे हा रॅलीचा मुख्य उद्देश होता. दुचाकीस्वारांनी कोणत्याही परिस्थितीत विना हेल्मेट तसेच विना सिटबेल्ट चारचाकी वाहन चालवू नये, पालकांनी अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये, असे आवाहन केले आहे.

### शिबिरात हेल्मेटवाटप; ११४ नागरिकांनी केले रक्तदान

प्रादेशिक परिवहन कार्यालय व जीवनधारा रक्तपेढी, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रादेशिक परिवहन कार्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. शिबीरामध्ये ११४ नागरिकांनी रक्तदान केले. रंकाळा तलाव परिसरात नागरीकांमध्ये रस्ते सुरक्षेविषयी जनजागृती करण्यात आली. यावेळी उपस्थित पर्यटक, नागरीक यांना रस्ते सुरक्षेविषयी प्रत्येकी ३ प्रश्न विचारुन यातील विजेत्यांना हेल्मेट वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर, सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रकांत माने, मोटार वाहन निरीक्षक सागर भोसले, सागर चौगले व सहा. मोटार वाहन निरीक्षक गणपत माशाळकर, रोशनी सुतार उपस्थित होते.

# 'बिल्डर्स असोसिएशन'च्या पदाधिकारी निवडी जाहीर



## चेअरमनपदी मोरे, सेक्रेटरीपदी शिंदे

▶ सातारा, (जि. प्र.) बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, सातारा सेंटरच्या पदाधिकाऱ्यांची निवडणूक नुकतीच पार पडली. सन २०२६-२७ या वर्षांसाठी चेअरमनपदी कौस्तुभ मोरे, सेक्रेटरीपदी निलेश शिंदे, व्हा. चेअरमन हर्षद वालावलकर, ट्रेझररपदी शरद जाधव यांची बिनविरोध निवड झाली. त्याचबरोबर संतोष जगताप व रामदास जगताप यांची जनरल कौन्सिल मेंबरपदी निवड करण्यात आली. इतर कार्यकारिणी लवकरच जाहीर केली जाणार आहे.
१९४१ सालापासून कार्यरत असलेली ही संस्था देशभरात बांधकाम व्यावसायिकांसाठी एक हक्काचे व्यासपीठ म्हणून प्रसिद्ध आहे. अशा देशपातळीवरील संस्थेमधील बीएआय सातारा सेंटर हे एक उत्कृष्ठ ॲक्टिव्ह सेंटर म्हणून नावलौकिक राखून आहे. सातारा सेंटरतर्फे दरवर्षी बांधकाम व्यवसायाशी संबंधित अनेक कार्यक्रम तसेच सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेऊन समाजोपयोगी कार्यक्रम पार पाडले जातात. सातारा सेंटरच्या नावलौकिकाला साजेसे कार्यक्रम घेण्यासाठी नक्कीच प्रयत्न असणार आहे, अशी ग्वाही मोरे यांनी दिली.

उपक्रम | विविध शाळांमधील राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदकप्राप्त विजेत्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार

# इचलकरंजी शहर, परिसरात प्रजासत्ताक दिन उत्साहात

▶ इचलकरंजी, (प्र.) इचलकरंजी शहर व परिसरात देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. महानगरपालिका, प्रांत कार्यालय, विविध राजकीय पक्ष, शासकीय, निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, विविध सामाजिक संघटना, सार्वजनिक मंडळांनी प्रजासत्ताक दिन साजरा केला. या निमित्ताने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आला.
प्रांत कार्यालय येथे प्रांताधिकारी दीपक शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आ. राहुल आवाडे, विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, पोलिस अधिकारी व कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी तसेच नागरिक उपस्थित होते.
समाजवादी प्रबोधिनी आणि प्रबोधन वाचनालयाच्या वतीने भारतीय लोकसत्ताक दिन साजरा करण्यात आला.




यावेळी प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष पांडुरंग पिसे यांच्या हस्ते आणि प्रा. आनंद खाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रसाद कुलकर्णी, आनंद खाडे, अब्दुल नदाफ, अक्षरा मगदूम यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास शकील मुल्ला, मनोहर जोशी, शहाजी धस्ते, भीमराव नाईकवडी, सद्दामहुसेन कारभारी, पूजा आगम, सतीश कांबळे यांच्यासह

### राष्ट्रवादी कार्यालयात ज्येष्ठांच्या हस्ते ध्वजारोहण

इंदिरा गांधी सामान्य रुग्णालय येथे ध्वजारोहण समारंभ आ. राहुल आवाडे यांच्या हस्ते व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. भारतीय जनता पार्टी इचलकरंजी शहर कार्यालय येथे माजी मंत्री प्रकाश आवाडे यांच्या हस्ते तसेच आ. राहुल आवाडे, माजी आमदार सुरेश हाळवणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहन सोहळा पार पडला. यावेळी तिन्ही मंडलचे अध्यक्ष, सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट कार्यालयात ज्येष्ठांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय येथे प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय इंगवले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्याचबरोबर शहरातील विविध शैक्षणिक संस्था, पोलीस उपअधीक्षक कार्यालयासह तिन्ही पोलिस ठाणे, शहर वाहतूक नियंत्रण शाखा आदींसह शहरात ठिकठिकाणी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

### 'ऑपरेशन सिंदुर' विषयावर आधारित प्रात्यक्षिकाचे सादरीकरण

इचलकरंजी महानगरपालिकेच्या वतीने राजाराम स्टेडियम येथे मुख्य ध्वजवंदन समारंभ महानगरपालिका आयुक्ततथा प्रशासक पल्लवी पाटील यांच्या हस्ते आणि आमदार राहुल आवाडे, अतिरिक्त आयुक्त सुषमा शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. महानगरपालिकेच्या वाहन विभागाच्या वतीने संजय कांबळे यांच्या मार्गदर्शनानुसार 'ऑपरेशन सिंदुर' विषयावर आधारित प्रात्यक्षिकाचे सादरीकरण केले. शहरातील विविध शाळांमधील राष्ट्रीय स्तरावर सुवर्ण पदक प्राप्त विजेत्या विद्यार्थ्यांच्या विशेष सत्कार करण्यात आला.
मान्यवर आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

CMYK

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



# साताऱ्याला ड्रग्जमाफियांचा विळखा घट्ट

## अमलीपदार्थांच्या वाढत्या कारवाईने सुसंस्कृत जिल्ह्याची 'उडता पंजाब'च्या दिशेने वाटचाल

**सातारा, प्रतिनिधी** सातारा जिल्ह्यात ड्रग्ज माफियांची पाळेमुळे गावागावात वाढीवस्तीपर्यंत पोहोचलेली आहेत. बामणोली (ता. जावली) येथील सावरी या दुर्गम भागात मुंबई क्राईम ब्रांचने मेफेड्रॉन (एम.डी.) फॅक्टरीवर छापा टाकून ११५ कोटींचे मोठे घबाड पोलिसांनी हस्तगत केले असताना आता कराड तालुक्यातील उंडाळे विभागातील तुळसण परिसरातील पाचुपुतेवाडी येथील दुर्गम भागात डीआरआय पुणे प्रादेशिक पथकाने छापा टाकून लाखो रुपयाचा अमली पदार्थांचा साठा जप्त केला आहे. सातारा जिल्ह्याच्या विविध भागात सापडत असलेले अमली पदार्थांचे साठे पाहता सातारा जिल्हा आता उडता पंजाबच्या वाटेवर असल्याचे दिसून येत आहे. ड्रग माफियांचे केंद्रबिंदू बनू पहात असलेल्या सातारा जिल्ह्याला यामुळे कलंक लागला आहे. उडता पंजाबच्या धर्तीवर सातारा जिल्ह्याची वाटचाल होऊ पाहात आहे का? अशी चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. याचा नायनाट करणे हे मोठे आव्हान जिल्हा पोलीस यंत्रणेपुढे आहे. सातारा जिल्ह्यातील तरुणाई मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांच्या आहारी जात असून यामुळे पालक वर्ग चिंतेत आहेत. विशेषतः शालेय व महाविद्यालयीन तरुणाई याकडे विशेष आकर्षिली जात आहे. त्यामुळे ड्रग्ज माफियांचा जिल्ह्यात सुळसुळाटही वाढला आहे. यावर अंकुश ठेवण्यासाठी जिल्हा पोलीस प्रमुखांनी ठोस कृतिशील धोरण पोलिस दलाकडून आखण्यात यावे, अशी अपेक्षा जिल्हावासियांची आहे. जिल्ह्याला पडलेला ड्रग्सचा विळखा तरुणाईसाठी घातक ठरणार असून यावर वेळीच उपायोजना होणे गरजेचे आहे. जिल्ह्यात गांजा, चरस, एमडी व विविध अंमली पदार्थांचे मोठे रॅकेट असून ते उद्ध्वस्त करणे काळाची गरज आहे.



### पर्यटनस्थळांमुळे माफियांच्या नजरा

- सातारा जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून विकसित होत आहे. त्यामुळे देशातील पर्यटकांच्या बरोबरच परदेशी पर्यटकांचा ओढा वाढला आहे.
- त्यामुळे ड्रग माफियांच्या नजरा आता सातारा जिल्ह्याकडे वळल्या आहेत. परिणामी सातारा जिल्ह्याच्या विविध ठिकाणी अमली पदार्थांचे साठे मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत.

### चार मंत्र्यांच्या जिल्ह्यात ड्रग्जमाफिया सुस्साट

सातारा जिल्हा हा क्रांतीकारकांचा जिल्हा म्हणून संपूर्ण देशात ओळखला जातो. त्याच जिल्ह्यावर आता ड्रग्स माफीयांनी कब्जा केल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्याच्या विविध ठिकाणी सापडत असलेल्या ड्रग्स साठे पाहता ड्रग्स माफिया सुसाट सुटले असल्याचे दिसून येते. एकेकाळी या जिल्ह्याचा संपूर्ण देशात एक दरारा व आदर होता. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचा सुसंस्कृत जिल्हा म्हणून संपूर्ण देशपातळीवर जिल्ह्याची ओळख आहे. जिल्ह्याच्या गौरवशाली परंपरेला गालबोट लावणाऱ्या या प्रवृत्तीमुळे जिल्ह्यावर आता नामुष्की ओढवली आहे. जिल्ह्याला चार मंत्री असूनही ड्रग्स माफियाना कोणताच धाक उरला नसल्याचे दिसून येत आहे.

### विविध भागांत ड्रग्ज वितरित करणारी यंत्रणा

पुणे मुंबईचे ड्रग्जचे लोन आता सातारा जिल्ह्यात पसरले आहे. त्यामुळे हा सामाजिक विषय निर्माण झाला आहे. अंमली पदार्थाच्या सेवन यामध्ये तरुणाई मध्ये मोठे आकर्षण वाढले आहे. ही चिंतेची बाब आहे. रेव्ह पार्टी व चंगळवादी वृत्ती याच्या आहारी गेलेली तरुणाई वास्तव जीवनाचे भान विसरलेली आहे. काही महिन्यांपूर्वी कराड तासवडे एमआयडीसी येथे दिनांक २३ मे रोजी पोलिस दलाने अमली पदार्थाच्या ठिकाणी छापे मारून सहा कोटी रुपयाचे ड्रग्ज जप्त केले होते. यापूर्वीही सातारा शहरात सुशिक्षित वर्गातील तरुणाईला ड्रग्जचे इंजेक्शन विकत घेताना पोलीसांनी पकडले होते. जिल्ह्याच्या विविध भागात ड्रग्ज वितरित करणारी यंत्रणा मोठ्या प्रमाणात कार्यरत असून त्याबाबत अधिक शोध पोलीस दलाने घ्यावा.

### ग्रामीण भागातील युवा पीढी आहारी

- सळसळत्या रक्ताच्या तरुणाईला ड्रग्ज चे आकर्षण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. हे लोण आता ग्रामीण भागातील वाडीवस्तीमधील तरुणाईपर्यंत पोहोचले आहे.
- सातारा शहर व जिल्ह्याला याचा विळखा पडला असून उडता पंजाबच्या धर्तीवर उडता सातारा होतो की काय अशी भीती आता येथील नागरिकांना वाटू लागली आहे. तस्करी करणाऱ्यांचे पुढे काय घडते हे कुणालाच समजत नाही.
- पोलिस यंत्रणा तपास करते, तस्करांच्या मुसक्या आवळते पण त्याचे पुढे काय होते हे मात्र हे गुढच राहते, त्यामुळे ड्रग्स व तस्करी करणारे बेफान होऊन पुन्हा एकदा तरुणाईच्या मुळावर उठत आहेत, असेच काहीसे चित्र सातारा जिल्ह्यात पाहायला मिळते.

# अमलीपदार्थविरोधी कारवायांना गती द्यावी

## जिल्हाधिकारी येडगे यांची सूचना

**कोल्हापूर, प्रतिनिधी** कोल्हापूर जिल्ह्या लगत सांगली,सातारा तसेच कराड या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थांचा साठा पोलिसांनी जप्त केला आहे .त्या पार्श्वभूमीवर येथील जिल्हा पोलीस प्रशासनाने अमली पदार्थ विरोधी शोध मोहिमेस गती द्यावी असे निर्देश जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी मंगळवारी दिले.



जिल्ह्यात अमली पदार्थविरोधी मोहिमेला व्यापक गती देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली शाहूजी सभागृहात जिल्हास्तरीय अमली पदार्थविरोधी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस अतिरिक्त पोलिस अधीक्षक धीरज कुमार उपस्थित होते. बैठकीस महिला व बाल विकास विभाग अधिकारी सुहास वाईंगडे, माहिती अधिकारी फारुख बागवान यांच्यासह पोलिस, राज्य उत्पादन शुल्क, अन्न औषध प्रशासन, औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी येडगे म्हणाले, शिक्षण व पोलिस विभागामार्फत शहर व जिल्ह्यातील माध्यमिक व व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती कार्यक्रम घेण्यात यावेत. जिल्ह्यातील पोलिस पाटलांमार्फत ग्राम स्तरावर अमली पदार्थ विक्रीबाबत माहिती घेऊन पुढील कार्यवाही करावी, अशी निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

### पोलिस विभागामार्फत पर्यटनस्थळी तपासणी करा

जिल्हाधिकारी म्हणाले, जिल्ह्यातील पर्यटन स्थळे, डोंगर परिसर, फार्म हाऊस या ठिकाणी, राधानगरी, चंदगड, गगनबावडा या पर्यटन स्थळी पोलिस विभागामार्फत तपासणी करून अमली पदार्थ खरेदी वा विक्री होणार नाही, याची खातरजमा करावी. शिरोली, हातकणंगले व गोकुळ शिरगाव या औद्योगिक वसाहतीमध्ये बंद पडलेले व चालू केमिकल कारखाने एमआयडीसीचे अधिकारी व पोलिस विभागामार्फत तपासण्यात यावेत.

# जिल्हा परिषदेला ४३, पंचायत समितीला ७३ उमेदवार रिंगणात

**कराड (वा)**, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कराड तालुक्यातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. अर्ज माघारीच्या अंतिम दिवशी मोठ्या प्रमाणावर उमेदवारांनी माघार घेतल्याने निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले असून, जिल्हा परिषद निवडणुकीसाठी कराड तालुक्यातून ४३ अंतिम उमेदवार, तर पंचायत समिती निवडणुकीसाठी ७३ उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक राहिले आहेत.

### माघारीनंतर कराड तालुक्यातील चित्र स्पष्ट; अंतिम उमेदवारांना चिन्हांचे वाटप

अर्ज माघारीच्या प्रक्रियेत जिल्हा परिषद व पंचायत समिती या दोन्ही निवडणुकांतून एकूण १४१ उमेदवारांनी माघार घेतली, तर यापूर्वी माघार घेतलेल्या ११ उमेदवारांसह एकूण १५२ उमेदवार निवडणूक रिंगणाबाहेर पडले आहेत. मंगळवारी अंतिम उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकारी अतुल म्हेत्रे यांच्या हस्ते अधिकृत निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कल्पना ढवळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्रताप पाटील, उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चिन्ह वाटपानंतर आता सर्वच गट व गणांमध्ये प्रचाराला वेग आला आहे. अंतिम उमेदवार व चिन्हे निश्चित झाल्याने कराड तालुक्यातील जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणांमध्ये आता थेट प्रचाराला सुरुवात झाली असून, अनेक गट आणि गणांमध्ये बहुरंगी व चुरशीच्या लढती पाहायला मिळणार आहेत. मतदार कोणाच्या पारड्यात कौल देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**तयारी** ● जिल्हाधिकाऱ्यांची जिल्हा पोलिस अधीक्षकांसमवेत सर्वेक्षण पथकांना भेट

# संशयास्पद हालचालींवर बारीक लक्ष

**कोल्हापूर, प्रतिनिधी** जिल्हा प्रशासनाने जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेसाठी आणि सुरक्षेसाठी पावले उचलली असून, जिल्हाधिकारी अमोल येडगे आणि जिल्हा पोलिस अधीक्षक योगेशकुमार यांनी शहराच्या सीमेलगत करवीर तालुक्यातील स्थिर सर्वेक्षण पथकांसह रमण मळा येथील ईव्हीएम स्ट्राँग रूमला भेट देऊन सविस्तर पाहणी केली. स्थिर सर्वेक्षण पथकांच्या भेटीदरम्यान त्यांनी प्रत्यक्ष वाहनांच्या तपासणीची कार्यपद्धती पाहिली आणि निवडणूक आयोगाच्या नियमानुसार प्रत्येक संशयास्पद हालचालीवर बारीक लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले.

जिल्हाधिकाऱ्यांनी रमण मळा येथील ईव्हीएम स्ट्राँग असलेल्या गोदामाची पाहणी केली, जिथे त्यांनी स्ट्राँग रूमच्या त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्थेची बारकाईने तपासणी केली. स्ट्राँग रूमच्या बाहेर तैनात असलेल्या सशस्त्र दलाची उपस्थिती, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे कव्हरेज आणि लॉगबुकची नोंदणी या सर्व बाबी त्यांनी तपासून घेतल्या. निवडणूक प्रक्रिया निर्भय आणि न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाने पूर्ण तयारी केली असून, कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा जिल्हाधिकारी येडगे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिला.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक योगेशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक धीरजकुमार, परविक्षाधीन पोलीस अधीक्षक आरंक्षा यादव, निवडणूक निर्णय अधिकारी मोसमी चौगुले, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्नील पवार, तेजस्विनी पाटील आदी उपस्थित होते.



### ईव्हीएमची सुरक्षितता संवेदनशील बाब

ईव्हीएम मशिनची सुरक्षितता ही अत्यंत संवेदनशील बाब असल्याने तिथे चोवीस तास कडक पहारा ठेवण्याचे आदेश त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांना दिले. पाऊस किंवा इतर नैसर्गिक आपत्ती लक्षात घेऊन स्ट्राँग रूममध्ये ओलावा येणार नाही आणि अग्निशमन यंत्रणा सज्ज राहील, याची खात्री करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी येडगे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि निवडणूक शाखेला दिले.

### कॅमेऱ्यासमोर व्हावी सर्व प्रक्रिया : येडगे

जिल्ह्यात बेकायदेशीरपणे रोख रक्कम, मद्यसाठा किंवा मतदारांना आमिष दाखवणारी कोणतीही वस्तू शिरणार नाही, याची पूर्ण जबाबदारी या पथकांची आहे. तपासणी दरम्यान सर्व प्रक्रिया कॅमेऱ्यासमोर झाली पाहिजे आणि त्यामध्ये कोणतीही त्रुटी राहता कामा नये, अशा सक्त सूचना जिल्हाधिकारी येडगे यांनी कर्मचाऱ्यांना दिल्या.

# हातकणंगलेत महायुती व महाविकास आघाडीत लढत

**हातकणंगले, प्रतिनिधी** हातकणंगले तालुक्यात जिल्हा परिषदेच्या २२ जागांसाठीएकूण ९ ८ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. माघारीच्या दिवशी ५७ उमेदवारांनी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतून माघार घेतली असून ४१ उमेदवार रिंगणात असणार आहे तर पंचायत समितीसाठी १६४ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ९० उमेदवारांना उमेदवारी अर्ज माघार घेतली असून ७४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

### जिल्हा परिषदेला ५७ जणांची तर पंचायत समितीला ९० जणांची माघार

हातकणंगले तालुक्यात प्रामुख्याने महायुती व महाविकास आघाडी यांच्यातच प्रमुख लढत होणार असल्याचे चित्र आहे. जिल्हा परिषदेसाठी दुरंगी तर काही ठिकाणी तिरंगी लढत होणार असली तर पंचायत समितीसाठी मात्र अनेक उमेद्वार निवडणूक रिंगणात असणार आहेत. त्यामुळे एकंदरीत हातकणंगलेत स्थानिक स्वराज्य संस्थेचे राजकारण तापणार आहे. माघारीसाठी मोठ्या प्रमाणात अर्थ पूर्ण घडामोडींसह दबाव तत्राचा वापर करण्यात आला, उमेदवारांना माघारीसाठी अनेक अमिषे दाखवण्यात आल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू होती. माघारी नंतर लगेचच उमेदवारांना चिन्हाचे वाठप करण्यात आले. हातकणंगले तालुक्यात जिल्हा परिषदेसह पंचायत समितीला महायुती व महाविकास आघाडीकडून एकास एक उमेदवार दिल्याने राजकीय ईर्षा पहायला मिळणार आहे. कुंभोज, रेंदाळ, रुकडी, भादोले, शिरोली, रुई या जिल्हा परिषद गटातील लढती लक्षवेधी ठरणार आहेत.

## Short News

### शिवसेनेच्या पालिका गटनेतेपदी रवींद्र माने

**इचलकरंजी** महायुतीचा घटक पक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गटाच्या गटनेतेपदी जिल्हाप्रमुख रवींद्र वसंत माने यांची निवड करण्यात आली आहे. शिवसेना नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार सचिव संजय मोरे यांनी ही निवड जाहीर केली.



महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे रवींद्र माने, सरिता आवळे आणि नुतन मुथा विजयी झाले आहेत. मंगळवारी शिवसेना गटनेतेपदाची निवड जाहीर करण्यात आली. रविंद्र माने सन २००६ पासून भागाचे लोकप्रतिनिधीत्व करत आहेत. ते दोन वेळा स्विकृत तर दोन वेळा निवडून आले आहेत. त्यांनी बांधकाम सभापतीपद भूषविले आहे. २०११ साली राष्ट्रवादीचे पक्षप्रतोद म्हणून काम केले आहे. सध्या माने शिवसेनेचे जिल्हाप्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

# कराड बसस्थानकाची स्वच्छता अभियानात झेप

## पुणे प्रादेशिक 'अ' वर्गात तृतीय क्रमांक

**कराड (वा)**, राज्य परिवहन महामंडळाच्यावतीने राबविण्यात आलेल्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान' अंतर्गत करण्यात आलेल्या तिसऱ्या सर्वेक्षणाचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. या सर्वेक्षणात पुणे प्रादेशिक विभागातील 'अ' वर्गात सातारा जिल्ह्यातील कराड बसस्थानकाने तृतीय क्रमांक पटकावला. ऑगस्ट २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राज्यभरातील जिल्हा व तालुकास्तरीय बसस्थानकांची स्वच्छता, प्रवासी सुविधा, देखभाल, सौंदर्यीकरण आणि व्यवस्थापनाच्या निकषांवर सखोल पाहणी करण्यात आली होती. सर्वेक्षणात राज्यातील शेकडो बसस्थानकांनी सहभाग घेतला होता.



### अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित

तिसऱ्या सर्वेक्षणात कराड बसस्थानकाने स्वच्छता, प्रवासी सोयी-सुविधा आणि एकूण व्यवस्थापनाच्या बाबतीत समाधानकारक कामगिरी करत पुणे प्रादेशिक विभागात मानाचे स्थान मिळविले. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे फलित असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. आगामी काळात आणखी चांगली कामगिरी करून उच्च क्रमांक मिळविण्याचा निर्धारही बसस्थानक प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

**सुवर्णक्षण :** पंचेचाळीस वर्षांच्या संघर्षाचे फलित; संयम आणि स्वाभिमानाच्या लढ्याला यश

# केंजळला अखेर स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा

**मसूर (वा.)** संघर्ष, संयम आणि स्वाभिमानाच्या लढ्याचा विजय प्राप्त करत कराड तालुक्यातील केंजळ पुनर्वसित गावाने अखेर स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा प्राप्त केला. या गावचा सुपुत्र अजित चंद्रकांत केंजळे या युवकांने या कामी राजकीय व प्रशासकीय पातळीवर प्रयत्नांची पराकाष्टा करून हा दर्जा प्राप्त करून घेण्यात यश मिळविले. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार मनोज घोरपडे, माजी जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम व संग्राम घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे गाव आज इतिहासाच्या सुवर्णपानावर आपलं नाव कोरत आहे, अशी भावना गावकऱ्यांच्यावतीने अजित केंजळे यांनी व्यक्त केली. सुमारे ४५ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर २०२५ साली केंजळ पुनर्वसन गावाला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मिळाला असून, हा क्षण केवळ प्रशासकीय निर्णय न राहता गावाच्या आत्मसन्मानाचा सुवर्णक्षण ठरला आहे.

१९८० साली कण्हेर धरण प्रकल्पामुळे जावळी तालुक्यातील मूळ केंजळ गावाला विस्थापनाला सामोरं जावं लागलं. पिढ्यानपिढ्या जपलेली घरे, देवस्थाने, शिवारं तिथेच सोडून गावकऱ्यांनी कराड तालुक्यातील कवठे येथे 'केंजळ पुनर्वसन' या नावानं नव्या जीवनाची सुरुवात केली. हा प्रवास केवळ स्थलांतराचा नव्हता, तर वेदना, संघर्ष आणि नव्या ओळखीच्या निर्मितीचा होता. या काळात कवठे गावानं केंजळ पुनर्वसनला प्रेम, माया, आधार दिला. या दोन गावांमध्ये निर्माण झालेली अनोखी बंधुता पुढील अनेक दशकांच्या संघर्षात केंजळ पुनर्वसनचं मोठं बळ ठरली.



### शासनस्तरावरील पाठपुरावा, नियमांतील अडथळ्यांवर मात

वर्षानुवर्षांची धावपळ, प्रशासकीय अडथळे, निराशा, असंख्य अर्ज-विनंत्या असूनही गावानं कधीही हार मानली नाही. या संघर्षाच्या केंद्रस्थानी तरुण नेतृत्व अजित चंद्रकांत केंजळे ठामपणे उभे राहिले. शासनस्तरावर सातत्यपूर्ण पाठपुरावा, नियमांतील अडथळ्यांना धैर्यानं सामोरं जाणं, दीर्घकाळाची मेहनत आणि गावावरचं निखळ प्रेम यांच्या बळावर त्यांनी हा लढा निर्णायक टप्प्यावर नेला. कवठे-केंजळ पुनर्वसन यांच्यातील बंध अधिक दृढ झाला. दोन गावांचं नातं अधिक उजळून निघालं आहे.

### दर्जा स्वाभिमानाचा, बंधुत्वाचा आणि जिद्दीचा

> ४५ वर्षांची प्रतीक्षा संपून आज केंजळ पुनर्वसन गावाला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा प्राप्त झाल्याने या प्रक्रियेत स्वाभिमान, बंधुभाव, जिद्द दिसून आली. आता या गावच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना बरोबर घेऊन प्रयत्नशील राहणार आहे. कवठे गावाने आजपर्यंत जो सन्मान दिला. त्याचा आदर राखत व त्यांच्या विशेष सहकार्याने गावचा विकास साधण्यासाठी मी व सर्व ग्रामस्थ कटिबद्ध आहोत.
>
> -अजित केंजळे.

**कृषीविषयक** हातकणंगले तालुक्यातील टोपमधील मयूर पाटील यांचा यशस्वी प्रयोग

# शेतकऱ्यांकडून दर्जेदार ऊसबियाणे निर्मिती

**रोहन साजणे । नवराष्ट्र**
**हातकणंगले.**

हातकणंगले तालुक्यातील टोप येथील मयूर जगन्नाथ पाटील या युवा शेतकऱ्याने कमीत कमी क्षेत्रात ८६०३२ नीरा जातीच्या दर्जेदार ऊस बियाणाची निर्मिती करत त्यात स्वीट कॉर्नचे आंतरपीक घेत कमी क्षेत्रात जास्त उत्पादन घेण्याचा नवा स्त्रोत निर्माण केला.

मयूर पाटील यांनी पारंपरिक शेतीपद्धतींचा अभ्यास करताना स्थानिक, देशी आणि नामशेष होत असलेल्या पिकांच्या जातींचे संकलन सुरू केले आहे. विविध हवामान, माती, पाण्याची उपलब्धता आणि रोगप्रतिकारक क्षमता लक्षात घेऊन त्यांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने बीजसंवर्धन, बीज निवड आणि जतन करण्याचे प्रयोग केले आहेत. त्यापैकी एक म्हणजे ऊस बियाणे, वेळोवेळी वेगवेगळ या कृषी प्र दर्शनास भेटी देऊन माहिती घेऊन शेतीत उपयोग केला आहे. मयुर पाटील यांनी नांगरट करून चार ट्रॉली शेणखत, एक ट्रॉली कोंबडीचे खत, टाकूण मशागत करून घेतली. त्यानंतर चार फुट अंतराने २० सऱ्या सोडल्या. लागण करताना मयूर पाटील यांनी आपल्या १६ गुंठे क्षेत्रात प्रगतशील शेतकरी आप्पासाहेब पाटील यांच्याकडून ९०० किलो उसाचे ८६०३२ नीरा जातीचे बियाणे घेतले. त्यानंतर प्रमाणानुसार खताची मात्रा देत लागण केली. उसाची लागण उगवण झाल्यानंतर केन बूस्टरचा पंपाच्या सहाय्याने डोस दिला. दोन वेळा शेतात भांगलन करून घेतली. चार महिन्यानंतर ऊस भरणी करताना जैविक घटक असलेला बायोअर्थ, पोटॅश, युरिया असा डोस दिला. वेळोवेळी उसाच्या वाढीची काळजी घेतली. दरम्यान अवकाळी वादळाने ऊस पडला त्यावेळी एका उसाला २० कांड्या होत्या. ऊस वजनालाही चांगला होता. दर्जेदार देखभाल आणि स्वच्छता यामुळे अकराव्या महिन्यात कासारवाडीचे शेतकरी लागणीसाठी बियाणे पहायला आले. त्यांनी लागणीसाठी सर्व क्षेत्रातील ऊस नेला. मयूर पाटील यांनी उसाचे बियाणे निर्मिती करत असतानाच यातून नवीन प्रयोग म्हणून बाजारपेठेचा अंदाज घेत चार फूट सरीच्या बाजूला शुगर ७५ जातीचे स्वीट कॉर्न (मका) टोकन केली. तीन महिन्यात ऊस पिकास कोणताही वसब न लागता व्यापारी वर्गाला न विकता स्वता बाजारपेठेत विक्री केली. त्यातून भरघोस उत्पादन मिळाले. कारखान्याला ३३०० दर असताना सुद्धा त्यांनी ४४०० रुपये प्रतिटन विक्री केली. शेतीत वडील जगन्नाथ पाटील, कृषी सेवा केंद्राचे तानाजी खाडे, प्रगतशील शेतकरी आप्पासाहेब पाटील, कृषी सहाय्यक अमोल कोरे यांचे मार्गदर्शन लाभले, असे मयूर पाटील यांनी सांगितले.



शेतकरी आप्पासाहेब पाटील यांच्याकडून ९०० किलो

### शेती करताना वैज्ञानिक दृष्टिकोन आवश्यक



सोळा गुंठे क्षेत्रात ३४ टन ऊस व स्वीट कॉर्न असे १ लाख ८० हजार उत्पन्न झाले. त्यातून ७० हजार उत्पादन खर्च वजा जाता एक लाख दहा हजार निव्वळ उत्पादन झाले. शेतकऱ्यांनी खोडवा व नेडवा यांचा वापर लागणीसाठी करू नये. लागण करताना बियाणाची निवड योग्य असावी. शेती करताना वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून केल्यास फायदेशीर असल्याचे मयूर पाटील यांनी सांगितले.

### योग्य बियाणांची निवड चागल्या उत्पन्नाचे स्रोत

बियाण्याचे निवड करत असताना नऊ ते अकरा महिन्यातील लागणीच्या बियाणाची निवड केली. ठसठसशीत असलेला कीड रोग मुक्त कांडीचा डोळा व लागण करताना कीटकनाशक बुरशीनाशक व जेविक खाताची बीजप्रक्रिया करूनच लागण केली.

# उदयसिंग पाटील शिवशाहू आघाडीचे पालिकेतील गटनेते

**इचलकरंजी (प्र)** इचलकरंजी महानगरपालिकेतील विरोधी शिव शाहू विकास आघाडीच्या गटनेतपदी शहापूरचे नगरसेवक उदयसिंग मारुती पाटील यांची निवड करण्यात आली आहे.



नुकत्याच झालेल्या महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत शिव शाहू विकास आघाडीला ६५ पैकी १७ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे महानगरपालिकेमध्ये आघाडी विरोधी बाकावर असणार आहे. या आघाडीच्या गटनेतेपदी उदयसिंग पाटील यांची निवड करण्यात आली. ही निवड शिव शाहू विकास आघाडीचे अध्यक्ष प्रमोद पाटील यांच्या सूचनेवरून आघाडीचे सचिव महादेव लांडगे यांनी केली. उदयसिंग पाटील तिसऱ्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. त्यांनी बांधकाम आणि आरोग्य सभापती म्हणून काम केले आहे. भविष्यात जिव्हाळ्याचा पाणी प्रश्न, रस्ते, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प त्याचबरोबर इतर नागरी सोयी सुविधा संदर्भात सभागृहात आवाज उठवणार असल्याचे सांगितले. वेळप्रसंगी रस्त्यावरची लढाई लढण्यास मागे हटणार नसल्याचे पाटील यांनी सांगितले.

# परवानगी एकीकडे, तर इमारत बांधली दुसरीकडे

## गोसावेवाडीतील सत्ताधाऱ्यांचा घाट

**मसूर (वा.)** कराड तालुक्यातील गोसावेवाडीच्या ग्रामपंचायतीच्या इमारत बांधकामाची परवानगी एका जागेची असताना इमारत मात्र दुसऱ्या जागेवर बांधण्याचा घाट येथील सत्ताधारी गटाच्या सरपंच, उपसरपंच व सदस्यांनी सुरू केला आहे. याबाबत संबंधित खात्याच्या वरिष्ठ विभागाकडे तक्रार करूनही कोणतीही दखल न घेता कोणतीच परवानगी न घेता बांधकाम केले जात आहे. असा आरोप ग्रामपंचायत सदस्य प्रवीण पवार यांनी पत्रकार परिषदेत केला. दरम्यान त्या ठिकाणी एक वर्षांपूर्वी झालेल्या काँक्रिट ग्राऊंडचे नुकसानही केले असल्याकडे पवार यांनी लक्ष वेधले. पवार म्हणाले, नव्याने मंजूर झालेली ग्रामपंचायत इमारत जुन्या ग्रामपंचायतीशेजारी बांधण्याचा ठराव देण्यात आला होता. त्यास मंजुरीही मिळाली होती. स्थळ नकाशावर तसे नमूद करण्यात आले होते. मात्र सध्या त्या इमारतीच्या पूर्व बाजूला असलेल्या ग्रामपंचायत जागेत कोणतीही पूर्व परवानगी न घेता बांधकाम सुरू करण्यात आले आहे. या ठिकाणी एक वर्षांपूर्वी कोयना भूकंप निधीतून काँक्रिटीकरण काम करण्यात आले होते. या चुकीच्या पद्धतीच्या कामामुळे ते काँक्रिटीकरण काढण्यात आले आहे. केवळ सरपंच, उपसरपंच, काही सदस्यांच्या मनमानी कारभारामुळे हा प्रकार सुरू असून ग्रामपंचायतीचे बेकायदेशीर काम थांबवून मंजूर असलेल्या ठिकाणीच ग्रामपंचायत इमारत घ्यावी, अशी मागणी ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आली आहे. नव्याने होत असलेल्या ग्रामपंचायत इमारत बांधकामाला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. तरीही त्या ठिकाणी जबरदस्तीने बांधकाम सुरू आहे.

### सरपंच, उपसरपंच परगावी, कामे ठप्प

ग्रामपंचायत निवडणूक प्रक्रिया होऊन दोन वर्षे झाली. तरी कोणत्याही समित्या स्थापन केलेल्या नाहीत. पंधराव्या वित्त आयोगाची २ वर्षाची काही रक्कम खर्च केलेली नाही. दोन वर्षे पंधरा टक्के अनुदान वाटप करण्यात आलेले नाही. सरपंच, उपसरपंच मीटिंग वगळता इतर वेळी परगावी असतात. ग्रामस्थांच्या समस्या सुटत नाहीत. वेळेवर कामे होत नाहीत, असा आरोप पवार यांनी केला.

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



# बहुमत असूनही भाजपाला धक्का!

## जत नगरपरिषद विषय समिती निवडीत काँग्रेस-राष्ट्रवादीची खेळी; दोन सभापतीपदांवर पाणी







**जत, (वा.)** जत नगरपरिषदेच्या विषय समिती तसेच सभापती निवडीत मंगळवारी राजकीय नाट्य रंगले. स्पष्ट बहुमत असूनही भारतीय जनता पार्टीला अपेक्षेप्रमाणे यश मिळवता आले नाही. काँग्रेसने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांची साथ घेत चतुर राजकीय खेळी करत स्वतःसह राष्ट्रवादीच्या पदरातही प्रत्येकी एक सभापती पद पाडून घेतले. परिणामी भाजपला दोन महत्त्वाच्या सभापती पदांपासून वंचित राहावे लागले.

नगराध्यक्ष डॉ. रविंद्र आरळी यांच्या अध्यक्षतेखाली विषय समिती सभापती निवडीसाठी विशेष सभा बोलावण्यात आली होती. सकाळी अकरा वाजता सुरू झालेल्या या सभेत सुरुवातीपासूनच तणावपूर्ण वातावरण होते. एका अपक्ष नगरसेवकासह भाजपकडे बहुमत असल्याने सर्व विषय समित्यांवर भाजपचाच वरचष्मा राहील, अशी जोरदार चर्चा होती. विशेषतः उपनगराध्यक्ष निवडीत राष्ट्रवादी (अ. प. गट) ने भाजपच्या बाजूने मतदान केल्यामुळे भाजपला सर्वच समित्या मिळतील, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र, ऐनवेळी काँग्रेसने राजकीय डावपेच आखत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांना सोबत घेत समीकरण बदलले. या अनपेक्षित हालचालीमुळे भाजपच्या गोटात खळबळ उडाली आणि सभापती पदांचे गणित पूर्णपणे उलटले. काँग्रेसला महिला व बालविकास समितीचे सभापती पद मिळाले, तर राष्ट्रवादी (अ. प. गट) ने शालेय शिक्षण समितीचे सभापती पद आपल्या पदरात पाडून घेतले.

### विविध विषय समितींच्या सभापतींची निवड अशी :

- स्वच्छता व आरोग्य समिती : गौतम ऐवळे (भाजप),
- सार्वजनिक बांधकाम समिती : मिथून भिसे (भाजप),
- पाणीपुरवठा व जलनिसारण समिती : फिरोज नदाफ (अपक्ष),
- महिला व बालविकास समिती : सुप्रिया बामणे (काँग्रेस),
- शालेय शिक्षण समिती : इम्रान गवंडी (राष्ट्रवादी काँग्रेस – अ. प. गट)
- विकास व नियोजन समिती : उपनगराध्यक्ष विक्रम ताड यांच्याकडे राहिली आहे.

### भाजपाकडे बहुमत असतानाही काँग्रेसची यशस्वी खेळी; नगरपरिषदेच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण

भाजपाकडे बहुमत असतानाही काँग्रेसच्या यशस्वी खेळीमुळे दोन सभापती पदांवर पाणी फिरले आहे. याशिवाय अपक्ष नगरसेवकाची साथ मिळवण्यासाठी त्यांना सभापती पद देण्याचा शब्द दिल्याने भाजपाला आणखी एक पद सोडावे लागले. परिणामी भाजपच्या पदरात केवळ दोनच सभापती पदे राहिली. या निकालामुळे जत नगरपरिषदेच्या राजकारणात नव्या चर्चा रंगल्या असून, आगामी काळात नगरपरिषदेत निर्णय घेताना सत्ताधारी भाजपाला विरोधकांच्या या नव्या एकजुटीचा सामना करावा लागणार, हे मात्र निश्चित मानले जात आहे.

# अजितदादांच्या जाण्याने सोशल मीडियाही गहिवरला

## दादांनी असे अचानक सोडून जाणे कुणालाही न पटणारे



**रोहन साजणे । नवराष्ट्र.** हातकणंगले, महाराष्ट्राच्या राजकारणात आपल्या स्वकतृत्वाने स्थान निर्माण केलेल्या एका धुरंधर नेतृत्वाचा असा दुर्दैवी अंत व्हावा हे कुणालाही न पटणारेचं, कडक स्वभाव व प्रशासनावरील जबर पकड, दांडगा अनुभव यामुळेच महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवार यांच्याकडे बघण्याचा एक वेगळाच दृष्टीकोन. हा माणूस जितका कडक तितकाच सदहृदयी, महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी रात्रीचा दिवस करणाऱ्या या अवलियाची महाराष्ट्राला अन भविष्यामध्ये देशाला गरज असताना हे जाणं कुणालाच न पटणारी घटना आहे. त्यांच्या अपघाती निधनाची बातमी वाऱ्यासारखी पसरली. काही क्षणात संपूर्ण महाराष्ट्राच शोकसागरात बुडाला. जो सोशल मीडिया गाजवला, तो सोशल मीडिया आज गहिवरून दुःखात बुडाल्याचे चित्र महाराष्ट्राने अनुभवले. अपघात इतका भयंकर होता की, काही क्षणात विमानाचे तुकडे विखुरले गेले. हा आपघात दादांचा नाही, तर महाराष्ट्राच्या विकासाचा झाला आहे हे निश्चित. बोलक्या अजितदादांनी महाराष्ट्राला अबोल केले. कामांचा प्रचंड आवाका, स्पष्टवक्ता, अभ्यासू, सहकार, अर्थकारण, समाजकारण, साखर उद्योग या क्षेत्रातील धुरंदर व अभ्यासू नेतृत्व अशीच दादांची महाराष्ट्रला ओळख.

कोल्हापूरशी असलेले दादांच अपुलकीचं नात कोल्हापूरच्या सहकार, शेती, उद्योग विकासात त्यांचा सिंहाचा वाटा, तरुणाईच्या गळ्यातील ताईत बनलेल्या दादांनी असं अचानक सोडून जाणं कुणालाही न पटणारे आहे. कधी आपल्या मिश्कील भाषणातून हसवणारे सोशल मीडियावर काही क्षणात दाद मिळवणाऱ्या लाडक्या अजितदादांना श्रध्दांजली वाहताना सोशल मीडीया ही गहिवरल्याचे चित्र पहायला मिळाले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून दादाचं हे नाव नेहमीच प्रत्येक मराठी माणसाच्या हृदयात कोरलेलं असेल हे निश्चित.

# ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विजयाताई भोसले यांचे निधन



**वाई, (वा.)** येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि भारतीय जनता पक्षाच्या नेत्या विजयाताई वसंतराव भोसले (वय ८८) यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व हरपले. त्यांच्या पश्चात पाच मुले, दोन विवाहित मुली, सुना नातवंडे परतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांनी स्वातंत्र्य लढ्यापासून ते सामाजिक आंदोलनांपर्यंत, शिक्षणाच्या क्षेत्रातून ते सांस्कृतिक कामांपर्यंत जीवनभर समाजसेवेला वाहून घेतले होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक महत्त्वपूर्ण समाजसेविका आणि राजकीय नेत्या हरपल्या आहेत.

विजयाताई भोसले यांचा जन्म २६ ऑक्टोबर १९३६ रोजी पुणे येथे झाला होता. त्यांनी जुनी मॅट्रीक पर्यंत शिक्षण घेतले होते. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला होता. १९५३ मध्ये विवाहानंतर त्यांनी बावधन (वाई) येथे राष्ट्रसेविका म्हणून सामाजिक कामास सुरुवात केली. १९५७ मध्ये जनसंघाच्या स्थापनेनंतर विजयाताई भोसले यांनी सातारा जिल्ह्यात जनसंघाच्या कामाला वाहून घेतले. त्यांनी कच्छ आंदोलनात सहभाग घेतला. सिमला करार आंदोलनातही त्यांचा सक्रिय सहभाग होता, १९७५ च्या आणीबाणीच्या काळात विजयाताई भोसले यांनी भूमिगत राहून काम केले आणि नंतर आठ महिने तुरुंगवास भोगला. भाजपात विविध पदांवर त्यांनी दीर्घकाळ काम केले. १९८० ते १९८४ या काळात भोसले यांनी राहुरी विद्यापीठाच्या सिनेट मेंबर म्हणून काम केले.

# मालवाहू ट्रक नाल्यात कोसळला; चालक ठार

**सातारा,** ताबा सुटल्याने एक मालवाहू ट्रक संरक्षक कठडा तोडून रस्त्यालगतच्या खोल नाल्यात कोसळला. या अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाला असून ट्रकचा चक्काचूर झाला. अजिनाथ नागरगोजे (वय ३२, रा. यवनवाडी, जि. बीड) असे मृताचे नाव आहे. हा अपघात सातारा–महाबळेश्वर मार्गावरील केळघर घाटात झाला. मालवाहू ट्रक (केए २८ सी ५५६८) हा रोहा येथून साताऱ्याच्या दिशेने निघाला होता. केळघर घाटातील मुकवली माची येथील एका धोकादायक वळणावर गुरुवारी पहाटे तीनच्या सुमारास ट्रकवरील वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रक थेट रस्त्याशेजारील संरक्षक कठडा तोडून खाली नाल्यात कोसळला. अपघाताची माहिती मिळताच सहाय्यक पोलिस निरीक्षक सुधीर पाटील, सहायक पोलिस निरीक्षक अश्विनी पाटील यांच्यासह ग्रामस्थ आणि रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाले.

स्मरण ● आनंदराव पाटील यांनी सांगितली उपमुख्यमंत्री अजित पवार यांची आठवण

# दादांसारखा धाडसी नेता पुन्हा होणे नाही



**कराड, (प्र.)** कराड आरटीओ कार्यालयासाठी दादांचे योगदान खूप मोठे राहिले आहे, हे कधीही न विसरता येण्यासारखे आहे. समाजकारण व राजकारणामध्ये सक्रिय असताना गेल्या अनेक वर्षांपासून दादांचे व माझे अगदी जवळचे संबंध होते. कराड तालुक्यातील विकासकामांवर त्यांचे लक्ष होते. विशेषतः आरटीओ कार्यालय उभारणीमध्ये दादांचा मोठा वाटा होता. या कार्यालयासाठी ४०० के. व्ही. टॉवर लाईन असल्याने अडथळा निर्माण झाला होता. लोकांनी त्यावेळी दादांना चुकीची माहिती दिली होती. नागपूर येथील अधिवेशनात सभापती स्वर्गीय शिवाजीराव देशमुख यांच्या दालनात माझी आणि अजितदादांची भेट झाली. त्यावेळी तत्कालीन ग्रामविकास मंत्री जयंतराव पाटीलही उपस्थित होते. अशी आठवण विधान परिषदेचे माजी सदस्य आनंदराव पाटील यांनी सांगितली.

कराडमध्ये अन्य जागा शिल्लक नाही. कराड व पाटणच्या दृष्टीने पाडळी-विजयनगर येथील डोंगराजवळ जागा आरटीओ कार्यालयासाठी योग्य असल्याचेही सांगितले. त्यानंतर तत्कालीन जिल्हाधिकारी रामा स्वामी यांनी पाहणी करून त्याबाबतचा प्रस्ताव सादर केला. यासंदर्भात दादांनी मला मुंबई येथे त्यांच्या कार्यालयात बोलावले. त्या ठिकाणी आरटीओ कार्यालयाबाबतची फाईल मागवून कार्यालयासाठी निधी मंजूर केला. ही आठवण दादांनी स्वतः आरटीओ कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थितांना आवर्जून सांगितली होती. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री, सर्वांचे लाडके नेते अजितदादा पवार यांच्या निधनाची बातमी मनाला चटका लावून गेली. दादांच्या अकाली जाण्याने राज्याचे न भरून येणारे नुकसान झाले आहे. सडेतोड आणि स्पष्टवक्ता म्हणून दादाकडे संपूर्ण महाराष्ट्र पाहत होता. जे काम होणार आहे, ते करून दाखवण्याचे कसब दादांमध्ये होते. महाराष्ट्राविषयी अपार प्रेम असणारे हे व्यक्तिमत्व आज आपल्यातून निघून गेले अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

> अजितदादांसारखे एवढे मोठे नेतृत्व आपल्यातून निघून जाणे, ही गोष्ट मनाला चटका लावणारी आहे. सातारा जिल्हा व कराड तालुक्यातील जनतेच्यावतीने व विधानपरिषदेचा माजी सदस्य या नात्याने मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करतो. त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात आम्ही सर्व सहभागी आहोत. या दु:खातून सावरण्याची शक्ती परमेश्वराने पवार कुटुंबाला द्यावी, ही परमेश्वर चरणी प्रार्थना.
>
> – **आनंदराव पाटील**, माजी विधान परिषद सदस्य

आदरांजली : शाळा, शासकीय व सहकारी संस्थांचे कामकाज बंद ठेवून वाहिली श्रद्धांजली

# मुरगूड शहरात सर्वपक्षीय शोकसभा



**मुरगूड, (वा.)** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनाची धक्कादायक बातमी मुरगूड शहरात समजताच सर्वत्र शोककळा पसरली. या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर शहरातील शालेय शिक्षण संस्था, शासकीय कार्यालये व सहकारी संस्थांचे कामकाज बंद ठेवून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

मुरगूड नगर परिषदेच्या आवारातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन केले होते. यावेळी अजित पवार यांचे मुरगूडशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध वक्त्यांनी आठवणींमधून उलगडून सांगितले. अनेक मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त करत दिवंगत नेत्याला भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. दिवसभर शहरात शोकमग्न वातावरण होते.

या शोकसभेत दिग्विजयसिंह पाटील, रणजीत सूर्यवंशी, सुहास खराडे, ओंकार पोतदार, दगडू शेणवी, दिगंबर परीट, चंद्रकांत जाधव, एस. व्ही. चौगुले, बबन बारदेस्कर आदींनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. अनंत फर्नांडिस व व्ही. आर. भोसले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली देण्यात आली.

यावेळी सत्यजित पाटील, रणजीत भारमल, सुनील रणवरे, अमर चौगुले, नामदेव चौगुले, दीपक शिंदे, अमर देवळे, संतोष वंडकर, बजरंग सोनुले, साताप्पा खंडागळे, शिवाजी मोरबाळे, राजू आमते, राहुल शिंदे, नामदेव भादिगरे, डॉ. सुनील चौगुले, सर्जेराव भाट यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

### विकासकामांवर विशेष लक्ष

काही महिन्यांपूर्वी मुरगूड येथील विश्वनाथराव पाटील मुरगूड सहकारी बँकेच्या वर्धापन दिनाच्या समारंभास अजित पवार यांनी उपस्थिती लावली होती. तसेच मंत्री हसन मुश्रीफ यांच्या पुढाकाराने मुरगूड नगर परिषदेच्या हद्दीतील कोट्यवधींच्या विकासकामांना अर्थमंत्री या नात्याने अजित पवार यांचा मोलाचा हातभार लाभला होता. कागल तालुक्यातील विकासकामांवरही त्यांनी विशेष लक्ष दिले होते, अशी भावना यावेळी व्यक्त झाली.

# उंब्रज बंद ठेवत अजितदादांना श्रद्धांजली



**उंब्रज, (वा.)** राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाची बातमी समोर येताच उंब्रज येथील सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ व व्यापारी वर्ग यांनी बाजारपेठ बंद ठेवून त्यांना श्रद्धांजली वाहिली.

बुधवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमान दुर्घटनेत मृत्यू झाल्याची बातमी आली. या बातमीने अनेकांना शोकअनावर झाला. उंब्रज येथील सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ यांनी उंब्रज बंदचे आवाहन केले. अत्यावश्यक सेवा वगळता उंब्रज पूर्णतः बंद होते.

राज्याच्या राजकारणात तडफदार नेतृत्व म्हणून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना ओळखले जाते. अजितदादा पवार यांचा अपघाती मृत्यू ही अत्यंत वेदनादायी घटना असून, राज्याच्या राजकारणातील एक तडफदार नेतृत्व गेले असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त करून श्रद्धांजली वाहिली. सायंकाळी पाच नंतर बाजारपेठ सुरळीत सुरू झाली.

## Short News

### शाहू स्मारक भवन इमारतीचे नूतनीकरण

**कोल्हापूर,** येथील राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्ट यांच्याकडील शाहू स्मारक भवन इमारतीमधील मुख्य सभागृह, नाट्यगृह, पश्चिम बाजूकडील विश्रामगृह तसेच पश्चिम बाजूचे चार दुकानगाळे येथे सध्या नूतनीकरण व दुरुस्तीचे कामकाज सुरू आहे. या नूतनीकरणाअंतर्गत पश्चिम बाजूचे चार दुकानगाळे कायमस्वरूपी बंद करून त्या ठिकाणी अद्ययावत लाऊंज, व्ही.आय.पी. प्रवेशद्वार, ग्रीन रूम, वेटिंग स्पेस तसेच मुख्य मंचाचे विस्तारीकरण करण्यात येणार आहे. येथील उपहारगृह व अन्य व्यवसायिकांना कायदेशीर नोटीस दिली आहे. ट्रस्टकडे असलेली त्यांची अनामत रक्कमही परत केली आहे अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी सचिव गजानन गुरव यांनी दिली.

# वस्त्रोद्योगाचे पाठबळ हरपले

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर वस्त्रनगरीत भावना व्यक्त

**इचलकरंजी, (प्र.)** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांचे अपघाती निधन झाल्यामुळे वस्त्रोद्योग क्षेत्राची व खासकरून यंत्रमाग उद्योगाला पाठबळ देणारा नेता हरपला, अशी भावना वस्त्रनगरीतून व्यक्त केली जात आहे. वस्त्रोद्योगाकडे डोळस नजरेने पाहणारा व नेहमी पाठिशी राहणारा नेता हरपल्याची भावना संपूर्ण इचलकरंजीकरांची आहे. त्यांना इचलकरंजीतील तमाम यंत्रमागधारकांच्याकडून व दि इचलकरंजी पॉवरलुम असोसिएशनच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

नेहमी महाराष्ट्रामध्ये वस्त्रोद्योग व यंत्रमाग उद्योगाला अर्थमंत्री असणाऱ्या अजितदादा पवार यांनी पाठबळ दिलेले आहे. वेगवेगळ्या योजना करताना नेहमीच ते सकारात्मक असत. इचलकरंजीतील वस्त्रोद्योगाकडे त्यांचे खास लक्ष असायचे. वस्त्रोद्योगातील कोणताही प्रश्न घेऊन गेल्यास त्वरीत त्यामध्ये लक्ष घालून तो प्रश्न सोडविण्याकडे त्यांचा कल असायचा किंवा इतर विभागाकडे असेल तर ते लगेचच फोन करून संबंधीत मंत्र्यांना सुचना करीत. यंत्रमाग उद्योगाचा १ रुपये व ७५ पैशांचा अतिरिक्त वीज सवलतीचा निर्णय प्रलंबित होता. तो प्रश्न त्यांच्यासमोर मांडल्यानंतर त्यांनी त्वरीत त्याची अंमलबजावणी करण्याच्या सुचना संबंधित सचिवांना दिल्या. तसेच कायमस्वरूपी ही योजना चालू राहील असा प्रस्ताव करण्यासंदर्भात आदेश दिले होते. इचलकरंजीवर नेहमी प्रेम करणारे विविध विषयात झोपडपट्टीचा विषय असो, पाण्याचा विषय असो, आ.जी.एम.चा विषय असो, झेड.एल.डी. च्या विषयासंदर्भात त्यांनी नेहमीच इचलकरंजीला झुकते माप दिले. काही महिन्यांपूर्वी झालेल्या भाई नेरूरकर चषक खो-खो स्पर्धेसाठी शासनाकडून भरीव आर्थीक तरतूद करून इचलकरंजीला या स्पर्धा व्हाव्यात यासाठी मदत केली होती. तसेच बक्षिस वितरण समारंभाला स्वतः हजर राहून फाईनलचा सामना ग्राऊंडवर बसुन त्यांनी पाहिला होता.

# दहीवडी बाजारपेठ पूर्णपणे बंद; प्रचारसभा थांबविल्या




**दहिवडी, (वा.)** उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाची बातमी कानावर पडताच सगळीकडे शोककळा पसरली. राजकारणातला दादा माणूस हरपल्याने सगळीकडे हळहळ व्यक्त होत होती. दहिवडी या ठिकाणी लवकरच त्यांची सभा होणार होती, मात्र या अगोदरच त्यांचा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या या निधनाने दहिवडीत सर्व बाजारपेठ पूर्णपणे बंद ठेवण्यात आली. दहिवडी येथील शिवाजी चौकामध्ये सर्वपक्षीय कार्यकर्ते जमा झाले. सर्वपक्षीयांच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

निधनाची बातमी समजताच तालुक्यातील प्रचार थांबवण्यात आला. तसेच दहिवड येथील मंत्री चषक सामने देखील बंद ठेवण्यात आले होते. माण तालुक्यातील बिदाल, पळशी, मलवडी वावरहिरे गावात बंद पाळून श्रद्धांजली वाहिली. शिवाजी चौकामध्ये कार्यकर्त्यांना दादांचे प्रसंग सांगताना अश्रू अनावर झाले. प्रत्येकाचा कोणत्या ना कोणत्या प्रकारे दादांशी संबंध आला होता, तो प्रसंग सांगताना कार्यकर्ते भावना व्यक्त करीत होते.

# 'संजीवन'मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

**पन्हाळा, (वा.)** पन्हाळा येथील संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्समध्ये 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' उत्साहात झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. संजीव जैन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुस्तकांचे ग्रंथप्रदर्शन भरवण्यात आले होते. कार्यक्रमास शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. एकनाथ साळोखे, विभागप्रमुख डॉ. विनायक देवकर, प्रा. सरदार देशमुख, प्रा. अरविंद भंडारी, प्रा. जब्बार मेवेकरी, प्रा. राहुल नेजकर, क्रीडा शिक्षक डॉ. रणजीत इंगवले, दीपक पाटील, सहा. ग्रंथपाल संग्राम पाटील उपस्थित होते. चेअरमन पी. आर. भोसले आणि सहसचिव एन. आर. भोसले यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

वारसा | कुस्तीपंढरीचे जतन व्हावे, अशी ठाम भूमिका; तालमींना सुविधा देण्यासाठी पुढाकार

# कुस्ती क्षेत्राला झळाळी देणारे 'अजितदादा'



**फिरोज मुलाणी । नवराष्ट्र.** औंध, 'एमओए'च्या अध्यक्ष पदावर आणि विविध क्रीडा संघटनेवर काम करताना अजित पवार यांनी खेळाडूंना देखील प्रोत्साहन दिले. कुस्तीपंढरीतील जुन्या ऐतिहासिक तालमींना सोईसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार आखाड्यात उतरले होते. तालमींना नवीन रुप देण्यासाठी त्यांनी अंदाजपत्रक आणि आराखडे मागवून घेऊन कुस्ती क्षेत्राला नवीन झळाळी दिली आहे.

व्यायामासाठी पुरेसी साधने सुविधा नसल्याने अलीकडे अनेक मल्लांनी पुण्याचा रस्ता धरला आहे. अनेक तालमीत सोयीसुविधांची वाणवा आहे. कोल्हापूरच्या तालमीतील गैरसोईबाबत आ. निलेश लंके यांनी विधानसभेत आवाज उठवला होता. कोल्हापूरच्या तालमींना वैभवशाली इतिहास आहे. कुस्तीचा इतिहास आणि वारसा जतन करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुढाकार घेतला. तसेच गंगावेश तालमीची प्रत्यक्ष पाहणी केली होती. येथील शाहूविजय गंगावेश, शाहुपुरी, मोतीबाग तालमींचा वेगळा इतिहास आहे. अजित पवारांनी काही वर्षे कोल्हापूरला महाविद्यालयीन शिक्षण घेतल्यामुळे तालमीचे महत्त्व माहित होते. अनेक जुन्या तालमींना सोईसुविधा उपलब्ध केल्यातर नव्या दमाने मल्ल तयार होतील. कुस्तीत राज्याचा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक होईल. कुस्तीपंढरीचा दैदिप्यमान गौरवशाली वारसा आपण जतन केला पाहिजे अशी ठाम भूमिका घेतली होती.

### कोल्हापुरातील तालमींना निधी

जुन्या तालमीचे सक्षमीकरण, नुतनीकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना अंदाजपत्रक तयार करण्याच्या सुचना केली होती. गंगावेश, शाहुपुरी, न्यू मोतीबाग तालीम कोल्हापूर जिल्ह्यातील २५ तालमींना देखील निधी देण्यासाठी १३ कोटी ७४ लाख ७६ हजार रुपयांचे अंदाजपत्रक त्यांनी मागवून घेतले होते. अर्थमंत्री म्हणून काम करताना नियोजन विकास मडळाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला. ग्रामीण खेळाडूंना केवळ स्थानिक स्पर्धांपुरते मर्यादित न ठेवता, त्यांना राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्याचा दृष्टिकोन अजितदादांनी मांडला होता.

### खेळाडूंना सुरक्षिततेचा आधार

अजितदादांचे कुस्ती क्षेत्रातील योगदान हे परंपरा आणि आधुनिक सुविधा, ग्रामीण कुस्ती आणि राष्ट्रीय स्तर, तसेच खेळ आणि करिअर यांचा समतोल साधणारे होते. अजित पवार यांनी केवळ कुस्तीच नव्हे तर व्यापक क्रीडा धोरणांमध्ये आणि खेळाडूंच्या भल्यासाठी सकारात्मक उपाय सुचवले. खेळाडूंना प्रोत्साहन आणि सुरक्षिततेचा आधार दिला होता.

### समाजजीवनातलं आणि राजकारणातल प्रभावी व्यक्तिमत्व म्हणून परिचित

> महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, महायूतीतील एक प्रमुख नेते अजितदादा पवार यांचं अपघाती निधन अतिशय दूर्दैवी, दु:खद आणि धक्कादायक आहे. महाराष्टानं एक धडाडीचा आणि कर्तबगार नेता गमावलेला आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या निधनानं महाराष्ट्राचं मोठं नुकसान झाले आहे. महाराष्ट्राच्या समाज जिवनातलं आणि राजकारणातल एक प्रभावी व्यक्तिमत्व, म्हणून अजितदादा सर्वांना परिचित होते. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. परमेश्वरानं नियतीनं या कठीण प्रसंगाला सामोरं जाण्याचं बळ त्यांच्या कुटुंबियांना देवो, अशी ईश्वर चरणी प्रार्थना!
>
> – **मदन भोसले**, माजी आमदार, वाई

### वक्तशीर, परखड, कामाचा माणूस अशी ख्याती

> माझे माहेर सणसर असल्याने पवार कुटूंबियांशी आमचा स्नेह सुरुवातीपासूनच होता. आमचे चुलते सूर्यकांत निंबाळकर हे छत्रपती कारखान्याचे व्हा. चेअरमन असताना अजितदादांनी अगदी तरुण वयात या कारखान्याचे संचालक म्हणून कारकीर्द सुरू केली. माझे सासरे स्व. मदनराव पिसाळ हे देखील राष्ट्रवादीत असल्याने अजितदादांशी आमचा स्नेह कायम राहिला. अतिशय वक्तशीर, परखड, धाडसी, कामाचा माणूस म्हणून त्यांची ख्याती होती. आमच्या परिसराचा ढाण्या वाघ गेला असून त्यांच्या अकाली जाण्याने राज्याची कधीही न भरून येणारी हानी झाली आहे.
>
> – **अरुणादेवी पिसाळ**, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा, सातारा

### जनतेची तळमळ लक्षात घेऊन केलेली मदत कायम स्मरणात

> मंगळवेढा उपसा सिंचन योजना व लोकवर्गणीची अट रद्द करून मंजूर केलेल्या भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी स्व. भारत नाना भालके यांच्या समवेत त्यांच्याकडे जाण्याचा योग आला. दुष्काळी जनतेची तळमळ लक्षात घेऊन त्यांनी केलेली मदत ही कायम लक्षात राहण्यासारखी आहे. त्यांच्या जाण्याने मंगळवेढा तालुक्याचे मोठे नुकसान झाले.
>
> – **पांडुरंग चौगुले**, आंदोलन पाणी संघर्ष समिती

### मंगळवेढ्याच्या विकासासाठी दिला भरभरून निधी

> नगराध्यक्ष असताना मंगळवेढ्याच्या प्रश्नावर ज्या–ज्यावेळी त्यांच्याकडे निधी मागायची वेळ आली. त्यावेळी त्यांनी मोठ्या भावाप्रमाणे मंगळवेढ्याच्या विकासासाठी निधी देण्याचे काम केले.
>
> – **अरूणा माळी**, माजी नगराध्यक्षा

### जनतेच्या मनातील चांगला नेता हरपला

> स्पष्ट आणि कडक शब्दात बोलून एखाद्या कामाविषयी असलेली तळमळ व ते काम रेंगाळत न ठेवण्याबद्दलची भूमिका ही जनतेच्या मनामध्ये कायम स्थान निर्माण करणारी आहे. त्यांच्या जाण्याने एक चांगला नेता हरवला.
>
> – **सिद्धेश्वर आवताडे**, अध्यक्ष खरेदी विक्री संघ मंगळवेढा

CMYK

Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919